# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# भारतातील ब्रिटिश सत्तेचा उदय आणि दृढीकरण

**(१७५७-१८५७)**

**(Rise and Consolidation of British Power in India 1757-1857)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-१ : सत्र-१**

**इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२३
एम. ए. भाग - १ करिता (भारतातील ब्रिटिश सत्तेचा उदय आणि दृढीकरण १७५७-१८५७)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-93-89345-48-3

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिति ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### अभ्यासमंडळ : इतिहास

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगोंडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

दूरशिक्षण (Distance Education) ही संकल्पना आज घडीला भारतीय शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाच्या स्थानी आहे. या पद्धतीच्या शिक्षणाची गरज फार मोठी आहे. शिवाजी विद्यापीठाने जून, २००७ पासून बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण योजनेची सुरवात केली आहे. आज बहि:स्थ विद्यार्थ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. दूर शिक्षण योजनेअंतर्गत एम. ए., इतिहास, भाग-१, सेमिस्टर-१, ''भारतातील ब्रिटिश सत्तेचा उदय आणि दृढीकरण १७५७-१८५७'' (Rise and Consolidation of British Power in India 1757-1857) या विषयाचे लिखाण पूर्ण केले आहे.

या पुस्तकात एकूण चार घटक आहेत. पहिल्या घटकात अठराव्या शतकाचा उत्तरार्ध याविषयी चर्चा केली आहे. दुसऱ्या घटकात ब्रिटिशांचा भारतावरील विजय याबाबत सविस्तर सांगितले आहे. तिसऱ्या घटकामध्ये भारतातील ब्रिटीश सत्तेचे दृढीकरण याबाबत सविस्तर सांगितले आहे. चौथ्या घटकामध्ये वसाहतीची विचारधारा आणि वसाहती राजवट याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

भारतातील ब्रिटीश सत्तेचा उदय आणि दृढीकरण १७५७-१८५७ या विषयातील सदरचे चार घटक वेगवेगळ्या अभ्यासकांनी लिहिले आहेत. हे घटक पूर्ण व्हावेत म्हणून आम्ही सर्व प्रयत्न कसोशीने केले आहेत. विद्यार्थी आणि अभ्यासक या पुस्तकाचे स्वागत करतीलच. या लिखाणात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या आणि अभ्यासकांकडून येणाऱ्या सूचनांचा पुढील आवृत्तीमध्ये विचार केला जाईल.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण योजनेअंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती करण्यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन व मौलिक सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे आणि या ग्रंथात लेखन केलेल्या प्राध्यापकांचे तसेच दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. संतोष जेठीथोर**<br>डी. आर. माने कॉलेज, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर | २ |
| **डॉ. दत्तात्रय मचाले**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक,<br>इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. (डॉ.) अवनिश पाटील**<br>इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४, १ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | अठराव्या शतकाचा उत्तरार्ध | १ |
| २. | ब्रिटिशांचा भारतावरील विजय | ३१ |
| ३. | भारतातील ब्रिटीश सत्तेचे दृढीकरण | ६६ |
| ४. | वसाहतीची विचारधारा आणि वसाहती राजवट | १०८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# अठराव्या शतकाचा उत्तरार्ध

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राजकीय परिस्थिती

१.२.२ सामाजिक व आर्थिक परिस्थिती

१.२.३ अठराव्या शतकासंबंधी वाद-विवाद

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये

- अठराव्या शतकातील राजकीय परिस्थितीची माहिती होईल.
- अठराव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचे आकलन होईल.
- अठराव्या शतकात झालेले आर्थिक बदल स्पष्ट होतील.
- अठराव्या शतकातील स्थित्यंतराबद्दल इतिहासकारांमधील वाद-विवादांची माहिती होईल.

## १.१ प्रास्ताविक

भारतात झालेली ब्रिटिश सत्तेची स्थापना आणि त्याचे सुदृढीकरण ही जागतिक इतिहासाच्या दृष्टीने देखील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया होती. आधुनिक जगाच्या इतिहासात वसाहतवादाच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून भारतातील ब्रिटिशांचे वासाहतिक राज्य हा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. प्रस्तुत अभ्यासक्रमामध्ये आपण भारतामध्ये ब्रिटिश सत्तेच्या उदयाची आणि सुदृढीकरणाची माहिती घेणार आहोत. भारतामधील ब्रिटिश सत्तेचा उदय हा अठराव्या शतकामध्ये भारतातील राजकीय सामाजिक आणि आर्थिक

परीस्थितीच्या पार्श्वभूमीवर झाला. त्यामुळे भारतातील वसाहतिक राज्याचा अभ्यास करत असताना अठराव्या शतकातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे. अठरावे शतक हा भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण काळ समजला जातो. हा काळ अत्यंत महत्वपूर्ण स्थित्यंतराचा काळ होता. अठराव्या शतकातील भारतात  शेकडो वर्ष जुन्या व्यवस्था, परंपरांचे पतन होत होते आणि त्याचवेळी अनेक नव्या व्यवस्था, परंपरांना आकार येत होता. अठराव्या शतकातील भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

भूतकाळातील सातत्यांचा व बदलांचा अभ्यास हे इतिहासाच्या अभ्यासातील एक महत्त्वपूर्ण अंग आहे. भारताच्या इतिहासातील अठरावे शतक हे सातत्य आणि बदल यांचा काळ होता. परिणामी, हा काळ इतिहासकारांच्या विशेष रुचीचा काळ असून इतिहासकारांमध्ये या काळाबाबत अनेक मतमतांतरे आढळतात. अठराव्या शतकातील भारताच्या इतिहासाबद्दल  इतिहासकारांमधील वाद-विवाद देखील आपण या घटकात जाणून घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ राजकीय परिस्थिती

अठराव्या शतकातील राजकीय परिस्थितीचा विचार करत असताना आपणास साधारणपणे तीन ऐतिहासिक प्रक्रियांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भारतातील शक्तिशाली मानल्या जाणाऱ्या मुघल सत्तेचा ऱ्हास, प्रादेशिक सत्तांचा उदय व ब्रिटीश सत्तेचा उदय या तीन ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रकिया होय.

**(अ) मुघल सत्तेचा ऱ्हास :**  अठराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये मुघल सत्तेचा ऱ्हास झाला. शेकडो वर्ष शक्तिशाली समजले जाणारे मुगल साम्राज्य हे अनेक अंतर्गत व बाह्य कारणामुळे खिळखिळे झाले होते. मुघल सत्तेच्या ऱ्हासामागे अनेक कारणे होती. त्यापैकी  काही महत्त्वाच्या कारणांचा आढावा आपण घेणार आहोत.

**१. अंतर्गत संघर्ष :**  शेवटचा शक्तीशाली मुगल सम्राट औरंगजेब याचा सन १७०७ मध्ये मृत्यू झाला. औरंगजेबच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. दख्खनमधील साम्राज्य विस्तारासाठी सातत्याने युद्धाचे धोरण, अकबर कालिन सर्वसमावेशी धार्मिक धोरणाशी फारकत घेणारे कट्टर धार्मिक धोरण इत्यादी, औरंगजेबच्या अनेक चुकीच्या धोरणांनी मुघल सत्तेच्या ऱ्हासामध्ये महत्वाची भूमिका पार पाडली. भारतातील मुघल सत्ता ही मनसबदारी व्यवस्थेवर आधारित होती. मनसबदारी व्यवस्थेच्या माध्यमातूनच मुघल सैन्यव्यवस्था आणि मुघल प्रशासन व्यवस्था कार्यरत होती. मुघल सैन्यव्यवस्था आणि मुघल प्रशासनव्यवस्था ही मुघल सत्तेचे आधार देणारे महत्त्वाचे आधारस्तंभ होते. सन १७०७ मध्ये औरंगजेबच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये सत्तेसाठी संघर्ष उसळला. मुघल राजपुत्रांच्या या सत्ता संघर्षामुळे मुघल मनसबदारांमध्ये गट पडून त्यांच्यात यादवी युद्ध झाले. औरंगजेब नंतरचे बादशाह हे तुलनेने कमकुवत असल्याने मुघल दरबारातील शक्तिशाली मनसबदारांमध्ये गटबाजी मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी, मुघल

सत्तेच्या स्थैर्याचा मुख्य आधार असलेली मुघलांची सैन्यव्यवस्था व प्रशासनव्यवस्था विस्कळीत होऊन खिळखिळी झाली. दीर्घकाळ कमकुवत राज्यकर्ता हे सम्राट पदावर असल्याने मुघल सत्ता ही पुन्हा कधीही आपले गतवैभव प्राप्त करू शकली नाही.

मुघल साम्राज्याच्या प्रांतांना 'सुभा' असे म्हणत. सुभ्याच्या प्रशासनाची जबाबदारी 'सुभेदार' या अधिकाऱ्याकडे असे. सुभेदारांना अनेक प्रशासकीय, महसूलविषयक व सैन्यविषयक अधिकार असत. मुघलांची केंद्रीय सत्ता कुमकुवत झाल्याने शक्तिशाली मुघल सुभेदारांनी आपल्या-आपल्या सुभ्यामध्ये स्वत:चा प्रभाव वाढविण्यास सुरवात केली. सुभेदार म्हणून मिळालेल्या अधिकारांचा व शक्तींचा वापर करून सुभेदारांनी स्थानिक अधिकाऱ्यांशी घनिष्ठ संबंध स्थापन केले. मुघलांच्या केंद्रीय सत्तेचा कमकुवतपणा जसजसा उघड होऊ लागला तसतसे हे सुभेदार स्वतंत्रपणे वागू लागले. मुघल सुभेदारांनी मुघल बादशाहला महसुलाचा हिस्सा देणे हळूहळू कमी केले. परिणामी, केंद्रीय सत्तेविरुद्धची बंडे मोडून काढण्यासाठी सैन्य उभारण्यासाठी लागणारी धनशक्ती हाती नसल्याने मुघल बादशाह हतबल झाले. निजाम-उल-मुल्क आसफजहां याने सन १७२४ मध्ये मुघल दरबारातील वजीर पदाचा त्याग करून दखखनमध्ये जाऊन स्वतंत्र हैदराबादचे राज्य स्थापन केले. बंगाल, अवध आणि पंजाबमध्ये देखील अशाच प्रकारे मुघल बादशाहचे नाममात्र अधिकार असलेली स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली. अशाप्रकारे मुघल सत्तेची अनेक शकले होऊन मुघल सम्राटाचा प्रभाव दिल्ली व आग्राच्या आसपासच्या प्रदेशापुरताच मर्यादित राहिला.

मुघल बादशाहची शक्ती क्षीण होत असल्याने सुभेदारांच्या पाठोपाठ जमीनदार व स्थानिक अधिकारी यांनी देखील बंड करणे सुरु केले. जमीनदार व शेतकऱ्यांचे उठाव वारंवार होऊन अशांतता निर्माण झाली. चोहोबाजूंनी महसुलाचा ओघ आटल्याने व दरबारातील अनागोंदीमुळे मुघल बादशाह हे उठाव मोडून काढण्यात असमर्थ ठरले. दरबारातील सामर्थ्यवान सरदारांनी दुर्बल मुघल बादशाहांचा शोभेच्या बाहुल्यांसारखा वापर केला. मुघल दरबारात इराणी व तुराणी (तुर्की) असे दोन गट पडले होते. दरबारातील या गटबाजीमुळे मुघल बादशाह पदाची प्रतिष्ठा कमी होत होती. फरुखसियार (१७१३-१७१९) व आलमगीर दुसरा (१७५४-१७५९) या मुघल सम्राटांची दरबारी राजकारणात हत्या करण्यात आली. दरबारातील सरदारांनी अहमदशाह (१७४८-१७५४) आणि शाहआलम (१७५९-१८१६) या मुघल सम्राटांचे डोळे काढले. मुघल दरबारातील अंतर्गत राजकारण व गटबाजीमुळे मुघल बादशाहची सत्ता व प्रतिष्ठा रसातळाला गेली.

**२. बाह्य आक्रमणे :** मुघल सत्तेचा डोलारा जसा जसा ढासळू लागला तसतसे भारताबाहेरील शक्तींनी भारतावर हल्ले सुरु केले. इराणचा बादशाह नादीरशाह १७३८-३९ मध्ये भारतावर आक्रमण केले. नादीरशाहने लाहोरवर हल्ला करून लाहोर काबीज केले. तत्कालीन मुघल बादशाह महंमदशाह याने निजाम-उल-मुल्क व इतर मुघल सरदारांच्या मदतीने हरयाणा येथील कर्नाल जवळ नादीरशाहला रोखण्याचा प्रयत्न केला. फेब्रुवारी १७३९ मध्ये झालेल्या कर्नालच्या युद्धात नादीरशाहच्या सैन्याने मुघल सैन्याचा दारूण पराभव केला. मुघल बादशाह आणि आणि अनेक मुघल सरदार यांना कैद करण्यात आले. नादीरशाहच्या सैन्याने दिल्लीत शहरात घुसून प्रचंड लुट मिळवली. कोहिनूर हिरा आणि मयूर सिंहासन या मौल्यवान वस्तू देखील लुटण्यात आल्या.

लुटालूट करणाऱ्या नादीरशाहच्या सैन्याशी दिल्लीतील काही लोकांनी संघर्ष केला असता नादीरशाह याने आपल्या सैन्याला सार्वत्रिक कत्तल करण्याचा आदेश दिला. काही तास चाललेल्या या कत्तलीत दिल्लीतील जवळपास ३० हजार लोक मारले गेले. सिंधू नदीच्या उत्तरेकडील भाग नादीरशाहने आपल्या साम्राज्याला जोडला व मुघल सत्तेवर जाचक तह लादला. इराणला परत जाताना नादीरशाहने दिल्लीतून इतकी प्रचंड लुट नेली की आपल्या साम्राज्यात त्याने तीन वर्ष करमुक्ती जाहीर केली.

नादीरशाहच्या आक्रमणाने मुघल सत्तेचा दुबळेपणा उघड पडून त्याची मोठी अप्रतिष्ठा झाली. नादीरशाह नंतर अफगाणिस्थानचा सुलतान अहमदशाह अब्दाली याने १७४८ ते १७६७ याकाळात आठ वेळा भारतावर आक्रमण करून लुटमार केली. अब्दालीच्या विरोधात लढण्यासाठी आलेल्या सदाशिवराव भाऊच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्याचा जानेवारी १७६१ मध्ये पानिपतच्या तिसऱ्या युद्धात पराभव केला. नादीरशाह व अहमदशाह अब्दाली यांच्या आक्रमणामुळे मुघल सत्ता खिळखिळी होऊन तिचा प्रभाव क्षीण झाला. मुघल सत्ता क्षीण झाल्याचे स्पष्ट होऊन प्रादेशिक सत्ता व ईस्ट इंडिया कंपनीने आपला प्रभाव वाढविण्यास सुरवात केली.

**३. मुघल सत्तेचा ऱ्हास – इतिहासकारांची मते :** मुघल सत्तेच्या ऱ्हासासंदर्भात इतिहासकारांची मते गेल्या काही दशकात बदललेली आहेत. विल्यम आयर्विन व जदुनाथ सरकार इत्यादी सारख्या इतिहासकारांच्या पारंपारिक मतानुसार मुघल सम्राट व त्याच्या सरदारांचा वैयक्तिक कमकुवतपणा, त्यांची भ्रष्ट वागणूक व ऐषआरामी जीवनपद्धती यांच्यामुळे मुघल सत्तेचा ऱ्हास झाला. पारंपारिक मतापेक्षा वेगळे मत आर्थिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून सतीश चंद्र व इरफान हबीब यांनी मांडले. सतीश चंद्र यांच्या मते, मुघलांच्या जागीरदारी व्यवस्थेतील संकट हे मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाचे मुख्य कारण होते. जागीरदारांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ व वाटण्यासाठी उपलब्ध असलेल्या जागीरची तुलनेने अत्यंत कमी संख्या हे जागीरदारी व्यवस्थेतील संकटाचे कारण होते. अलीगढ विद्यापीठातील प्रख्यात इतिहासकार इरफान हबीब यांनी मुघल साम्राज्यातील कृषीव्यवस्थेचा अभ्यास करून मर्यादित संसाधने असलेल्या शेतकऱ्यांवर करवसुलीसाठी पडणाऱ्या दबाव वाढल्यामुळे व त्यांच्या शोषणामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. शेतकऱ्यांमध्ये वाढलेल्या असंतोषामुळे वारंवार होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उठावांमुळे मुघल साम्राज्याचे स्थैर्य नष्ट झाले.

**(ब) नव्या प्रादेशिक सत्तांचा उदय :** मुघल सम्राटांचा प्रभाव नष्ट होत असताना साम्राज्याच्या विविध भागातील मोठमोठ्या सुभ्यांचे सुभेदार आणि मोठे जमीनदार यांनी आपल्या भागात स्वत:चे वर्चस्व वाढविण्यास सुरुवात केली. अठराव्या शतकात मुघल साम्राज्य हे हळूहळू अनेक स्वतंत्र प्रादेशिक राज्यांमध्ये विभागले गेले. अठराव्या शतकातील ही स्वतंत्र प्रादेशिक राज्यांचे साधारणपणे तीन प्रकार पडतात. ते पुढील प्रमाणे–

१. मुघल साम्राज्याचे सुभे असलेले अवध, बंगाल व हैद्राबाद सारखी राज्ये

२. मुघल साम्राज्यात वतन जागीर असलेली राजपूत राज्ये

३. मुघल साम्राज्याशी संघर्ष करून उदयाला आलेली स्वतंत्र राज्ये

**१. मुघल साम्राज्याचे सुभे असलेले अवध, बंगाल व हैद्राबाद सारखी राज्ये :** अवध, बंगाल आणि हैद्राबाद सारखी पूर्वी मुघल साम्राज्याची सुभे असलेली राज्ये ही जरी अत्यंत शक्तीशाली व स्वतंत्र असली तरी त्यांनी मुघल सम्राटाशी असलेले संबंध औपचारिकपणे तोडून टाकले नाहीत. अवध, बंगाल आणि हैद्राबाद ही राज्ये अठराव्या शतकातील राजकीय पटलावर महत्त्वाची राज्ये होती. ही तीनही राज्ये मुघल साम्राज्यातील बलशाली मनसबदार व त्या-त्या प्रांताचे सुभेदार असलेल्या व्यक्तींनी स्थापन केली होती. सआदत खान याने अवधचे राज्य, मुर्शिद कुली खान याने बंगालचे राज्य  व आसफजहां याने हैद्राबादचे राज्य स्थापन केले.

**(१) हैद्राबाद :** हैद्राबाद राज्याचा संस्थापक निजाम-उल-मुल्क आसफजहां हा मुघल सम्राट फरुखसियार याच्या दरबारातील महत्त्वपूर्ण सदस्य होता.  निजाम-उल-मुल्क याला सुरवातीला अवधचा सुभेदार म्हणून व नंतर दख्खनचा सुभेदार म्हणून सन १७१३ मध्ये नेमण्यात आले होते. दख्खनचा सुभेदार म्हणून आसफजहांने तेथील प्रशासकीय व महसूल व्यवस्थेवर आपली पकड बसवली. दख्खनमधील राजकीय अस्थिरता व दिल्ली दरबारातील गटबाजी यांचा फायदा घेऊन आसफजहांने हैद्राबादच्या प्रदेशावर वर्चस्व निर्माण करून साधारणपणे सन १७२४ पर्यंत तेथील सर्व सत्ता आपल्या ताब्यात घेतली.

उत्तर भारतातील प्रशिक्षित सैन्य व प्रशासकीय अधिकारी यांना दक्षिणेत आमंत्रित करून आसफजहांने त्यांना मनसबदार म्हणून नियुक्त करून  जागीर दिल्या. मुगल सम्राटाच्या सेवेत असून देखील आसफजहां संपूर्णरित्या स्वतंत्रपणे राज्यकारभार करत असे. आसफजहांच्या राज्यात मुघल सम्राटाकडून कोणताही हस्तक्षेप केला जात नसे. आसफजहांने घेतलेल्या निर्णयाला मूकसंमती देण्याचे काम मुघल सम्राट करत असे.

हैदराबादचे राज्याचे  मराठा राज्य  व तेलगु भागातील  नायकांचे राज्य यांच्याशी सातत्याने संघर्ष होत असे. कोरोमंडल किनाऱ्यावरील कापड उद्योग असलेल्या प्रदेशावर वर्चस्व मिळवण्याच्या निजामाच्या प्रयत्नाला ब्रिटिश सत्तेच्या उदयामुळे खीळ बसली.

**(२) अवध :** बुऱ्हाण-उल-मुल्क सादत खान याला सन १७२२ मध्ये अवधचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले. अत्यंत समुद्ध प्रदेश असलेल्या अवध सुभ्या मध्ये गंगा नदीच्या मैदानी भागातील सुपीक प्रदेश व उत्तर भारताला बंगालशी जोडणारा मुख्य व्यापारी मार्ग होता. सादत खानकडे अवधची सुभेदार (प्रशासन), दिवाणी (महसूल) व फौजदारी (सैन्य) अधिकार होते म्हणजेच अवधच्या राजकीय, आर्थिक व सैन्यविषयक सर्वाधिकार एकवटून तो स्वतंत्रपणे अवध राज्याचा कारभार करू लागला.

बुऱ्हाण-उल-मुल्क याने मुघलांद्वारे अवध सुभ्यात नियुक्त केलेल्या जागीरदारांची संख्या कमी करून मुघल सम्राटाचा अवध सुभ्यातील प्रभाव कमी केला. जहागिरीचा आकार कमी करणे व आपल्याशी निष्ठावान असलेल्या व्यक्तींची रिक्त जागांवर नेमणूक करणे या मार्गाचा अवलंब देखील सादत खान याने केला. जागीरदारांकडून महसुलात होणारा भ्रष्टाचार मोडून काढण्यासाठी जागीरदारांच्या महसुलाची हिशोब तपासणी व महसुलाच्या निश्चिततेची तपासणी इत्यादी बाबींसाठी अवधचा नवाब सआदत खानद्वारे

अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाई. राजपूत जागीरदारांची संख्या मर्यादित ठेवणे तसेच रोहिलखंडातील अफगाण जमीनदारांच्या जमिनीचा आकार मर्यादित करणे या मार्गांचा अवलंब करून सआदत खानने आपल्या प्रदेशात अंतर्गत वर्चस्व स्थापित केले.

अवधचे राज्य हे स्थानिक सावकार व महाजन यांच्याकडून मिळणाऱ्या कर्जावर अवलंबित होते. अवधमध्ये जास्तीतजास्त बोली लावणाऱ्यास महसूल गोळा करण्याचे अधिकार अथवा ठेका दिला जात असे, याला 'इजारा' असे म्हणत. 'इजारा' चे अधिकार प्राप्त करणाऱ्यांस 'इजारादार' म्हणत. इजारादार हे अवध राज्याला ठरविक रक्कम अदा करण्याचे कबूल करत. स्थानिक सावकार हे इजारादाराच्या वतीने राज्याला रक्कम अदा केली जाईल याचे जामीन (guarantee) देत असत. सावकाराकडून जामीन मिळताच इजारादारास महसूलाची निश्चिती व महसूल गोळा करण्यात बरेचसे स्वातंत्र्य दिले जाई. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळे सावकार व पेढीव्यवहार करणाऱ्या नव्या सामाजिक वर्गाचा उदय झाला. सावकारांचा हा धनवान वर्ग राज्याच्या महसूल व्यवस्थेवर प्रभाव टाकणारा वर्ग बनला.

**(३) बंगाल:** दिल्ली पासून दूरवर असलेला बंगालच्या सुभ्यावर मुर्शिद कुली खान याची नायब म्हणजे सुभेदाराच्या खालोखालच्या पदावर नेमणूक करण्यात आली. मुर्शिद कुली खान याने वेगाने आपल्याला दिलेल्या पदाचे सर्वाधिकार स्वत:च्या हाती घेतले. हैद्राबाद व अवधच्या राज्यकर्त्यांप्रमाणे मुर्शिद कुली खान याने देखील सुभ्याच्या महसूल व्यवस्थेच्या अधिकारांवर वर्चस्व निर्माण केले. मुघल सत्तेचा बंगाल सुभ्यातील प्रभाव कमी करण्यासाठी मुर्शिद कुली खान याने सर्व मुघल जागीरदारांची बदली ओडीसामध्ये करून बंगालच्या महसुलाच्या निश्चितीचे आदेश दिले. मुर्शिद कुली खानच्या नियंत्रणाखालील बंगालमध्ये सर्व जमीनदारांकडून रोख स्वरूपात सक्तीने महसूल गोळा केला जाई. परिणामी, अनेक जमीनदारांना सावकार व पेढीव्यवहार करणाऱ्यांकडून रोख रक्कम कर्जाऊ घ्यावी लागे. ज्या जमीनदारांना महसूल अदा करणे शक्य होत नसे त्यांना आपल्या जमिनी मोठ्या जमीनदारांना विकण्याशिवाय दुसरा मार्ग शिल्लक राहत नसे.

अठराव्या शतकात बंगालमध्ये प्रादेशिक राज्याचा उदय झाल्याने जमीनदारांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. सन १७४० ते १७५६ या काळात अलीवर्दी खान हा बंगालचा नवाब असताना हैद्राबाद व अवध प्रमाणे राज्य व सावकार यांच्यातील घनिष्ठ संबंध बंगालमध्ये देखील स्पष्टपणे दिसून येऊ लागले. अलीवर्दी खानच्या कारकिर्दीत जगत सेठ या सावकाराचे घराणे अत्यंत श्रीमंत घराण्याच्या स्वरूपात उदयाला आले.

मुघल सत्तेतून स्वतंत्र राज्याच्या स्वरुपात अस्तित्वात आलेल्या प्रादेशिक राज्यांचा आढावा घेतल्यानंतर तीन बाबी प्रकर्षाने जाणवतात. (१) जरी ही राज्ये मुघल उमरावांनी स्थापन केलेली असली तरी त्यांना मुघल काळापासून चालत आलेल्या प्रशासकीय व्यवस्थेविषयी विशेषत: जागीरदारी व्यवस्थेच्या कार्यक्षमतेविषयी साशंकता होती. (२) मुघल काळाच्या महसूल व्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था या राज्यांत उभी राहिली. महसूल गोळा करण्यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर अवलंबून न राहता इजारादारी व्यवस्थेनुसार जास्त बोली लावणाऱ्याला महसूल गोळा करण्याचे अधिकार या तीनही राज्यांनी दिले. मुघल सत्तेने नाकारलेली

इजारादारीची व्यवस्था अठराव्या शतकात भारतभर पसरलेली दिसते. या व्यवस्थेचा ग्रामीण भागावर मोठा परिणाम झाल्याचे दिसते. (३) श्रीमंत व्यापारी व सावकार यांच्याशी राज्याचे घनिष्ठ संबंध निर्माण होऊन धनिक सावकारांचा राज्यव्यवस्थेतील प्रभाव वाढला.

**२. मुघल साम्राज्यात वतन जागीर असलेली राजपूत राज्ये :** अनेक राजपूत राज्यकर्ते विशेषत: अंबर आणि जोधपुरच्या राजपुतांनी मुघल साम्राज्यात मोठमोठी कामगिरी पार पाडली. मुघलांकडील सेवेच्या बदल्यात राजपुतांना त्यांच्या 'वतन' जहागिरीमध्ये बहुतांश प्रमाणात स्वातंत्र्य प्राप्त होते. वतन जहागिर ही वंशपरंपरेने दिलेली असे. अठराव्या शतकात राजपूत राज्यकर्त्यांनी आपल्या आजूबाजूच्या प्रदेशावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला. जोधपूरचा राजा अजित सिंह हा मुघल दरबारातील अंतर्गत गटबाजीमध्ये देखील सहभागी होता.

अंबर आणि जोधपुरच्या प्रभावशाली राजपूत घराण्यांनी समृद्ध अशा गुजरात सुभा व माळवा सुभा येथील सुभेदारीवर देखील दावा केला. जोधपुरच्या राजा अजित सिंहकडे गुजरात सुभ्याची तर अंबरच्या सवाई राजा जयसिंहकडे माळवा सुभ्याची सुभेदारी होती. मुघल सम्राट जहांदरशाह याने सन १७१३ मध्ये या दोघांच्या सुभेदारी पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिली. राजपुतांनी आपल्या वतन जागीरीला लागून असलेल्या प्रदेशातील काही भाग मिळविण्यासाठी देखील खटपटी केल्या. जोधपुरच्या राजपुतांनी नागौरवर आक्रमण करून हा प्रदेश आपल्या राज्याला जोडला. अंबरच्या राजपुतांनी बुंदीच्या प्रदेशातील मोठा भाग कब्जात घेतला. सवाई जयसिंह याने जयपूर येथे आपली नवी राजधानी स्थापन केली आणि सन १७२२ मध्ये त्याला आग्र्याची सुभेदारी देण्यात आली. साधारणपणे सन १७४० च्या दशकात राजस्थानातील मराठ्यांच्या मोहिमांमुळे राजपूत राज्यांवर दबाव निर्माण होऊन त्यांच्या विस्तारवादाला अटकाव बसला.

**३. मुघल साम्राज्याशी संघर्ष करून उदयाला आलेली स्वतंत्र राज्ये :**

**(१) शीखांचे राज्य :** शीख धर्मियांचे संघटन होऊन सतराव्या शतकात शीख हे राजकीयदृष्ट्या शक्तिशाली समूहाच्या स्वरूपात पुढे आले. याचकाळात पंजाबमध्ये शीखांचे प्रादेशिक राज्य बनण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. सन १६९९ मध्ये खालसा या शीख धर्मियांच्या सैनिकी पंथाची स्थापना होण्यापूर्वी व नंतर गुरु गोविंद सिंह यांनी राजपूत व मुघल राज्यकर्त्यांशी अनेक युद्धे केली. सन १७०८ मध्ये गुरु गोविंद सिंह यांच्या मृत्यूनंतर बंदा बहादूर यांच्या नेतृत्वाखाली खालसा सैन्याने मुघलांच्या सत्तेविरोधात उठाव केला. बंदा बहादूर यांनी गुरु नानक व गुरु गोविंद सिंह यांच्या नावाने नाणी पाडून शीख राज्याच्या सार्वभौमत्वाची घोषणा केली. सतलज आणि यमुना नद्यांच्या मधल्या प्रदेशात शीखांनी स्वत:चे प्रशासन स्थापित केले. पुढे सन १७१५ मध्ये मुघल सैन्याने बंदा बहादूर यांना कैद केले आणि सन १७१६ मध्ये त्यांना मृत्युदंड देण्यात आला.

अठराव्या शतकात शीख हे विविध नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक छोट्या-छोट्या सैन्य तुकड्यांच्या स्वरुपात संघटीत झाले ज्यांना 'जथ्था' असे म्हणत. नंतरच्या काळात शीख नेत्यांनी आपल्या सैन्याच्या सहाय्याने आपली प्रभावक्षेत्रे स्थापन केली त्यांना 'मिसल' असे म्हणत. जथ्था व मिसल यांना एकत्रित करून

तयार होणाऱ्या सैन्याला 'दल खालसा' असे म्हणत. शीखांचे संपूर्ण सैन्य हे बैसाखी व दिवाळीला अमृतसरमध्ये एकत्र येई व येथे सामुहिक निर्णय घेतले जाई. गुरु गोविंद सिंह यांनी खालसा पंथ हा राज्यकर्ता बनेल अशी घोषणा केली होती. खालसा पंथाच्या संघटन शक्तीमुळे शीखांनी पंजाब व सरहिंद प्रांतात आधी मुघल सुभेदारांना व नंतर अहमद शाह अब्दालीशी प्रखर संघर्ष केला. सन १७६५ मध्ये खालसा पंथाने पुन्हा बंदा बहादूर यांच्या प्रमाणे स्वत:ची नाणी पाडून आपल्या सार्वभौमत्वाची घोषणा केली.

अठराव्या शतकाच्या शेवटी शीखांचे राज्य हे सिंधू नदीपासून यमुना नदी पर्यंत पसरले होते. मात्र, हे राज्य अनेक राज्यकर्त्यांमध्ये विभागलेले होते. या राज्यकर्त्यांपैकी एक असलेल्या महाराजा रणजित सिंह यांनी सर्व छोट्या छोट्या राज्यांना एकत्रित केले आणि सन १७९९ मध्ये लाहोरला शीख राज्याची राजधानी म्हणून घोषित केले.

**(२) मराठा राज्य :** मुघल साम्राज्याला प्रखर प्रतिकार करून स्थापित झालेले मराठा राज्य हे अठराव्या शतकात शक्तिशाली राज्य होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मावळ खोऱ्यातील लढवय्या लोकांना एकत्र करून स्वराज्य स्थापन केले. सुरुवातीला आदिलशाही व नंतर मुघलांशी संघर्ष करून मराठ्यांनी बराच प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यू (१६८०) नंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्याने बलाढ्य मुघल फौजेशी सतत पंचवीस वर्ष संघर्ष करून आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवले. मुघल बादशाह औरंगजेब याच्या मृत्यू (१७०७) नंतर मुघल साम्राज्याच्या ऱ्हासास सुरुवात झाली. संभाजी पुत्र छत्रपती शाहू महाराज हे मुघल कैदेतून सुटून आल्यानंतर मराठा सरदार हे छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वात संघटीत झाले. मुघलांमध्ये यादवी युद्ध सुरु झाल्यानंतर संभाजी पुत्र छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वातील मराठा सरदारांनी मुघल प्रदेशांवर हल्ले सुरु केले. शाहू महाराजांच्या दरबारातील बाळाजी विश्वनाथ याचा उदय होऊन पुढे तो पेशवा बनला व नंतरच्या काळात पेशव्यांच्या हाती मराठा राज्याची सत्ता एकवटली.

पेशव्यांच्या व इतर मराठा सरदारांच्या फौजांनी मुघल प्रदेशात छापे घालण्याचे सत्र सुरु केले. मुघलांचे किल्ले व तटबंदीची शहरे वगळता सर्वत्र मराठे सैन्य हल्ले करत असे. मुघल सैन्याची रसद लुटून त्यांनी मुघलांना हैराण करून सोडले. सन १७२०-१७६१ या बाजीराव पेशवा व नानासाहेब पेशवा यांच्या कारकिर्दीत मराठा सत्तेचे मोठ्याप्रमाणात विस्तार झाला. १७२० च्या दशकात माळवा व गुजरातचा प्रदेश मुघलांकडून जिंकून घेऊन मराठ्यांच्या अंमलाखाली आला. १७३०च्या दशकात छत्रपती शाहू महाराज हे संपूर्ण दखखनचे सत्ताधीश म्हणून मान्यता पावले. छत्रपती शाहू महाराजांना 'चौथाई' व 'सरदेशमुखी'चे अधिकार प्राप्त झाले.

सन १७३७ मध्ये दिल्लीवरील मोहिमेनंतर मराठ्यांची सत्ता वेगाने विस्तारत राजस्थान, पंजाब, ओडीसा, बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश इत्यादी प्रदेशात पसरली. हा प्रदेश पूर्णत: मराठा राज्यात समाविष्ट नसला तरी मराठ्याचे वर्चस्व मान्य करून मराठ्यांना 'चौथाई' देण्याचे या प्रदेशांतील अधिकाऱ्यांनी मान्य

केले होते. 'चौथाई' म्हणजे विशिष्ठ प्रदेशातील महसुलाचा चौथा हिस्सा होय. चौथाईच्या माध्यमातून मराठा राज्याचे उत्पन्न मोठ्याप्रमाणात वाढले. चौथाईमुळे मराठा राज्याचे उत्पन्न वाढले असलेले तरी चौथाई वसुलीसाठी वारंवार लष्करी मोहिमा काढाव्या लागत असत. मराठ्यांच्या लष्करी मोहिमांमुळे अनेक सत्ता या मराठा सत्तेच्या शत्रू बनल्या. परिणामी, सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धात उत्तर भारतात मराठे एकटे पडले आणि त्यांचा मोठा पराभव झाला.

सातत्याने काढण्यात येणाऱ्या लष्करी मोहिमांसोबतच मराठ्यांनी या भागात प्रभावी प्रशासन उभारण्याचा प्रयत्न केला. एखाद्या प्रदेश नियंत्रणाखाली आला की स्थानिक परिस्थिती पाहून महसुलाची रक्कम ठरविली जाई. कृषी व व्यापाराला उत्तेजन देण्यात आले. ग्वालियरचे शिंदे, बडोद्याचे गायकवाड, नागपूरचे भोसले यांच्यासारखे मराठा सरदार हे मोठ्या प्रमाणात महसूल गोळा करत व त्याआधारे शक्तिशाली सैन्य उभारत. शिंदेंच्या अंमलाखालील उज्जैन व होळकरांच्या अंमलाखालील इंदौर सारख्या शहरांचा विकास होऊन ही शहरे व्यापार व सांस्कृतिक देवाणघेवाणीची केंद्रे बनली.

**(३) जाटांचे राज्य :** नव्याने उदयाला आलेल्या प्रादेशिक राज्यांप्रमाणे जाटांनी चुडामण यांच्या नेतृत्त्वाखाली दिल्लीच्या पश्चिमेकडील प्रदेशात साधारणपणे सतराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात प्रदेश काबीज करण्यास सुरवात केली. सन १६८० च्या दशकात दिल्ली आणि आग्रा या दोन शहरांच्या दरम्यानच्या प्रदेशावर जाटांनी नियंत्रण प्रस्थापित केले. जाट राज्य हे अत्यंत सुपीक जमिनीवरील शेतीमुळे समृद्ध होते. पानिपत, वल्लभगढ ही शहरे व्यापारी केंद्रे म्हणून उदयाला आली. सुरजमल जाट याच्या नेतृत्त्वाखालील भरतपूर राज्य शक्तिशाली बनले. सन १७३९ मध्ये नादीरशाह दिल्लीची लुट केली तेंव्हा दिल्लीतील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींनी भरतपूर मध्ये आसरा घेतला. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर अब्दालीच्या सैन्यापासून जीव वाचविण्यासाठी मराठा सैन्यातील अनेक सैनिक व स्त्रियांनी देखील भरतपूर मध्ये आश्रय घेतला. सुरजमल यांचा मुलगा जवाहीर शाह याने ३०००० जाट, २०००० मराठा व १५००० शीख फौज ही मुगलांच्या विरोधात लढण्यासाठी उभी केली. भरतपूर किल्ला हा वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो.

**(क) भारतात ब्रिटीश सत्तेचा उदय :** इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना १६०० मध्ये झाली. सन १६११ मध्ये भारताच्या पूर्व किनार्यावर मसुलीपट्टणम येथे कंपनीने आपली फॅक्टरी स्थापन केली. मुघल सम्राट जहांगीरने १६१२ मध्ये सुरत येथे फॅक्टरी स्थापन करण्याचे अधिकार इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला प्रदान केल्यामुळे तिने भारतात पाऊल ठेवले. सन १६४० मध्ये, दक्षिण भारताच्या किनारपट्टीवर मद्रासमध्ये दुसरी फॅक्टरी स्थापन करण्यात आली. सध्या मुंबई म्हणून ओळखले जाणारे पूर्वीचे बॉम्बे हे सात बेटांपासून बनले होते. सुरतपासून फार दूर नसलेले हे ठिकाण पूर्वी एक पोर्तुगीज चौकी होती. पोर्तुगीज राजकन्या कॅथरीन हिचा इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याच्याशी विवाह झाला. राजा चार्ल्स दुसरा याला पोर्तुगीज राजाने मुंबईचे बेट हे हुंडा म्हणून दिले. इंग्लडचा राजा चार्ल्सने १६६८ मध्ये मुंबई हे बेट इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले. दोन दशकांनंतर, इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने गंगा नदीच्या मुखाच्या प्रदेशात बंगालमधील कलकत्ता येथे फॅक्टरी स्थापन केली. या काळात पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि डॅनिश या इतर युरोपियन सत्तांनी स्थापन केलेल्या इतर कंपन्याही भारतीय उपखंडात अशाच प्रकारे विस्तारत होत्या.

बंगालचा नवाब व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्या मध्ये व्यापारावरील कराच्या आणि कर सवलतीच्या मुद्द्यावरून संघर्ष झाला. सन १७५७ मध्ये प्लासीच्या लढाईत रॉबर्ट क्लाइव्हच्या नेतृत्वाखाली इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा विजय होऊन बंगालच्या नवाबाचा पराभव झाला. पुढे १७६४ मध्ये बिहार येथील बक्सार येथे झालेल्या युद्धात इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने मुघल बादशाह शाहआलम, अवधचा नवाब आणि बंगालचा नवाब यांचा पराभव केला. बक्सार च्या विजयामुळे कंपनीची शक्ती मजबूत झाली आणि सम्राट शाह आलम दुसरा याला बंगाल, बिहार व ओरिसा येथील  दिवाणी अधिकार म्हणजेच महसूल गोळा करण्याचे अधिकार  इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला देण्यास भाग पाडण्यात आले. सन १७७३ पर्यंत इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी ही  गंगा नदीच्या पूर्वेकडील मोठ्या मैदानी प्रदेशाची वास्तविक शासक बनली. कंपनीने मुंबई व मद्रासच्या आसपास आपले वर्चस्व वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आणि त्यात कंपनीला यश देखील मिळाले. अँग्लो-म्हैसूर युद्धे (१७६६-१७९९) आणि अँग्लो-मराठा युद्धे (१७७२-१८१८)  अशा युद्धात इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या विजयामुळे जवळपास संपूर्ण भारतावर कंपनीची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सत्ता प्रस्थापित झाली. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपल्या सत्तेच्या केलेल्या विस्ताराची सविस्तर माहिती आपण पुढील घटकात करून घेणार आहोत.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) मुघल सत्तेचे आधार देणारे महत्त्वाचे आधारस्तंभ कोणते होते?

(२) फेब्रुवारी १७३९ मध्ये झालेल्या कर्नालच्या युद्धात मुघल सैन्याचा पराभव कोणी केला?

(३) हैद्राबाद राज्याच्या संस्थापक कोण होता?

(४) बुऱ्हाण-उल-मुल्क सआदत खान याला सन १७२२ मध्ये कोणत्या प्रांताचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले?

(५) शीखांचे संपूर्ण सैन्य हे अमृतसरमध्ये कधी एकत्र येत असे?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) ................ याच्या नेतृत्त्वाखालील भरतपूर राज्य शक्तिशाली बनले.

(२) शिंदेंच्या अंमलाखालील ............... व होळकरांच्या अंमलाखालील इंदौर या शहरांचा विकास झाला.

(३) ............... यांच्या मते, जागीरदारी व्यवस्थेतील संकट हे मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाचे मुख्य कारण होते.

(४) ............. यांनी मुघल साम्राज्यातील कृषीव्यवस्था अभ्यासून शेतकरी शोषणासंबंधी मांडणी केली.

(५) छत्रपती शाहू महाराजांना चौथाई व ................ चे अधिकार प्राप्त झाले.

## १.२.२ सामाजिक व आर्थिक परिस्थिती :

**(अ) सामाजिक परिस्थिती :** भारतातील अठरावे शतक हा राजकीय उथापालट व अस्थैर्याचा काळ होता. अठराव्या शतकातील समाजाची शतकानुशतकांची पारंपारिक जीवनपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये कायम राहिली असली तरी समाजात काही महत्त्वपूर्ण बदल घडून आले. भारतीय समाजावर युरोपियन संस्कृतीच्या पडलेल्या प्रभावामुळे संपूर्ण भारतातील समाजामध्ये बदल घडून येण्यास सुरुवात झाली.

समाजाच्या सर्वोच्च स्थानी राज्यकर्ता वर्ग होता. राज्यकर्ता वर्गात ज्यामध्ये सम्राट, राजे, नवाब, उमराव, सरदार इत्यादी लोकांचा समावेश होता. राज्यकर्ता वर्गाच्या हाती सर्व अधिकार आणि अनेक विशेष अधिकार एकवटलेले होते. समाजाच्या सर्वात खालच्या थरामध्ये बहुसंख्य प्रजा ज्याला 'रयत' म्हणत. यामध्ये शेतकरी व कारागीर यांचा समावेश होई. समाजाच्या तळाशी असलेल्या या वर्गाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती. समाजामध्ये व्यापारी, सरकारी अधिकारी, दुकानदार, शहरी कारागीर अशा बऱ्यापैकी उत्पन्न असलेल्या लोकांचा मध्यमवर्ग तुलनेने कमी संख्येने अस्तित्वात होता. उत्पन्नाच्या प्रमाणात प्रचंड असमानता असल्याने भारतीय समाजातील स्तरीकरण कठोर स्वरूपाचे होते.

भारतात शेकडो वर्षांपासून अस्तित्वात असलेली चातुर्वर्ण व्यवस्था जातीव्यवस्था ही अठराव्या शतकात देखील विद्यमान होती. विवाह, पेहराव, आहार आणि अगदी व्यवसायाच्या बाबतीतही जातीचे नियम अत्यंत कठोर होते. उच्चवर्णीय जातींना सामाजिक प्रतिष्ठा आणि विशेषाधिकारांचा लाभ मिळत असे. निम्नवर्णीय जातींशी अंतर ठेऊन वर्तन केले जाई. अस्पृश्य मानलेल्या समाजाचा स्पर्शदेखील टाळला जात असे. जातीव्यवस्थेमध्ये आपल्या-आपल्या जातींचे नियमन करण्यासाठी 'जात पंचायती' अस्तित्वात होत्या. जातीचे नियम मोडणाऱ्यांना जातीबहिष्कृत केले जात असे. काही समूहांनी व्यवसाय, लष्करी पेशा इत्यादींच्या माध्यमातून आपला सामजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला. मात्र, अशा समुहांची संख्या अत्यंत मर्यादित होती. जातीव्यवस्था ही फक्त हिंदू धर्मियांमध्येच अस्तित्वात होती असे नसून भारतातील मुस्लिमांमध्ये देखील अनेक जाती निर्माण झाल्या. इस्लाम धर्मात जरी जातीव्यवस्था नसली तरी भारतातील मुसलमानांत कालांतराने व्यवसायावरून अनेक जाती निर्माण झाल्या. मुस्लिमांतील उच्च जातींना 'अशराफ' वर्गात, कनिष्ठ जातींना 'अजलाफ' वर्गात आणि अस्पृश्य मानलेल्या जातींना 'अरजाल' वर्गात विभागलेले होते. याशिवाय भारतातील मुस्लिम समाजात शिया-सुन्नी असा पंथीय भेद व इराणी, पठाण, तुर्क, हिंदुस्थानी, दख्खनी असे प्रादेशिक भेद देखील अस्तित्वात होता.

भारतीय समाजातील कुटुंब व्यवस्था ही पितृसत्ताक पद्धतीची असल्यामुळे कुटुंबाचा प्रमुख पुरुष असे. पुरुषांच्या हाती सर्व अधिकार एकवटले असल्याने महिलांना दुय्यम स्थान होते. तरी देखील काही हिंदू आणि मुस्लिम महिलांनी राजकारण आणि प्रशासन क्षेत्रात महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या होत्या. मात्र, ही बाब उच्चकुलीन समाजातील महिलांपुरतीच मर्यादित होती. निम्नवर्गातील महिलांना समाजात दुय्यम स्थान असे. हिंदू आणि मुस्लीम अशा दोन्ही समाजात पर्दापद्धत प्रचलित होती. मात्र, गरीब कुटुंबातील महिलांना उदरनिर्वाहासाठी त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांसोबत बाहेर काम करावे लागत होते. बालविवाह, जरठविवाह

सारख्या प्रथा प्रचलित होत्या. समाजामध्ये हुंडा पद्धत, बहुपत्नीत्व प्रचलित होते. विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता नव्हती. बंगाल, मध्यभारत आणि राजपुतानामध्ये काही उच्च जातींमध्ये सती प्रथा प्रचलित होती.

अठराव्या शतकातील भारतात गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. गुलामांचे दोन वर्गात वर्गीकरण केले जाऊ शकते-घरगुती गुलाम आणि दुसरे म्हणजे जमिनीशी बांधलेले गुलाम. जमिनीशी बांधलेले गुलाम हे नवीन मालकाला जमिनीच्या विक्रीसह हस्तांतरित केले जात असेल. आर्थिक संकटे, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, आत्यंतिक दारिद्र्य यामुळे काहींना आपली अपत्ये कवडीमोल भावाने विकावी लागत असत. उच्चवर्गीय लोक सहसा गुलाम स्त्रियांना घरगुती कामासाठी ठेवत असत. गुलामांना कुटुंबाची वंशपरंपरागत मालमत्ता मानली जात असे.

मुघल सत्तेचा ऱ्हास झाल्याने कला व साहित्य यांना मिळणारा आश्रय कमी झाला होता. मात्र, प्रादेशिक राज्यांच्या विकासाबरोबर प्रादेशिक राज्यांमध्ये कला आणि साहित्य यांना आश्रय मिळू लागला. प्रादेशिक राज्यांत राजाश्रय मिळाल्याने उर्दू, हिंदी, बंगाली, आसामी, पंजाबी, मराठी, तेलगू आणि तमिळ या प्रादेशिक भाषांचा आणखी विकास होऊन या भाषांमध्ये साहित्यनिर्मिती वाढीस लागली. प्रादेशिक राज्यांमधील लखनौ, मुर्शिदाबाद, हैद्राबाद, पुणे इत्यादी महत्त्वाची शहरे सांस्कृतिक केंद्रांच्या स्वरूपात उदयाला आली. लखनौ येथे असफ-उद-दौला याने बांधलेला मोठा इमामबाडा हे अठराव्या शतकातील भारतातील महत्त्वाची वस्तू होती. सवाई जयसिंग यांनी जयपूर शहर वसविले आणि भारतातील पाच खगोलशास्त्रीय निरीक्षणे बांधली. अमृतसर येथे, महाराजा रणजित सिंग यांनी शीखांच्या जुन्या गुरुद्वाराचे नूतनीकरण केले ज्याला सुवर्ण मंदिर म्हणून ओळखले जाते. दिग येथील सुरजमलने बांधलेल्या वाडा देखील महत्त्वाची वास्तू होती. मराठा राज्यात देखील अनेक वाडे-गढी यांची उभारणी करण्यात आली.

**(ब) आर्थिक परिस्थिती :** अठराव्या शतकातील अर्थव्यवस्था ही तिच्या पूर्वीच्या व नंतरच्या काळातील अर्थव्यवस्थेशी सातत्य दाखवणारी अर्थव्यवस्था नव्हती. अठराव्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेत बऱ्याच प्रमाणात बदल झाले. अठराव्या शतकाचा काळ हा राजकीय बदलांचा काळ होता ज्यात मुघल साम्राज्याचे पतन आणि नव्या राज्यांचा उदय घडून आला. सततच्या लष्करी मोहिमा, छापेमारी यामुळे लोकांचे मोठ्याप्रमाणात स्थलांतर देखील झाले. लष्करी संघर्षामुळे पिकांची, पशुधनाची, सिंचन सुविधांची नासाडी झाली. यांचा नकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर होणे स्वाभाविक होते.

मुघल सत्तेला केंद्रस्थानी ठेवून पाहिल्यास अठरावे शतक हे आर्थिकदृष्ट्या ऱ्हासाचा काळ असल्याचे दिसून येते. नादीरशाह याने केलेली दिल्लीची लुट, अहमदशाह अब्दालीचे भारतावरील हल्ले, रोहील्यांचे दिल्लीवरील हल्ले यामुळे मुघल सत्ता ही सातत्याने अस्थैर्यामध्ये होती. मात्र, प्रादेशिक राज्यांच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास या काळात तुलनात्मक दृष्ट्या राजकीय स्थैर्य आढळून येते. प्रादेशिक राज्यांची मुख्य शहरे म्हणजे लखनौ, मुर्शिदाबाद, हैद्राबाद, जयपूर, पुणे इत्यादी शहरे भरभराटीस आली होती. राजकीय विकेंद्रीकरणाच्या परिणाम स्वरूप अर्थव्यवस्थेची पुनर्मांडणी झाल्याचे दिसून येते. कृषी, अंतर्गत व्यापार व

शहरीकरण यांचा विचार करता विविध प्रदेशामध्ये ही प्रक्रिया सातत्याने विकसित व विस्तारित होत होती. मात्र, जे प्रदेश लष्करी मोहिमांमध्ये भरडले जात होते तिथे मात्र कृषी क्षेत्राची हानी होत होती.

अठराव्या शतकाच्या सुरुवातीस, भारतीय अर्थव्यवस्थेचे मूलभूत एकक स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था होते. सरकारचे उत्पन्न प्रत्येक जमिनीवर आकारल्या जाणाऱ्या जमीन महसुलातून आले. शासक आणि राजघराण्यांच्या बदलामुळे गावातील समुदाय आणि जमीन महसुलाची टक्केवारी कायम राहिली. भारतातील शहरी हस्तकला विकासाच्या उच्च पातळीवर पोहोचल्या होत्या आणि त्यांनी जगभरातील बाजारपेठांना आकर्षित केले होते. ढाका, अहमदाबाद आणि मसुलीपटम येथील सूती उत्पादने, मुर्शिदाबाद, आग्रा, लाहोर आणि गुजरात इत्यादी ठिकाणचे रेशीम कापड अत्यंत लोकप्रिय होते. काश्मिर, लाहोर आणि आग्रा येथील उत्तम शाल आणि लोकरीच्या शाल आणि गालिचे, सोने, चांदी, धातूची भांडी इत्यादींना देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी होती. देशांतर्गत आणि परदेशी व्यापारात मोठ्या प्रमाणावर भांडवली व्यवहार अस्तित्वात आले. व्यापक व्यापाराच्या वाढीसह पेढीव्यवहार देखील सक्रिय झाले. व्यापाराच्या वाढीमुळे अठराव्या शतकात भारतात भांडवलशाही अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. अठराव्या शतकातील भारतात असे अनेक आर्थिक बदल घडून आले त्यांचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक आहे.

अठराव्या शतकात भारतामध्ये दोन महत्त्वाची स्थित्यंतरे घडली यामुळे सत्तेची रचना पालटली व मूलभूत सामाजिक आणि आर्थिक बदल घडून आले. ही दोन स्थित्यंतरे खालील प्रमाणे होती:

१) मुघल साम्राज्याच्या राजकीय - अर्थव्यवस्थेचा -हास झाला आणि प्रादेशिक राज्ये निर्माण झाली.

२) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या प्रभावामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत परिवर्तन घडून आले.

अठराव्या शतकात मुघल साम्राज्याला उतरती कळा लागली. नादीरशहा (१७३९) आणि अहमदशहा अब्दाली (१७४८-१७६१) यांच्या सारख्या भारताबाहेरील राज्यकर्त्यांनी मुघल साम्राज्यावर हल्ले केले. भारतातील मराठे, जाट, रोहिला व शीख लोकांनी मुघलांच्या विरुद्ध उठाव केला. मुघल साम्राज्याची अर्थव्यवस्था कोलमडली. मुघल सम्राट कर्जबाजारी झाला. त्याची प्रशासनावरील पकड जवळजवळ नष्ट झाली. भारताच्या राजकीय परिस्थितीतील हा बदल अत्यंत जलद गतीने झाला. सन १७०० साली मुघल सम्राट औरंगजेबाने आपल्या सत्तेचा उच्चांक गाठला होता. मात्र, १७३० साला पर्यंत मुघल साम्राज्यामध्ये प्रादेशिक राज्यकर्त्यांच्या प्रभाव निर्माण झाला होता. अवध व बंगाल ही राज्ये जवळजवळ स्वतंत्र असलेल्या राज्यकर्त्यांकडे गेली होती. मराठे व जाट सरदारांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली होती. १७६० साला पर्यंत ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने जवळपास सर्व पूर्व भारत आपल्या अधिपत्याखाली आणला होता व भारतीय वस्तूंच्या बाजारपेठेवर मक्तेदारी निर्माण करायला सुरुवात केली होती.

अठराव्या शतकातील ह्या स्थित्यंतरांचा सखोल अभ्यास इतिहासकारांनी केला आहे. ह्या स्थित्यंतरांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर केलेल्या परिणामाच्या संदर्भात अनेक नामवंत आर्थिक इतिहासकारांमध्ये एक सजीव

वाद देखील निर्माण झाला. भारताच्या इतिहासलेखन शास्त्रात या वादाला 'अठराव्या शतकासंबंधीचा वाद' (Eighteenth Century Debate) असे म्हणतात.

अठराव्या शतकाबद्दल इतिहासकारांनी दोन वेगवेगळे अन्वयार्थ मांडले आहेत. काही इतिहासकार हे मत मांडतात की मुघल साम्राज्याच्या ऱ्हासामुळे भारतामध्ये गोंधळ व अराजकता (chaos and anarchy) माजली. अर्थव्यवस्था पूर्णपणे मोडली. ह्या पारंपारिक मांडणीला अलीकडील काळात इतिहासकारांनी आव्हान दिले आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करणारे इतिहासकार हे मांडतात की, जरी मुघल साम्राज्याचे पतन झाले असले तरी भारतात 'गोंधळ व अराजकता' माजली नाही. प्रादेशिक राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली काही प्रदेशांमध्ये सामाजिक व आर्थिक भरभराट घडून आली. अनेक राजकीय प्रश्न असूनही भारतीय अर्थव्यवस्थेचा विस्तार सुरूच राहिला.

अठराव्या शतकात मुघल साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण झाली. लष्करी संघर्ष सुरू झाले. या परिस्थितीचा परिणाम काही क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर नक्कीच झाला. उदा. मुघल केंद्रीय सत्ता क्षीण झाल्यावर व अफगाणी सरदारांची अनेक आक्रमणे झाल्यामुळे दिल्ली शहराचा –हास साहजिकच झाला. दिल्लीमधील कारागीर वर्ग इतर शहरांकडे स्थलांतरित झाल्याचे पुरावे मिळतात. शीख लोकांनी उठाव केल्यामुळे लाहोर शहराकडे जाणाऱ्या व्यापारी मार्गावर अडथळे निर्माण झाले. याचा फटका आग्रा शहराला बसला. सन १७१२ नंतर आग्रा शहराला उतरती कळा लागली. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्तर भारतातील अनेक शहरांची अर्थव्यवस्था खुंटली होती. बंगाल, बिहार व ओरिसा मध्ये मराठ्यांच्या आक्रमणाचे परिणाम झाले. ह्या परिसरात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला आणि अंतर्गत व परदेशी व्यापार खुंटला. पश्चिम बंगाल मधील सुती व रेशमी कापडाच्या विणकरांनी पूर्व बंगालकडे स्थलांतर केले. अठराव्या शतकात पश्चिम भारतातील 'मुघल साम्राज्याचे बंदर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरत शहराचा जलद –हास होण्यास सुरुवात झाली. याचे प्रमुख कारण सुरतच्या व्यापाऱ्यांनी 'पर्शियन बाजारपेठ' गमावली हे होते. गुजरात मधील मराठ्यांच्या आक्रमणामुळे तेथील रेशीम कापड उद्योगाला तडाखा बसला. दक्षिण भारतातही काही क्षेत्रामध्ये उद्योग व व्यापार खुंटल्याचे चित्र आढळते. दक्षिणेतील 'आरकोट' राज्याच्या नवाबाने जमीन महसूल 'मक्ता' पद्धतीने गोळा करण्यासाठी द्यायला सुरुवात केली होती. महसूल गोळा करणारे एजंट शेतकऱ्यांच्या कडून डोईजड महसूल गोळा करू लागले होते.

राजकीय अस्थिरतेचा परिणाम काही प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेवर झाला असला तरी भारताच्या बहुतेक प्रदेशांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. सन १७१२ नंतर उतरती कळा लागलेले आग्रा शहर १७८७ सालापर्यंत पूर्वस्थितीला आले होते. दिल्ली शहरातील श्रीमंत लोकांनी आग्रा शहराकडे स्थलांतर केले होते. जाट आणि मराठा सरदारांनी आग्रा शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना दिली. आर्थिक इतिहासकारांना असे आढळून आले आहे की, उत्तर भारतातील पश्चिमेस असलेल्या शहरांचा –हास झाला असला तरी पूर्वेच्या दिशेला असलेल्या शहरांना भरभराट आली होती. मराठा आक्रमणांनी व अलीवर्दी खानाच्या जाचक राजवटीमुळे बंगालच्या अर्थव्यवस्थेवर थोडाच परिणाम झाला होता. बंगालच्या अर्थव्यवस्थेचा लक्षणीय –हास १८५७ सालानंतर ब्रिटीश राजवटीमध्ये झाला. सन १७५० मध्ये कासीमबाजार येथील रेशीम कापड

उद्योगाला भरभराट आलेली आढळते. बंगालमधील सुती कापड व साखर उद्योग देखील मोठ्या प्रमाणात विस्तारीत झाला होता. बंगालमध्ये अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जवळजवळ १० लाख विणकर अस्तित्वात होते असा अंदाज इतिहासकारांनी केला आहे. थोडक्यात, जरी राजकीय अस्थिरता व लढायांनी काही क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला असला तरी सर्व भारताची अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती असे समजणे चुकीचे होईल.

राजकीय अस्थिरता व लढायांनी सर्व प्रदेशातील व्यापारावर परिणाम केला असे नाही. पटना व बनारस शहरांच्या पश्चिम भारताबरोबरच्या व्यापारावर राजकीय परिस्थितीचा फार परिणाम झाल्याचे आढळत नाही. सुरत शहराच्या व्यापाराचे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुनरूज्जीवन झाल्याचे आढळते.

मुघल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर अस्तित्वात आलेली नवीन प्रादेशिक राज्ये ही व्यापाराची केंद्रे बनली होती. अवध राज्याचे फैजाबाद शहर हे समृद्ध परिस्थितीत होते. दख्खन मधील आसफजहां निजामाच्या राज्याची आर्थिक परिस्थिती बळकट होती.

आर्थिक इतिहासकारांच्या मते, अठराव्या शतकात एखाद्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन नुकसान झाले असले तरी यामुळे इतर प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होत होता. उदा. सुरत शहराचा व्यापार खुंटल्याचा फायदा बंगालला झाला.

ब्रिटीश राजवट स्थापन होण्याच्या पूर्वसंध्येला भारतीय अर्थव्यवस्थेचा एकसमान ऱ्हास झाला होता असे आपल्याला म्हणता येणार नाही. भारतातील अनेक प्रदेशात अर्थव्यवस्था प्रबळ परिस्थितीत असल्याचे आढळते. भारतातील बहुतेक लोकांची आर्थिक परिस्थिती पूर्वीच्या काळापेक्षा फार वेगळी होती असे आपल्याला म्हणता येणार नाही. भारतीय उपखंडात कोणत्याही प्रकारचा एकसमान आर्थिक ऱ्हास (uniform economic decline) झाल्याचे चिन्ह दिसत नाही. ऐतिहासिक पुरावे पाहिल्यास बहुतांश सर्वसाधारण लोकांची आधीच्या काळात असलेल्या परिस्थितीपेक्षा अठराव्या शतकात फार वेगळी परिस्थिती नव्हती.

**ब्रिटीश पूर्व काळातील पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्था :** 'जजमानी पद्धती' ही भारतातील पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अशा प्रकारची पद्धत महाराष्ट्रामध्ये 'बलुतेदारी-अलुतेदारी पद्धत' म्हणून ओळखली जात होती. ग्रामीण भागातील प्रभावशाली शेतकरी जाती आणि कारागीर जातींच्या मध्ये एकमेकांना परस्परपूरक संबंध जजमानी पद्धती / बलुतेदारी पद्धतीच्या माध्यमातून निर्माण होत असत. जात ही आर्थिक संघटन ठरवणारा महत्त्वाचा घटक होती. उत्पादनात जातीचे महत्त्व असल्यामुळे उच्च कोटीचे विशेषीकरण निर्माण झाले होते. उदा. उत्तर भारतातील दिगंबर जातीचे लोक तूप आणि उसाचा रस ठेवण्यासाठी चामड्याच्या पिशव्या तयार करत असत. चर्मकार जातीचे कारागीर चामड्यापासून पादत्राणे व दोऱ्या तयार करत असत.

कापड उत्पादन सोडल्यास शेतकऱ्याला लागणाऱ्या सर्व वस्तू जजमानी पद्धतीच्या माध्यमातून गावातील कारागीर वर्ग त्याला पुरवत असे. वस्तूंच्या मोबदल्यात कारागिरांना शेती उत्पादनातील परंपरेने ठरवलेला

हिस्सा मिळत असे. गावातील कारागीर बाजारपेठेसाठी सुद्धा उत्पादन करू लागले होते. बंगाल मधील कुंभार छोट्या व्यापाऱ्यांच्या साठी वस्तू तयार करू लागले होते. महाराष्ट्र आणि तामिळनाडूतील कुंभार वीट व घर बांधकाम उद्योग करून जास्त पैसे मिळवू लागले होते. थोडक्यात पारंपारिक जजमानी पद्धतीने आपले अस्तित्व टिकवून ठेवले असले तरी तिच्यावर बाजारपेठेचा प्रभाव पडू लागला होता.

शेती हे बहुतेक लोकांच्या उपजीविकेचे साधन होते. भारतामध्ये दोन प्रकारचे शेतकरी स्पष्टपणे आढळतात.

१) जमिनीवर मालकी हक्क व वारसा हक्क असलेला शेतकरी वर्ग, ज्यांना जमीनदार, रयत, मुकादम, मालक असे म्हटले जात असे.

२) असा शेतकऱ्यांचा वर्ग ज्याला जमिनीवर कोणत्याही प्रकारचा मालकी अथवा वारसा हक्क नव्हता. अशा शेतकऱ्यांना फारसी कागदपत्रांमध्ये माजारा, असामी किंवा राया असे म्हंटले आहे. हे शेतकरी जमिनीच्या मालकांना खंड भरत असत. त्यांचे वहिवाटीचे हक्क पक्के नव्हते.

ब्रिटीश-पूर्व काळात उत्तर भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेत जहागिरदार व जमीनदार यांची महत्त्वाची भूमिका होती. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जमीनदार हे महसूल गोळा करण्याच्या यंत्रणेमध्ये महत्त्वाचे झाले होते. जमीनदाराच्या ताब्यात जमिनीचा एक पट्टा असे जो त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने वारसा हक्काने मिळत असे. जमीन महसूल भरणे व सरकारच्या आदेशांचे पालन करणे ह्या अटींवर त्याला जमिनीच्या पट्ट्यावर ताबा मिळत असे. मुघल साम्राज्यात जमीनदारी पद्धत सर्वत्र पसरली होती. मात्र, वेगवेगळ्या प्रदेशात ह्या पद्धतीमध्ये छोटे-मोठे फरक आढळतात.

सामान्य शेतकऱ्यांवर जमीन महसुलाचा बोजा खूप होता. पूर्वी मुघल साम्राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशात उत्पादनाच्या १/३ ते १/२ भाग महसूल म्हणून गोळा केला जात असे. पण कमी सुपीकता असलेल्या जमिनींवर उत्पादनाच्या १/९ भाग इतका कमी जमीन महसूल आकारलेला आढळतो. मैसूर इलाख्यात हैदर अलीची राजवट स्थापन होण्याच्या आधीच्या काळात बागायती जमिनीच्या उत्पन्नातून २/३ भाग जमीन महसूल आकारल्याचे पुरावे मिळतात.

खेडेगावात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यामध्ये 'सावकार' अथवा 'महाजन' हे महत्त्वाची भूमिका पार पाडत असत. पण सावकारांवर अनेक पारंपारिक निर्बंध असल्यामुळे ते शेतकऱ्यांचे शोषण करू शकत नव्हते. उदा. पश्चिम भारतातील दामदुप्पट परंपरा कर्जावरील सर्व व्याज मूळ कर्जाच्या रक्कमेपर्यंत सीमित करत असे. म्हणजे सावकार किंवा वाणी कर्जाच्या मूळ रक्कमे इतकेच व्याज गोळा करू शकत असे. नंतर मूळ कर्जावरील व्याज वाढायचे थांबत असे. वाणी हा गावातच रहात असे. शेतकऱ्याचे शोषण केल्यास शेतकरीवर्ग त्याच्यावर बहिष्कार घालत असे. त्याला राज्य-संस्था मदत करत नसे. गावची पंचायत शेतकरी वर्गाच्या ताब्यात असल्यामुळे ती नेहमीच शेतकऱ्याच्या बाजूने निर्णय देत असे. सावकाराला दिलेल्या कर्जाची मूळ रक्कम परत मिळवण्यासाठी शेतकऱ्याच्या घरासमोर 'सत्याग्रह' करावा लागल्याची आपल्याला समकालीन कागदपत्रात अनेक उदाहरणे सापडतात.

मध्य अठराव्या शतकापर्यंत भारतीय कृषीव्यवस्थेवर बाजारपेठेचा प्रभाव वाढला होता. अनेक प्रदेशांमध्ये शेतकऱ्यांनी बाजारपेठेसाठी उत्पादन सुरू केले होते. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना लागवडीसाठी आगाऊ रक्कम देण्याची पद्धत अस्तित्वात आलेली होती. नगदी पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात वाढली होती. अठराव्या शतकात नीळ, तुती, अफू व ऊस ही नगदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जाऊ लागली होती. मुघल राजांनी फळांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले होते. पोर्तुगीज लोकांनी आणलेली तंबाखू व मका या सारखी नवीन पिके सर्वत्र माहिती झाली होती. मात्र, भारतामध्ये वापरले जाणारे शेती तंत्रज्ञान युरोप, जपान व चीनच्या तुलनेत मागासलेले होते. मुघल काळात उद्यान विज्ञानातील (horticulture) बदल सोडले तर अनेक वर्षे भारताच्या शेती तंत्रज्ञानात कोणताही बदल घडून आला नव्हता. सर्व भारतामध्ये शेतकऱ्यांनी वापरलेली अवजारे ही निकृष्ट दर्जाची होती. बहुतेक सामान्य शेतकरी लाकडी नांगराचा उपयोग करीत असत. भारतामधील लोखंडी नांगरांचे प्रमाण अतिशय अल्प होते. भारतातील बहुतेक शेतकरी वर्ग गरीब असल्यामुळे त्यांनी वापरलेली अवजारे देखील मागासलेली होती. मात्र, असे असले तरी भारताचे दर एकरी शेतकी उत्पादन हे ब्रिटन आणि अमेरिकेमधील उत्पादनाच्या समान होते. म्हणजे भारतातील शेतकरी मागासलेली अवजारे वापरूनही शेती तंत्रज्ञानात पुढारलेल्या देशातील शेतकऱ्यांच्या इतके उत्पादन करत असे. याचे कारण हे होते की ब्रिटीश पूर्व काळात भारताची लोकसंख्या कमी होती. यामुळे शेतकरी वर्गाला फक्त सुपीक जमिनींवर, विशेषतः नदी काठी असलेल्या जमिनींवर लागवड करणे शक्य होते. सुपीक जमिनीवर मागासलेली अवजारे वापरून भारतीय शेतकरी चांगले उत्पादन मिळवू शकत होता.

ग्रामीण भागातील लोक त्यांच्या बहुतेक गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक उत्पादनावर अवलंबून होते. लोकांना लागणाऱ्या वस्तू त्यांना जजमानी पद्धतीच्या माध्यमातून गावातील कारागीर वर्ग तयार करून देत असे. वस्तू विनिमय फार मोठ्या प्रमाणात होत नसे. पण शेतकरी वर्ग देखील वस्तू उत्पादन प्रक्रियेत सहभागी होत असत, याचे पुरावे आपल्याला सापडतात. काही शेतकरी सूत कताई करत असत. म्हैसूर, महाराष्ट्र, पंजाब आणि उत्तर बंगाल येथील शेतकरी स्वतःच्या वापरासाठी जाडेभरडे कापड तयार करत असत. बंगाल आणि उत्तर भारतातील शेतकरी रेशीम, नीळ, साखर आणि तेल देखील तयार करत असत. मीठ, सोरामठ (बंदुकीची दारूसाठी लागणारे संयुग) व लोखंड उत्पादनात शेतकरी जाती गुंतल्याचे आढळते. बिहारमध्ये शेतकरी वर्षाचे पाच महिने लोखंड तयार करण्यामध्ये गुंतलेला असे.

ब्रिटीश पूर्व काळात बहुतेक वस्तू उत्पादन ग्रामीण भागातच होत असे. असे असले तरी शहरी व ग्रामीण भागांमध्ये वस्तू उत्पादनाची स्थानिक केंद्रे (localised centers of manufactures) अस्तित्वात आली होती. काही शहरे आणि खेडेगावांमध्ये एखादी वस्तू तयार करणारे कारागीर एकत्रित राहू लागले होते. बंगालमधील गावांमध्ये कापड विणकरांच्या मोठमोठ्या वस्त्या अस्तित्वात आल्या होत्या. ह्या वस्त्यांना 'औरंग' असे म्हटले जात असे. मध्य अठराव्या शतकात व्यापारी मोठ्या प्रमाणात सुती आणि तलम कापड गावातील ह्या 'औरंग' मधूनच विकत घेत असत.

शेती प्रमाणेच मागासलेले तंत्रज्ञान आणि अवजारे हे भारतातील उद्योगव्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. मध्य अठराव्या शतकापर्यंत युरोप आणि चीन हे धातुशास्त्र, छापखाना यंत्रणेत व अवजार आणि उपकरणांच्या

तंत्रज्ञानात भारतापेक्षा जास्त प्रगत होते. मात्र, मागासलेली अवजारे आणि उपकरणे असली तरी भारतीय कारागीर आपल्या प्रतिभेचा, कौशल्य आणि क्षमतेचा उपयोग करून उत्तम गुणवत्तेच्या वस्तूंचे उत्पादन करत होता. थोडक्यात भारतीय वस्तूंची गुणवत्ता ही विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नव्हती तर कारागीरांच्या कला कौशल्यामुळे निर्माण झालेली होती. भारतामधील कापड विणकर आपल्या अविकसित हातमागावर कौशल्याच्या जोरावर युरोप मधील कापडापेक्षा उत्तम नक्षीकामयुक्त कापड करू शकत असे.

तांत्रिकदृष्ट्या भारतीय उद्योग मागासलेला होता. भारतातील लोक बीड (cast iron), काच (glass) तयार करू शकले नाहीत. भारतामध्ये खनिज कोळशाचा मोठा साठा होता. मात्र, लोकांनी त्याचा वापर उद्योगात केला नाही. ह्या काळातील भारतीय तंत्रज्ञानाच्या दोन प्रमुख उपलब्धी होत्या. १) सुरत येथील जहाज बांधणी उद्योगाने युरोपीय जहाजांशी तुलना होऊ शकेल अशी जहाजे निर्माण केली होती २) भारतीय कारागीरांनी लोखंडी तोफा तयार केल्या. मात्र ह्या तोफा युरोपियन तोफांच्या तुलनेत कमी प्रतीच्या होत्या.

मध्य अठराव्या शतकापर्यंत व्यापाऱ्यांचे वस्तू उत्पादन करणाऱ्या कारागीर वर्गावरचे नियंत्रण वाढले होते. याची प्रचिती आपल्याला भारतातील काही ठिकाणी अस्तित्वात असलेल्या 'ददन' किंवा 'दद्री' पद्धतीतून येते. ह्या पद्धतीमध्ये व्यापारी कारागीरांना आगाऊ (advance) रक्कम किंवा त्यांना लागणारा कच्चा माल देत असे. कारागीराने वस्तू तयार केल्यावर त्या ज्या व्यापाऱ्याकडून आगाऊ रक्कम मिळाली आहे त्यालाच विकणे बंधनकारक असे. दद्री पद्धतीमुळे व्यापाऱ्यांचे कारागीरांवरील नियंत्रण वाढले. ही पद्धत बंगाल मध्ये सुरू झाली आणि लवकरच देशाच्या इतर भागांमध्ये पसरली. इ.स. १६७० च्या दशकात काशी विरांना नावाच्या एका व्यापाऱ्याने भारताच्या पूर्वी समुद्र किनाऱ्यावरील हजारो गावातील विणकरांना दद्री पद्धतीच्या माध्यमातून आगाऊ रक्कम दिली होती. ह्या सर्व गावांना 'विरांनाची गावे' असे ओळखले जात होते. दद्री पद्धतीचा उपयोग करून देशी व परदेशी व्यापारी बयाना इलाख्यातील नील, बंगाल व कोरोमंडल इलाख्यातील कापड, काश्मीरमधील शाल इत्यादी वस्तू व्यापार करण्यासाठी विकत घेत असत.

वस्तू उत्पादनाच्या संघटनांवर बाजारपेठेचा देखील प्रभाव पडला. कापडापासून जहाज बांधणी उद्योगातील कारागीरांना दररोजचा पगार मिळायला सुरुवात झाली. काही वेळेला ते व्यापाऱ्यांच्या थेट देखरेखीखाली काम करत असत. इ.स. १६७० च्या दशकात मद्रास येथील ईस्ट इंडिया कंपनीला कापड पुरवणाऱ्या विणकरांच्या दररोजच्या पगाराचा (daily wages) उल्लेख आढळतो. मध्य अठराव्या शतकापर्यंत आर्मेनियन व्यापाऱ्यांनी रेशीम धागा गुंडाळणारे कारागीर पगारावर ठेवले होते. जहाज बांधणी उद्योगातील पारसी मास्तरच्या (Parsee Master Builder) हाताखाली दररोज पगार दिले जाणारे कारागीर काम करत असत.

सर्वच कारागीर दाद्री पद्धतीवर अथवा व्यापाऱ्यांच्या पगारावर अवलंबून होते असे नाही. मध्य अठराव्या शतकात बंगालमध्ये असे श्रीमंत विणकर अस्तित्वात होते ज्यांनी आपल्या उद्योगामध्ये स्वतःचे भांडवल गुंतवले होते. अशा प्रकारचे विणकर हे तयार केलेले कापड स्वतःच बाजारपेठेमध्ये विकत असत. लखनौ शहरातील अशा विणकरांनी आपल्या उद्योगामध्ये ५०० कारागीरांना नोकरीला ठेवल्याचे उल्लेख

सापडतात. काश्मीर मधील काही 'उस्ताद' शाल तयार करण्याचा कारखाना चालवत होते. ह्या कारखान्यात शाल विणण्यासाठी जवळजवळ ३०० हातमाग होते. थोडक्यात, ब्रिटीश पूर्व काळात भारतातील उद्योग क्षेत्रात 'भांडवलदारी' वृत्ती अस्तित्वात नव्हती असे आपल्याला म्हणता येणार नाही.

ब्रिटीश-पूर्व काळातील उद्योगव्यवसायात थोडीफार भांडवलदारी वृत्ती असली तरी त्यांनी उद्योगव्यवस्थेचे अधिष्ठान असलेल्या 'जातिव्यवस्थेवर' कोणताही परिणाम केला नव्हता. उदा. (१) विणकरांची प्रत्येक उपजाती वेगळ्या प्रकारचे कापड तयार करत असल्यामूळे कापड उद्योगात विशेषीकरण निर्माण झाले होते. (२) कारागीरांच्या 'श्रेण्या' जातीवर आधारलेल्या होत्या. श्रेणीचा प्रमुख उत्पादनाच्या पारंपारिक पद्धती व गुणवत्ता टिकवून ठेवत असे. (३) कधी कधी व्यापाऱ्यांच्या अखंड श्रेणीचे कारागीरांच्या श्रेणी वर नियंत्रण असे. अशा प्रकारचे उद्धरण आपल्याला गुजरातमधील अगेट खनिजाच्या उद्योगात सापडते.

ब्रिटीशपूर्व काळात सागरी व्यापारामध्ये तेजी आली होती. युरोपियन व्यापारी कंपन्यांनी आशियाई व पूर्व आफ्रिकेतील देशांबरोबरचा भारताचा व्यापार जास्त समृद्ध केला होता. १६व्या शतकात पोर्तुगीज लोकांनी सागरी व्यापारावर मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. ह्यामुळे भारतीय व्यापारी आशियाई देशांबरोबरच्या व्यापारातून दूर झाले होते. मात्र, मध्य अठराव्या शतकापर्यंत भारतीय व्यापाऱ्यांचा सहभाग पुन्हा वाढल्याचे आढळते.

भारतातील तीन प्रदेश मोठ्या प्रमाणात वस्तूंची निर्यात करत होते:

१) गुजरात - आशियाई आणि आफ्रिकेतील देशांना जाड्याभरड्या कापडाची निर्यात

२) कोरोमंडल किनारा- तलम कापडाची निर्यात

३) बंगाल - तलम कापडाची निर्यात

अठराव्या शतकात ह्या तिन्ही प्रदेशात मोठमोठे व्यापारी आणि सावकार अस्तित्वात होते. सुरत मधील अब्दुल गफूर खान, बंगाल मधील जगत शेठ घराणे व आर्मेनियन व्यापारी खोजा सहाद आणि खोजा वाजीद आणि कोरोमंडल किनाऱ्यावरील सुकर रामा शेट्टी हे जगप्रसिद्ध व्यापारी होते.

भारताच्या सागरी व्यापारामध्ये युरोपीय कंपन्यांची भूमिका महत्त्वाची असली तरी सागरी व्यापारावर इतर घटकांनी परिणाम केला. मध्य अठराव्या शतकातील सागरी व्यापारावर परिणाम करणारे घटक खालील प्रमाणे होते:

१) भारताच्या सागरी व्यापारातील गुजरात प्रदेशाचे महत्त्व कमी झाले आणि बंगाल प्रदेशाचे महत्त्व वाढले.

२) इराणमधील सफाविद साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळे गुजराती व्यापाऱ्यांनी एक महत्त्वाची बाजारपेठ गमावली. गुजरातमधील मुसलमान व्यापारी हे भारताच्या परदेशी व्यापारातील महत्त्वाचे घटक होते. त्यांना ह्या घटनेमुळे मोठा तडाखा बसला. गुजराती व्यापाऱ्यांचा ऱ्हास झाल्यामुळे भारतीय सागरी व्यापारात युरोपीय व्यापाऱ्यांचे महत्त्व वाढले.

भारतातील व्यापाऱ्यांच्यामध्ये विशेषीकरण घडून आल्याचे आढळते. ठरावीक प्रदेशाच्या व्यापारावर एखाद्या विशिष्ट समूह अथवा जातीतील व्यापाऱ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झालेले दिसते. प्रदेश आणि त्यांच्या व्यापारात प्रभुत्व असलेल्या जाती / समूह खालील प्रमाणे होत्या :

१) दक्षिण कोरोमंडल किनारा – शेट्टी व्यापारी

२) उत्तर कोरोमंडल किनारा – कोमती आणि मुसलमान व्यापारी

३) सूरत – वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेले मुसलमान व्यापारी आणि बनिया व्यापारी

४) उत्तर बंगाल आणि बिहार – पठाण व्यापारी

५) दक्षिण बंगाल – बंगाली हिंदू व्यापारी

७) मलबार किनारा – कोकणी आणि अरब व्यापारी

६) पश्चिम भारत – सिंधी व्यापारी

८) आर्मेनियन व्यापारी सर्वत्र पसरलेले होते पण ते जास्त संख्येत बंगाल आणि कोरोमंडल किनाऱ्यावर होते.

९) मारवाड प्रदेशातील सावकार सर्व भारतभर पसरण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– २**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) ग्रामीण भागातील शेतकरी जाती आणि कारागीर जातींच्या परस्परपूरक संबंध असण्यास उपयुक्त अशी कोणती पद्धत अस्तित्वात होती ?

(२) भारतातील कोणते तीन प्रदेश मोठ्या प्रमाणात वस्तूंची निर्यात करत होते ?

(३) अठराव्या शतकात कोणती नगदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जाऊ लागली होती?

(४) भारतीय वस्तूंची गुणवत्ता ही कशामुळे निर्माण झाली होती?

(५) अठराव्या शतकात भारताच्या सागरी व्यापारातील कोणत्या प्रदेशाचे महत्त्व कमी होऊन बंगाल प्रदेशाचे महत्त्व वाढले ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) बंगालमधील विणकरांच्या मोठमोठ्या वस्त्यांना ............. म्हणत.

(२) जजमानी पद्धती सारखी पद्धत महाराष्ट्रामध्ये .............. म्हणून ओळखली जात होती.

(३) दद्री पद्धतीमुळे .............. चे कारागीरांवरील नियंत्रण वाढले.

(४) ................. ला जमिनीचा पट्टा वंशपरंपरेने वारसा हक्काने मिळत असे.

(५) पोर्तुगीज लोकांनी आणलेली ............. व मका या सारखी नवीन पिके सर्वत्र माहिती झाली होती.

### १.२.३ अठराव्या शतकासंबंधी वाद–विवाद

इतिहास हे गतकाळाचे आकलन करून देणारे सामाजिक शास्त्र आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्राला आत्मभान, आत्मविश्वास देण्यासाठी, सदसदविवेकबुद्धी विकसित करण्यासाठी इतिहासाचा अभ्यास महत्वाचा असतो. त्यामुळेच भारताचा विशेषतः वसाहतपूर्व भारताच्या इतिहासाचे आकलन करून घेताना इतिहासातील १८व्या शतकाबाबतचा विवाद समजून घेणे आवश्यक ठरते. १८ वे शतक जगभर विशेषतः युरोपामध्ये हे सर्वांगीण परिवर्तनाचे शतक होते. भारतात याकाळात मुघल व इतर प्रादेशिक एतद्देशीय सत्तांचा –हास झाला व ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीची सुरुवात झाली. हा राजकीय स्वरूपाचा बदल व त्यानुषंगाने झालेल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बदलाबाबत इतिहासकारांनी परस्परविरोधी स्वरूपाची मांडणी केली आहे. साम्राज्यवादी वा वसाहतवादी व केम्ब्रिज विचारधारेच्या इतिहासकारांनी १८व्या शतकाला स्थितप्रज्ञतेचा काळ (Age of Stagnation) वा काळा कालखंड (Dark Age) म्हटले आहे. तर अलीकडे काही इतिहासकारांनी हा दावा सप्रमाण खोडून काढला आहे. यातूनच १८व्या शतकाबाबतच्या विवादाचा उगम झाला. त्यामुळे १८ व्या शतकाचे नेमके स्वरूप समजून घेण्यासाठी १८व्या शतकाबाबतचा विवाद समजून घेणे आवश्यक आहे.

#### (अ) राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक

१८व्या शतकाबाबतच्या इतिहासाचे लेखन प्रथम वसाहतवादी इतिहासकारांनी केले. हे शतक राजकीय अराजकतेचे व स्थितीशिलतेचे होते अशी मांडणी या इतिहासकारांनी केली. अशी मांडणी प्रथम जेम्स मिल याने आपल्या History of India (१८१७) या ग्रंथात केली. या दाव्याला पूरक असे इतिहास लेखन उपयुक्ततावादी विचारधारा व केम्ब्रिज स्कूलच्या इतिहासकारांनी केले. भारतातील राष्ट्रवादी इतिहासकारांनी वसाहतवादी / साम्राज्यवादी इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास कसा एकांगी व चुकीचा आहे हे सांगण्यासाठी इतिहासलेखन केले. त्यांची भूमिका वसाहवादी इतिहास लेखनाच्या विरोधातील होती. असे असले तरी राष्ट्रवादी विचारधारेच्या इतिहासकारांनी १८ व्या शतकाबाबत वसाहतवादी इतिहासकारांची मांडणी खोडून काढली नाही. त्यांनीही १८ व्या शतकाला राजकीय अस्थिरतेचा व अराजकतेचा काळ असे म्हटले. साम्राज्यवादी इतिहासकारांनी १८ व्या शतकाबाबत काय व का विवेचन केले आहे हे प्रथम समजून घेणं संयुक्तिक ठरेल.

**१. राजकीय अराजकतेचा काळ :** १८व्या शतकात भारताच्या राजकीय क्षेत्रात दोन महत्वाच्या घटना घडल्या. पहिली घटना होती, १७०७ साली बादशहा औरंगजेबाचा मृत्यू होऊन मुघल साम्राज्याचा ऱ्हास सुरु झाला व दुसरी घटना म्हणजे, १८५७ च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटीश सत्तेची मुहूर्तमेढ रोवली गेली. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना मुघल साम्राज्य सांभाळता आले नाही. त्यांचा आपसात सत्तासंघर्ष सुरु झाला. त्यातच बादशहाच्या सरदारांनी स्वतंत्ररित्या राज्यकारभार पाहायला सुरुवात केली. मुघलांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन देशाच्या विविध भागात प्रादेशिक राज्यांचा उदय झाला. या प्रादेशिक

सत्तांचा उदयाने मुघल साम्राज्याचे वेगाने -हास घडून आला. याबाबत वसाहतवादी किंवा साम्राज्यवादी इतिहासकारांनी असे लिखाण केले की, संपूर्ण भारतवर वर्चस्व असलेल्या मुघल सत्तेचा -हास झाला. त्यामुळे भारतात राजकीय अस्थिरता व त्यातून अराजकता निर्माण झाली. तसेच मुघल सत्तेच्या ऱ्हासानंतर उदयास आलेल्या प्रादेशिक सत्ता आपापसात सतत संघर्ष करत असल्याने राजकीय अस्थिरतेत भर पडली. मात्र, ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता स्थापनेमुळे ही अराजकता संपुष्टात आली व राजकीय स्थैर्य निर्माण झाले. अशीच भूमिका केम्ब्रिज स्कूलच्या इतिहासकारांनीही घेतली आहे.

राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटीश वसाहतवादी इतिहासकारांच्या १८व्या शतकाबाबतच्या या भूमिकेला विरोध केला नाही. त्यांनीही राजकीय अराजकता असल्याचे मान्य केले. तसेच ही राजकीय अराजकता ज्या मुघल सत्तेच्या ऱ्हासामुळे आली होती तिची सखोल कारणमीमांसा केली. सर जदुनाथ सरकार यांनी मुघल सत्तेच्या ऱ्हासाला औरंगजेबाच्या कडव्या धार्मिक धोरणांना जबाबदार धरले. औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे हिंदू व शीख धर्मिय दुखावले गेले व त्यांनी उठाव केले. ज्यामुळे मुघल साम्राजाचा ऱ्हास झाला असे प्रतिपादन केले आहे.

मात्र मार्क्सवादी व आर्थिक इतिहासकारांनी मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाची भौतिकवादी दृष्टीकोनातून कारणमीमांसा केली आहे. मार्क्सवादी इतिहासकार इरफान हबीब यांनी मुघल सत्ता ही तिच्या विरोधात झालेल्या विविध बंडांमुळे ऱ्हास पावली असे म्हटले आहे. मात्र, ही बंडे राष्ट्रवादी इतिहासकार म्हणतात तशी औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे झाली नाहीत तर मुघल राज्यकर्त्यांनी जमीन महसूलाचा दर वाढवल्याने झालीत. डोईजड महसुलामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला, त्याची परिणीती जाट, सतनामी, शिखांनी बंड केले. त्यातून मुघल सत्तेचा ऱ्हास झाला.

इतिहासकार सतीश चंद्र आणि अतहर अली यांनी औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाऐवजी जहागीरदारी संकटास मुघल सत्तेच्या ऱ्हासाला कारणीभूत धरले आहे. औरंगजेबाच्या काळात मुघल सत्तेचा दक्षिण भारतात विस्तार झाला. दक्षिण भारतातील सरदारांना सत्तेत सामावून घेण्यासाठी जहागीरदाऱ्या वाटाव्या लागल्या. दक्षिण भारताचा औरंजेबाने जिंकलेला भाग तितकासा सुपीक नसल्याने त्याला उत्तर भारतातील जहागिरी वाटाव्या लागल्या. त्यामुळे जहागिरी देण्यासाठी जमिनी कमी पडल्या. त्यामुळे प्रशासकीय अडचणी व त्यातून आर्थिक संकट निर्माण झाले. त्याची परिणीती मुघल सत्तेच्या ऱ्हासात झाली.

एकूणच १८ व्या शतकाच्या सुरुवातीलाच मुघल सत्तेचा ऱ्हास झाला. त्यामुळे भारतात राजकीय अराजकता निर्माण झाली आणि इस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात स्थापन झाल्याने हे राजकीय अस्थैर्य संपले अशी मांडणी साम्राज्यवादी ब्रिटीश इतिहासकारांनी केली आहे. राष्ट्रवादी इतिहासकारांनी त्याला अप्रत्यक्ष सहमती दिली आहे.

**२. आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता :** मुघल सत्तेच्या ऱ्हासामुळे भारतातील राजकीय स्थैर्य संपुष्टात आले. त्यामुळे राजकीय अराजकता निर्माण झाली त्याचा फटका अर्थव्यवस्थेला बसला. त्यातून १८ व्या शतकात आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता आली. असा दावा साम्राज्यवादी इतिहासकारांनी

केला. मुघल सत्तेच्या –हासानंतर शहरीकरण व व्यापार मंदावला. मुघलांच्या शहरीकरणाचा व व्यापाराचा आधार ग्रामीण भागातून येणारा शेतसारा होता. मात्र शेतकऱ्यांच्या उठावामुळे ग्रामीण भागातून येणारा शेतसारा खंडित झाला. त्याचा परिणाम व्यापार व शहरीकरण यावर होऊन त्यांची गती मंदावली. म्हणून मुघल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर भारतात आर्थिक स्थितीशिलता आली.

तसेच मुघल सत्तेच्या आश्रयामुळे भारतात कला, साहित्य, स्थापत्य, चित्रकला, संगीत असा विविधांगी सांस्कृतिक विकास झाला होता. मात्र मुघली सत्तेच्या ऱ्हासामुळे राजकीय आश्रयाआधारे विकसित झालेल्या कला, साहित्य, संगीत, स्थापत्य यांची गती मंदावली. राजकीय व आर्थिक स्थितीशिलतेचा परिणाम सांस्कृतिक स्थितीशिलतेवर झाला व सांस्कृतिक विकासाची गती खुंटली. एकूणच, १८ व्या शतकात मुघल साम्राज्याचा ऱ्हास झाल्याने आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता आली.

ब्रिटीश साम्राज्यवादी विचारधारेच्या इतिहासलेखनानुसार १८ वे शतक हे राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक होते. म्हणूनच ते भारताची इतिहासातील काळा कालखंड (Black Era) होता. मात्र १८व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे भारतातील परिस्थिती बदलली. सन १७५७ ची प्लासीची लढाई व १७६४ ची बक्सारची लढाईने ब्रिटिशांनी बंगाल जिंकला. सन १७९९ ला टिपूचा पराभव करून म्हैसूरचे राज्य जिंकले, १८१८ साली मराठ्यांचे राज्य जिंकले, १८४८ला शिखांचे राज्य जिंकले, तैनाती फौज पद्धती वापरून भारतीय राज्ये आपल्या अंकित बनवली. यातून १७५७ ते १८५७ या काळात ब्रिटिशांनी संपूर्ण भारतावर आपला अंमल बसवला. साम्राज्यवादी इतिहासकारांनी केलेल्या दाव्यानुसार ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यामुळे भारतातील राजकीय अराजकता संपुष्टात आली. राजकीय सत्ताप्राप्त करत असताना ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने भारताच्या अर्थव्यवस्थेत बदल केले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे सुरु झाली. एकंदर वसाहतवादी इतिहासकारांच्या इतिहासलेखनानुसार ब्रिटीश राजवट भारतात आल्याने भारतातील राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक जडपणा संपला. मात्र पुढील काळात १८ व्या शतकाबाबत जे सखोल व आंतरविद्याशाखीय संशोधन झाले. त्यातून वेगळे चित्र समोर येते.

**(ब) राजकीय स्थिरता, आर्थिक सुबत्ता व सांस्कृतिक विकासाचा काळ**

१८ वे शतक अराजकता व स्थितीशिलतेचे शतक होते, या दाव्याला छेद देणारी मांडणी प्रथम १९७०च्या दशकात एरिक स्टोक्स (The First century of British Colonial Rule या निबंधात) यांनी केली. असेच लेखन १९८०च्या दशकात ख्रिस्तोफर बेली यांनीही केले, त्यात १८ वे शतक हे राजकीय अराजकतेचे शतक असल्याने ब्रिटीशांची सत्तास्थापना कशी योग्य होती हा वसाहतवादी इतिहासकारांचा दावा सप्रमाण खोडून काढला. स्टोक्स व बेली यांच्या लेखनामुळे १८व्या शतकाच्या इतिहासाबाबतच्या विवादास सुरुवात झाली. त्यातच वसाहतपूर्व दक्षिण भारतावर डेव्हिड वॉशब्रूक यांनी, मराठ्यांच्या व्यापारावर फ्रांक पर्लीन, सुमित गुहा यांनी, मराठा इतिहासावर आंद्रे विंक, स्टूअर्ट गॉर्डन यांनी, अवध सुभ्यावर मुजफ्फर

आलम यांनी, हैद्राबादवर लिओनार्ड यांनी, बंगालवर अब्दुल करीम, पी. जे. मार्शल, ओम प्रकाश यांनी, पंजाबवर चेतनसिंग, याशिवाय प्रादेशिक इतिहासावर अशीनदास गुप्ता, बी. आर. ग्रोवर, करन लिओबार्ड, रिचर्ड बार्नेट यांनी इतिहासलेखन केले. या इतिहासलेखनात प्रादेशिक इतिहास लेखनाला प्राधान्य दिले. तसेच युरोपियन भाषातील वा फारशी भाषेतील साधनाऐवजी मराठी, बंगाली, पंजाबी अशा प्रादेशिक भाषातील साधनांचा वापर या इतिहासकारांनी केला. यातून १८व्या शतकाबाबत एक नवी मांडणी समोर आली जी जुन्या वसाहतवादी इतिहासलेखनाला नाकारणारी होती.

**१. राजकीय अराजकतेचा नव्हे, राजकीय स्थिरतेचा काळ :** मुघल सत्तेचा ऱ्हास होऊन भारतात राजकीय अराजकता निर्माण झाली. हा दावा अर्धसत्य आहे कारण मुघल सत्तेच्या ऱ्हासाने निर्माण झालेली राजकीय पोकळी प्रादेशिक सत्तांच्या उदयाने भरून निघाली. महाराष्ट्रात मराठा साम्राज्य, दक्षिणेत निजाम, पंजाबमध्ये शिख, म्हैसूरमध्ये हैदर अली, बंगालमध्ये नवाब मुर्शिदकुलीखान, अवधमध्ये नवाब सादतखान, इ. प्रादेशिक सत्ता देशाच्या विविध भागात अस्तित्वात आल्या. यातील काही राज्ये मुघल सरदारांची होती, तर काही स्वतंत्र सत्ताधीशांची होती. या प्रादेशिक राज्यांनी आपापल्या राज्यात प्रशासकीय रचना व महसूल व्यवस्था निर्माण केली. आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. सोबत व्यापार वाढीला प्रोत्साहन दिले. त्यांच्या धोरणामुळे आर्थिक विकास होण्यास मदत झाली. एकूणच भारतात ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापन होण्यापूर्वीच प्रादेशिक सत्तांच्या उदयामुळे राजकीय स्थिरता निर्माण झाली होती. वसाहतवादी इतिहासकारांनी १८व्या शतकाबाबतची राजकीय अराजकता असल्याचे इतिहासलेखन एकांगी स्वरूपाचे आहे. हे नव्या इतिहासलेखनातून समोर आले.

**२. आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशीलता नव्हे, तर सुबत्ता व विकासाचा काळ :** मुघल साम्राज्याचा ऱ्हास झाल्यावर या साम्राज्याच्या आधारे जी अर्थव्यवस्था विकसित झाली होती तिचा आधार संपला. हे जरी सत्य असले तरी याच काळात नव्याने उदयास आलेल्या प्रादेशिक सत्तांनी भारतीय अर्थव्यवस्थेला आधार दिला. त्यामुळे अठराव्या शतकात भारतभर लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली. त्यातून शेतीचे उत्पन्न वाढले. सोबत प्रादेशिक सत्तांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे हस्तकलेचा विकास झाला. या काळात कापड उद्योगाची प्रगती झाली. ढाका, अहमदाबाद, मच्छलीपट्टणम, येथील सुती कापड, मुर्शिदाबाद, आग्रा, लाहोर व गुजरात मधील रेशमी कापड, काश्मीर, लाहोर, आग्रा येथील शाली यांची मागणी वाढली. गालिचे, दागिने, भांडी, ढाली यांचीही मागणी वाढली. यातून अंतर्गत व बाह्य व्यापारात वाढ झाली. आशिया व युरोपशी व्यापार वाढला. व्यापार वाढीने भारतातील अर्थव्यवस्थेचा विस्तार होण्यास मदत झाली. १८व्या शतकात विशेषतः १७४० नंतर मराठा प्रदेशात व्यापारात वाढ झाल्याचे सुमित गुहा यांनी सिद्ध केले. अवध प्रांतातही व्यापारात वाढ झाली त्यातून आर्थिक संपन्नता आली असा निष्कर्ष मुझफ्फर आलम यांनी काढला आहे. बंगालमध्ये कापड व्यापाराने भरारी घेतली त्यामुळे युरोपातून मोठ्या प्रमाणात चलनाचा ओघ बंगालकडे सुरु झाला. आणि ब्रिटीश सत्ता येईपर्यंत तो चालू राहिल्याचे निरीक्षण प्रादेशिक इतिहासकारांनी नोंदवले आहे. एकूणच १८ व्या शतकाबाबत आर्थिक ऱ्हासाची जुनी मांडणी नव्या संशोधनामुळे मागे पडली आणि आर्थिक समृद्धीचे शतक असा नवा इतिहास समोर आला.

अठराव्या शतकातील व्यापाराची भरभराट झाल्याने सावकार, व्यापारी व जमीनदार या भांडवलदार वर्गाच्या उदयास पोषक वातावरण निर्माण झाले. तसेच प्रादेशिक सत्ता स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध गटांचा पाठिंबा मिळवण्यात मुघलांपेक्षा यशस्वी झाल्या. या काळात भारतभर श्रीमंत व्यापारी, सावकार व जमीनदार यांनी नव्या राजकीय व्यवस्थेला आधार दिला. उदा. १८व्या शतकात मराठ्यांच्या राज्यात सावकारांनी महसूल व्यवस्था व सैन्याच्या खर्चासाठी पतपुरवठा करण्यात महत्वाची भूमिका बजावली. याच काळात हुंडी पद्धतीचे प्रचलन वाढले ज्यामुळे दूरवरच्या ठिकाणी पैश्याची देवाणघेवाण करणे अधिक सुलभ व निर्धोक बनले. या सर्व प्रादेशिक सत्तांना जशी सावकार व व्यापारी वर्गाची मदत झाली तशी सावकार, जमीनदार व व्यापारी वर्गाला या नव्या राजकीय बदलाचा आर्थिक फायदा झाला. यातून त्याच्या श्रीमंतीत भर पडली. उ. भारतात जगतसेठ, नगरसेठ, द. भारतात शेट्टी या सावकारांचा उदय झाला. बंगालच्या नवाबाचे सावकार जगतसेठ सावकार बैंक ऑफ इंग्लंडएवढे श्रीमंत होते. बंगाली व्यापाऱ्यांचे शासनाच्या टांकसाळी वर नियंत्रण होते. एकूणच या सर्वातून १८ व्या शतकातील आर्थिक समृद्धी असल्याची साक्ष पटते.

प्रादेशिक सत्तांनी आर्थिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकासास प्रोत्साहन दिले. हैद्राबाद, लखनौ, जयपूर, मुर्शिदाबाद या प्रादेशिक राज्याच्या राजधान्या सांस्कृतिक विकासाची केंद्रे बनल्या. मुघल साम्राज्याच्या ऱ्हासामुळे आश्रयहीन झालेल्या दरबारातील कलाकारांना या प्रादेशिक राज्यांनी आश्रय दिला. १७८४ साली अवधचा नवाब असउद्दौलाने लखनौमध्ये इमामवाडा ही प्रसिद्ध इमारत बांधली. सवाई जयसिंह या राजाने १७८६ साली जयपूर, दिल्ली, काशी, येथे पाच वेधशाळा बांधल्या. शिखांचा राजा रणजीतसिंह याने अमृतसर येथील सुवर्ण मंदिरास संगमरवर लावले, त्याच्या कळसाला सोन्याचा पत्रा लावला. सुरजमल जाट याने आण्यासारख्या इमारती बांधण्याचा प्रयत्न केल्या. यातून लक्षात येते की, सांकृतिक विकास खुंटला नव्हता. यातून १८व्या शतकाबाबत नवे आकलन सामोरे येते ज्यातून राजकीय स्थिरता, आर्थिक सुबत्ता व सांकृतिक विकास असल्याचे चित्र समोर येते.

अशा प्रकारे दोन परस्परविरोधी स्वरूपाच्या इतिहास लेखनातून १८व्या शतकाबाबत विवाद समोर येतो. एका बाजूला १८ वे शतक हे राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक होते. किंबहुना ते अंधकार युग होते आणि ब्रिटीश सत्तेची भारतात स्थापना झाल्यामुळे भारतात राजकीय स्थिरता आली व आर्थिक विकासाला सुरुवात झाली अशी इतिहासाची मांडणी वसाहतवादी वा साम्राज्यवादी इतिहासकारांनी केली. तर दुसऱ्या बाजूला १८ व्या शतकात भारतात राजकीय स्थिरता व आर्थिक सुबत्ता होती, तसेच सांकृतिक विकासालाही गती होती अशी इतिहासाची नव्याने मांडणी केली आहे.

या दोन्ही मांडणीच्या अभ्यासांती आपण या निष्कर्षाप्रत येतो की, १८ वे शतक राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्ता व सांस्कृतिक विकासाचे होते ही मांडणी ऐतिहासिक सत्य वाटते. साम्राज्यवादी वा वसाहतवादी इतिहासकारांनी केलेले इतिहासलेखन हे ब्रिटीश सत्तेची भारतात स्थापना कशी योग्य आहे. अशा दृष्टीने केली आहे. यातून ब्रिटीश सत्ताधीशांनी भारतातील आपल्या सत्तेला इतिहास लेखनाच्या माध्यमातून लोकमान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटीश भारतात आल्यावर भारताला राजकीय ऐक्य

लाभले, भारतीय अर्थव्यवस्था जगाच्या अर्थकारणाशी जोडली गेली एकूणच भारतात आधुनिकता यायला सुरुवात झाली. जरी खरे असले तरी भारत पारतंत्र्यात गेला. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वतंत्र अस्तित्व संपून ती ब्रिटनला उपकारक ठरणारी अर्थव्यवस्थेला वसाहतवादी अर्थव्यवस्था बनली. त्यामुळे आर्थिक बदलांचा फायदा इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेला झाला भारताच्या नाही. ब्रिटीश राजवटीत भारताच्या अमर्याद शोषणाची सुरुवात झाली. भारत अधिक दरिद्री बनला. शेती मागास राहिली. उद्योगांचा विकास झाला नाही. त्यामुळे १८व्या शतकाला काळा कालखंड म्हणण्यापेक्षा भारतातील ब्रिटीश सत्तेचा काळ हाच खऱ्या अर्थाने अंधकार युग (An Era of Darkness) होते असे म्हणणेच योग्य ठरेल.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) कोणत्या इतिहासकारांनी १८व्या शतक हे राजकीय अराजकता असल्याचा एकांगी निष्कर्ष काढला ?

(२) १८ वे शतक अराजकता व स्थितीशिलतेचे शतक होते, या दाव्याला छेद देणारी मांडणी प्रथम १९७०च्या दशकात कोणी केली ?

(३) १८व्या शतकात विशेषतः १७४० नंतर मराठा प्रदेशात व्यापारात वाढ झाल्याचे कोणी सिद्ध केले?

(४) मुघलांच्या शहरीकरणाचा व व्यापाराचा आधार कोणता होता ?

(५) औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाऐवजी जहागीरदारी संकटास मुघल सत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत आहे अशी मांडणी कोणी केली ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) ब्रिटीश सत्ताधीशांनी भारतातील आपल्या सत्तेला इतिहास लेखनाच्या माध्यमातून ........... मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

(२) मार्क्सवादी व आर्थिक इतिहासकारांनी मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाची .......... दृष्टीकोनातून कारणमीमांसा केली आहे.

(३) ............... यांनी मुघल सत्तेच्या ऱ्हासाला औरंगजेबाच्या कडव्या धार्मिक धोरणांना जबाबदार धरले.

(४) प्रादेशिक सत्तांनी आर्थिक विकासाबरोबरच ............ विकासास प्रोत्साहन दिले.

(५) बंगालच्या नवाबाचे सावकार ........... सावकार बँक ऑफ इंग्लंड एवढे श्रीमंत होते.

## १.५ सारांश

भारताच्या इतिहासातील अठरावे शतक हा अत्यंत महत्त्वपूर्ण स्थित्यंतराचा काळ आहे. अठराव्या शतकात जुन्या परंपरांचे, व्यवस्थांचे पतन होऊन नव्या परंपरा, व्यवस्था उदयाला आल्या. भारतीय इतिहासाचा प्रवास मध्ययुगातून आधुनिक युगात याच शतकात झाला असे काही इतिहासकार मानतात. म्हणजेच अठराव्या शतकात झालेले बदल हे भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम करणारे ठरले. अठराव्या शतकात भारतात शक्तिशाली मानले गेलेले मुघल साम्राज्य औरंगजेबच्या मृत्युनंतर खिळखिळे होण्यास सुरवात झाली. अनेक अंतर्गत व बाह्य कारणे ही मुघल साम्राज्याच्या पतनाला कारणीभूत ठरली. मुघलांच्या केंद्रीय सत्तेचा जरी ऱ्हास झाला तरी मुगलांच्या सुभेदारांनी आपल्या प्रदेशात मुघल सम्राटाला नाममात्र महत्त्व देऊन स्वत:ची जवळपास स्वतंत्र प्रादेशिक राज्ये स्थापन केली. हैद्राबाद, अवध, बंगाल इत्यादी मुघल सुभ्यांची प्रादेशिक राज्ये बनली. मुगल साम्राज्यातील राजपूत राजांनी देखील आपल्या वतन जहागिरीत आपला प्रभाव वाढविण्यास सुरवात केली. शीख, मराठा आणि जाट ही प्रादेशिक राज्ये मुघल साम्राज्याशी संघर्ष करून शक्तिशाली बनली. मराठा राज्य तर पुढे काही काळाकरिता भारतभर विस्तारले. भारतात आलेल्या युरोपीय व्यापारी कंपनी मधील इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने व्यापार करण्यासोबतच राजकीय क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली. बंगालमधील सत्ता हस्तगत करून हळूहळू इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व निर्माण केले. अशारीतीने अठराव्या शतकात मुघल साम्राज्य ते प्रादेशिक राज्ये आणि प्रादेशिक राज्ये ते ईस्ट इंडिया कंपनी असे दोन टप्प्यातील राजकीय स्थित्यंतर घडून आले.

अठराव्या शतकातील राजकीय स्थित्यंतराचे सामाजिक व आर्थिक परिणाम होणे साहजिक होते. तरी देखील अठराव्या शतकातील समाज हा पारंपारिक पद्धतीचाच राहिला आणि त्यात खूप काही बदल घडून आला नाही. समाजात सावकार, व्यापारी इत्यादींच्या सारखा धनिक वर्ग प्रभावी बनल्याचे मात्र दिसून येते. अठराव्या शतकातील अर्थव्यवस्थेच्या संदर्भात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. मुघलांच्या केंद्रीय सत्तेचा ऱ्हास झाल्यामुळे तिच्याशी संबंधी अर्थव्यवस्था क्षीण होण्याची प्रक्रिया सुरु झाली. दुसरी कडे प्रादेशिक राज्यांचा उदय झाल्यामुळे प्रादेशिक अर्थव्यवस्थेला उभारी मिळून प्रादेशिक शहरांची भरभराट झाली. भारताचा सागरी व्यापार मोठ्याप्रमाणात वाढला.

अठरावे शतक हे राजकीय व आर्थिक स्थित्यंतराचा काळ होता. अठराव्या शतकातील स्थित्यंतरांचा भारतीय इतिहासावर मोठा परिणाम झाल्याने अठराव्या शतकाच्या इतिहासाच्या अभ्यासाबद्दल इतिहासकारांना रस आहे. अठराव्या शतकातील राजकीय व आर्थिक बदलांचा आवाका लक्षात घेऊन इतिहासकारांनी विविध क्षेत्रांवर नव्याने संशोधन केले. परिणामी, अठराव्या शतकाबद्दलची पारंपारिक मांडणी व नवी मांडणी असा वाद इतिहासकारांमध्ये झडला. अठरावे शतक हे अंधार युग होते की समृद्धीचे युग होते यावर इतिहासकारांचे मतभेद झाले. इतिहासकारांमधील या वाद-विवादामुळे अठराव्या शतकाच्या भारतच्या इतिहासाचे अनेक पैलू समोर आल्याचे दिसते.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**सुभा :** मुघल साम्राज्यातील प्रांत

**सुभेदार :** सुभ्याच्या प्रशासनाची जबाबदारी असलेला अधिकारी

**इजारा :** बोली लावणाऱ्यास महसूल गोळा करण्याचा दिलेला अधिकार अथवा ठेका

**इजारादार:** इजाराचे अधिकार प्राप्त करणारा

**जथ्था :** शीखांच्या सैन्य तुकड्या

**चौथाई :** महसुलाचा चौथा हिस्सा

**ददन/दद्नी :** व्यापाऱ्यांद्वारे कारागीरांना आगाऊ (advance) दिलेली रक्कम किंवा कच्चा माल देण्याची पद्धत

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) मुघल सैन्यव्यवस्था आणि मुघल प्रशासनव्यवस्था

(२) इराणचा बादशाह नादीरशाह

(३) निजाम-उल-मुल्क आसफजहां

(४) अवध

(५) बैसाखी आणि दिवाळी

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) सुरजमल जाट (२) उज्जैन (३) सतीश चंद्र (४) इरफान हबीब

(५) सरदेशमुखी

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) जजमानी पद्धती / बलुतेदारी पद्धती

(२) गुजरात, कोरोमंडल किनारा आणि बंगाल

(३) नीळ, तुती, अफू व ऊस

(४) कारागीरांच्या कला

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) औरंग (२) बलुतेदारी-अलुतेदारी पद्धत (३) व्यापाऱ्यांचे (४) जमीनदार (५) तंबाखू

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) वसाहतवादी (२) एरिक स्टोक्स (३) सुमित गुहा

(४) ग्रामीण भागातून येणारा शेतसारा (५) इतिहासकार सतीश चंद्र आणि अतहर अली

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) लोकमान्यता (२) भौतिकवादी (३) सर जदुनाथ सरकार (४) सांस्कृतिक (५) जगतसेठ

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) अठराव्या शतकातील प्रादेशिक राज्यांच्या उदयाची प्रक्रिया स्पष्ट करा.

(२) मुघल सत्तेशी संघर्ष करून प्रादेशिक राज्य निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा.

(३) अठराव्या शतकातील आर्थिक परिस्थितीचे विवेचन करा.

(४) १८ वे शतक हे भारतीय इतिहासातील अंधारयुग होते की नव्हते यासंदर्भात सविस्तर विवेचन करा.

(५) अठराव्या शतका संबंधीचा वाद-विवादाची चर्चा करा.

ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

(१) मुघल सत्तेचा ऱ्हास

(२) मुघलांचे सुभे असलेली प्रादेशिक राज्ये

(३) अठराव्या शतकातील सामाजिक परिस्थिती

(४) मराठा राज्य

(५) भारतातील ब्रिटीश सत्तेचा उदय

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

Dharma Kumar (ed.), The Cambridge Economic History of India, Volume 2, Orient Longman, 2003

Shekhar Bandyopadhyay, From Plassey to Partition: A History of Modern India, Orient Longman, 2004

Ishita Banerjee-Dube, A History of Modern India, Cambridge University Press, 2014

बी.एन. सरदेसाई आणि व्ही. एन. नलावडे, आधुनिक भारताचा इतिहास (१७५०-१९५०), कोल्हापूर

आर. एम. लोहार, आधुनिक भारताचा इतिहास, हर्षल प्रकाशन, सातारा

❑❑❑

## घटक २

# ब्रिटिशांचा भारतावरील विजय

(The British Conquest of India )

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ बंगाल

२.२.२ म्हैसूर

२.२.३ मराठा

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यावर आपल्याला

- इंग्रजांनी भारतात आपली सत्ता कशी स्थापन केली हे समजेल.
- इंग्रजांचे विस्तारवादी व महत्वाकांक्षी धोरणाचे आकलन होईल.
- एतदेशीय सत्तामध्ये ऐक्य का नव्हते हे समजेल.

**२.१ प्रस्तावना :**

इतिहासामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन असे तीन कालखंड मानण्यात येतात. कालखंड ठरवण्याचे गमक सर्वच देशांच्या बाबतीत समान नसते. ज्या घटनेमुळे देशाच्या किंवा भूप्रदेशांच्या इतिहासाला कलाटणी मिळते तेथून वेगळा कालखंड मानला जातो. ज्यावेळी लेखनाची कला मानवाला अवगत झाली त्या वेळेपासून प्राचीन कालखंडाची सुरुवात झाली. त्याच्या पूर्वीच्या कालखंडाला प्रागैतिहासिक कालखंड म्हणण्याची प्रथा आहे. भारताचा विचार करावयाचा झाल्यास सोयीप्रमाणे प्राचीन कालखंड, सुलतानशाहीचा कालखंड (१२०६ ते १५२६), मुघल कालखंड (१५२६ ते १७५०), याला

मध्ययुगीन कालखंड मानतात. भारतीय अर्वाचीन कालखंडाची सुरुवात साधारणतः १७५७ पासून म्हणजे प्लासीच्या लढाईपासून मानण्याकडे विद्वानांचा कल आहे. याच संदर्भात युरोपमधील आधुनिक कालखंडाची सुरुवात इसवी सन १४५३ पासून म्हणजे तुर्कांनी कॉन्स्टंटीनोपलवर हल्ला केला तेव्हापासून मानतात. यावरून आपल्या लक्षात आले असेल की, प्रत्येक देशाची कालखंड मोजण्याची पद्धत वेगळी व आपापल्या सोयीप्रमाणे असते. प्रत्येक कालखंडामध्ये, नुसत्याच ऐतिहासिक घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन युद्धावर किंवा परकीय आक्रमणावर अवलंबून नसतो. तर युद्ध किंवा आक्रमणाच्या जोडीला नवे विचार, नवे साहित्य, नवे  तत्त्वज्ञान श्रेष्ठ व्यक्ती यांचा सुद्धा विचार केला जातो. थोडक्यात ज्या घटनांमुळे देशाच्या जडणघडणीवर दीर्घकालीन परिणाम होत असतो त्या घटनांमुळे नवा कालखंड सुरू होतो असे मानतात. आधुनिक भारताची सुरुवात जरी आपण प्लासीच्या लढाईपासून मानली तरी सोयीसाठी, लक्षात राहण्यास सोपे वर्ष यादृष्टीने १७५० पासून भारतीय आधुनिक काळाची सुरुवात होते. हे गृहीत धरून आपल्याला आधुनिक भारताचा इतिहास समजून घ्यावयाचा आहे. आधुनिक काळात पोर्तुगीज, डच, फ्रेंच व ब्रिटिश भारतामध्ये का व कशासाठी आले याचाही विचार होणे आवश्यक आहे. या युरोपियन राष्ट्रांनी भारताच्या विविध क्षेत्रात आपली प्रभावाची क्षेत्रे निर्माण केली परंतु यापैकी ब्रिटिशांनाच भारतात साम्राज्य निर्माण करता आले. या युरोपीय राष्ट्रांना भारताविषयी आकर्षण वाटण्याची कारणे कोणती याचाही विचार होणे गरजेचे आहे इसवी सन १७५० नंतरच्या कालखंडाला आधुनिक भारताची सुरुवात होते. या कालखंडासंबंधी ब्रिटिश व भारतीय इतिहासकारांनी विपुल असे लिखाण केले आहे. प्रत्येक इतिहासकाराने आपापल्या पद्धतीने अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

१५ व्या व १६व्या शतकापासून युरोपियन लोक भारताच्या किनाऱ्यावर येऊ लागले प्रथम आले ते पोर्तुगीज त्यांच्यानंतर डच, इंग्रज व फ्रेंच आले. ही सर्व व्यापारी मंडळी होती. पण आपल्याकडील व्यापाऱ्याप्रमाणे ते साधे बनिये  नव्हते. ते उत्तम दर्यावर्दी  होते, तसेच वेळ पडल्यास हातातील तागडी टाकून तलवार हाती घेण्याची त्यांची तयारी होती. तशी तलवार त्यांनी हाती घेतली ती प्रथम आपल्या व्यापार धंद्याच्या संरक्षणासाठी, पण त्यांच्या या व्यवहारात अपेक्षेपेक्षा अधिक फायदा होतो आहे हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या  तलवारी येथे स्वतःची राज्य स्थापन करण्याच्या कामी चालविल्या. सर्वच युरोपियन अशा व्यवहारात तरबेज होते, विलक्षण धाडसी होते, पण त्या सर्वांमध्ये इंग्रज व्यापारी अधिक तरबेज, अधिक धाडसी व मुत्सद्दी ठरले. कालौघात आपल्या इतर युरोपियन सहकाऱ्यांना मागे टाकून त्यांनी भारताच्या साम्राज्याचे पक्क फळ आपल्या पदरात घट्ट बांधून घेतले. भारताचे साम्राज्य ही काही सामान्य गोष्ट नव्हती. इंग्रज त्या साम्राज्याला आपल्या राणीच्या मुकुटातील कोहिनूर हिराच मानत होते. हा हिरा संपादन करण्यासाठी त्यांनी भारतातील प्रांतीय सत्ताधीशांची संघर्ष करून आपल्या हाती मिळविला. अशा या प्रांतीय सत्ताधीशांमध्ये बंगाल, मैसूर व मराठा या सत्ताधीशांबरोबर इंग्रजांनी दिलेला संघर्ष कशा स्वरूपाचा होता हे पाहणे गरजेचे ठरेल. प्रस्तुत प्रकरणात इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने हे साम्राज्य कसे स्थापन केले आणि कोणत्या हिकमतीने वाढविले याचा आपण थोडक्यात वृत्तांत पाहणार आहोत.

**'ब्रिटिश साम्राज्य' असे का म्हणतात?**

ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये स्थापन केलेले साम्राज्य इंग्लिश साम्राज्य या नावाने इतिहासात नमूद न होता ते 'ब्रिटिश साम्राज्य' या नावाने प्रसिद्ध  आले. असे का हे प्रथम आपण समजून घेतले पाहिजे. ज्या इंग्रजांनी हे साम्राज्य स्थापन केले त्या इंग्रजांच्या देशाचे मूळ नाव 'ग्रेट ब्रिटन' असे आहे. इंग्लंड हा ग्रेट ब्रिटनचा एक मोठा भाग आहे. इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड, उत्तर आयर्लंड व शेजारची शेकडो लहान लहान बेटे या सर्वांनी मिळून ग्रेट ब्रिटन हा देश बनला आहे. आणि म्हणूनच ईस्ट इंडिया कंपनी ही मूळची इंग्लंडची असली तरी तिने निर्माण केलेले साम्राज्य संपूर्ण देशाच्या मालकीचे म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या मालकीचे होते. म्हणूनच या साम्राज्याला 'ब्रिटिश साम्राज्य' असे म्हणत आणि हे साम्राज्य भारतात चालविणाऱ्या लोकांना ब्रिटिश लोक असे म्हणत.

प्रस्तुत प्रकरणात आपण इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करून एतदेशीयांचा पराभव करून संपूर्ण भारत पादाक्रांत केला व आपला एकछत्री अंमल कसा सुरु केला हे पहावयाचे आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ बंगाल (Bengal)

ब्रिटिश म्हणजे केवळ व्यापार करणारे बनिये नसून ते लढाऊ राजकारणी, प्रसंगी तलवार हाती घेऊन युद्ध करणारे हिकमती लोक आहेत, हे त्यांच्या कर्नाटकातील उद्योगावरून स्पष्ट झाले होते. कर्नाटकचा नवाब चंदासाहेब व त्यास पाठिंबा देणारे फ्रेंच यांचा पराभव करून ब्रिटिशांनी कर्नाटकात आपली राजकीय प्रतिष्ठा निर्माण केली होती. कर्नाटकच्या नवाबीवर आपल्या वतीने नवाब स्थापून त्यांनी किंगमेकरची भूमिका पार पाडली होती. अशाच प्रकारचा प्रयोग त्यांनी लवकरच बंगालच्या नवाबा बाबत ही करावयाचे ठरविले आणि त्यात ते  कमालीचे यशस्वी झाले.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचे मोगल साम्राज्य कमकुवत झाले. ठिकठिकाणी सुभेदारांनी आपली स्वतंत्र राज्य स्थापन केली. ते केवळ नाममात्र मोघलांचे सुभेदार होते. बंगालमध्ये अलीवर्दीखान हा देखील १७४० मध्ये स्वतंत्र झाला. तो १७५६ मध्ये मरण पावला. त्याच्या मुलीचा मुलगा सिराज उद्दौला हा २४ वर्षांचा तरुण बंगालचा नवाब बनला. अलीवर्दी खानाने आपल्या काळात इंग्रजांना किल्ले बांधण्याची परवानगी दिली नव्हती. त्याने मराठ्यांच्या आक्रमणानंतर मराठ्यांना ओरिसा प्रांत व बंगालची चौथ  देऊन मैत्री ठेवली होती. त्यानंतर बंगालचा नवाब सिराज उद्‌दौला व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात २३ जून १७५७ रोजी बंगालमध्ये प्लासी येथे झालेल्या लढाईत ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या विजयाने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला गेला. अशा या प्लासीच्या लढाईची कारणे पाहणे गरजेचे ठरते

**प्लासीच्या लढाईची कारणे**

**१. ब्रिटिशांची संरक्षणाची तयारी:** इसवी सन १७५६ मध्ये युरोप खंडात इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्ये सप्तवार्षिक युद्धाला प्रारंभ झाला होता त्याचे पडसाद भारतात उमटतील हे गृहीत धरून बंगालमध्ये फ्रेंचांनी

चंद्रनगर भोवती व ब्रिटिशांनी आपल्या कलकत्ता वखारी भोवती तटबंदी बांधण्यास प्रारंभ केला. शस्त्रात्रांची जमवाजमव केली. परंतु ब्रिटिशांनी कलकत्ता वखारीभोवती तटबंदी बांधण्यासाठी बंगालचा नवाब सिराजउद्दोलाची परवानगी घेतली नाही म्हणून नवाबाने तटबंदी पाडण्यास ब्रिटिश व फ्रेंच यांना सांगितले. फ्रेंचांनी चंद्रनगर भोवती तटबंदी बांधण्याचे काम तात्काळ थांबविले. पण ब्रिटिशांनी त्यास नकार दिला त्यामुळे ब्रिटिश व नवाब यांचे संबंध बिघडण्यास प्रारंभ झाला.

**२. ब्रिटिशांकडून परवानगीपत्राचा गैरवापर:** मोगल बादशहा फार्रुखशियर याने ईस्ट इंडिया कंपनीला एक अधिकार दिला होता. त्यानुसार ३००० रुपये कराच्या मोबदल्यात कंपनी बंगाल, बिहार व ओरिसा या राज्यात कुठेही कर न भरता व्यापार करू शकत होती. पण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी हे वैयक्तिक व्यापार करू लागले. त्यांनी परवानगी पत्र व दस्तक हे अधिकार पत्र भारतीय व्यापाऱ्यांना विकून वैयक्तिक पैसे कमवायला प्रारंभ केला. त्या पत्रांच्या आधारे भारतीय व्यापारी देखील जकात न भरता व्यापार करू लागले. अर्थात हा गैरप्रकार होता. तो सिराजला सहन झाला नाही. त्यामुळेच इंग्रज व सिराज यांच्यातील संबंध बिघडले.

**३. ब्रिटिशांचा सिराज उद्दौलाच्या शत्रूंना आश्रय:** शौकत जंगच्या आईचे नाव घसिटी बेगम असे होते. तिचा दिवाण रायवल्लभ हा होता तर रायवल्लभ चा मुलगा कृष्णदास हा होता. तो आपल्या खजिण्यासह कुटुंबीयांना घेऊन कलकत्ता येथे इंग्रजांना शरण आला. हे सिराजला सहन झाले नाही. इंग्रज व दिवाण राजवल्लभ यांच्यामध्ये पत्रव्यवहार सुरू होता. त्यामुळे सिराजच्या मनात इंग्रजांबद्दल शंका येऊ लागणे स्वाभाविक होते. जेव्हा सिराजने कृष्णदास यास आमच्या ताब्यात द्या असे स्पष्टपणे बजावले त्यावेळी इंग्रजांनी मात्र स्पष्ट नकार दिला. त्यामुळे इंग्रज व सिराज यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झाले. त्यातूनच प्लासीची लढाई उद्भवली.

**४. हिंदू मुस्लिमांमध्ये दुही :** बंगाल प्रांताचे शासक मुस्लिम होते. तर बहुसंख्य जनता हिंदू होती. बंगालमध्ये हिंदू व ब्रिटिश व्यापारी समृद्ध होत चालले होते. सिराजउद्दौलाला हे बरे वाटत नव्हते. त्याने हिंदूंना त्रास देण्याचे धोरण अवलंबिले. तेथील हिंदू प्रजा या मुसलमान नवाबाच्या जोखडातून मुक्त होण्यास आतुर असल्याचे ब्रिटिशांच्या लक्षात आले. ब्रिटिशांनी हिंदूंना हाताशी धरून सिराजउद्दौलाच्या विरुद्ध कटकारस्थान चालविले. यातूनच इंग्रज व सिराजउद्दौला यांच्यामध्ये दरी निर्माण होऊन प्लासीची लढाई झाली.

**५. अंधार कोठडी प्रकरण:** ब्रिटिश तटबंदी बांधायचे काम थांबवत नाहीत हे लक्षात येताच सिराजउद्दौलाने जून १७५६ रोजी ब्रिटिशांविरोधी कारवाई सुरू केली. कासिम बाजार जिंकून घेतले. कलकत्ता ही जिंकून घेतले. ब्रिटिशांनी शरणागती स्वीकारल्याने हा संघर्ष थांबला. परंतु त्यावेळी ब्रिटिश सैनिकांकडून नवाबाच्या काही लोकांचा बळी गेला. त्यामुळे चिडलेल्या शिराज उद्दौलाने कलकत्ता येथील फोर्ट विल्यम मधील १८ फूट लांब व १४ फूट दहा इंच रुंदीच्या खोलीत १४६ ब्रिटिशांना कोंडले. परिणामी जूनचा महिना असल्याने तेथे गर्मी जास्त होती. त्यामुळे त्या लोकांना प्राणवायू न मिळाल्याने गुदमरून १२३ जणांचा

मृत्यू झाला. याच घटनेला अंधार कोठडी प्रकरण या नावाने संबोधले जाते. ब्रिटिशांनी या घटनेचा अचूक फायदा घेण्याचे ठरविले आणि लवकरच सिराजउद्दौला विरोधी लढाई करण्याची तयारी सुरू केली.

**६. सिराज उद्दौला विरोधी कट:** अंधार कोठडीच्या घटनेने ब्रिटिश प्रचंड संताप झाले होते. मद्रास येथील रॉबर्ट क्लाइव्ह व वॅटसन या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सिराज उद्दौलाला धडा शिकविण्याचा व अंधार कोठडीच्या घटनेचा सूड घ्यायचा असे ठरविले. त्यानुसार या दोघांनी कट रचला या गटात नवाबाचा सेनापती व नातेवाईक मीर जाफर तसेच राय दुर्लभ, व्यापारी उमीचंद आणि सावकार जगत सेठ यांना या कटात सामील करून घेतले. तसेच मिरजाफर याला बंगालचा नवा बनविण्याचे आश्वासन देऊन आपल्या गोटात घेतले.

वस्तुतः रॉबर्ट क्लाइव्ह हा काही श्रेष्ठ सेनापती नव्हता, परंतु अर्काटच्या वेढ्यात नशिबाने यश मिळाल्याने त्याला मोठेपण प्राप्त झाले. क्लाईव्हला बंगालच्या नवाबी मध्ये रस होता. कारण त्याचाही खाजगी व्यापार होता. त्याने आपले ३०० पौंडाचे नुकसान झाल्याचे आपल्या पित्याला कळविले होते. त्यानंतर सिराज उद्दौलाविरुद्ध कट करण्याचे ठरले. त्यामध्ये बंगालमधील अनेक प्रतिष्ठित लोक होते. इंग्रजांच्या बाजूने विल्यम वॅट्स, लुक, सेक्रेटन, रॉबर्ट क्लाइव्ह, बंगाली लोकांमध्ये जगतसेठ उमीचंद, मिरजाफर, रायदुर्लभ राय इत्यादी होते. या सर्वांनी मिळून सिराजउद्दौलाविरुद्ध कट रचला परंतु यामध्ये जगतसेठ उमीचंद याने रॉबर्ट क्लाइव्ह याच्याकडे तीस लाख रुपयांची मागणी केली. अन्यथा हा कट आपण सिराजउद्दौलाला सांगू अशी धमकी दिली. रॉबर्ट क्लाइव्हलाही हा कट लवकरात लवकर अंमलात आणण्याची करण्याची घाई झाली होती. बंगालच्या संरक्षणासाठी दिल्लीचा वजीर सैन्य घेऊन येत आहे. अशी गुप्त बातमी इंग्रजांना कळली होती. जगतसेठ उमीचंदला फसवण्याची योजना रॉबर्ट क्लाइव्ह आणि आखली. रॉबर्ट क्लाइव्हने ३० लाख रुपयाचे दोन बॉण्ड्स तयार केले. पैकी एका पांढऱ्या बॉण्ड्वर सेठ अमीचंदला द्यावयाच्या ३० लाख रुपयाचा उल्लेख नव्हता. त्या बॉण्डवर रॉबर्ट क्लाइव्ह व वाटसन यांच्यासह्या होत्या. तांबड्या बॉण्डवर तीस लाख रुपये असा उल्लेख होता. पण तो बॉण्ड खोटा होता. वॉटसन याने अशा बॉण्डवर सही करण्यास नकार दिला. रॉबर्ट क्लाइव्हने वॉट्सनची खोटी सही केली. प्लासीच्या लढाईनंतर फक्त पांढरा बॉण्ड दाखवून सेठ उमीचंदला पैसे दिले नाहीत. या फसवाफसवीबद्दल रॉबर्ट क्लाइव्हला दोष दिला जातो. परंतु आपलेच नाणे खोटे असेल तर परक्या माणसाला दोष देण्यात काय अर्थ? किंबहुना प्राचीन काळापासून भारताच्या इतिहासात परकीयांना डोक्यावर घेण्याची अनेक उदाहरणे आपल्याला सापडतील. प्राचीन काळातील पोरस राजाविरुद्ध अलेक्झांडरला मदत करणारा आंबी राजा असो, मध्ययुगातील पृथ्वीराज चव्हाण विरुद्ध मोहम्मद घोरिला मदत करणारा जयचंद् राठोड असो भारताच्या प्रत्येक कालखंडात अशा व्यक्ती आपल्याला मिळतात. भारताविषयी खरे प्रेम निर्माण झाले काय? असाच खरा कळीचा प्रश्न आहे. २३ जून १७५७ रोजी प्लासी येथे जी लढाई झाली त्या लढाईमध्ये इंग्रजांचा विजय झाला. बंगालमध्ये ब्रिटिश सत्ता स्थिरावली. प्लासीच्या युद्धाचे परिणाम यादृष्टीने प्लासीच्या लढाईला अनन्य साधारण महत्त्व आहे.

**प्लासीची लढाई:** रॉबर्ट क्लाइव्ह सारखा अत्यंत धाडसी, मुत्सद्दी व महत्त्वकांक्षी नेता यावेळी ब्रिटिशांना लाभला होता हे त्यांचे भाग्य होते. यापूर्वी रॉबर्ट क्लाइव्हने भारताच्या पूर्व किनाऱ्यावर फ्रेंचांवर आणि पश्चिम किनाऱ्यावर अंग्र्यांवर विजय प्राप्त केले होते. आता बंगालच्या भूमीवरही त्याला असाच नेत्र दीपक विजय प्राप्त करायचा होता. तोही पराक्रमापेक्षा फंदफितुरीच्या जोरावर

ब्रिटिशांचा हा बहादूर सेनापती ९०० गोरे शिपाई, १२० हिंदी शिपाई व आठ तोफा एवढे सैन्य घेऊन सिराज उद्दौलावर चालून गेला, मुर्शिदाबाद या आपल्या राजधानीतून सिराज उद्दौला आपल्या प्रचंड सैन्यासह लढाई करण्यास निघाला. त्याच्याजवळ ५० हजार पायदळ १८००० घोडदळ व ५० तोफा होत्या. पण हे प्रचंड सैन्य आतून फंद फितुरीने पोखरलेले होते. प्लासी या गावाजवळ उभय सैन्यांची गाठ पडली. तत्पूर्वीच नवाबाच्या मीर जाफर आणि राय दुर्लभ या सेनानींनी लढाईतून आपले अंग काढून घेतले. हे पाहताच नवाबाचे अवसान गळाले. रणांगणावर फारशी लढाई झालीच नाही ब्रिटिशांचे अवघे २९ शिपाई मारले गेले. तर नवाबांचे ५०० सैनिक मृत्युमुखी पडले. खुद्द नबाबास मुर्शिदाबाद येथे पळून जावे लागले. २३ जून १७५७ रोजी ब्रिटिशांना मोठा विजय प्राप्त झाला. पुढे नवाब सिराजउद्दौला यास पकडून ठार मारण्यात आले. रॉबर्ट क्लाइव्ह याने मीर जाफर यास बंगालचा नबाब म्हणून गादीवर बसविले. अशा प्रकारे बंगालचा नबाब ब्रिटिशांच्या हाती आला.

**प्लासीच्या लढाईचे परिणाम**

इतिहास हे परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. युद्ध शास्त्राच्या दृष्टीने पाहता प्लासीची लढाई फारशी मोठी नव्हती, काही तासातच ही लढाई संपली. मीर जाफर सारखा स्वार्थी मनुष्य ब्रिटिशांच्या ताब्यात आल्याने ब्रिटिशांना हे यश मिळाले. प्राचीन काळापासून भारतीय इतिहासाचा अभ्यास करत असताना इतिहासाची पुनरावृत्ती हे विधान आपल्याला बरेचसे सत्य वाटते. या युद्धाचे परिणाम पाहणे गरजेचे ठरते ते परिणाम खालील प्रमाणे–

१. मीर जाफर यास बंगालचा नबाब बनवण्यात आले. पण ते कळसुत्री बाहुले ठरला.

२. मीर जाफरला मात्र इंग्रजांना पावणेदोन कोटी रुपये द्यावे लागले. क्लाईव्ह यास तीस लाख रुपये तसेच अन्य इंग्रज कर्मचाऱ्यांना बक्षीसे द्यावी लागली.

३. कंपनीला बंगालमध्ये जकात न भरता व्यापार करण्याची परवानगी देण्यात आली.

४. कंपनीला २४ परगण्याची जमीनदारी मिळाली. या प्रदेशाचे वार्षिक उत्पन्न जवळपास दीड लाख पाउंड होते.

५. कलकत्ता येथे कंपनीला स्वतःची नाणी पाडण्याचा अधिकार मिळाला.

६. उमीचंद यास नकली तहनामा दाखविला. त्यास एक पैसाही दिला नाही. ज्याने मध्यस्थी केली त्याला अशा प्रकारे फसविण्यात आले.

**प्लासीच्या लढाईचे मूल्यमापन व महत्त्व :** प्लासीच्या लढाईचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन अनेक संशोधकांनी त्यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा परामर्श आपणास या ठिकाणी घ्यावयाचा आहे. प्लासीच्या लढाईचे महत्त्व भारताच्या इतिहासात एक विशेष वळण देणारे आहे.

१. **एस. सी. हिल** यांच्या मते, प्लासीच्या लढाईची कारणे आपल्याला हिंदू मुस्लिम समाजाच्या दुही मध्ये शोधावी लागतील. हिंदी समाजाचे दोन धर्मीयांमध्ये विभाजन झाले. मुस्लिम राजवटीला हिंदू कंटाळले होते. म्हणून त्यांनी अंतर्गतपणे इंग्रजांना मदत केली. सबब ही लढाई एका अर्थाने हिंदू मुस्लिमांच्या दुहीचे दर्शन घडविते. हिंदू हे इंग्रजांकडे आपले उद्धारक म्हणून पहात असत. जीन लॉ व कर्नल स्कॉट यांनी या सिद्धांताचा पाठपुरावा केला आहे. जीन लॉ असे म्हणतो की, हिंदू लोक मुसलमानांचा सतत राग करीत असत त्यांना मुसलमानांचे वागणे मान्य नव्हते. सिराजच्या पतनानंतर बंगालमधील सेठ सावकारांना हिंदूंचे राज्य निर्माण करावयाचे होते. आपल्या विधानाच्या समर्थनासाठी हिलने आपला मित्र कर्नल स्कॉट यांच्या १७५४ च्या पत्राचा आधार दिला आहे. कर्नल स्कॉट म्हणतो की, हिंदू जनता मुस्लिम जाचाला कंटाळली होती. त्यांना सत्तेमध्ये बदल हवा होता.

२. **प्रो. ब्रिजेन गुप्ता** आपल्या 'सिराजउददोला' या ग्रंथात म्हणतात की, अठराव्या शतकाच्या मध्यास बंगाली समाज धार्मिक तत्त्वावर विभाजित झाला होता. हिंदू संधीची वाट पाहत होते. अर्थात वरील दोघांचे विचार प्रो. सुशील चौधरींना मान्य नाहीत. चौधरींच्या मते, प्लासीची क्रांती ही हिंदूंनी केलेली क्रांती नव्हती तर ब्रिटिशांनी केलेला तो एक कट होता. आपल्या मताच्या समर्थनार्थ चौधरी १७२७ व १७३९ साली बंगालमध्ये झालेल्या दोन क्रांतीची उदाहरणे देतात. दोन्ही बंडा मध्ये हिंदू मुस्लिम सामील होते हे मत व्यक्तिशः मला मान्य नाही. कारण १७३९ मधील परिस्थिती वेगळी होती. अलीवर्दीखानसारखा प्रजाहित दक्ष सुभेदार सत्तेवर होता. पुढे राजाच्या काळात हिंदू वरील अत्याचार वाढले. याविषयीची वर्णने तपन मोहन चटर्जींनी आपल्या 'रोड टू प्लासी' या ग्रंथामध्ये सिराजची वागणूक दिली आहे. त्याचे प्रचंड मद्यपान व इतर वर्तणुकीमुळे त्याच्याबद्दल कोणालाही सहानभूती वाटली नाही.

३. **प्रो. सुशील चौधरी** यांनी असा सिद्धांत मांडला आहे की, त्याकाळी हिंदू मुस्लिम संघर्ष नव्हता. उलट दोन्ही जमातीमध्ये प्रेमाचे संबंध होते. आपल्या मताच्या समर्थनासाठी त्यांनी काही उदाहरणे दिली आहेत.

१. अलीवर्दीखान व सिराजउददोला यांच्या दरबारात किती हिंदू अधिकार अधिकारावर होते याची यादी इंग्रज अधिकारी ओरम यांनी दिली आहे. जॉन कर्सेबूम या डच अधिकाऱ्यांच्या खाजगी नोंदीमध्ये अशीच हिंदू अधिकाऱ्यांची यादी आहे.

२. नवाबाचा प्रमुख सल्लागार हिंदू होता. यूसुफ अलीने मतारीख - ए - बांगला - ए - महाबनजंगीफ हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये त्याने म्हटले आहे की, मोहनलाल हाच सिराजचा मुख्य आधार होता.

३. हिंदू - मुस्लिम एकमेकांच्या शेजारी पिढ्यानपिढ्या राहत असत.

४. क्षेमानंद नावाच्या हिंदू कवीने मबेहुला सुंदरफ नावाचे काव्य लिहिले आहे त्यामध्ये हिंदू मुस्लिम ऐक्याच्या अनेक कथा दिले आहेत.

५. नबाब शहामतजंग मुर्शिदाबाद मध्ये होळीचा सण अनेक दिवस साजरा करीत असे.

थोडक्यात प्रा. सुशील चौधरी हिंदू – मुस्लिम संघर्ष होता. हा सिद्धांत अमान्य करतात.

**रॉबर्ट क्लाइव्ह बंगालचा गव्हर्नर:** प्लासीच्या विजयाचा खरा शिल्पकार रॉबर्ट क्लाइव्ह हा होता. प्लासीची लढाई म्हणजे त्याच्या मुत्सद्देगिरीचा विलक्षण नमुना होता. न्याय अन्यायाची चाड न बाळगता त्याने हा विजय हस्तगत केला होता. म्हणून कंपनीने त्याच्यावर खुश होऊन त्याची बंगालच्या गव्हर्नर पदी नियुक्ती केली. आता कंपनीत बंगालच्या संपत्तीची हाव सुटली होती. बंगालच्या रूपाने त्यांना कामधेनु सापडली होती. बंगालमधून जास्तीत जास्त संपत्ती गोळा करण्याचे कंपनीने ठरविले. मद्रास व मुंबई प्रांताचा सर्व खर्च बंगालच्या संपत्तीतून भागविण्यात येऊ लागला. तसेच याच संपत्तीतून बंगालमधील निर्यातीचा माल देखील खरेदी केला जाऊ लागला. परिणामी नव्या नबाबाकडे ब्रिटिशांच्या मागण्या दिवसेंदिवस वाढू लागल्या. अशा परिस्थितीत कंपनीचे अधिकारी गर्भश्रीमंत बनले. हा सर्व पैसा त्याने बंगालमधील भ्रष्टाचाराने मिळवला होता.

**मीर कासीम बंगालचा नवाब :** कंपनी व तिचे अधिकारी यांच्या सततच्या मागण्या पूर्ण करणे अशक्य असल्याचे लवकरच मीरजाफरला कळून चुकले. तर कंपनीच्या अपेक्षांची परिपूर्ती नबाबाकडून होत नाही. हे कंपनीच्या लक्षात येताच त्यांनी दुसरे एखादे बाहुले बंगालच्या नवाब पदावरती बसवावे असा विचार केला. अशा परिस्थितीत मीरजाफरचा जावई मीर कासीम हा पुढे आला. इंग्रजांनी त्याला बंगालच्या गादीवर बसवून त्याच्याकडून बरद्वान, मिदनापूर व चितगाव या जिल्ह्यांची जमीनदारी व कंपनीच्या अधिकाऱ्यांना २९ लक्ष रुपयांच्या भेटी देण्याचे त्याच्याकडून कबूल करून घेतले व तशा स्वरूपाचा मीर कासिम बरोबर सप्टेंबर १७६० मध्ये करारही करण्यात आला. मीर जाफर याने कोणत्याही प्रकारचा विरोध न दर्शवता नबाब पदापासून बाजूला झाला व तो कलकत्त्याला इंग्रजांच्या आश्रयाला जाऊन राहिला.

एकंदरीत सिराजउद्दौलाच्या ऐवजी ज्या मीर जाफरला इंग्रजांनी नवाबाच्या गादीवर बसविले त्याला ऑक्टोबर १७६० मध्ये जबरदस्तीने बाजूला करून त्या ठिकाणी मीर कासिम यास नवाबाच्या गादीवर बसविले. हा सत्ता बदल म्हणजे नव्याने इंग्रज अधिकाऱ्यांच्या पदरात मोठे लाभ पाडून घेण्याची एक नामी संधी ठरली. त्यांनी त्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. ठरल्याप्रमाणे तीन जिल्ह्यांची जमीनदारी कंपनीला मिळाली पण त्याचबरोबर लक्षावधी रुपयांची बक्षिसे ही कंपनी अधिकाऱ्यांना मिळाली.

**शासक म्हणून मीर कासीमची भूमिका :** पूर्णिया व रंगपूरचा शासक म्हणून उत्कृष्ट कार्य केलेला मीरकासिम हा अलीवर्दीखानानंतरचा सर्वात योग्य नवाब होता. सर्वप्रथम त्याने आपली राजधानी मुर्शिदाबाद वरून मुंगेर येथे हलविले. मुर्शिदाबाद येथे सतत कटकारस्थाने चालत असत व इंग्रजांचा राज्यकारभारामध्ये हस्तक्षेप असे म्हणून या सर्वांपासून मीर कासिम हा दूर राहू इच्छित होता. मुंगेर येथे आल्यानंतर त्याने आपले सैन्य संघटन युरोपियानाप्रमाणे करण्यास सुरुवात केली. बिहारमध्ये असलेला मोगल राजपुत्र अली गौहर

याच्यापासून सावध राहत असतानाच मीरकासिम हा उत्तर दिशेने राज्य विस्तार करू इच्छित होता. त्याला आपली आज्ञा न पाळणाऱ्या जमीनदारांना शासन करावयाचे होते. कारण त्यांच्यापासून मीर कासिम याला धोका संभवत होता. तसेच बंडखोरांचा नेता बिहारचा नायब सुभेदार रामनारायण हा नवाबाची सत्ता मानत नव्हता. काही प्रमाणात त्याला इंग्रजांचे समर्थन होते. या सर्व अडचणीमधून मीर कासिम याला मार्ग काढावयाचा होता. म्हणून त्याने सर्वप्रथम राम नारायण याला सेवामुक्त केले व त्यानंतर त्यास ठार मारले.

आपल्या राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने नबाब मीर काशीम याने बरेच प्रयत्न केले. त्याने जुन्या करांमध्ये वाढ केली व काही नवे कर लागू केले. त्याने भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांविरुद्ध मोहीम काढून दोषी आढळणाऱ्यास दंड केला. त्यामुळे राज्यात मीरकासिम याची स्तुती होऊ लागली. मीरकासिम उत्कृष्ट प्रशासक होता. त्याला प्रशासनातील बारकावे माहीत होते. त्याने आपल्या कारकिर्दीत सर्वांना नियमित वेतन सुरू केले. त्याचबरोबर चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान करून त्यास योग्य ते पारितोषिक दिले. कोणत्या गोष्टीवर किती खर्च करावा ह्याचे ज्ञान मीर कासिम याला अनुभवातून आले होते.

**मीर कासिम व कंपनी संबंध :** मीर कासिम हा आपल्या हातातील खेळणे बनवून आपल्या आर्थिक मागण्या जास्तीत जास्त पूर्ण करेल अशी धारणा कंपनी सरकारला होती. कंपनीलाही असाच माणूस बंगालच्या नवाब पदावर हवा होता. परंतु नबाब मीर कासिम याला कंपनीची साम्राज्यवादी नीती मान्य नव्हती. आपली सत्ता इंग्रजांच्या समर्थनावर टिकवून ठेवणे मीर कासिम याला मान्य नव्हते. तो स्वतंत्र वृत्तीचा होता. याविषयी एच. एच. डॉडवेल एन. एल. चटर्जी यांनी मीरकासीमची राजकीय आकांक्षा आणि अंतर्गत व्यापार समस्या यांच्यामध्ये एक अस्पष्ट सीमा रेखा आखली आहे. डॉडवेल म्हणतो, 'इंग्रज आणि नबाब यांचे हित परस्पर विरोधी होते इंग्रज आपला अधिकार गाजवू पाहत होते आणि नबाब मात्र स्वतंत्रवृत्तीने राहू इच्छित होता. तोपर्यंत हीच परिस्थिती कायम राहणार होती.' तर चटर्जी असे म्हणतात की, 'खाजगी अंतर्गत व्यापारावरील कर ह्या मतभेदाचे प्रमुख किंवा एकमेव कारण नव्हते. नबाबाची आकांक्षा वेगळी असल्याने तो युद्ध करावयास तयार झाला १७५७ मध्ये स्थापन झालेली इंग्रजांची सत्ता समाप्त करून नवाब स्वतंत्र बनवू पाहत होता. युरोपियनांची शक्ती समाप्त करून निष्कंटक व निरंकूश सत्ता प्राप्त करण्याचा नवाबाचा इरादा होता.'

कंपनीच्या गोटात मीरकासिमविरुद्ध हालचाल सुरू झाली तर इंग्रजांचा प्रभाव व हस्तक्षेप झुगारून देऊन स्वतःचे स्वातंत्र्य जपण्याचा मीर कासिमचाही प्रयत्न होता. व्यापाराच्या क्षेत्रात कंपनी करीत असलेल्या गैरव्यवहारावर त्याचा विशेष रोख होता. कंपनीचे कर्मचारी त्यांचा खाजगी व्यापार हे जकात न भरताच करीत होते. आणि हे सर्व बेकायदेशीर होते. बादशहा फारुखसियर याने कंपनीला फक्त जकात मुक्तीचा परवाना दिला होता. तो केवळ कंपनीच्या आयात निर्यातीच्या व्यापारापुरता मर्यादित होता. तसे कंपनीने मान्य केले होते. तरीही कंपनीने जकात मुक्तीचा दुरुपयोग करून आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक भारतीय व इतर व्यापारी ही ते परवाने विकत घेण्यास उत्सुक असत कारण त्यामुळे सरकारी जकात चुकवून व्यापार चालविणे शक्य होत असे. याचा बंगालच्या आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम होत होता.

या सर्व प्रकारामुळे प्रामाणिक भारतीय व्यापारी इंग्रजांशी स्पर्धा करू शकत नसत. कंपनीच्या या भ्रष्ट व्यवहारामुळे राज्याचे फार मोठे नुकसान होईल व सरकारच्या उत्पन्नावरही त्याचा विपरीत परिणाम होत असे. या सर्व गोष्टीमुळे नबाब मीर कासिम नाराज झाला होता. कंपनीचा हा कालखंड निर्लज्जपणे केलेल्या बेसुमार लुटीचा काळा कालखंड होता. त्यामुळे बंगालची सर्व समृद्धी झपाट्याने नष्ट होऊ लागली होती. कंपनी सरकार कोणालाच जुमानत नसे.

अंतर्गत प्रशासन स्थिरस्थावर झाल्यावर मीर कासिम याने या प्रश्नाकडे लक्ष दिले. जकातीच्या मुद्द्याशिवाय त्याला आणखी एक बाब जाचक वाटत होती. ती म्हणजे व्यापारी क्षेत्रात कंपनीचे कर्मचारी व नवाबाचे अधिकारी यांच्यात काही तंटा उद्भवल्यास त्यासंबंधीचा निकाल देण्याचा अधिकार इंग्रजांकडे होता. याला मीर जाफर याने संमती दिली होती. त्यामुळे न बाबाच्या सार्वभौम अधिकारालाच धक्का पोहोचत होता.

भारतीय व्यापारी वर्गात इंग्रजांबद्दल मोठा असंतोष निर्माण झाला होता त्यामुळे मीर कासिम याने अंतर्गत व्यापारावरील सर्वांचीच जकात रद्द करून टाकली. त्यामुळे इंग्रजांचा व भारतीय व्यापाऱ्यांचा व्यापार एका समान पातळीवर आला भारतीय व्यापाऱ्यांवर होत असलेला अन्याय व त्यांचा असंतोष दूर करण्याचा प्रयत्न नवाब मीर कासिम यांनी केला.

मीर कासिम याच्या कार्यवाहीमुळे इंग्रजांमध्ये त्याच्याविषयी संताप निर्माण झाला. कायद्यानुसार जकात देण्याची तयारी इंग्रजांची नव्हती आणि भारतीय व्यापाऱ्यांना जकात मुक्ती मिळावी हेही त्यांना नको होते. त्यांच्या पदरात पडत असलेले लाभ त्यांना तसेच चालू राहायला हवे होते. मीर कासिमची ती कार्यवाही म्हणजे इंग्रजांशी उघड शत्रुत्व असाच त्याचा अर्थ होतो. इंग्रजांनी मिर कासीम यास धमकी वजा इशारा दिला की भारतीय व्यापाऱ्यांवरील जकात पुन्हा सुरू न केली तर युद्धाला तोंड द्यावे लागेल. इंग्रजांच्या या धमकीला मिर कासिम घाबरला नाही. त्याने इंग्रजांविषयी कडक धोरण अमलात आणण्यास सुरुवात केली. नवाबाच्या स्वतंत्र बाण्याची लागण त्याच्या अधिकाऱ्यांनाही झाली. तर इंग्रज जास्तीत जास्त दडपशाहीचे धोरण राबवू लागले. अशा परिस्थितीत पाटणा येथील इंग्रजांच्या वखारीत सैन्यांनी व शस्त्रास्त्रांनी भरलेले जहाज येऊन पोहोचले. हे मीरकासिम यास समजल्यानंतर तो अस्वस्थ झाला त्याने २१ जून १७६३ रोजी सुरक्षिततेच्या दृष्टीने थोडी फौज पाटण्याला रवाना केली. तेव्हा वखारीचा प्रमुख इंग्रज अधिकारी एलिस हा होता. त्याने पाटणा शहरच ताब्यात घेतले. परंतु नवाबाच्या सैन्याने ते परत मिळविले. नवाब मीर कासिम याने इंग्रजांची कासिम बाजार ही वखार लुटली व सुमारे २०० युरोपियन यांना कैद केले. त्यातूनच दोघांमध्ये युद्ध भडकले. १७६३ मध्ये इंग्रजांशी झालेल्या लढाईत मीर कासीम अवधला पळून गेला.

**पुन्हा मीरजाफर नबाब पदी**

मिरकासिम ऐवजी मीरजाफर याला पुन्हा इंग्रजांनी गादीवर बसविले. व त्याच्याकडून इंग्रजांनी पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात द्रव्य उकळले. इंग्रजांनी त्याच्यामार्फत भारतीय व्यापाऱ्यावरील जकात पुन्हा सुरू

केली. तसेच मीरकासिम बरोबर झालेल्या युद्धात नुकसान भरपाई म्हणून तीस लक्ष रुपये वसूल केले. इंग्रजांच्या या अनावश्यक मागण्या मीरजाफर पूर्ण करू शकला नाही त्यातच त्याचा १७६५ मध्ये मृत्यू झाला.

**बक्सारची लढाई (२२ ऑक्टोबर १७६४)**

भारताच्या इतिहासात ब्रिटिशांचे सामर्थ्य मजबूत करण्यात प्लासीच्या लढाई पेक्षा बक्सारच्या लढाईला विशेष महत्त्व आहे. प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला तर बक्सारच्या लढाईने तो पाया मजबूत केला. कारण बक्सारच्या लढाईत इंग्रजांनी भारताच्या तीन शक्तींचा पराभव केला. अशा या बक्सारच्या लढाईची कारणे पुढील प्रमाणे

**बक्सारच्या लढाईची कारणे**

१. **मीर कासिमला नवाब पदावरून काढून टाकले:** इंग्रजांच्या सर्व अटी मान्य करूनही जेव्हा इंग्रजांनी मीर कासिम याला नवाब पदावरून काढून टाकले तेव्हा तो इंग्रजांचा कट्टर शत्रू बनला.

२. **मीरकासिम कडून इंग्रज कैद्यांची हत्या:** मुंगेर वगैरे ठिकाणी पराभूत झाल्यावर मीरकासिम हा पाटणा येथे पळून गेला होता. त्यावेळी २०० इंग्रज कैद्यांची हत्या करण्यात आली होती. त्यामुळे इंग्रज व मीर कासिम यांच्यात वितुष्ट निर्माण झाले.

३. **अवधच्या नवाबाची मीर कासीमला मदत:** मीर कासिम पाटणा येथून आयोध्येस पळून गेला. तेथे त्याने शुजा उद्दोला याच्याबरोबर संगनमत केले. या दोघांची दिल जमाई इंग्रजांना आवडली नाही. त्यातूनच बक्सारच्या लढाईचा प्रसंग उद्भवला.

४. **त्रिकूट एकत्र जमले :** मीरकासीम, शुजाउद्दोला व मोगल बादशहा शहाआलम हे तिघे एकत्र आले. या तिघांचे एकत्र येणे इंग्रजांना आवडले नाही. तसेच या तिघांनी इंग्रजांच्या विरोधात लष्करी हालचाली सुरू केल्या होत्या. त्यामुळे बक्सार ची लढाई घडून आली.

**बक्सारच्या लढाईतील घटना:** तिघांच्या फौजा बिहार मार्गे पुढे निघाल्या. काही फ्रेंचांनी देखील त्यांना मदत केली. यामध्ये काही किरकोळ लढाया झाल्या. पण त्या निर्णायक नव्हत्या. इंग्रजां तर्फे मेजर मनरो या सेनापतीस पाठवण्यात आले होते. गंगा नदीच्या काठी बक्सार या गावाजवळ तिघांची इंग्रजांशी गाठ पडली. २२ ऑक्टोबर १७६४ रोजी झालेल्या या लढाईत इंग्रजांचा विजय झाला.

यामध्ये मोगल बादशहाने इंग्रजांशी समझोता केला तर मीर कासीम हा पळून गेला. अवधूचा नवाब शुजाउद्दोला याने मात्र इंग्रजांशी लढा दिला. पण १७६५ मध्ये कोटा येथे त्याने आत्मसमर्पण केले आणि अवध हा प्रदेश पूर्णपणे इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**बक्सार च्या लढाईचे महत्व व मूल्यमापन**

इतिहासकारांनी बक्सारच्या लढाईला फार महत्त्व दिले आहे. जेम्स स्टीफन यांच्या मते 'ब्रिटिश प्रभुत्वाच्या दृष्टीने बक्सारच्या लढाईचे महत्व प्लासीच्या लढाई पेक्षा जास्त आहे.' प्लासीची लढाई वस्तुतः

लढाईच नव्हती. धोकेबाजीच्या दृष्टीने केलेले एक नाटक होते. याउलट बक्सार ची लढाई ही खरोखरची भयंकर लढाई होती. यात इंग्रज सैन्यांचे ८४७ सैनिक मृत्यू पावले. तर संयुक्त फौजेतील अंदाजे २००० सैनिक कामी आले. प्लासीच्या लढाईत भारताच्या एका प्रदेशाचा म्हणजेच बंगालचा पराभव झाला होता. तर बक्सारच्या लढाईत मात्र प्रत्यक्ष मोगल बादशहा, अवधचा नवाब तसेच बंगालचा नवाब अशा तीन शक्तीचा शेवट झाला होता. प्लासीच्या लढाईने इंग्रजांना बाहुले म्हणून एक नवाब सापडला तर बक्सारच्या लढाईने इंग्रजांना कितीतरी जास्त मिळवून दिले. इंग्रजांचे पाय आता बंगाल, अवध व वायव्य भागाकडे पसरत चालले.

**रॅम्से म्युर** यांचे म्हणणे खरे आहे की बक्सारच्या लढाईने बंगालवर कंपनीचे शासन पूर्णपणे अमलात आले. बक्सारच्या लढाईने कंपनीला भारतात एक प्रभुसत्ता संपन्न शक्ती बनविले.

**डॉ. आर. सी.** मुजुमदार म्हणतात की, प्लासीच्या लढाईचा निर्णय इंग्रजांच्या जन्मजात युद्ध कलेच्या श्रेष्ठतेपेक्षा कपट व धोकेबाजीमुळे अधिक झाला. पण मीर कासिम व त्याच्या सहकाऱ्यांचा पराभव हा मात्र धोकेबाजीचा परिणाम आहे असे म्हटले जाऊ शकत नाही.

**अल्फ्रेड लायल** यांच्या मते, बक्सार च्या लढाईचे तत्कालीक व दुरगामी परिणाम अतिशय महत्त्वाचे होते. इंग्रजांच्या विजयामुळे मुघल सम्राट त्यांना येऊन मिळाला. वजीर भीतीग्रस्त झाला आणि कंपनीचे सैन्य गंगा पार करून काशी व अलाहाबाद पर्यंत जाऊन पोहोचले. त्यांना आता एक नवीन प्रगतीचा मार्ग सापडला. इंग्रज उत्तर भारताच्या संपर्कात आले व त्यांना एक नवे कार्यक्षेत्र मिळाले ज्याचे स्वरूप लवकरच बदलत गेले.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या लढाईने ब्रिटिशांनी भारतात आपल्या सत्तेचा पाया घातला.

२. बक्सारच्या लढाईने इंग्रजांना कोणते अधिकार मिळाले.

३. प्लासीची लढाई किती साली झाली.

४. भारताचा पहिला गव्हर्नर म्हणून कोणाला ओळखले जाते.

५. बक्सारची लढाई किती साली झाली.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. मीरकासिम बरोबर झालेल्या युद्धात इंग्रजांनी नुकसान भरपाई म्हणून ................ रुपये वसूल केले.

अ. २५ लाख    ब. ३० लाख    क. ४० लाख    ड. ५० लाख

२. ............ याने बंगालमध्ये भारतीय व्यापाऱ्यासाठी जकात मुक्तीचा निर्णय घेतला.

अ. मीरजाफर ब. मीरकासीम क. इंग्रज ड. सिराजउद्दोला

३. ............... रोजी बक्सारची लढाई झाली.

अ. २२ ऑक्टोबर १७६४ ब.२३ ऑक्टोबर१७६४

क. २५ ऑक्टोबर१७६४ ड.२६ऑक्टोबर १७६४

४. ............ हा प्लासीच्या विजयाचा खरा शिल्पकार होय.

अ. रॉबर्ट क्लाइव्ह ब. वॉरन हेस्टिंग्ज क. मनरो ड. लॉर्ड कोर्नवालीस

## २.२.२ म्हैसूर

बंगाल व म्हैसूर या भारतामधील दोन प्रांतांमध्ये ब्रिटिश साम्राज्यवादाचा विचार करीत असताना आपल्याला दोन भिन्न चित्र दिसतात. बंगालमध्ये इंग्रजांचा शिरकाव सहजासहजी कमी श्रमात झाला. त्यामानाने म्हैसूर मध्ये इंग्रजांना अत्यंत प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. बंगालचा इतिहास व म्हैसूरचा इतिहास यामध्ये गुणात्मक फरक आहे. बंगालमध्ये इंग्रजांना मदत करण्याचे काम तेथील काही व्यापारी व असंतुष्ट लोकांनी केले. म्हैसूरच्या प्रश्नांमध्ये इंग्रज व म्हैसूरकर असा संघर्ष न राहता त्यामध्ये मराठ्यांचाही खूप संबंध आला. त्यामुळे म्हैसूर मधील इंग्रज प्रवेश व त्यानंतरच्या घडामोडींच्या अभ्यासामध्ये मराठ्यांच्या राजकारणाचाही आपल्याला विचार करावा लागेल. बंगाल सारखा संपन्न प्रदेश ताब्यात आल्याने इंग्रजांची ताकद वाढली होती. म्हैसूर प्रवेशापूर्वीच १७६० साली वॉनदीवॉस लढाईत इंग्रजांनी फ्रेंचांचा पराभव केल्याने त्यांचा धोका उरला नाही. वस्तुतः मराठे दक्षिणेकडे अतिशय प्रबळ होते, त्यामुळे हैदर, टिपू यांना मराठ्यांपासून खरा धोका होता. परंतु दुर्दैव असे की, १८ नोव्हेंबर १७७२ रोजी पेशवा पहिला माधवराव मरण पावल्यावर मराठीशाहीमध्ये अनेक दुष्ट प्रवृत्ती निर्माण झाल्या. राघोबादादा सारखा स्वार्थी मनुष्य राजकारणात आल्यावर मराठ्यांचे राजकारण बिघडत गेले. दक्षिणेकडील आणखी एक महत्त्वाची सत्ता म्हणजे हैदराबादच्या निजामाची परंतु १७४८ साली निजाम मृत्यू पावल्यानंतर त्याची मुले व नातवंडे यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाल्याने इंग्रजांच्या वाटेतील आणखी एक काटा दूर झाला. तथापि निजामाचे महत्त्व होतेच. मराठ्यांना इंग्रजांचा कावा कधीच समजू शकला नाही. टिपू सुलतान कसाही असला तरी शेवटी देशी सत्ताधीश आहे. तेव्हा त्यालाच मदत केली पाहिजे हा विचार मराठ्यांना सुचला नाही. परंतु त्याकाळी राष्ट्रवाद ही संकल्पना निर्माण झाली नसल्याने राष्ट्रहित हा विचारच कधी निर्माण होऊ शकला नाही. त्याचे दृश्य फळ म्हणजे इंग्रजांचा म्हैसूर प्रवेश हे ध्यानात घेऊन आपल्याला इंग्रजांच्या म्हैसूर प्रवेशाचा अभ्यास करावयाचा आहे.

**इंग्रजांचा म्हैसूर मध्ये प्रवेश व साम्राज्यवादाचे स्वरूप**

इंग्रजांचा म्हैसूर प्रवेश ही प्रक्रिया वॉरन हेस्टिंग, लॉर्ड कॉर्नवालीस व लॉर्ड वेलस्ली या तीन गव्हर्नर जनरलच्या काळात घडली. म्हैसूर प्रवेशाची प्रक्रिया कमी अधिक प्रमाणात १७६७ ते १७९९ म्हणजे ३२ वर्ष

सुरू होती. या प्रक्रियेचा व तेथील राजकारणाचा आपल्याला विचार करावयाचा आहे. १७६१ नंतर दक्षिणेकडे ४ सत्ता अस्तित्वात होत्या. त्या म्हणजे मराठे, निजाम, हैदर व इंग्रज यापैकी प्रत्येकाचे एकमेकांशी होते. परंतु वेळेनुसार, गरजेप्रमाणे ते एकमेकास सहाय्य करीत असत. त्यामुळे दक्षिणेच्या राजकारणात आजचे शत्रू उद्याचे मित्र, आजचे मित्र उद्याचे शत्रू असल्याचे दिसून येतात.

**हैदर व इंग्रज संघर्षाची कारणे**

या काळातील इंग्रजांच्या हालचाली, हैदरला अस्वस्थ करण्यास कारणीभूत ठरल्या. वर उल्लेख केलेल्या चौकडीच्या कारस्थाना आधीच इंग्रजांनी निजामाला गुंटूर प्रांत देण्याचे आमिष दाखविले होते. तसेच नागपूरकर भोसल्यांनाही इंग्रजांनी आश्वासने दिली होती परंतु त्यापैकी कोणत्याही आश्वासनाची पूर्ती इंग्रजांनी न केल्याने निजाम व नागपूरकर भोसले हैदरच्या बाजूला वळलेले होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी इंग्रजांनी खंबीरपणे पावले टाकली त्यामधूनच हैदर व इंग्रज यांचे संबंध बिघडले. त्याची कारणे पुढील प्रमाणे

१. **इंग्रजांचे विरोधक फ्रेंच यांच्याकडे हैदर वळला.** फ्रेंचांनी हैदरला सर्व प्रकारची भरघोस मदत दिली. पोर्तुगीज बिशपाने फ्रेंच अधिकारी काउंट लाली व हैदर यांच्यामध्ये मैत्रीचा तह घडवून आणला. हैदरचे महत्त्व ओळखून फ्रेंचांनी त्याला महिन्याला दहा हजार रुपये नजराना देण्याचे कबूल केले. शिवाय हैदरने इंग्रजांना कर्नाटकातून हुसकावून लावल्यास हैदरला त्रिचनापल्ली, मदुराई व तीनवेल्ली हे प्रदेश देण्याचे फ्रेंचांनी मान्य केले. या घटना इंग्रजांना धोकादायक वाटत होत्या. त्यातूनच इंग्रज म्हैसूर युद्ध घडले.

२. **हैदरला मिळणारी फ्रेंचांची मदत बंद केली.** इंग्रज नुसतेच स्वस्थ बसले नाहीत तर हैदर व फ्रेंच एकत्र येण्यापूर्वीच हैदरला अटकाव करण्यासाठी इंग्रजांनी मेजर मूरच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठविले, पण हैदरने मेजर मूरचा पराभव केला. त्यांनी फ्रेंचांचा काटा काढण्यासाठी त्यांच्या ताब्यातील पाँडिचेरीवर हल्ला करून ते जिंकून घेतले. तेव्हापासून हैदरला फ्रेंचांची मदत कमी झाली. पण हैदर मात्र इंग्रजा विरुद्ध भडकला. म्हणून त्याने पेशवा माधवराव बरोबर तह करून इंग्रजांना शह देण्याचा प्रयत्न केला हैदरने ३०० फ्रेंच सैनिकांना आपल्या नोकरीत घेतले.

३. **हैदरच्या शत्रूला इंग्रजांची मदत** कर्नाटकचा नवाब मोहम्मद अली व हैदर यांचा कर्नाटकात संघर्ष सुरू होता. त्यावेळी इंग्रजांनी मोहम्मद अलीला मदत केली. वेल्लोर या महंमद अलीच्या प्रदेशात ब्रिटिशांनी आपल्या फौज ठेवल्या. हैदरने मोहम्मद अलीचा भाऊ महफूज खान याला आश्रय देऊन मोहम्मद अलीविरुद्ध हालचाली सुरू ठेवल्या. तसेच राजा साहेब व चंदासाहेब या मोहम्मद अलीच्या शत्रूला आपली मदत दिली.

४. **निजामाची फसवणूक :** १७६० साली वाँदिवॉश लढाईत इंग्रजांनी फ्रेंचांचा पराभव केल्यानंतर काही काळ हैदरने मद्रासकर इंग्रजांबरोबर मैत्री करण्याचा प्रयत्न केला होता, पण अंत्यस्थपणे इंग्रजांनी हैदराबादच्या निजामालाच हैदरविरुद्ध उभा करण्याचे प्रयत्न सुरू केले. तसा निजाम – इंग्रज मैत्रीचा तह झाला. इंग्रजांनी निजामाला पाच लाख रुपये नजराणा व गुंटूरसह तीन जिल्हे देण्याचे कबूल केले. पण प्रत्यक्षात मात्र काहीच केले नाही. म्हणून निजाम हा नाना फडणीसाच्या चौकडीच्या कारस्थानात सहभागी झाला होता.

५. **बालाघाटचा प्रदेश हैदरच्या ताब्यात होता:** इंग्रजांनी बालाघाट घेण्यासाठी हैदरविरुद्ध हालचाली सुरू केल्या. इंग्रजांनी निजामाला तटस्थ राहण्याबद्दल सात लाख रुपये व दिवाणीचे अधिकार देण्याचे कबूल केले होते. अशा स्थितीमध्ये हैदर - इंग्रज युद्ध अटळ होते. हैदर व टिपू यांच्याविरुद्ध चार युद्धे झाली. त्यांनाच म्हैसूरचे युद्धे असे म्हटले जाते.

**१. पहिले इंग्रज - म्हैसूर युद्ध (१७६७ - १७६९ )**

पहिल्या म्हैसूर युद्धाचे तत्कालीन कारण म्हणजे ब्रिटिशांनी निजामाला दिलेली मदत हेच होते. ऑगस्ट १७६७ मध्ये कर्नल स्मिथ व निजाम यांनी म्हैसूरवर हल्ला केला. त्याने इंग्रजांविरुद्ध मराठ्यांची मदत मिळवली. युद्ध संपल्यावर मराठ्यांना २३ लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. अंतस्थपणे हैदरने निजामाला इंग्रजांपासून वेगळे केले. फक्त इंग्रज व हैदर यांच्यात लढाई सुरू झाली. या युद्धात टिपू हा पहिल्यांदाच मोठा सेनापती होईल अशी चुणूक दिसून आली. पुढे मद्रास मधील इंग्रज ठाण्यांवर हल्ला करून इंग्रजांना घाबरून सोडले. इंग्रजांनी ताबडतोब हैदर पुढे शरणागती पत्करली. व ४ एप्रिल १७६९ रोजी मद्रासचा तह करण्यात आला. या तहानुसार पहिले इंग्रज-म्हैसूर युद्ध संपले. या तहान्वये परस्परांचे जिंकलेले प्रदेश व युद्ध कैदी परत करावे असे ठरले. या पहिल्या इंग्रज-म्हैसूर युद्धात हैदर अलीने इंग्रजांना पाणी पाजले होते. हे मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखे आहे. मार्च १७६९ मध्ये हैदर अली मद्रास पासून फक्त पाच मैलाच्या अंतरावर येऊन धडकला होता. म्हणून इंग्रजांना त्याच्याबरोबर मद्राचा तह करावा लागला होता. हे सुद्धा विसरता कामा नये.

या तहानुसार हैदर अलीवर जर कोणी स्वारी केली तर इंग्रजांनी त्याला मदत करण्याचे वचन दिले. तसेच हैदरअलीने इंग्रजांना मदत करण्याचे मान्य केले. या कलमाद्वारे हैदरने मराठ्यांविरुद्ध इंग्रजांची मदत मिळेल अशी व्यवस्था केली. परंतु १७७२ मध्ये माधवराव पेशवा मरण पावला. तर १७७३ मध्ये पेशवा नारायणरावांचा वध झाला. आणि पुण्यात बारभाई कारस्थानाला सुरुवात झाली. यावेळी वॉरन हेस्टिंग्ज गव्हर्नर जनरल होता. त्याने १७७५ साली मराठ्यांबरोबर पुरंदरचा तह करून कर्नाटकच्या राजकारणात हैदर आलेला एकाकी पाडले. हैदरने इंग्रजांना धडा शिकवण्याची तयारी सुरू केली. या ठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, इंग्रजांच्या तीन ठिकाणांमध्ये कलकत्ता, मुंबई व मद्रास यांच्यामध्ये स्पर्धा होती. मुंबई व मद्रासकर इंग्रजांना बंगाल व हेस्टिंगचा वर्चस्ववादी स्वभाव खपत नव्हता. परंतु इंग्रजांपेक्षा भारतीय सत्तांमध्ये ऐक्य नसल्याने इंग्रजांना विजय मिळाला.

**२. दुसरे इंग्रज म्हैसूर युद्ध (१७८० - १७८४ )**

**कारणे**

१. **मराठ्यांविरुद्ध इंग्रजांनी हैदरला मदत केली नाही:** पहिल्या माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत मराठ्यांनी १७७१ मध्ये हैदरला मराठा प्रदेशातून हाकलून लावण्यासाठी स्वारी केली. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर (१७६१) हैदर अलीने मराठ्यांचा काही प्रदेश बळकावला होता. तो सोडविण्यासाठी मराठ्यांनी हैदर अलीवर स्वारी केली होती. पण मद्रासच्या तहात ठरल्याप्रमाणे इंग्रजांनी मराठ्यांविरुद्ध हैदर अलीला मदत केली नाही म्हणून हैदर अली इंग्रजांवर नाराज झाला.

२. **हैदर अली व इंग्रज यांचा परस्परांवर संशय:** हैदर अलीच्या आक्रमक हालचाली व त्याची साम्राज्य विस्ताराची प्रगती इंग्रजांना खटकत होती तर इंग्रजांचे मराठा व निजाम यांच्याशी मैत्रीचे करार मदार अलीच्या चिंतेचा विषय होता. म्हणून दोघांची परस्परांवर शत्रुवत दृष्टी होती. त्यातूनच ही लढाई झाली.

३. **अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध:** अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध १७७५ मध्ये सुरू असताना इंग्रजांना आपल्या हातातून अमेरिकेच्या वसाहती निघून जातील असे वाटत होते. तेव्हा त्याची नुकसान भरपाई करण्यासाठी भारतात ब्रिटिशांचा साम्राज्यविस्तार करावा हे देखील वॉरन हेस्टिंगच्या विस्तारवादी धोरणाचे एक अंग होते. अमेरिकन युद्धात फ्रान्सने इंग्लंडच्या विरुद्ध अमेरिकेला मदत केली म्हणून वॉरन हेस्टिंगच्या कारकिर्दीत भारतातील माही हे ठाणे इंग्रजांनी ताब्यात घेतले. हे पाहून हैदर अली क्रोधित झाला. कारण माहे हे ठाणे मैसूर राज्यातील होते. व त्यापासून हैदर अलीला मोठा फायदा होत होता. हैदरने इंग्रजांना माहे हे ठाणे परत करण्यास सांगितले पण इंग्रजांनी स्पष्ट नकार दिला. दोघांमध्ये असलेली स्पर्धेची भावना शत्रुत्वात परिवर्तित झाली.

४. **इंग्रजांचा गुंटूर प्रदेशावर ताबा:** इंग्रजांनी निजामाच्या ताब्यातील गुंटूर हा प्रदेश १७७९ मध्ये निजामाला न कळवितात परस्पर आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे निजाम इंग्रजांवर चिडला. पण त्याचबरोबर हैदर अली सुद्धा इंग्रजांवर चिडला. समुद्र तटापर्यंत पोहोचण्यासाठी हैदरला गुंटूर हा प्रदेश हवा होता. यामुळे हैदर व निजाम दोघेही इंग्रजांच्या विरोधात गेले. यावेळी इंग्रज – मराठा युद्ध सुरू होते. नाना फडणीसाने भारतीय महासंघ स्थापन करून इंग्रजांच्या विरोधात निजाम व हैदर यांना महासंघात समाविष्ट करून घेतले हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

वरील सर्व कारणांमुळे हैदर – इंग्रज यांच्यात जुलै १७८० मध्ये युद्ध सुरू झाले. यालाच दुसरे इंग्रज म्हैसूर युद्ध असे म्हणतात. हे युद्ध चार वर्षे चालले. यापैकी पहिले दोन वर्ष हैदरने इंग्रजांशी लढा दिला. पण हैदर अली युद्ध सुरू असतानाच ७ डिसेंबर १७८२ रोजी मृत्यू पावला. त्यानंतरही युद्ध बंद झाले नाही. हैदरचा मुलगा टिपू याने इंग्रजांशी युद्ध सुरू ठेवले. ते युद्ध १७८४ मध्ये संपले.

**युद्धातील घटना:** हैदर अली याने ८३ हजार सैनिकासह जुलै १७८० मध्ये कर्नाटकवर स्वारी केली. इंग्रजांनी मनरो व बेली या अधिकाऱ्यांना पाठविले. पण हैदरने त्यांचा पराभव केला. हैदरने ऑक्टोबर मध्ये अर्काट जिंकून घेतले. इतकेच नव्हे तर सगळा कर्नाटक त्याने पादाक्रांत केला. हैदरच्या मृत्यूनंतर टिपूने युद्ध चालू ठेवून इंग्रज अधिकारी मॅथ्यू याच्यावर विजय मिळवून त्याला कैदेत टाकले. अशाप्रकारे इंग्रजांवर विजय मिळत असताना फ्रेंच सैन्याने त्याची साथ सोडली. कारण युरोपात १७८३ मध्ये इंग्रज व फ्रेंच यांच्यातील युद्ध बंद होऊन तह झाला होता. पुन्हा इंग्रज व टिपू यांच्यात कधी जय तर कधी पराभव होत राहिला. म्हैसूरची राजधानी श्रीरंगपट्टणम जवळ इंग्रज अधिकारी फुलटर्न हा येऊन धडकला पण त्याला मद्रासच्या गव्हर्नरने माघारी बोलविले. शेवटी १७८४ मध्ये इंग्रज व टिपू या दोघांमध्ये तह झाला. यालाच मंगलोरचा तह असे म्हणतात.

**मंगलोरचा तह (१७८४) –** मंगलोरच्या तहात इंग्रजांनी मागील तहाप्रमाणे अटी मान्य केल्या. दोघांनी परस्परांचे प्रदेश व योग्य कैदी परत करावेत असे ठरले. इंग्रजांनी नेहमीप्रमाणे आश्वासन दिले की म्हैसूरशी मैत्री ठेवण्यात येईल व म्हैसूरवर स्वारी झाल्यास इंग्रज त्यांना मदत करतील.

**मूल्यमापन –** मंगलोरचा तह इंग्रजांसाठी अपमान जनक होता जर टिपूने तह न करता युद्ध चालू ठेवले असते व शेजारच्या भारतीय शासनाकडून (मराठी व निजाम) मदत मिळवली असती तर इंग्रजांना भारतातून हाकलून लावणे शक्य झाले असते. तसे पाहिले तर चार वर्षेपर्यंत चालणाऱ्या या युद्धामुळे दोघेही थकले होते. विसावा म्हणून त्यांना तह करावा लागला. हा तह चिरस्थायी नव्हता. सैन्यशक्ती वाढल्यांबरोबर पुन्हा दोघांनीही दोन हात करण्याची तयारी दाखविली. या युद्धाच्या वेळी वॉरन हेस्टिंग याने कूटनीतीचा अवलंब करून भारतीय शासकाना टिपूच्या बाजूने एकत्र येऊन देण्यात यश मिळविले.

वॉरन हेस्टींग याला विस्तारवादी धोरणात प्रत्यक्ष यश मिळालेले दिसत नाही. पण त्याच्या कूटनीतीमुळे इंग्रज–मराठा युद्ध व इंग्रज 'म्हैसूर युद्ध' यावेळी इंग्रजांना गाशा गुंडाळण्याची पाळी आली नाही हे मात्र निश्चित. यावेळी त्यांना सैन्याच्या परीक्षा देण्याचा सराव झाला. भारतात ठीकठिकाणी कूटनीती, कपटनीती व राजनीति सोबत सैन्य संचालनाचे फार मोठे अभ्यासपूर्ण अनुभव मिळवण्यात मात्र त्यांना यश आले. वॉरन हेस्टिंग आला नसता तर कदाचित क्लाईव्हने घातलेला ब्रिटिश साम्राज्याचा पाया उघडला गेला असता. असे विधान केले तर ते अतिशयोक्ती पूर्ण ठरू नये. कारण भारतीय सत्ताधीशांनी आपल्या सैन्य पद्धतीत कवायतीच्या फौजेचा शिरकाव केला होता. व दारुगोळ्याचे कारखाने उघडले होते. हैदर व महाजी शिंदे ही त्याची बोलकी उदाहरणे होत.

### ३. तिसरे इंग्रज – म्हैसूर युद्ध (१७९० – ९२ )

वॉरन हेस्टिंगच्या कारकिर्दीत दुसरे इंग्रज – म्हैसूर युद्ध झाले होते. मंगलोरच्या तहाने संपले हे आपण वर पाहिले. तिसरे इंग्रज – म्हैसूर युद्ध हे लॉर्ड कॉर्नवालीस याच्या कारकिर्दीत झाले. लॉर्ड कॉर्नवालीस हाही साम्राज्यवादी वृत्तीचाच सत्ताधीश होता. अशा या तिसऱ्या इंग्रज – म्हैसूर युद्धाची कारणे पुढील प्रमाणे–

**१. पारस्परिक अविश्वास:** मंगलोरच्या तहाने टिपू व इंग्रज यांच्यात शांतता प्रस्थापित झाली होती. पण ती स्थायी स्वरूपात राहिली नाही. कारण त्यांचा परस्परावर विश्वास नव्हता. दोघेही पुढच्या युद्धाच्या तयारीला लागले होते. फक्त वेळेची वाट पाहत होते.

**२. टिपू चे फ्रेंचांशी संगनमत :–** दुसऱ्या म्हैसूर युद्धाच्या वेळी फ्रेंचांनी हैदरला मदत केली होती. टिपूने १७८७ मध्ये आपले दूत फ्रान्समध्ये पाठवून फ्रेंचांची इंग्रजांविरुद्ध मदत मिळते की काय हे पाहण्याचे ठरविले होते. टिपूच्या मनात इंग्रजांशी दोन हात करण्याची इच्छा होती. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली त्यावेळी जर इंग्लंडवर फ्रान्सला युद्ध करण्याची वेळ आली तर भारतातही फ्रेंच सत्तेशी व त्यांचा मित्र टिपू यांच्याशी युद्ध करावे लागेल हे कॉर्नवालीसने जाणले होते. म्हणून तोही युद्ध करण्याच्या तयारीला लागला होता.

**३. टिपूला एकटे पाडण्याचा लॉर्ड कॉर्नवॉलीसचा डाव :–** वॉरन हेस्टिंग्ज याने दुसऱ्या म्हैसूर युद्धात मंगलोरचा तह करून जिंकलेले प्रदेश टिपूला परत दिले होते. मंगलोरचा तह इंग्रजांच्या दृष्टीने अपमान जनक होता याची जाणीव कॉर्नवॉलिसला देखील असणे स्वाभाविक होते. टिपूवर विजय मिळवणे एकटे इंग्रजांना शक्य नव्हते. त्यात जर टिपूने मराठे व निजाम यांच्याशी मैत्री केली तर ते मुळीच शक्य होणार नव्हते. अशा परिस्थितीत टिपूला मराठे अथवा निजाम यांच्याशी मैत्री होऊ न देण्याचा प्रयत्न करणे कॉर्नवॉलिसने ठरविले. त्याने मराठे व निजाम यांना मधाचे बोट लावून त्यांच्याशी मैत्री जमविली. इंग्रज, मराठे व निजाम या तिघांनी टिपू वर संयुक्त स्वारी करावी व जिंकलेले प्रदेश तिघांनी आपापसात वाटून घ्यावे असे ठरले. लॉर्ड कॉर्नवालीस हा दोघांची मैत्रीचे वेगवेगळे तह करण्यात यशस्वी झाला.

**४. गुंटूर प्रकरण: –** गुंटूरच्या बाबतीत टिपू व कॉर्नवालीस यांच्यात मतभेद निर्माण झाले. टिपूला तसेच निजामाला समुद्रकिनाऱ्यावर जाण्याकरिता गुंटूर प्रदेश भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचा होता. फ्रेंचांची मदत समुद्र मार्गे येईल तेव्हा आपल्याजवळ गुंटूरचा प्रदेश असावा असे टिपूला प्रकर्षाने वाटत होते. द्वितीय मैसूर युद्धाच्या शेवटी वॉरन हेस्टिंग्जने गुंटूर हा प्रदेश निजामाला परत करून निजामाशी मैत्री केली होती. लॉर्ड कॉर्नवालीसने गुंटूरचे भौगोलिक महत्व ओळखून तो प्रदेश निजामाकडून परत मिळविला. तेव्हा तो प्रदेश जिंकण्यासाठी टिपूने कॉर्नवॉलिस बरोबर युद्ध पुकारले.

**५. टिपूची त्रावणकोर स्वारी :** तिसऱ्या इंग्रज म्हैसूर युद्धाचे हे तत्कालीन कारण ठरले. त्रावणकोर हा प्रदेश जिंकला तर समुद्रकिनारा मिळतो व फ्रेंचांची सरळ मदत घेणे सोयीचे ठरते असा विचार करून टिपूने त्रावणकोरच्या हिंदू राजावर स्वारी केली. येथील राजाने इंग्रजांचे संरक्षण मिळविले. तेव्हा हिंदू राजाला मदत करण्यासाठी टिपूशी युद्ध करावे असे कॉर्नवॉलिसने ठरविले. याच्या अगोदर त्याने मराठे व निजाम यांच्याशी मैत्री करार केलेले होते. ही योग्य संधी आहे असे पाहून लॉर्ड कॉर्नवालीसने टिपूशी युद्ध सुरू केले.

**युद्धातील घटना:** – मराठे व निजाम यांची मदत असू नये इंग्रजांना युद्धात उल्लेखनीय यश मिळाले नाही. जनरल मीडोज याने वर्ष घालविले पण कोणताच विजय मिळाला नाही. म्हणून कॉर्नवालीस स्वतःच सैन्य संचलन करू लागला. त्याने १७९१ मध्ये बंगलोर ताब्यात घेतले व टिपूच्या श्रीरंगपट्टणम या राजधानी जवळ येऊन पोहोचला. पण पावसाळा सुरू झाल्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. डिसेंबरमध्ये पुन्हा युद्ध सुरू झाले. टिपूने पराक्रम गाजवून कोईमतुर जिंकून घेतले पण त्याच्याविरुद्ध इंग्रज, मराठे व निजाम यांच्या संयुक्त फौजा लढत होत्या. या संयुक्त फौजांनी टिपूचा एक एक किल्ला जिंकायला सुरुवात केली. शेवटी त्यांनी श्रीरंगपट्टणम या राजधानीलाच वेढा घातला. नाईलाजाने मार्च १७९२ मध्ये टिपूला त्यांच्याशी तह करावा लागला.

**श्रीरंगपट्टणमचा तह (१७९२)**

१. टिपूला आपले अर्धे राज्य द्यावे लागले. हे अर्धे राज्य इंग्रज, मराठे व निजाम यांनी आपापसात वाटून घेतले. लॉर्ड कॉर्नवॉलीस याने पश्चिमेकडील मलबार, दक्षिणेकडील डीडींगल व पूर्वेकडील बारा महल

हे प्रदेश घेऊन मैसूरला तिन्ही बाजूंनी वेढले. कृष्णा नदीच्या खोऱ्यापर्यंतचा प्रदेश निजामाच्या ताब्यात आला. पूर्वी मराठ्यांचा तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश मराठ्यांना मिळाला.

२. टिपूने कुर्गच्या राजाचे स्वातंत्र्य मान्य केले. पुढे कुर्गच्या राजाने इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारले.

३. टिपूला युद्ध खर्च म्हणून तीस लाख पाउंड इंग्रजांना द्यावे लागले.

४. इंग्रजांनी टिपूची दोन मुले ओलिस म्हणून आपल्या ताब्यात ठेवली.

**मूल्यमापन:–**

अनेक इतिहासकारांनी कॉर्नवॉलिसवर टीका केली आहे. त्याचे म्हणणे असे की, जर १७९२ मध्ये कॉर्नवालीसने टिपूचे सगळे राज्य ताब्यात घेतले असते तर चौथ्या इंग्रज – म्हैसूर युद्धाची आवश्यकताच पडली नसती. पण परिस्थिती लक्षात घेता लॉर्ड कॉर्नवालीसने जे केले ते इंग्रजांच्या दृष्टीने योग्यच केले असे म्हणावे लागेल. याबद्दल पुढील मुद्दे मांडले जातात. निजाम व मराठे हे काही कारणामुळे परकीय इंग्रजांचा पक्ष सोडून स्वकीय टिपूच्या पक्षात गेले असते तर युद्ध लांबले असते व त्याचे वेगळे परिणाम दिसू शकले असते. फ्रेंच क्रांतीच्या काळात जर टिपूला फ्रेंचांची मदत मिळाली असती तर चित्र वेगळेच राहिले असते. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जर संपूर्ण राज्य जिंकले असते तर त्या सर्व प्रदेशाचे दोन हिस्से निजाम व मराठे यांना द्यावे लागले असते. तेव्हा भारतातील एक विरोधी शक्ती नष्ट करून दोन विरोधी शक्तींना बळकट करणे म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणे होय. हा कॉर्नवालीसचा विचार कंपनीच्या दृष्टीने मोठा दूरदर्शीचा ठरतो. कारण पुढे इंग्रजांना मराठे व निजाम यांना पराभूत करणे जड गेले असते. सध्या टिपूचे जे निम्मे राज्य ठरले आहे ते एकट्या इंग्रजांना भविष्यात जिंकणे शक्य आहे कारण म्हैसूरच्या तीन बाजू इंग्रजांच्या प्रदेशाने वेढलेल्या आहेत. त्या जिंकल्या म्हणजे म्हैसूरचे अर्धे राज्य एकट्या इंग्रजांनाच मिळाले. लॉर्ड कॉर्नवालीचे हे निवेदन अत्यंत खरे आहे की, 'आपल्या मित्रांना सामर्थ्य संपन्न बनविल्याशिवाय आपल्या शत्रूला मात्र पूर्णपणे खच्ची करता येत नाही.'

### ४. चौथे इंग्रज म्हैसूर युद्ध (१७९९)

हे युद्ध लॉर्ड वेलस्लीच्या काळात उद्भवले. याची कारणे पुढील प्रमाणे

**१. तिसऱ्या इंग्रज –** म्हैसूर युद्धाचे शेवटी लॉर्ड कॉर्नवॉलीस यांनी श्रीरंगपट्टणमचा जो तह केला होता. त्याद्वारे टिपूचे अर्धे राज्य निघून गेले होते. नुकसान भरपाई म्हणून तीस लाख रुपयचा बोजा टिपूवर आला होता. या अपमानाचा बदला घेण्याच्या दृष्टीने त्याने मैत्रीसाठी आपल्या दुताकरवी काबुल, कॉन्स्टटीनोपल, अरबस्थान व मॉरेसिस येथील शासकांशी संपर्क साधला. तो फ्रान्सच्या जेकोबीन क्लबचा सदस्य बनला. ज्यावेळी नेपोलियन बोनापार्ट हा इजिप्त पर्यंत येऊन पोहोचला होता. त्यावेळी टिपूने त्याला भारतात बोलविण्यासाठी त्याच्याशी पत्रव्यवहार केला होता. टिपूने इंग्रजांशी लढण्यासाठी कवायती फौज तयार करावी म्हणून फ्रेंच अधिकारी देखील नेमले होते. टिपूने युद्धासाठीही तयारी केले आहे. असे पाहून साम्राज्यवादी टिपूशी युद्ध करण्याचा निश्चय केला.

२. मॉरीसिस ही फ्रेंचांची वसाहत होती तेथील फ्रेंच गव्हर्नर याने टिपूला सहाय्य करण्यासाठी फ्रेंचांना भारतात जाण्यास प्रेरित केले. फ्रेंच सैनिक म्हैसूरमध्ये येऊ लागले. ज्या दिवशी वेलस्ली चेन्नई येथे आला त्या दिवशी मंगलोर येथे अनेक फ्रेंच सैनिक उतरले हे पाहून वेलस्लीने टिपूशी लढण्याचा निर्णय घेतला.

३. टिपूशी युद्ध करण्याच्या अगोदर कूटनीतिज्ञ लॉर्ड वेलस्लीने मराठे व निजाम यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड कॉर्नवालीस याने टिपूच्या विरोधात जसा इंग्रज – मराठे – निजाम यांच्यात १७९० मध्ये मैत्री करार केला होता तसाच लॉर्ड वेलस्ली याने तिघांमध्ये मैत्री करार करण्याचा प्रयत्न केला. वेलस्लीने या पार्श्वभूमीवर निजामाला तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले. व त्याला आपल्या बाजूने ओढले. मराठ्यांनी तैनाती फौज स्वीकारण्यास नकार दिला असला तरी शिंदे यांच्या मध्यस्थीने पेशव्यांचे समर्थन मिळविले.

४. टिपूने वेलस्लीच्या हालचाली हेरल्या. वेलस्लीने मराठे व निजाम यांना आपल्या बाजूने वळविले हे टिपूने पाहिले म्हणून त्याने मुसलमानी देशांकडून धर्माच्या नावावर मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. टिपू व हैदर यांच्या कूटनीतीबाबत एक महत्त्वाचा मुद्दा येथे लक्षात ठेवावयास हवा. हैदरने इंग्रजांना भारतीय मित्र मिळू नयेत यासाठी दूरदृष्टीने हालचाली केल्याचे दिसून येते. पण टिपूला मात्र हे साध्य करता आले नाही. म्हणून त्याने भारताबाहेरून इस्लामी देशाचे सहाय्य मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून येते.

५. साम्राज्यवादी वेलस्ली याला तर टिपूशी युद्ध करण्यासाठी फक्त निमित्त हवे होते. तो ज्यावर्षी भारतात आला त्या १७९८ मध्ये त्याने टिपूचे राज्य आपल्या ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्याचे ठरविले होते. म्हणून आता योग्य संधी आहे असे पाहून वेलस्लीने टिपूला तैनाती फौज स्वीकारण्यास सांगितले. पण टिपूने याला स्पष्ट नकार दिला. हे निमित्त साधून वेलस्लीने मार्च १७९९ मध्ये टिपू वर स्वारी केली व चौथे इंग्रज – म्हैसूर युद्ध सुरू झाले.

**युद्धातील घटना: –** चौथे इंग्रज – म्हैसूर युद्ध अवघे तीन महिनेच चालले. वेलस्लीने स्वतः मद्रास येथे युद्धाचे संचालन केले. त्याने पूर्व व पश्चिम या दोन्ही बाजूंनी स्वाऱ्या केल्या. पूर्वेकडून जनरल हैलीस व आर्थर वेलस्ली यांना पाठविले. ऑर्थर वेलस्ली हा लॉर्ड वेलस्लीचा भाऊ होता. पुढे तो ड्युक ऑफ वेलिंग्टन म्हणून प्रसिद्ध आला. पश्चिमेकडून जनरल स्टूअर्ट याला पाठवले. यामध्ये टिपू कोणाचीही मदत मिळवू शकला नाही. शेवटी त्याने राजधानी श्रीरंगपट्टणम गाठली. इंग्रजांनी श्रीरंगपट्टणम ला वेढा दिला. टिपूने वीस लाख पाऊंड देऊन तह करावा असे इंग्रजांनी सुचविले पण त्याने नकार दिला. त्यामुळे युद्ध सुरू राहिले. श्रीरंगपट्टणमच्या किल्ल्यांच्या भिंतीजवळ युद्ध करीत असताना तो में १७९९ मध्ये ठार झाला.

**परिणाम: –**

१. म्हैसूर वर विजय मिळवून लॉर्ड वेलस्ली याने म्हैसूरचे विस्तृत राज्य ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले.

२. निजामाने मदत केली म्हणून त्याला गुटी, गुरमकोंडा व चित्तलदुर्गाचा काही प्रदेश दिला.

३. मराठ्यांना काही अटीवर सुंदा व हारपोनेली हे दोन जिल्हे देण्याचा ठराव मांडला पण मराठ्यांनी नकार दिला म्हणून तो प्रदेश इंग्रज व निजाम यांनी आपसात वाटून घेतला.

४. इंग्रजांनी स्वतःकडे कनारा, कोईमतुर व श्रीरंगपट्टणम इत्यादी महत्त्वाचे प्रदेश ठेवले.

५. उरलेला प्रदेश टिपूच्या वंशंजाना न देता वेलस्लीने तो मूळच्या हिंदू राजाच्या कृष्णराव या राजकुमारला दिला.

६. टिपूच्या मुलीला व राजघराण्यातील सदस्यांना वेलस्लीने पेन्शन निश्चित करून दिली. ते सर्व वेल्लोर येथे निघून गेले.

**मूल्यमापन**

या युद्धामुळे लॉर्ड वेलस्लीची कीर्ती वाढली. त्याला मार्किस या पदाने सन्मानित करण्यात आले. पण भारतीय शासकांचा एक फार मोठा प्रदेश ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्यात आला. लॉर्ड वेलस्लीने एका दगडात तीन पक्षी मारले. एक म्हणजे ब्रिटिशांचा साम्राज्य विस्तार दुसरा म्हणजे टिपू सारख्या प्रबळ शत्रू पासून कायमची मुक्ती व तिसरा म्हणजे म्हैसूर मधून फ्रेंच प्रभावाची समाप्ती.

लॉर्ड वेलस्ली आपल्या साम्राज्यवादी विस्तारीकरणाच्या धोरणात यशस्वी झाला. वास्तविक पाहता मद्रास कौन्सिलने टिपूशी संघर्ष न करण्यास सुचविले होते, पण त्याचा सल्ला धुडकावून त्याने आपले धोरण यशस्वी केले.

टिपू ने जर मराठे व निजाम यांना काही प्रदेश देऊन त्यांच्याशी मैत्री केली असती व इंग्रजांना एकटे पाडले असते तर टिपूचे राज्य हातचे गेले नसते. पण त्याच्यात अशा दूरदृष्टीचा अभाव होता. पिता हैदर अली हा मात्र इंग्रजांना एकटे पाडण्यासाठी मराठे व निजाम यांच्याशी तात्पुरती का होईना पण मैत्री करण्यात तरबेज होता म्हणून म्हैसूरची पहिली दोन्ही युद्धे इंग्रजांना जड गेलीत.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

अ) एका वाक्यात उत्तर द्या.

१. हैदर अलीने कोणाच्या सहाय्याने शस्त्रनिर्मितीचा कारखाना सुरू केला?

२. चौथे इंग्रज म्हैसूर युद्ध किती साली झाले?

३. चौथे इंग्रज म्हैसूर युद्ध कोणाच्या काळात झाले?

४. श्रीरंगपट्टणमचा तह किती साली झाला?

५. म्हैसूर मध्ये कोणत्या घराण्याची सत्ता होती ?

ब. रिकाम्या जागा भरा.

१. ............ याच्या काळात चौथे इंग्रज - म्हैसूर युद्ध घडले.

अ. वॉरन हेस्टिंग्ज    ब. क्लाईव्ह    क. कॉर्नवॉलिस    ड. लॉर्ड वेलस्ली

२. भारताबाहेरून मुस्लिमांची मदत मिळविण्याचा प्रयत्न ........... यांनी केला.

अ. हैदर अली    ब. फ्रेंच    क. टिपू    ड. इंग्रज

३. ............ साली मंगलोरचा तह झाला.

अ. १७८४    ब. १७८५    क. १७८६    ड. १७८८

४. ............ येथे शस्त्रास्त्रनिर्मितीचा कारखाना सुरु केला.

अ. गुंटूर    ब. डीडिंगल    क. त्रावणकोर    ड. मदुराई

५. ............ साली हैदरचा मृत्यू झाला.

अ. १७८२    ब. १७८३    क. १७८४    ड. १७८५

**२.२.३ मराठा**

मुघल साम्राज्याच्या अवशेषांवर मराठ्यांनी आपले साम्राज्य निर्माण केले. नेमक्या त्याच स्थितीचा फायदा इंग्रजांनी सुद्धा घेतला. दोन्ही शक्ती आपापल्या क्षेत्रात कार्यरत होत्या. इतर भारतीय शक्तीमध्ये मराठे सर्वात प्रबळ होते. तर युरोपियनांमध्ये इंग्रज वरचढ ठरले. अशा प्रकारे भारतातील प्रमुख दोन शक्ती समोरासमोर आल्या आणि भारतावर वर्चस्व गाजविण्यासाठी अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात परस्पर संघर्ष सुरू झाले ज्यात इंग्रजांनी मराठ्यांवर मात केली.

रॉबर्ट क्लाइव्हने ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला तर वॉरन हेस्टिंग्जने विस्तारवादी धोरण अमलात आणून तो पाया पक्का केला. विस्तारवादी धोरण आखण्यासाठी पैसाही लागणार होता. तो मिळवण्यासाठी त्याने अन्यायपूर्ण व अनितीचे मार्ग देखील अवलंबिले. विस्तारवादी धोरणाची अंमलबजावणी करताना त्याला मराठे, रोहिले, म्हैसूर व अयोध्या यांच्याशी संघर्ष करावा लागला. इंग्रज व मराठा यांच्यामध्ये तीन युद्ध घडून आली ही युद्धे वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेलस्ली लॉर्ड हेस्टिंग यांच्या काळात झाली. यामधून इंग्रज मराठा संबंध कसे होते हे आपणास समजून येईल. सर्वप्रथम आपण पहिल्या मराठा – इंग्रज युद्धाचे समालोचन करूया.

**पहिले मराठा – इंग्रज युद्ध (१७७५ – १७८२)**

१७६१ मधील पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा इतका जबरदस्त पराभव झाला. की, मराठे त्यातून आपली स्थिती कितपत सुधारू शकतील याबद्दल सर्वत्र साशंकता होती. पण सुदैवाने मराठ्यांना माधवराव पेशव्यासारखा कर्तबगार पेशवा मिळाला. माधवरावाने आपल्या अल्प कारकिर्दीत (१७६१–१६७२) हैदर अली व निजाम या दक्षिणेतील शत्रूंना गप्प बसविले. रघुनाथराव सारख्या घरातील विरोधकांना नियंत्रणात ठेवले, प्रशासन व्यवस्था, अर्थव्यवस्था नीट करून राज्याची घडी बसविली. तोफखण्याची, लष्कराची, गुप्तहेर खात्याची पुनर्बांधणी केली एवढेच नव्हे तर दिल्ली जिंकून पत पूर्वस्थिती निर्माण केली. पण

माधवरावच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे भाग्यचक्र वेगाने फिरू लागले. पहिला माधवराव याला अपत्य नसल्याने त्याचा लहान भाऊ नारायणराव हा पेशवा बनला पण तो अल्पकालीन ठरला पेशवा बनण्याची आकांक्षा असलेल्या रघुनाथरावाने नारायणगावचा काटा काढला होतो स्वतः पेशवा बनला. पण मराठ्यांना ही गोष्ट पटली नाही. परिणामी  बारभाई मंडळ स्थापन करून रघुनाथ रावाला पेशवा पदावरून काढून टाकले व राज्याची सत्ता आपल्याकडे घेतली. अशातच नारायणरावांचा मुलगा सवाई माधवराव जन्माला आल्याने त्याला ताबडतोब पेशवा बनविल्याने निराश झालेल्या रघुनाथ रावाने इंग्रजांचा आश्रय घेतला. घरातील भांडणामुळे मराठ्यांच्या राजकारणात इंग्रजांचा शिरकाव झाला आणि ते राज्यहिताला बाधक ठरले. इंग्रजांनी रघुनाथरावाला पेशवा बनण्यास मदत करण्याचे कबूल केले त्या बदल्यात इंग्रजांच्या अटी मान्य करण्यास रघुनाथरावास तयार केले. यातूनच प्रथम इंग्रज मराठा युद्ध सुरू झाले हे युद्ध जवळजवळ सात वर्षे चालले. १७७५ मध्ये सुरतच्या तहाने सुरू झालेले हे युद्ध  १७८२ मध्ये सालबाईच्या तहाने समाप्त झाले.

**सालबाईचा तह (१७ मे १७८२)**

१. सवाई माधवराव यांना पेशवे म्हणून मान्यता

२. राघोबा यास तीन लाख रुपये पेन्शन देऊन वेगळे केले. पुन्हा त्याला पेशवे पद मिळवून देण्याचा अट्टाहास इंग्रजांनी केला नाही.

३. साष्टी बेट व ठाण्याचा किल्ला इंग्रजांकडे राहील. इंग्रजांनी जिंकलेले सर्व प्रदेश मराठ्यांना परत केले.

४. फत्तेसिंह गायकवाड यास बडोदा येथील स्वतंत्र शासक म्हणून मान्यता देण्यात आली. त्याचा प्रदेश त्याला परत करण्यात आला.

याप्रमाणे १७७५ पासून सुरू झालेले पहिले मराठा-इंग्रज युद्ध संपले. महादजी शिंदे यांनी नाना फडणवीस यांना हा तह करण्यास गळ घातली होती.

**मूल्यमापन**

भारताच्या इतिहासात  सालबाईच्या तहाचे  महत्व अनन्यसाधारण आहे. वॉरन हेस्टिंग याने विस्तार वादाचे धोरण आखून मराठ्यांशी संघर्ष केला. त्यात सात वर्ष बरेच सैन्य व अमाप पैसा खर्च घातला पण त्याला साष्टी खेरीज प्रत्यक्ष पदरात काहीच पडले नाही. मराठ्यांशी झुंज देणे योग्य नाही असे अनुभवांती त्याच्या लक्षात आले. म्हणूनच  वीस वर्षेपर्यंत इंग्रज मराठ्यांच्या  वाट्याला गेले नाहीत. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

परकीय इतिहासकार डॉ. व्ही. ए. स्मिथ यांच्या मते जरी कंपनीला भारतात प्रभुता संपन्न सत्ता मिळाली नाही तरी  सालबाईच्या तहाने एक नियंत्रण शक्ती मात्र खचितच ठरविले आहे.

याउलट भारतीय इतिहासकार डॉक्टर ईश्वरी प्रसाद म्हणतात की या तहाला भारताच्या राजकारणात इंग्रजांना एक महत्त्वपूर्ण नियंत्रण शक्तीच्या रूपात ठरविणे हे ऐतिहासिक तथ्य ऐवजी कल्पनेवर जास्त आधारित आहे.

हेस्टिंग्जने पुरंदरच्या तहानंतर पुन्हा युद्ध सुरू करून पुरंदरच्या तहान्वये मिळणाऱ्या लाभापेक्षा सालबाईच्या तहात जास्त काहीच मिळविले नाही.

महादजी शिंदेंना जर विश्रांतीची आवश्यकता भासली नसती तर त्याने हिमतीने हे युद्ध पुढे नेले असते व हैदर अलीच्या सहाय्याने व नाना फडणीसाच्या कूटनीतीने इतिहास आणखी काही वेगळाच राहिला असता.

सरदेसाई म्हणतात हा तह एक वर्षापासून तयार होत होता. भारताच्या इतिहासात हा तह अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. इंग्रजांनी मराठ्यांची आपल्या स्वतःच्या सामर्थ्याची परीक्षा घेतली व पराभवाचा असा मार खाल्ला की त्यांना आपली स्थिती सांभाळता सांभाळता नाकी नऊ आले.

वॉरन हेस्टिंग याबाबतीत नम्रपणे सांगतो की, हा तह माझ्या कारकिर्दीतील अत्यंत कठीण काळातील यशस्वी तह होय.

इतिहासतज्ञ सुंदरलाल या युद्धाचे मूल्यमापन करताना असे म्हणतात की, पहिल्या इंग्रज मराठा युद्धाने भारतात इंग्रजांचा कोणताच प्रदेश वाढला नाही वा वीरता दिसली नाही तसेच त्यांचे कोणतेच युद्ध कौशल्य ही दृष्टीस पडले नाही किंवा प्रामाणिकपणासाठी त्यांची कीर्ती देखील वाढली नाही. याच्या उलट मराठ्यांचा पराक्रम त्यांचे युद्ध कौशल्य व नाना फडणवीस यांची नितिज्ञता या तीन बाबी या युद्धात अत्यंत उच्च श्रेणीच्या ठरल्या. जर गायकवाड, शिंदे व भोसले यांनी पेशवे दरबाराशी विश्वासघात केला नसता किंवा जर ऐनवेळी हैदर अलीच्या आयुष्य मर्यादेने धोका दिला नसता तर हिंदुस्थानातून परकीय सत्ता मुळासकट उकडून फेकून दिली असती.

**दुसरे इंग्रज – मराठा युद्ध (१८०२ – १८०४)**

या युद्धात एकीकडे लॉर्ड वेलस्ली हा साम्राज्यवादी होता तर दुसरीकडे शिंदे व भोसले हे दोन मराठे सरदार होते. लॉर्ड वेलस्ली याच्या भारत आगमनापूर्वी सर जॉन याचे तटस्थतेचे धोरण (१७९३ – ९८) होते. अर्थातच या काळात इंग्रजांची मराठ्यांची युद्ध होण्याची शक्यता नव्हती. या काळात मराठ्यांच्या इतिहासात काही महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. १७९५ मध्ये झालेल्या खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांना निजामाविरुद्ध विजय मिळाला या विजयामुळे मराठ्यांची प्रतिष्ठा वाढली व नाना फडणीसाच्या प्रभावात वृद्धी झाली. पेशव्यांच्या छत्राखाली आलेल्या मराठा सरदारांच्या सामूहिक साह्यामुळे मिळालेला हा प्रचंड विजय मराठ्यांच्या इतिहासात शेवटचा ठरला. २५ ऑक्टोबर १७९५ मध्ये दुसऱ्या माधवराव पेशव्याने आत्महत्या केली.

४ डिसेंबर १७९६ रोजी बाजीराव दुसरा याच पेशवाईची वस्त्रे दिली. नाना फडणवीस हा त्याचा मुख्यमंत्री बनला. विशेष सांगायचे म्हणजे यापूर्वी मराठ्यांच्या दुर्दैवाने महादजी शिंदे, तुकोजी होळकर

यासारखे सरदार यांना काळाने हिरावून नेले होते. त्याच्याजागी दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर हे सरदार आपापसात लढण्यात मग्न राहिले. दुसरा बाजीराव व नाना फडणवीस यांचेही पटत नसे.लॉर्ड वेलस्ली भारतात आला त्यावेळी मराठ्यांची स्थिती आपापसातील भांडणात क्षीण होत होती.एकजूट तर सोडा आज पण परस्परातील अविश्वास व संशय बळावला होता.

लॉर्ड वेलस्लीने मराठ्यांना देखील तैनाती फौज स्वीकारण्याची गळ घातली होती. पण मराठ्यांनी त्याकडे कानाडोळा केला. मराठ्यांमधील एक मुत्सद्दी नेता नाना फडणवीस हा १३ मार्च १८०० रोजी मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्याच्या योग्यतेचा एकही नेता मराठ्यांकडे नव्हता. शिंदे व होळकर यांच्यात पेशव्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पर्धा लागली होती. त्यांच्यातील संघर्ष दुसरा बाजीराव मुळे कमी होण्याऐवजी वाढला. दुसरा बाजीराव याने दौलतराव शिंदेची बाजू घेतली व तो त्याच्या सल्ल्याने वागू लागला. हे यशवंतराव होळकर सहन झाले नाही. त्याने पेशव्याला वठणीवर आणण्याचे प्रयत्न केले. त्याने पेशवा आणि शिंदे यांच्या संयुक्त फौजेवर आक्रमण करून विजय मिळवला व पुण्यात येऊन विनायकराव यास पेशवे पद दिल्याची घोषणा केली. यामुळे दुसऱ्या बाजीरावावर नियंत्रण प्रस्थापित झाले नाही उलट दुसरा बाजीराव हा इंग्रजांची मदत मिळण्यास वसई येथे पळून गेला.

**दुसऱ्या इंग्रज – मराठा युद्धाची कारणे**

**१. लॉर्ड वेलस्लीचे विस्तारवादी धोरण:–** वेलस्लीचे ध्येयच मुळी भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करण्याचे होते आणि हेच दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचे प्रमुख कारण ठरले. वेलस्ली हा आपल्या ध्येयप्राप्तीसाठी दुसऱ्यांच्या शांततामय विचारांची उपेक्षा करीत असे व प्रत्येक योग्य व अयोग्य उपायाने भारतीय राज्य ब्रिटिश साम्राज्यात विलीन करत असे. यामुळे मराठा व इंग्रज यांच्यात युद्ध होणे अपरिहार्य होते.

**२. वसईचा तह (३१ डिसेंबर १८०२) :–** यशवंतराव होळकराच्या स्वारीच्या भीतीने दुसरा बाजीराव वसई येथे पळून गेला व त्याने इंग्रजांबरोबर वसईचा तह केला या तहान्वये त्याने तैनाती फौज स्वीकारली व २६ लाखाचा प्रदेश इंग्रजांना दिला. तसेच इंग्रजांच्या सल्ल्याने वागण्याचे मान्य केले. पेशवे हे हिंदू पदपादशाहीचे प्रमुख असत व मराठा सरदार त्यांना आपला नेता मानत असत. यावेळी पेशवा बाजीराव दुसरा याने वसईचा तह करून इंग्रजांचे एक प्रकारे मांडलिकत्व स्वीकारले होते. याचा अर्थ मराठा सरदारांच्या स्वतंत्रतेचा देखील अंत झाला होता. ही गोष्ट स्वाभिमानी मराठे सरदार यांना मान्य झाली नाही. हा तह करून पेशव्याने सुरक्षिततेच्या मोबदल्यात स्वातंत्र्याचे बलिदान दिले. यशवंतराव होळकर आणि पेशव्याला शेवटी शेवटी विनंती केली होती की धूर्त इंग्रजांकडे जाऊ नका आपण आपसात योग्य तो निर्णय घेऊ पण दुसरा बाजीराव हा वसईला गेला व इंग्रजांशी तह केला. वसईच्या तहाचा मराठ्यांवर परिणाम म्हणजे शिंदे व भोसले हे सरदार इंग्रजांशी लढण्यासाठी एकत्र आले. होळकर माळव्याकडे निघून गेला गायकवाड तटस्थ राहिला. यातूनच हे युद्ध उद्भवले.

**३. तैनाती फौजेची पद्धत:–** मराठा सरदार चौथ व सरदेशमुखी वसूल करण्यासाठी दक्षिण भारतात निजाम वगैरे शेजारच्या प्रदेशात जात असत. लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौजेची पद्धत अमलात आणून निजाम, रजपूत यांना आपल्या नियंत्रणात आणले. त्यामुळे मराठ्यांना मोगल बादशहाकडून मिळालेला चौथ व सरदेशमुखीचा अधिकार व्यर्थ ठरू लागला म्हणून त्यांच्या मनात इंग्रजांविषयी शत्रुत्वाची भावना येणे स्वाभाविक होते. याप्रमाणे तैनाती फौजेची पद्धत हे देखील दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धाचे प्रमुख कारण मानले जाते.

यावरील कारणांमुळे ऑगस्ट १८०३ मध्ये इंग्रज व मराठा (दौलतराव शिंदे व भोसले) यांच्यात युद्ध झाले त्यालाच दुसरे इंग्रज–मराठा युद्ध असे म्हणतात.

**युद्धातील घटना :–** शिंदे व भोसले यांच्या सैनिकांची संख्या जवळजवळ अडीच लक्ष होती. याउलट ब्रिटिशांची फौज फक्त ५५ हजार होती. म्हणून लॉर्ड वेलस्लीने पूर्ण विचार करून व्यूहरचना तयार केली. एकाच वेळी वेगवेगळ्या मोर्चावर लढण्याचे त्याने ठरविले यामुळे दक्षिण भारत व उत्तर भारत येथे लढायला प्रारंभ झाला.

दक्षिणेत ऑर्थर वेलस्ली याने अनेक ठिकाणी विजय मिळविले. १२ ऑगस्ट १८०३ रोजी त्याने अहमदनगर जिंकले. त्याने शिंदे व भोसले यांच्या संयुक्त फौजेवर असाई येथे विजय मिळवला. असाई हे गाव औरंगाबाद जवळ आहे. या युद्धात मराठ्यांनी पराक्रम दाखवून पंधराशे इंग्रज सैनिक कापून काढले पण विजय मात्र मिळवता आला नाही.

वऱ्हाडात आडगाव येथे भोसल्यांचा पराभव झाला. इंग्रजांनी त्याचा गाविलगड किल्ला जिंकून घेतला. शेवटी नागपूरकर रघुजी भोसले यास इंग्रजांशी देवगाव चा तह करावा लागला.

**देवगाव चा तह (१७ डिसेंबर १८०३)**

१. नागपूरकर भोसलेंनी इंग्रजांना कटक हा ओरिसा मधील प्रदेश द्यावा. त्याचप्रमाणे वर्धा नदीच्या पश्चिमेकडील आपला सर्व प्रदेश द्यावा.

२. निजाम व पेशवे यांच्याशी संघर्ष झाला तर इंग्रजांची मध्यस्थी भोसलेंनी मान्य करावी.

३. भोसल्यांच्या नागपूर या राजधानीत ब्रिटिश रेसिडेंट ठेवण्यात यावा.

४. इंग्रजांच्या परवानगीशिवाय कोणत्याही युरोपियन व अमेरिकन व्यक्तीस नोकरीस ठेवता येणार नाही तसेच इंग्रजांच्या शत्रू देशाशी पत्रव्यवहार करता येणार नाही.

५. भोसल्यांनी निजामाच्या विरोधात असलेल्या सर्व प्रादेशिक मागण्या सोडून द्याव्यात.

६. भोसल्यांनी तैनाती फौज स्वीकारणे अमान्य केले वेलस्ली याने देखीलआग्रह केला नाही.

उत्तर भारतात लॉर्ड वेलस्ली याने लॉर्ड लेक यास पाठविले. त्याने अलिगड जिंकून घेतले त्यानंतर दिल्ली सुद्धा जिंकून घेतली. मोगल बादशहा शहाआलम  हा शिंदे या मराठा सरदारांच्या संरक्षणात होता. आता मात्र इंग्रजांनी त्याला आपल्या संरक्षणात घेतले.

लॉर्ड लेक याने ऑक्टोबर १८०३ मध्ये आग्रा जिंकून घेतले. त्यानंतर अलवर जवळ लसवाडी येथे नोव्हेंबर १८०३ मध्ये जोरदार लढाई झाली. यामध्ये शिंदे यांच्या सैन्यांनी इंग्रजांना चांगलेच धारेवर धरले होते.

लॉर्ड लेक मराठ्यांचा पराक्रम पाहून म्हणतो की, 'मराठे सैतानासारखे वा विरासारखे लढले हे परमेश्वरा ! मला पुन्हा अशा स्थितीत टाकू नको'  पण शेवटी शिंदे यांचा पराभव झाला. इंग्रजांनी बुंदेलखंड, गुजरात व ओरिसा येथेही विजय मिळविले. शेवटी पाच महिन्याच्या कालावधीत शिंदे यांना विदर्भात अंजनगाव सुर्जी येथे ३० डिसेंबर १८०३ रोजी तह करावा लागला.

**अंजनगाव सुर्जी तह (३० डिसेंबर १८०३)**

१. लॉर्ड वेलस्ली याने दौलतराव शिंदे यांचे कडून अहमदनगर, भडोच, गंगा यमुनेतील  दुआबचा प्रदेश, दिल्ली व आग्रा हे प्रदेश घेऊन ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले.

२. दौलतराव शिंदे यांना वचन द्यावे लागले की इंग्रज विरोधी युरोपियन किंवा अमेरिकन माणसाला नोकरीत ठेवणार नाही किंवा त्यांच्याशी पत्रव्यवहार करणार नाही.

३. पेशवे, निजाम व गायकवाड यांच्यावर असलेले दावे सिंध्यांना सोडावे लागतील.

४. दौलतराव शिंदे यांनी वसईच्या तहाला मान्यता दिली. इतकेच नव्हे तर त्यांना तैनाती फौज स्वीकारावी लागली.

**परिणामः–** दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचे भारताच्या इतिहासात दूरगामी परिणाम झाले. एकेकाळी जे मराठे इंग्रजांना भारतातून कायमचे पिटाळून लावण्यासाठी महासंघ स्थापन करून भारतातील राजे, नवाब, सरदार यांना एकत्रित करीत होते त्यांना आता इंग्रजांशी अपमान जनक तह करावा लागत होता. भारतातील एक सामर्थ्य संपन्न अशी मराठा शक्ती इंग्रजांपुढे हतबल झाली. पण याचा अर्थ असा नव्हे की, मराठे कायमचे संपले. त्यांच्यात अजूनही इंग्रजांशी लढण्याची शक्ती होती पण  नाना फडणवीस सारखा नेता नसल्यामुळे  कुटनितीत निपुण असलेल्या  इंग्रजांपुढे  मराठ्यांचा पराक्रम यशस्वी होऊ शकला नाही.

**महत्व व मूल्यमापनः–**

१. भारताच्या इतिहासात दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचे महत्त्व फार मोठे आहे. या युद्धात यश मिळवून लॉर्ड वेलस्लीने आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचे धोरण फार मोठ्या प्रमाणात यशस्वी करून दाखविले. भारतात जी मराठा शक्ती श्रेष्ठ व महान समजली जात होती तिच्यावर विजय मिळवल्याने इंग्रज शक्ती बलाढ्य ठरवली जाऊ लागली.

२. इंग्रजांचा प्रभाव आता उत्तर भारत व ओरिसा येथेही वाढला. त्यांना फार मोठे प्रदेश मिळाले.

३. लॉर्ड वेलस्ली याने इंग्रज सैन्याच्या सामर्थ्याचा दबदबा पूर्ण भारतात वाढविला.

४. लॉर्ड वेलस्ली याच्यामुळे पेशवे, शिंदे व भोसले हे इंग्रजांच्या नियंत्रणात आले. गायकवाड या मराठा सरदाराने तर अगोदरच इंग्रजांशी मैत्रीचा तह केला होता. एक होळकर हाच काय तो स्वतंत्र राहिला. त्याने नंतर इंग्रजांशी लढून आपला पराक्रम दाखविला. पेशवे व चारही मराठी सरदार( शिंदे भोसले होळकर व गायकवाड) हे एकत्र आले असते व इंग्रजांशी लढा दिला असता तर भारताच्या इतिहासात वेगळे चित्र दिसले असते. त्यांच्यात पराक्रम होता पण अंतर्गत मतभेद व कलह यामुळेच केवळ इंग्रजांना फावले या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

५. दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धात विजय मिळाल्यामुळे इंग्रजांना भविष्यात साम्राज्य वाढविणे सोपे गेले त्यांच्या भावी साम्राज्याचा पाया पक्का झाला.

६. महाराष्ट्रातून फ्रेंचांचा प्रभाव नाहीसा झाला.

७. कंपनीच्या साम्राज्याची सीमा खूपच विस्तारली.

८. मोगल बादशहा शहा आलम हा मराठ्यांऐवजी आता इंग्रजांच्या संरक्षणात गेला.

**तिसरे इंग्रज – मराठा युद्ध (१८१७ – १८१८ )**

दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाच्या समाप्तीनंतर जो काही दहा-बारा वर्षाचा काळ मराठ्यांना मिळाला. त्याचा उपयोग आपल्या शक्तिवृद्धीसाठी करून न घेता उलट परस्पर भांडणापायी मराठ्यांनी आत्मघातच करून घेतला. अशा स्थितीत १८१३ मध्ये गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड हेस्टिंग याची नियुक्ती झाली. त्याने आपल्या कारकिर्दीत आक्रमक धोरणाचा अवलंब केला. नेपाळ युद्धाच्या समाप्तीनंतर लॉर्ड हेस्टिंग्जने पेंढाऱ्याशी संघर्ष सुरू करून अप्रत्यक्षरीत्या मराठा सत्तेला आव्हान दिले. परिणामी इंग्रज मराठा संघर्ष सुरू झाला. तसे पाहिले तर मराठ्यांच्या दृष्टिकोनातून ही लढाई शेवटचीच मानली जाते. अशा या इंग्रज – मराठा संघर्षाची कारणे पुढील प्रमाणे

**तिसऱ्या इंग्रज – मराठा युद्धाची कारणे**

**१. पश्चातापदग्ध पेशव्यांचे स्वातंत्र्य प्रेम:** दुसऱ्या बाजीराव पेशव्याने १८०२ मध्ये वसईचा तह करून इंग्रजांची मदत मिळवली होती. पण तहाच्या दिवसापासूनच इंग्रजांच्या नियंत्रणामुळे व दडपणामुळे त्याला वसईचा तह असह्य वाटू लागला होता. त्याचे स्वातंत्र्य प्रेम उफाळून आले व इंग्रजांच्या गुलामगिरीचे जोखड फेकून देण्यासाठी पश्चातापी पेशव्याने शिंदे, होळकर व भोसले या सरदारांकडे दूत पाठवून इंग्रजा विरुद्ध गुप्त तह करण्यास प्रारंभ केला. पुणे येथे वास्तव्यास असलेल्या इंग्रज रेसिडेंटने पेशव्याबद्दलचा संशय लॉर्ड हेस्टिंगला कळविला व इंग्रजांनी सावध होऊन मराठ्यांविरुद्ध साधनांची जमवाजमव करण्यास प्रारंभ केला.

**२. मराठे व पेंढारी यांच्या मैत्रीमुळे इंग्रज आक्रमक:** मराठे सरदार शिंदे व होळकर हे पेंढाऱ्याशी मैत्री करून इंग्रजांचे प्रदेश लुटतात. अशी शंका असल्यामुळे पेंढाऱ्याचा नायनाट करण्याचे तसेच त्यांच्याशी मैत्री करणाऱ्या मराठा सरदारांची शक्ती कमी करण्याचे लॉर्ड हेस्टिंग्जने ठरविले. त्याला कसेही करून मराठ्यांना बलहीन करून इंग्रजांचे राज्य वाढवायचे होते. यामुळे वरील मराठ्यांच्या मनात इंग्रजांबद्दल राग निर्माण झाला त्यातूनच हा संघर्ष उद्भवला.

**३. मराठ्यांची शक्ती खच्ची करण्यासाठी नवीन तहाची लॉर्ड हेस्टिंगची योजना:** लॉर्ड हेस्टिंग जुने मराठ्यांची शक्ती खच्ची करण्यासाठी हिंदू पदपादशाहीचा सर्वात मुख्य असलेला पेशवा व त्याचे चार सबळ मराठे सरदार यांच्याशी नवीन तह करून त्यांच्यावर अनेक बंधने टाकण्याचे ठरविले. कूटनीतीने प्रेरित होऊन त्याने मराठा साम्राज्याच्या या पाचही आधारस्तंभाना निर्बल करण्यासाठी प्रत्येकाशी वेगवेगळे राजकीय तह केले. प्रत्येक तहाचे मूल्यमापन केले तर असे लक्षात येते की लॉर्ड हेस्टिंग हा खरोखरच मोठा राजनीतिज्ञ व कुशल कूटनितज्ञ होता. त्याच्या या तहामुळे मराठा शक्ती काही प्रमाणात विस्कळीत होण्यास मदत झाली. पण या तहामुळेच मराठ्यांच्या मनात इंग्रजांविषयी कटुतेची व शत्रुतेची भावना वाढीस लागली.

**४. भोसल्यांच्या स्वातंत्र्याचा शेवट करणाऱ्या आप्पासाहेबांशी तह केला (२७ में १८१६ ) :** दुसरा रघुजी भोसले २२ मार्च १८१६ मध्ये मरण पावला. नागपूरच्या गादीवर परसोजी भोसले यास बसविण्यात आले. त्याच्या चुलत भावाचे नाव अप्पासाहेब भोसले होते. तो महत्त्वकांक्षी होता. त्याला गादी हवी होती. त्याने प्राथमिक उपाय म्हणून रीजन्सी मिळविण्यासाठी इंग्रजांशी संपर्क साधला. धूर्त इंग्रज अशा संधीच्या शोधातच होते. नागपूरचा रेसिडेंट जेन किन्स याने २७ मे १८१६ रोजी आप्पासाहेबांशी एक तह केला. त्यानुसार आप्पा साहेबांना रेजन्सी मिळाली. पण भोसल्यांच्या वास्तविक स्वातंत्र्याचा शेवट झाला. खरे पाहिले तर या अटी आप्पासाहेबांवर लादण्यात आल्या होत्या व त्याला सही करावी लागली होती. त्यामुळे तो दुःखी झाला व त्यातून इंग्रजांच्या नियंत्रणातून स्वतंत्र होण्यासाठी त्याने इंग्रजांच्या विरोधात हालचाली सुरू केल्या या हालचालीतून मराठे इंग्रज युद्ध उद्भवले.

**५. पेशव्यावर लादलेला कठोर तह (१३ जून १८१७ ):–** लॉर्ड हेस्टिंग या साम्राज्यवादी गव्हर्नर जनरल ने एलफिस्टन या पुण्याच्या इंग्रज रेसिडेंटला दुसरा बाजीराव या पेशव्याशी एक नवीन तह करण्याची आज्ञा दिली. या नवीन तहाचा उद्देश पेशव्याने इंग्रजांवर स्वारी करू नये असा होता. कारण लॉर्ड हेस्टिंग याला पेशव्याच्या आक्रमणाची भीती वाटत होती. त्याच्या आदेशावरून एलफिस्टन याने १३ जून १८१७ रोजी पेशव्यावर जबरदस्ती करून त्याची तहावर सही घेतली त्या कठोर तहाच्या अटी खालील प्रमाणे होत्या.

१. पेशव्याने मराठ्यांचे सर्वपरी असलेल्या आपल्या पदाचा त्या करावा यामुळे पेशवा हा मराठी सरदारांचा कायद्याने प्रमुख राहिला नाही. मराठा सरदारांचे नेतृत्व करण्याचा त्यांचा घटनात्मक हक्क हिरावून घेण्यात आला.

२. पेशव्याने आश्वासन दिले की, तो कोणत्याही राज्याशी इंग्रज प्रेसिडेंटच्या सल्ल्याशिवाय बोलणी करणार नाही. यामुळे तर पेशव्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. त्याने मराठा सरदारांशी व निजामांशी संगनमत करून इंग्रजांवर स्वारी करू नये हा या अटीमागे उद्देश होता.

३. इंग्रजांना पेशव्याच्या राज्यात जितके सैन्य आवश्यक असेल तितकेच ठेवावे हे पेशव्याला मान्य करावे लागले. यामुळे इंग्रजांना पेशव्याचे सैन्य खच्ची करण्याचा अधिकार मिळाला.

४. पेशवा आपला मंत्री त्रिंबकजी डेंगळे यास पकडून इंग्रजांच्या ताब्यात देईल. तसेच आपल्या परिवारातील एका सदस्याला ओलीस म्हणून इंग्रजांच्या ताब्यात देणे पेशव्याला मान्य करावे लागले.

५. इंग्रजांनी पेशव्याचा अहमदनगर किल्ला तर घेतलाच पण त्याच्या अधिपत्यातील माळवा बुंदेलखंड उत्तर भारतावरील प्रदेशावर पेशव्यास पाणी सोडाव्यास लागले. यामुळे पेशव्यांचा प्रादेशिक ऱ्हास झाला व त्याचे सामर्थ्य कमी झाले.

या वरील अटी बघितल्या म्हणजे खरोखरच इंग्रजांनी पेशव्यावर कठोर तह लादला हे स्पष्ट होते याच कठोर अटींमुळे पेशव्याने इंग्रजांशी युद्ध करण्याची तयारी केली.

**६. दौलतराव शिंदेंशी तह (५ नोव्हेंबर १८१७) :** इंग्रजांनी बोलण्याचा सरदार दौलतराव शिंदे यांच्याशी ५ नोव्हेंबर १८१७ रोजी तह केला. या तहान्वये शिंद्यांनी इंग्रजांना आश्वासन दिले की, तो पेंढाऱ्याच्याविरुद्ध इंग्रजांना सहाय्य करेल. उदयपूर, जोधपूर, कोटा, बुंदी या रजपूत राज्याशी स्वतंत्रपणे तह करण्याच्या अधिकारापासून त्याला वंचित करण्यात आले. याप्रमाणे लॉर्ड हेस्टिंग याने शिंध्यांच्या राज्याच्या जवळपासच्या प्रदेशावर आपली स्थिती इतकी मजबूत केली की पुढे मराठ्यांची युद्ध झाले तर इंग्रजांच्या विरोधात जाण्याची हिंमत दौलतराव शिंदे यास होऊ नये.

**७. गुजरातच्या गायकवाडशी नवीन तह (६ नोव्हेंबर १८१७ ):** वस्तूतः गुजरातचा गायकवाड हा दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धाच्या वेळी देखील इंग्रजांशी तह केलेला असल्यामुळे तो गप्प होता. त्याने इंग्रजांच्या विरोधात युद्ध केले नव्हते तसेच मराठा सरदारांना मदतही केली नव्हती. तरीदेखील इंग्रजांनी त्याच्याबरोबर नवीन तह करावयास त्यास भाग पाडले. या तहानुसार स्वतः गायकवाड हा मराठा सरदार व त्याची फौज ही इंग्रजांना जास्त उपयोगी पडावी असे ठरले होते.

**८. होळकरांची स्थिती दुर्बल करणे:** इंदूरचा यशवंतराव होळकर हा पराक्रमी मराठा सरदार ज्याने युद्धात लॉर्ड वेलस्लीला त्रस्त केले होते. तो २० ऑक्टोबर १८११ मध्ये मृत्यु पावला. त्यामुळे इंदूर राज्यात अव्यवस्था व अशांतता पसरली. इंग्रजांनी या परिस्थितीचा फायदा घेतला. त्यानी यशवंतरावाच्या दोन सहकाऱ्यांना आपल्या बाजूने वळविले. त्यामुळे यशवंतराव नंतर गादीवर आलेल्या मल्हारराव द्वितीय या वारसाचे सामर्थ्य कमी झाले.

**युद्धघटना:** तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धात एका बाजूने इंग्रज होते तर दुसऱ्या बाजूने पेशवे भोसले व होळकर हे मराठा सरदार होते.

**१. इंग्रज पेशवे यांच्यातील युद्धः** ५ नोव्हेंबर १८१७ रोजी दुसरा बाजीराव पेशवा याने पुण्यातील ब्रिटिश रेसिडेंट याच्या निवासस्थानावर हल्ला चढवून त्याला आग लावली. एलफिस्टन हा कसातरी आपला प्राण वाचवू शकला. पुण्यातील खडकी या भागात असलेला कर्नल बर याच्या इंग्रज छावणीवर हल्ला करण्यात आला. पण पेशव्याला विजय मिळाला नाही. इंग्रजांनी १७ नोव्हेंबर १८१७ रोजी पुन्हा पुणे ताब्यात घेतले. तरी देखील न खचता त्याने संधी पाहून कोरेगाव येथे १ जानेवारी १८१८ रोजी इंग्रजांशी युद्ध केले. त्यानंतर आष्टी येथे २० फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रज व पेशवे यांच्यात युद्ध झाले. आष्टीच्या लढाईत पेशव्यांचा सेनापती बापू गोखले मारला गेला. या दोन्ही लढायात पेशव्यांचा पराभव झाला. त्याने शेवटी सर जॉन माल्कम जवळ आत्मसमर्पण केले.

लॉर्ड हेस्टिंग याने पेशव्याचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. मराठ्यांचे सर्वोच्च सत्तेचे पेशवे पद लयाला गेले. दुसरा बाजीराव याला वार्षिक आठ लाख रुपये पेन्शन देऊन कानपूर जवळ बिठूर येथे पाठविले. भारतात इंग्रजांचा प्रभाव व अधिकार जलद गतीने वाढू लागला. पेशव्याच्या राज्यातून सातारा हे छोटे राज्य वेगळे करून ते प्रताप सिंह या भोसले घराण्याच्या वंशजाला दिले. पुढे कालांतराने लॉर्ड डलहौसीने हे सातारा राज्य इंग्रजी राज्यात विलीन केले.

**२. नागपूरच्या अप्पासाहेब भोसल्याशी युद्धः** इंग्रजांनी आप्पासाहेब भोसले यांच्याशी जबरदस्तीने जो तह केला त्यामुळे नाराज होऊन आप्पासाहेबांनी इंग्रजांशी युद्ध पुकारले. त्यांनी देखील पेशव्यांप्रमाणे नागपूरच्या ब्रिटिश रेसिडेन्सी वर हल्ला चढवला. परंतु ७ नोव्हेंबर १८१७ रोजी त्याचा सीताबर्डीच्या युद्धात पराभव झाला. नंतर आप्पासाहेब भोसले पंजाब कडे निघून गेले. नर्मदेच्या उत्तरेकडील भोसल्यांचे प्रदेश लॉर्ड हेस्टिंग याने इंग्रजी राज्यात विलीन केले. उरलेल्या भागावर दुसरा रघुजी भोसले यांच्या नातवाला गादीवर बसविले.

**३. होळकरांशी युद्धः** दुसरा मल्हाराव होळकर हा अल्पवयस्क होता. पेशव्याने इंग्रजांशी युद्ध सुरू केले ही बातमी ऐकताच होळकराच्या सैनिक अधिकाऱ्यांनी इंग्रजांशी युद्ध सुरू केले. अन्य मराठ्यांना सहाय्य करण्याच्या दृष्टीने त्यांनी दक्षिणेकडे कुच केली. पण सर जॉन माल्कम याच्या फौजेने हिस्लॉपच्या नेतृत्वात महिदपूर येथे २१ डिसेंबर १८१७ रोजी होळकराच्या सैन्यांचा पराभव केला. ६ जानेवारी १८१८ रोजी इंग्रजांनी मंदसौरच्या तहावर होळकरांना सही करण्यास भाग पाडले. या तहानुसार होळकरांचे रजपुतराजांवरील सर्व दावे रद्द करण्यात आले. नर्मदेच्या दक्षिणेकडील होळकरांचे सर्व जिल्हे इंग्रजांच्या राज्यात समाविष्ट करण्यात आले. होळकरांचे परराष्ट्र धोरण इंग्रजांच्या सल्ल्याने व मध्यस्थीने राबविण्याचे ठरविले. होळकरांच्या बाजूने असलेल्या आमिरखानाला टोंकचे नवाब पद देण्यात आले. इंदूरमध्ये ब्रिटिश रेसिडेंट कायमचा ठेवण्यात आला.

**परिणाम व महत्त्वः** लॉर्ड हेस्टिंग याने मराठ्यांचा पराभव करून साम्राज्यवादी विस्ताराचे परराष्ट्र धोरण यशस्वीपणे राबविले. त्याने या युद्धानंतर पेशवे भोसले व होळकर यांचे बरेच प्रदेश ब्रिटिश राज्यात समाविष्ट

केले. इंग्रजांनी मराठ्यांची इतके खच्चीकरण केले की यानंतर मराठे इंग्रजांशी युद्ध करण्याइतपत सामर्थ्य संपन्न राहिले नाही.

याविषयी मार्शमन असे म्हणतो की, या इंग्रज मराठा युद्धाने फक्त संस्थानांचे सैन्यच नव्हे तर येथील लोकांचे मन देखील हतोत्साहीत झाले.

डॉडवेल याच्या मते १८१८ च्या व्यवस्थेचा काळ हा ईस्ट इंडिया कंपनीच्या सामर्थ्यसंपन्नतेच्या प्रारंभाचा काळ होय. कंपनीच्या प्रभुत्वाला आव्हान देणारे एकही राज्य शिल्लक राहिले नाही. हे कार्य लॉर्ड वेलस्लीने पूर्ण केले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) एका वाक्यात उत्तर द्या.

१) सालबाईचा तह किती साली करण्यात आला?

२) इंग्रजांनी मंदसौरच्या तहावर कोणास सही करावयास भाग पाडले?

३) दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यात १८०२ मध्ये कोणता तह झाला?

४) इंग्रज व दौलतराव शिंदे यांच्यात कोणता तह झाला?

५) मराठा सेनापती बापू गोखले कोणत्या लढाईत मारला गेला?

ब) रिकाम्या जागा भरा.

१. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने .............. या इंग्रज अधिकाऱ्याजवळ आत्मसमर्पण केले.

अ. लॉर्ड वेलस्ली ब. लॉर्ड कॉर्नवॉलिस क. जॉन माल्कम ड. मनरो

२. देवगावचा तह इंग्रज व .............. यांच्यात झाला.

अ. रघुजी भोसले ब. दौलतराव शिंदे क. पेशवा ड. होळकर

३. .............. यांनी तैनाती फौजेची पद्धत सुरु केली.

अ. लॉर्ड हेस्टिंग्ज ब. वॉरन हेस्टिंग्ज क. लॉर्ड वेलस्ली ड. लॉर्ड कॉर्नवॉलिस

४. .............. साली पहिला माधवराव पेशवा यांचा मृत्यू झाला.

अ. १७७२ ब. १७७३ क. १७७४ ड. १७७५

५. दुसरा बाजीराव पेशवा यास .............. इतकी वार्षिक पेन्शन देवू केली.

अ. ८ लाख ब. ९ लाख क. १० लाख ड. १२ लाख

## २.३ सारांश :

वरील सर्व विवेचनावरून असे दिसून येते की इंग्रजांनी सुरुवातीला आपले युरोपियन व्यापारी शत्रू डच, फ्रेंच यांचा पराभव करून त्यांना आपल्या सत्तास्पर्धेतून बाजूला केले. व इंग्रजांनी भारतात निर्विवाद व्यापारी सत्ता स्थापन केली. यानंतर भारतातील बंगाल, म्हैसूर, निजाम व मराठे या एतदेशीयांबरोबर संघर्ष करून संपूर्ण भारतावर आपली व्यापारी व राजकीय सत्ता प्राप्त केली. भारतातील एतदेशीयांबरोबर संघर्ष करत असताना त्यांनी अत्यंत कूटनीती, दूरदर्शी व मुत्सद्दीपणाचा योग्य वेळी वापर करून येथील सत्ताधीशांना एकसंघ होऊ दिले नाही. त्यामध्येच येथील सत्ताधीश हे एकमेकांमध्ये भांडण करण्यात गुंतले होते. याचा सर्वतोपरी फायदा इंग्रजांना झाला. इंग्रजांनी या सत्ताधीशांना एक एकटे पाडून युद्धामध्ये पराभूत केले. यासर्व इंग्रज अधिकाऱ्यांमध्ये रॉबर्ट क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग, लॉर्ड कॉर्नवालीस, लॉर्ड वेलस्ली यासारख्या साम्राज्यवादी व महत्वकांक्षी गव्हर्नर जनरलचा महत्वपूर्ण वाटा आहे. त्यांच्या महत्त्वाकांक्षी व विस्तारवादी धोरणामुळेच इंग्रज पुढे संपूर्ण भारतावर आपली सत्ता काबीज करू शकले हे विसरता कामा नये.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न –१**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या .

१) प्लासी २) दिवाणी व निजामतीचे अधिकार ३) २३ जून १७५७

४) रॉबर्ट क्लाईव्ह ५) २२ ऑक्टोबर १७६४

ब) रिकाम्या जागा भरा .

१. ब. ३० लाख २. ब. मीरकासीम ३. अ. २२ ऑक्टोबर १७६४

४. अ. रॉबर्ट क्लाइव्ह

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) एका वाक्यात उत्तर द्या.

१) फ्रेंच २) १७९९ ३) लॉर्ड वेलस्ली ४) मार्च १७९२

५) ओडीयार

ब) रिकाम्या जागा भरा.

१. ड. लॉर्ड वेलस्ली २. क. टिपू ३. अ. १७८४ ४. ब. डीडिंगल

५. अ. १७८२

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) एका वाक्यात उत्तर द्या.

१) १७ में १७८२ २) दुसरा मल्हारराव होळकर ३) वसईचा तह

४) अंजनगाव सुर्जी तह ५) आष्टीची लढाई

ब) रिकाम्या जागा भरा.

१. क. जॉन माल्कम २. अ. रघुजी भोसले ३. क. लॉर्ड वेलस्ली

४. अ. १७७२ ५. अ. ८ लाख

## २.५ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. प्लासीच्या लढाई माहिती देऊन त्याचे परिणाम व महत्व स्पष्ट करा.

२. इंग्रजांनी भारतात सत्ता स्थापन करण्यासाठी बंगाल मध्ये केलेल्या प्रयत्नाची चर्चा करा.

३. पहिल्या व दुसऱ्या हैदर इंग्रज युद्धाची माहिती द्या

४. तिसऱ्या इंग्रज–मराठा युद्धाची चर्चा करा.

ब) टिपा लिहा

१. बक्सारची लढाई

२. प्लासीची लढाई

३. तिसरे इंग्रज–म्हैसूर युद्ध

४. दुसरे मराठा – इंग्रज युद्ध

५. तैनाती फौज पद्धत

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) डॉ. कोठेकर शांता व डॉ. वैध सुमन, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १८५७), साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१९

२) डॉ. वक्काणी नि. आ., आधुनिक भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर

३) डॉ. सरदेसाई बी. एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर

४) डॉ. रोडे सोमनाथ, आधुनिक भारताचा इतिहास, पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर १९९८

५) डॉ. ग्रोव्हर बी. एल. आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद कंपनी दिल्ली

६) खरे, ग. ह., मराठ्यांचा इतिहास खंड २ कॉन्तिनेनटल प्रकाशन

७) डॉ. पवार, जयसिंगराव, हिंदुस्थानचा राजकीय व घटनात्मक इतिहास

८) Mujumdar R.C. struggle for Freedom

९) Prof. Chatarji, Road to Plasi

❑❑❑

## घटक ३
# भारतातील ब्रिटिश सत्तेचे दृढीकरण

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ जमीन महसूल पद्धती

    ३.२.२ प्रशासकीय व्यवस्था

    ३.२.३ लष्कर, न्यायव्यवस्था, पोलीस

३.३ सारांश

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास;

- ब्रिटिशांनी राबविलेल्या विविध जमीन महसूल पद्धतीची माहिती होईल.
- कंपनी सरकारच्या प्रशासनाचा आधार स्पष्ट करता येईल.
- कंपनीच्या लष्करी व्यवस्थेचा आढावा घेता येईल.
- कंपनीने सुरु केलेल्या नवीन न्यायव्यवस्थेच्या रचनेचा आढावा घेता येईल.
- कंपनीच्या पोलीस व्यवस्थेविषयी माहिती होईल.

## ३.१ प्रास्ताविक :

इ.स. १७५७ साल भारताच्या इतिहासात क्रांतिकारी ठरले. भारताचा एक विशाल व अत्यंत समृध्द प्रदेश परकियांच्या अंमलाखाली गेला. तोपर्यंत केवळ एक व्यापारी कंपनी असलेली ईस्ट इंडिया कंपनी एकाएकी राज्यकर्ती सत्ताधीश बनली. १७६५ मधील बक्सार येथील विजयानंतर त्या क्षेत्रातील सार्वभौमत्वाचे संपूर्ण अधिकार खऱ्या अर्थाने कंपनीच्या हाती गेले. पुढे कंपनीने येथील महसूल व्यवस्थेत सुधारणा

करण्यासाठी पाऊले उचलली. कारण राज्य चालविण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. त्यातून महसूल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विविध प्रयोग कंपनीने केले. त्यानंतर कंपनीने प्रशासन व्यवस्थेत महत्त्वाचे बदल करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. इंग्लंड येथील सरकारने त्यांच्या अडचणी ओळखून आवश्यक असे कायदे संसदेच्या मदतीने संमत केले. भारतातील प्रचलित शासनव्यवस्था फारशी उपयुक्त ठरणार नाही याची खात्री झाल्याने प्रशासन व्यवस्थेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८५३ पर्यंत अनेक कायदे संसदेने संमत केले. त्याव्दारे भारतात प्रशासनाची भक्कम अशी चौकट निर्माण होऊ शकली. त्याचबरोबर पोलीस प्रशासनात महत्त्वाचे बदल केले. पोलीस यंत्रणेच्या मदतीने संपूर्ण देशात अंतर्गत शांतता प्रस्थापित करून भयमुक्त असे वातावरण निर्माण केले. लष्करी व्यवस्थेत अनेक बदल केले. लष्करासाठी नव्या तंत्राचा उपयोग करण्यात आला. तोफखाना दलास अधिक महत्त्व दिले. त्यामुळे संपूर्ण भारतावर एकछत्री अंमल प्रस्थापित करणे कंपनी सरकारला शक्य झाले. कायद्यांचे संहितीकरण करण्यात आले. नवी न्याय व्यवस्था उभारण्यात आली. कंपनीने भारतात प्रशासनात मूलगामी स्वरूपाचे बदल केले असले तरी भारतीयांना प्रशासनात अत्यंत नगण्य असे स्थान होते. तसेच कंपनी सरकारने हिंदू-मुस्लिम यांच्यात एकोपा निर्माण होऊ नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ जमीन महसूल पद्धती:-

साम्राज्यवादी वृत्तीच्या ब्रिटिशांनी भारतीय कृषी व्यवस्थेत व्यापक स्वरुपाचे बदल केले. नव्या भू-धारण पद्धती, मालकी हक्काच्या नव्या कल्पना, वहिवाटीतील बदल, राज्याकडून अधिकाधिक भू-राजस्वाची मागणी ह्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत व सामाजिक संबंधात घडून आलेल्या परिवर्तनामुळे ढवळून निघाले आणि त्यात विकृत आधुनिकीकरण आले.

**ब्रिटीशपूर्व काळातील भूमीकर पद्धती:-**

वैदिक काळापासूनच भारतात ग्राम स्वातंत्र्याची कल्पना ही ग्राम प्रशासनाचा शेवटचा पण अत्यंत महत्वाचा घटक होता. स्थानिक शासन आणि भूमी कर ह्यादृष्टीने एकक म्हणून ग्राम कार्य करीत असे. काही लोकांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या काळात म्हणजे मुघल काळात भूमीचे स्वामित्व कोणाकडेच नव्हते. भूमीशी संबंध असणाऱ्या सर्वच घटकांचा त्यावर अधिकार होता. भूमीस्वामीला करारानुसार ठरलेली रक्कम देत राहील तोपर्यंत शेतकऱ्याला त्याच्याकडे असलेल्या जमिनीवर पिके घेता येत होती. पाटील किंवा ग्रामाचा प्रमुख, मामलतदाराच्या किंवा नवाबाच्या वतीने कर वसूल करीत असे. कराचे प्रमाण साधारणतः १/६ ते १/३ इतके होते. पाटील दंडाधिकारी म्हणूनही काम पहात असे. ग्रामाच्या अंतर्गत व्यवस्थेला अनुसरून घ्यावयाची पिके, विशेष प्रकारच्या जमिनीचे विशेष लोकांमधे वाटप, सिंचाई व्यवस्था, शेतकऱ्यांपासून वैयक्तिक कर वसूली इ. गोष्टी ग्रामपंचायतीच्या सहाय्याने व तेथील प्रथा, परंपरा लक्षात घेऊन पाटील पार पाडीत असे.

**ब्रिटीशांची भूमीकर व्यवस्था व प्रशासनः–**

ब्रिटिशांनी भारताच्या विजयाचा आर्थिक लाभांसाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. ब्रिटिशांच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधांनी कंपनीला आयातनिर्यातीवरील कर वाढविण्यास प्रतिबंध लावला. त्यामुळे कंपनीचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेतीवरील कर हे होते. म्हणूनच त्यावर जास्त भर देण्यात आला व जास्त लक्ष केंद्रीत करण्यात आले.

ईस्ट इंडिया कंपनीचे प्रारंभीचे ब्रिटीश शासक भारताला आपली एक विशाल जागीर समजत होते. म्हणून भारतातून जास्तीत जास्त पैसा उपटण्याच्या तत्वाला ते चिकटून राहिले. पण त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने पिकांना लागलेला खर्च आणि मजूरीच जेमतेम निघत होती. ग्रामीण जनतेकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. भूमीकराचा लिलाव करून जास्तीत जास्त कर देणाऱ्याला जमीन देण्यात येत असे. अशी व्यक्ती प्रती–उत्पादक बनत असे. बरीच जमीन पडीत राहू लागल्याने कृषी उत्पादन कमी झाले. देशात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली. म्हणूनच भारत आणि इंग्लंड सरकारने भूमीकर पद्धतीवर गंभीरपणे विचार केला. त्यातून काही परिणाम दिसू लागले.

**नवीन भू–धारण पद्धती:–**

ब्रिटीश शासकांनी भारतात वेगवेगळ्या भू-धारण पद्धतीचा अवलंब केला. भू–धारण ह्या शब्दात संबंधित अटी येतात ज्या आधारावर जमीनदार किंवा शेतकऱ्याला राज्याकडून जमीन मिळते तसेच शेतकऱ्याला भूमीस्वामीकडून. ढोबळ मानाने ब्रिटिशांनी कायमधारा, महालवारी आणि रयतवारी ह्या तीन प्रकारच्या भू–धारण पद्धतीचा भारतात अवलंब केला. कायम जमीनदारी पद्धती बंगाल, बिहार, ओरिसा, बनारस विभाग, उत्तर कर्नाटक येथे लागू करण्यात आली. भारतातील ब्रिटीश प्रदेशांपैकी जवळ जवळ १९% क्षेत्र त्यामुळे व्यापले गेले. महालवारी पद्धती उत्तर प्रदेशाच्या बहुतांश भागात, मध्यभारत क्षेत्र, पंजाब येथे लागू झाली आणि त्यामुळे ३०% प्रदेश प्रभावित झाला. रयतवारी पद्धतीचा अवलंब मुंबई व मद्रास इलाख्यातील मोठा भूभाग, आसाम आणि इतर ठिकाणी करण्यात आला व त्यात अंदाजे ब्रिटीश भारताचा ५१% भाग समाविष्ट झाला.

१.एरिक स्टोक्स (Eric stokes) ह्याचे पुस्तक The English utilitarians and India, Oxford, 1959, व जी. डी. बिर्स (G.R. Bearce) ह्याचे पुस्तक 'British Attitudes Towards India, OxFord, 1961 ह्यात व्यक्त झालेले विचार की, 'समकालीन इंग्रजी रिति–रिवाजांचा भारतावर प्रभाव पडला. आधुनिक संशोधनाला मान्य नाही. सध्या बेडन पावेलचे विश्लेषण की, ''भू-धारण पद्धती स्थानिक परिस्थितीनुसार बदलत होती हे मान्य केले जाते. बेडन पावेलने आपले पुस्तक "The Land Systems of India, OxFord, १९८२ असे प्रतिपादन केले आहे की, बंगालमधील मोठमोठी जमीनदारी पद्धती, मद्रास व मुंबईमधील शेतकऱ्यांशी वैयक्तिक कर ठरविण्याची पद्धती आणि उत्तर प्रदेशात महालवारी पद्धती ह्यासाठी लागू करण्यात आली कारण ती तेथे आधीपासूनच अस्तित्वात होती. राष्ट्रीय विचारसरणीच्या लोकांनी व

भारतातील मार्क्सवाद्यांनी हे सिद्ध केले आहे की, इंग्रजांनी भारतात आपले हित समोर ठेवूनच हया पद्धती लागू केल्या.

**कायमधारा पद्धतीमागील वैचारिक संकल्पना:–**

बंगालमधील आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होण्याची गरज हळूहळू इंग्लंडमधील विचारवंतांना वाटू लागली अशा परिस्थितीत अलेक्झांडर डोव्ह आणि फिलीप फ्रान्सिस या अर्थशास्त्रांनी फ्रेंच निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांकडून कायमधारा पद्धतीची संकल्पना इंग्लंडमध्ये अठराव्या शतकाच्या शेवटच्या काही वर्षांत आणली. इंग्लंडमधील बऱ्याच मंडळींना कंपनीचे बंगालमधील धोरण ट्रायल अँण्ड एरर पद्धतीचे वाटत होते. परंतु युरोपमध्ये ज्या नवनव्या संकल्पना उदयास येत होत्या त्यावरच आधारीत असे धोरण आखण्याचा प्रयत्न कंपनी करीत होते असे मत प्रा. एरिक स्ट्रोक्स आणि प्रा. रणजीत गुहा यांनी आपल्या पुस्तकातून अनुक्रमे ‘दि इंग्लीश युटिलेरिरियन्स ॲण्ड इंडिया’ आणि ‘ए रूल ऑफ प्रॉपर्टी फॉर बेंगॉल’ मध्ये मांडले आहे. या दोन्ही अर्थतज्ञांची मते विचारात घेतली तर ब्रिटिशांच्या धोरणावर उपयुक्ततावाद, उदारमतवाद खंडविषयक सिद्धांत, व्यापारवाद, व्यापारवादी, निसर्गवादी व खाजगी मालमत्तेची कल्पना या इंग्लंड आणि युरोपमधील विचारांचा प्रभाव होता असे दिसून येते.

यामध्ये रणजीत गुहा यांचा तरुण असल्यापासूनच कायमधारा पद्धतीचा अभ्यास करण्याकडे ओढा होता. हे त्यांनी १९५०च्या दशकात लिहिलेल्या लेखांवरून स्पष्ट होते. कायमधारा पद्धतीचा हा अभ्यास करताना रणजित गुहा यांनी एका वैचारिक विरोधाभासाचा शोध घेतला. फ्रांसमध्ये १८व्या शतकाच्या उत्तरार्धात शेतीविषयक विचार मांडणारे विचारवंत प्रभावी झाले होते. राष्ट्राची संपत्ती ही कृषिक्षेत्राच्या माध्यमातून वाढू शकते, असा त्यांचा दृढ विश्वास होता. अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांच्या विकासाला कृषिक्षेत्राकडूनच चालना मिळते, असे विचार त्यांनी मांडले होते. थोडक्यात, शेती सुधारल्याशिवाय राष्ट्राचा विकास होणे शक्य नव्हते. अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्त्व सांगणाऱ्या या विचारवंतांना “Physiocrats’ (निसर्गवादी) म्हणून ओळखले जात होते. मध्ययुगीन काळात युरोपमध्ये प्रचलित असलेल्या सरंजामदारी पद्धतीला या विचारवंतांनी कडाडून विरोध केला होता. आर्थिक व्यवहारांमध्ये शासनाने अतिशय कमी हस्तक्षेप करावा, असे त्यांचे ठाम मत होते. एकंदरीतच भांडवलशाही व्यवस्थेमधील निरंकुश अर्थव्यवहाराला (laissez faire) त्यांचा पाठिंबा होता. गुहा यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून दाखवून दिले की, अशा प्रकारच्या आधुनिक ‘निसर्गवादी’ विचारांमध्येच कायमधारा पद्धतीचे मूळ वैचारिक बीज होते. निसर्गवादी विचारसरणीने १७७० आणि १७८०च्या दशकात इंग्लंडमध्ये खूप प्रभाव निर्माण केला होता. सर फिलिप फ्रान्सिस या वादग्रस्त ब्रिटिश अधिकाऱ्यावर देखील या विचारसरणीचा प्रभाव पडला होता. इंग्लंडमध्ये भांडवलदारी पद्धतीने शेती करणाऱ्या ‘सभ्य शेतकऱ्यांचा’ (gentlemen farmers) वर्ग अस्तित्वात आला होता. बंगालमध्येदेखील इंग्लंडप्रमाणे कायमधारा पद्धती लागू करून जमीनदारांना जमिनीचा मालकी हक्क दिला तर भांडवलदारी पद्धतीने शेती करून प्रगती साधणारा जमीनदारांचा एक वर्ग अस्तित्वात येईल, अशी ब्रिटिश राज्यकर्त्यांना आशा वाटत होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी फ्रांसमधील निसर्गवादी विचारांचा उपयोग करून बंगालमधील ग्रामीण प्रदेशाचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला होता.

परंतु भारतामध्ये त्यांना अपेक्षित यश लाभले नाही. शेतीसुधारणा तर झालीच नाही, उलट कायमधारा पद्धतीमुळे शेतकरी कुळांचे प्रचंड शोषण झाले. एकंदरीतच, ब्रिटिश वसाहतिक राजवटीत शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी सुरू केलेल्या पद्धतीने शेतीमध्ये एक शोषणकारी यंत्रणा निर्माण केली. भांडवलदारी स्वरूपाच्या विचारांचा वापर एका निमसरंजामी (semi- feudal) समाजातील सत्तासंबंध टिकवण्यासाठी करण्याचा हा एक प्रकार होता. गुहा यांनी या ज्ञानशास्त्रीय विरोधाभासाचे (epistemological paradox)) स्पष्टीकरण बंगालमधील ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आधार घेऊन देण्याचा प्रयत्न केला.

परंतु भारतामधील परिस्थिती युरोपपेक्षा एकदमच वेगळी असल्याने भारतामधील सामाजिकता आणि स्थानियता यांचा विचार करणे अभिप्रेत होते आणि असा विचार झाल्याचे ठाम मत रॉबर्ट फ्रेकेनबर्ग आदींनी व्यक्त केले आहे. ब्रिटिशांच्या जमीन महसूलविषयक धोरणाला युरोपीय आर्थिक तत्वज्ञानाचा सबळ पाया लाभला होता. एकंदरीतच ब्रिटिशांच्या भारतामधील जमीन महसूल विषयक पहिला महत्वाचा टप्पा म्हणून कायमधारा पद्धतीकडे पाहिले जाते.

**कायमधारा पद्धती:– (१७९३)**

ब्रिटीशांच्या भारतातील जमीन महसूलविषयक धोरणामधील पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणजे कायमधारा पद्धत होय. लॉर्ड कॉर्नवॉलिसने २२ मार्च १७९३ रोजी बंगालमध्ये कायमधारा पद्धत लागू केल्याची घोषणा केली. ही पद्धती जागीरदारी, मालगुजारी, बिस्वेदारी इ. वेगवेगळया नावांनी ओळखली जाते. या पद्धतीत शासनाचा हिस्सा कायम स्वरुपात निश्चित केलेला होता. इतर पद्धतींमधे १० वर्ष ते ४० वर्षानंतर भूमीकरात बदल केला जात होता. त्यामधील तीन महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे:–

१. पूर्वी बंगाल, बिहार आणि ओरिसा या प्रांतांतील जमीनमालकांशी महसुलासंबंधी १० वर्षांचा करार करण्यात आला होता किंवा त्या जमीनदारांच्या मध्यस्थाशी असा करार झाला होता. तोच करार नव्या परिस्थितीमध्ये 'जमाबंदी' ध्यानात घेऊन कायम करण्यात येईल. दहा वर्षांची मुदत संपल्यावरही हा करार सुरू राहील. अर्थात, या कराराला ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाची मान्यता घ्यावी लागेल. तरच हा करार अस्तित्वात आला असे मानले जाईल.

२. बंगाल, बिहार व ओरिसामधील सर्व जमीनदार, स्वतंत्र तालुकादार व प्रत्यक्ष शेती करणारे खाजगी जमीनमालक यांना लॉर्ड कॉर्नवॉलिसने असे कळविले की, ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाने त्याला खास अधिकार दिले आहेत. त्यानुसार जमिनीची मोजणी केली जाईल व कायमस्वरूपी महसूल ठरवून दिला जाईल. ही जमाबंदी कायमची असेल.

३. तसेच जमीनदार, तालुकादार, प्रत्यक्ष शेती करणारे खाजगी जमीनमालक यांच्याशी प्रत्यक्ष किंवा त्यांच्या मध्यस्थाशी जमीन महसुलाची व्यवस्था कोणताही बदल न करता, सध्याची मुदत संपल्यावरही कायम स्वरूपाची ही व्यवस्था असेल.

अशा रीतीने बंगालमधील कायमधारा महसूल पद्धत अस्तित्वात आली.

या पद्धतीमध्ये जमीनदारी पद्धतीनुसार जमीनदाराला भूमीस्वामी मानले जात होते. तो जमीन विकू शकत होता, गहाण ठेवू शकत होता तसेच दान करू शकत होता. मात्र भूमीकराबाबत जमीनदाराला जबाबदार धरले जाई आणि त्याची वसूल न झाल्यास त्याची जमीन जप्त केली जाई.

जमीनीवरील कराचे दर फार जास्त ठरविण्यात आले होते. उदाहरणासाठी बंगालमधे हा दर ८९% होता आणि जमीनदाराजवळ फक्त ११% शिल्लक रहात होती. जॉन शोअरने भूमीकर वसूल आकडे पुढीलप्रमाणे दिले आहेत.

| | | |
|---|---|---|
| मीर कासीमचे प्रशासन | १७६२-६३ | ६४.६ लक्ष रु. |
| मीर जाफरचे प्रशासन | १७६३-६४ | ७६.२ लक्ष रु. |
| मीर जाफरचे प्रशासन | १७६४-६५ | ८१.७ लक्ष रु. |
| कंपनीच्या दिवाणीचे पहिले वर्ष | १७६५-६६ | १४७.० लक्ष रु. |
| कंपनीची वसूली | १७९०-९१ | २६८.० लक्ष रु. |

वरील आकड्यांवरून हे स्पष्ट होते की, कंपनीच्या दिवाणीच्या पहिल्याच वर्षात त्याआधीच्या वर्षापेक्षा ८०% जास्त भूमीकर गोळा झाला होता. त्याचबरोबर १७९०-९१ मधे झालेली वसूली कंपनीच्या दिवाणीच्या पहिल्या वर्षाच्या वसूलीच्या जवळजवळ दुप्पट झाली होती.

**कायमधारा पद्धतीचे फायदे-तोटे**

कायमधारा पद्धतीचे काही फायदे काही तोटे आपल्याला दिसतात. जरी ही पद्धत कॉर्नवॉलिसने सुरू केली असे म्हणत असले तरी या पद्धतीमागील विचार १७६५ पासून बंगालमध्ये सुरू होता. सुरुवातीच्या काळात जमीन महसुलाकडे कंपनीने का लक्ष पुरविले याचे उत्तर प्रो. केन पी. जे. व प्रो. हॉपकिन्स यांनी असे दिले आहे. "The expansion of empire in India in second half of the eighteenth Century marked an extension of the gentlemanly capitalism upheld by an alliance between landed interests and financial power that was in ascendancy in London after 1688, and that was the reason why revenue became and remained the Central preoccupation of imperial Policy.''

**फायदे**

१. ईस्ट इंडिया कंपनीचे उत्पन्न वाढले तसेच ते निश्चित झाले. पूर्वी कंपनीच्या नोकरांना दरवर्षी जे काम करावे लागत असे त्यामुळे नोकरांचा वेळही खर्च होत असे व जादा पैसा कंपनीस खर्च करावा लागत असे तो खर्च वाचला. कंपनीचे अधिकारी शेतीचे उत्पन्न कसे वाढेल याचा विचार करू शकत. कंपनीची ही शक्ती, प्रशासनाच्या इतर बाबींकडे वळविणे कंपनीला शक्य झाले.

२. जमिनीवरील मालकी सरकारची नसून जमीनदार, शेतकरी यांची आहे हे कायद्याने ठरल्यामुळे जमीनदार आपल्या इस्टेटीमध्ये स्थिरावले. त्यांनी शेतीचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला. त्याचबरोबर कंपनीचा निष्ठावान असा धनिक वर्ग बंगालमध्ये निर्माण झाला. परंतु रयतेला कोणतेही स्थान या पद्धतीमध्ये नव्हते. मध्यम वर्गाचा अजूनही उदय झालेला नव्हता. त्यामुळे धनिक वर्गाचे महत्त्व वाढले.

३. प्रो. ताराचंद यांच्या मते, ''वॉरन हेस्टिंग्जच्या कारकिर्दीमध्ये बंगालमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. बंगाल दुःख, दारिद्र्य, बंडाळी व दुष्काळाचे सावट बनले होते. या परिस्थितीमध्ये कॉर्नवॉलिसने सुधारणा केली. कंपनीचे हितसंबंध राखणे, नागरिकांचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करणे, जमीनदारांना सुरक्षितता देणे ही कामे कॉर्नवॉलिसने कायमधारा पद्धतीमुळे केली. कायमधारामध्ये जमीनदार, शेतकरी व रयत यांचे समाजातील स्थान निश्चित केले. एकंदर जमिनीच्या उत्पन्नापैकी ८९% उत्पन्न सरकारला मिळण्याची व्यवस्था झाली होती.

४. नव्या पद्धतीत तहसीलदार, कानुनगो, पटवारी व इतर महसूल अधिकाऱ्यांच्या नेमणुका रद्द करून कंपनीचा खर्च कमी करण्यात आला.

५. शेती व्यवसायाखाली येणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली. देशी उद्योगधंदे मागे पडले. व्यवसायात असणारे लोक शेतीकडे वळले. त्यामुळे शेती व्यवसायातील दबाव वाढला त्यामुळे जमिनीच्या किमतीमध्ये प्रचंड वाढ झाली. नवा सधन वर्ग निर्माण झाला.

६. कायद्याने जमीनदाराची स्थिती भक्कम बनविली. पूर्वी जमीनदाराला आपला वारस नेमीत असताना सरकारला 'पेशकश', 'नजराणा' द्यावा लागत असे. (या रकमेला मराठ्यांच्या कागदपत्रामध्ये दरबारखर्च म्हणत). तसेच जमीन विकणे, गहाण टाकणे, दान देणे यासाठी सरकारची पूर्व संमती घ्यावी लागत असे. नव्या कायद्याने जमीनदारांवरील ही सर्व बंधने रद्द करण्यात आली. जमीनदारांचे समाजामधील स्थान सर्वोच्च बनले.

७. या पद्धतीमध्ये रयतेसाठी एकच छोटासा फायदा होता. जमीनदारांनी रयतेला म्हणजे प्रत्यक्ष शेतावर कसणाऱ्यांना 'पट्टा' द्यावा. एखादा पट्टा दिल्यावर त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा जमीनदाराला अधिकार राहत नसे. याबाबत रयतेला न्यायालयात न्याय मागता येत असे.

८. प्रो. पीटर मार्शल यांच्या मते, १७५७ पेक्षा कंपनीच्या उत्पन्नामध्ये किमान २०% वाढ झाली.

९. प्रो. ख्रिस्तोफर बेली यांच्या मते, 'कंपनीचा हेतू बंगालमध्ये समता निर्माण करण्याचा नव्हता. त्यांना तेथे स्थिरता निर्माण करावयाची होती. कायमधारा पद्धतीचा मुख्य हेतू जमीन महसुलाची निश्चिती असावी. पूर्वीप्रमाणे अस्थिरता नसावी हा होता. हा प्रयोग राजकीय व लष्करी हेतूंनी प्रेरित होता. समाजावर वेगळ्या मार्गांनी नियंत्रण मिळविणे हाही उद्देश यामध्ये होता.'

१०. प्रो. एरिक स्टोक्स यांच्या मते, आजपर्यंत एखाद्याचे जमिनीवरील हक्क पारंपरिक कायद्यावर म्हणजे अलिखित कायद्यावर, शेतकऱ्याच्या रिवाजावर आधारित होते. तेव्हा या स्थितीत बदल करण्याचे कार्य कायमधारा पद्धतीने केले.

**तोटे**

कायमधारा पद्धतीचे तोटे आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. ईस्ट इंडिया कंपनीने जमीन महसुलासंबंधी जे करार केले ते बऱ्याच वेळा चुकीच्या लोकांच्या बरोबर केले. त्यामुळे जमिनीचे खरे मालक बाजूला राहिले. त्यामुळे खऱ्या मालकांनी आपल्या कायदेशीर हक्कासाठी न्यायालयाकडे धाव घेतली. यामधून बंगालमध्ये कोर्टखटल्यांची कामे खूप मोठ्या प्रमाणात सुरू झाली. जमीनदारांचे हक्क, विशेष हक्क स्पष्ट शब्दात नमूद केले नसल्याने बऱ्याच वेळा जमीनदारांना कोर्टाची पायरी चढण्याची पाळी आली. ब्रिटिश न्याय कसा असतो याचा अनुभव आता भारतीयांना येऊ लागला.

२. जमीन महसुलाचे सर्वसाधारण दर वाजवीपेक्षा जास्त होते. त्यामुळे सर्वांनाच सर्व काळ लागू केलेला महसूल ताबडतोब भरता येत नसे. जमीनदारांना लागू केलेला महसूल ठरावीक एका दिवशी भरावाच लागे. त्याला "Sun-set" कायदा म्हणत, जर त्या दिवशी महसूल भरला नाही तर जमीनदाराची जमीन लिलावाने विकून टाकली जात असे. अशा प्रकारची उदाहरणे मोठ्या प्रमाणावर घडत असतात. परिणामी १७९४ ते १८०७ या काळात बंगाल, बिहारमधील ४१% जमिनीची अशा प्रकारे विक्री करण्यात आली. ओरिसामध्ये १८०४ ते १८१८ या काळात ५१.१% टक्के जमीन अशा प्रकारे लिलावाने विकण्यात आली. तर बंगालमध्ये ४१% तर ओरिसामध्ये ५१.१% जमीनदारांना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या.

३. प्रो. डी. एन. धनागरे यांच्या मते, 'ब्रिटिशांनी प्रत्यक्षात कधीही जमिनीमधील 'खाजगी मालमत्ता' ही संकल्पना दृढ केली नाही. ब्रिटिशांनी जमीनदारांना खऱ्या अर्थाने जमिनीमध्ये संपूर्ण मालकी हक्क कधीच दिले नाहीत. अशा प्रकारचे विषय निव्वळ जमीनदारांनी जनतेला कशा प्रकारे पिळले यासंबंधी वर्णन करीत असताना सांगितले जातात. डॅनिअल थॉर्नर अशा प्रकारच्या जमिनीवरील मालकीला 'कच्ची मालकी' असे संबोधतो.

४. नव्या पद्धतीचे कायदे करूनही सामान्य रयतेला कधीच न्याय मिळाला नाही.

५. प्रो. रजन व रत्नलेखा रे यांनी १९७३ साली 'दि डायनॅमिक्स ऑफ कन्ट्यूनिटी इन रूरल बेंगॉल अंडर दि ब्रिटिश इम्पेरियम' या लेखात व १९७५ साली लिहिलेला 'जमीनदार्स ॲन्ड जोतेदार्स' या लेखात असे म्हटले आहे की, कायमधाराच्या सुधारणांनी बंगालमधील श्रीमंत शेतकऱ्यांचा एक वर्ग पुढे आला. या वर्गाला 'जोतेदार' असे म्हणतात. ग्रामीण बंगालमधील सत्ता जोतेदाराच्या हातात गेली. या सिद्धांताला 'जोतेदार सिद्धांत' (Jotedar thesis) असे म्हणतात. जमीनदार शहरांत राहून फक्त महसूल गोळा करीत पण खरी सत्ता जोतेदारांच्याच हाती होती. म्हणजेच जमीनदारांचे महत्त्व, कायमधारा पद्धतीने कमी केले असा हा सिद्धांत होता. परंतु रे च्या सिद्धांताला सुगाता बोस, अकिनोबुकवाई, पार्थ चॅटर्जी यांनी कसून विरोध केला

आहे. चित्त पंड्या यांनी १९९६ साली असा सिद्धांत मांडला की, फक्त पश्चिम बंगालमध्ये जमीनदारांचा ऱ्हास झाला. त्या ठिकाणी जोतेदार म्हणजे श्रीमंत शेतकरी यांच्या हातात जमीन खरेदी-विक्रीचा बाजार, ग्रामीण पतपुरवठा व व्यापारी व्यवस्था गेल्यामुळे जमीनदारांचा ऱ्हास झाला. तेथे 'जोतेदार सिद्धांत' यशस्वी ठरला.

६. 'के' च्या मते, काही अपवादात्मक प्रकरणे सोडली असता जमीनदार सामान्य रयतेकडून मोठ्या प्रमाणात महसूल गोळा करीत त्यामुळे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याकडे आपला उदरनिर्वाह चालविण्यास पुरेसे उत्पन्न क्वचितच राहत असे.

७. प्रो. ताराचंद यांच्या मते, कायमधारा पद्धतीमुळे जमीनदारांच्यावर महसूल भरण्याचा एवढा दबाव होता की, महसूल सूर्यास्तापूर्वी भरला पाहिजे अन्यथा त्यांची जमीनदारी काढून घेतली जाईल, याचा परिणाम म्हणून १७९६ साली बंगाल, बिहारमधील १/१० जमीनदारांच्या २८ लाख ७० हजार ६१ रु. किमतीच्या जमिनींचा लिलाव होऊन हे जमीनदार बेकार झाले. १७९६-९७ व १७९७-९८ या दोन वर्षांत ग्रामीण भागातील अनुक्रमे १४ लाख रुपये व २२.७ लाख रुपये उत्पन्न देणाऱ्या जमिनीचा लिलाव झाला. ह्या जमिनी श्रीमंत शेतकऱ्यांनी घेतल्या. त्यांना जोतेदार म्हणतात. दुसरा मोठा तोटा म्हणजे जमीनदारांनी आपले हक्क टिकविण्यासाठी आपल्या हाताखालील शेतकऱ्यांना आपले हक्क विकले त्यामुळे पोट जमीनदारी (Sub-infeudation) पद्धत सुरू झाली. बंगाल, बिहारमधील ३९ जिल्ह्यांमध्ये २० वर्षांत पोट जमीनदारांची संख्या १ लाख १० हजार ४५६ झाली. या पोट जमीनदारीपैकी ०.४% मध्ये (एका पोट जमीनदाराकडे २०,००० एकर जमीन असे) ८८% जमीनदाराकडे ५०० एकरांपेक्षा कमी जमीन असे. अशा प्रकारे जमिनीचे तुकडे पडले. त्याचा परिणाम उत्पन्नावर झाला.

कायमधारा व्यवस्थेतील सर्वात मोठा दोष म्हणजे सरकारचा आकडा ठरलेला असला तरी शेतकऱ्यांपासून जी वसूली जमीनदार करीत तो आकडा निश्चित नव्हता. पुढे त्या दरात वाढ करण्यात आली. कर न दिल्यास शेतकऱ्यांचा अतिशय छळ केला जाई. १८५९, १८६८ आणि १८८५ मध्ये आलेल्या बंगाल दर अधिनियमांचा (Bengal Rent Acts) शेतकऱ्यांना थोडाफार फायदा झाला. काही इतिहासकारांचे असे मत आहे की, वरील अधिनियम ग्रामीण भागातील असंतोष कमी करण्यासाठी केले गेले.

**रयतवारी पद्धत**

अठराव्या शतकातील भारतामधील दुसरी महत्त्वाची पद्धत म्हणजे रयतवारी पद्धत होय. ज्या जमीनधारणेच्या प्रकारामध्ये सरकार व जमीन कसणारी रयत यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झालेला असतो अशा जमीनधारणेच्या प्रकाराला 'रयतवारी पद्धत' असे म्हणतात. या पद्धतीनुसार प्रत्येक पंजीकृत (Registered) भूमी धारकाला भूमिस्वामी म्हणून मान्यता देऊन सरकारला सरळ कर देण्यास जबाबदार धरण्यात आले. त्यांना आपली जमीन किरायाने/भाड्याने देण्याचा, हस्तांतर करण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा विकण्याचा अधिकार होता. जोपर्यंत ठरलेला भूमीकर सरकारला व्यवस्थित मिळत असे तोपर्यंत त्याचे अधिकार हिरावून घेतले जात नव्हते.

**मद्रासमधील रयतवारी पद्धती:-**

मद्रास इलाख्यात सर्वप्रथम भूमीव्यवस्था बारामहाल जिल्ह्यात १६ मार्च १७९२ मध्ये लागू करण्यात आली. बारामहालमध्ये सालेम, बेल्लारी, कडप्पा व कनूलचा काही भाग यांचा समावेश होत असे. थॉमस मन्रोच्या मदतीने कॅप्टन रीडने शेतजमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज बांधून त्याच्या ५०% भूमीकर निश्चित केला. हा कर संपूर्ण आर्थिक भाटकाच्या (economic rent) अधिक होता. इतरही ही पद्धती लागू करण्यात आली.

**थॉमस मन्रो आणि मद्रासची रयतवारी व्यवस्था:-**

मद्रासचा १८२० ते १८२७ पर्यंत गव्हर्नर राहिलेल्या थॉमस मन्रोने जुनी करपद्धती अयोग्य ठरविली. त्याने एकूण उत्पन्नाच्या तिसरा भाग ठरवून कायम भूमी व्यवस्था असलेल्या प्रदेशांना वगळून बाकी संपूर्ण प्रांतात रयतवारी पद्धती लागू केली. पण हा करही संपूर्ण आर्थिक भाटकाइतकाच होता. भूमीकर नगदी स्वरुपात द्यावा लागत होता आणि त्याचा प्रत्यक्ष झालेले उत्पन्न किंवा त्यावेळेचा बाजारभाव ह्यांचाही काहीही संबंध नव्हता. परिणामी शेतकऱ्यांवर जास्तीचा भार पडला.

थॉमस मन्रोची ही भूमीकर व्यवस्था जवळजवळ ३० वर्षे होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला व शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आपल्या दरिद्री अवस्थेमुळे कर देण्यासाठी शेतकरी शेट्टींच्या (money lender) विळख्यात सापडले. भूमी कर गोळा करण्याची पद्धती अतिशय कठोर होती आणि त्यासाठी शेतकऱ्यांना यातना सहन कराव्या लागत. ह्या यातनांच्या वार्ता थेट इंग्लंडच्या संसदेत पोहचून त्यावर तेथे प्रश्न विचारण्यात आले. उपाशी ठेवणे, नैसर्गिक कार्याला जाऊ न देणे, वाकलेल्या स्थितीत ठेवणे, म्हशीच्या किंवा गाढवाच्या शेपटीला त्या व्यक्तीचे केस बांधणे, गळ्यात हाडांचे हार घालणे व अशाच प्रकारच्या यातना आणि अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली जात असे.

१८५५ मध्ये एकूण उत्पन्नाच्या ३०% आधार ठरवून विस्तृत सर्वेक्षण व भूव्यवस्था हयांची योजना लागू करण्यात आली. प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ १८६१ मध्ये झाला. १८६४ च्या नियमानुसार राज्याचा वाटा भू-भाटकाच्या ५०% इतका मर्यादित करण्यात आला. पण हा नियम कागदावरच राहिला आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत आला नाही. १८७७-७८ मधील मद्रास इलाख्यातील भीषण दुष्काळात तेथील शेतकऱ्यांची वास्तविक स्थिती समोर आली.

**मुंबई इलाख्यातील पद्धती:-**

मुंबई इलाख्यात सुद्धा रयतवारी पद्धती लागू करण्याचा निर्णय ईस्ट इंडिया कंपनीने घेतला जेणेकरून नफ्याचा वाटा जमीनदारांच्या किंवा ग्रामसमाजाच्या घशात जाणार नाही. त्याप्रमाणे एलफिन्स्टन ही पद्धत मुंबई प्रांतात लागू केली.

**एलफिन्स्टन व चॅप्लीनचे अहवाल–**

एलफिन्स्टन १८१९–२७ हया काळात मुंबईचा गव्हर्नर होता. पेशव्याकडून मिळविलेल्या प्रदेशासंबंधी त्याने १८१९ मध्ये एक विस्तृत अहवाल दिला. त्यात त्याने मराठा प्रशासनाच्या दोन मुख्य गोष्टीकडे अंगुलीनिर्देश केला. (१) स्थानिक प्रशासन चालविण्यासाठी ग्राम सभांचे असलेले अस्तित्व (२) मिरासी भू-धारणपद्धतीचे अस्तित्व (मिरासदार वंशपरंपरेने आपली जमीन कसत आणि शासनाला ठरलेला भूमी कर देत.) दक्षिणचा कमिशनर असलेल्या चॅप्लीनने १८२१ व १८२२ मध्ये आपले दोन अहवाल दिले. त्यात भूमीकराच्या जुन्या पद्धतीचे वर्णन करून काही महत्वाच्या सूचना केल्या.

त्यानंतर १८२४–२८ दरम्यान प्रिंगलने भूमीचे नियमित सर्वेक्षण केले आणि निव्वळ उत्पन्नाच्या ५५% भाग सरकारचा हिस्सा म्हणून निश्चित केला. पण बहुतांश सर्वेक्षण दोषपूर्ण होते व उत्पन्नाचा केलेला अंदाज बरोबर नव्हता. परिणामी भूमीकर जास्त निश्चित करण्यात आला व त्यामुळे शेतकरी अधिकच त्रस्त झाले. अनेक शेतकऱ्यांनी पिके घेणे बंद केले व जमिनीचे फार मोठे क्षेत्र उजाड बनले. **विनगेटचे सर्वेक्षण आणि मुंबईमध्ये रयतवारी पद्धती**

१८३५ मध्ये अभियांत्रिकी विभागातील अधिकारी लेफ्टनंट विनगेट ह्याला भूमी सर्वेक्षणाचा अधिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याने १८४७ मधे सादर केलेल्या अहवालावर त्याच्या व्यतिरिक्त कॅप्टन डेव्हिडसन व गोल्डस्मिथ ह्यांची स्वाक्षरी होती.

ढोबळमानाने एका जिल्ह्याचा भूमीकर त्या जिल्ह्याचा इतिहास, तेथील जनतेची स्थिती (paying capacity) ह्यावर अवलंबून होता. त्यानंतर जिल्हयाचा भूमीकर तेथील जमिनीवर विभागून देण्यात आला. जुन्या समानतेवर आधारलेल्या पद्धतीऐवजी भूमीच्या उपजक्षमतेनुसार कर ठरविण्यात आला. कर प्रत्येक जमीनक्षेत्रावर होता. शेतकऱ्याच्या ताब्यात असलेल्या पूर्ण जमिनीवर नव्हे. त्यामुळे शेतकरी कोणतेही शेत पिकवू शकत होता अथवा सोडून देऊ शकत होता. ही व्यवस्था ३० वर्षांसाठी करण्यात आली. परंतु ह्या व्यवस्थेतही दोष होता आणि तो म्हणजे ही व्यवस्था काही प्रमाणात अंदाजावर आधारलेली होती आणि कडकपणाकडे झुकलेली होती.

भूमीच्या पुनर्व्यवस्थेचे कार्य (re settlement) ३० वर्षानंतर १८६६ मध्ये सुरु करण्यात आले. त्यावेळी अमेरिकेतील गृहयुद्धामुळे (१८६१–६५) काही काळापुरता मुंबईच्या कापसाचा भाव वधारला होता. त्याचाच फायदा घेऊन सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी संधी सोडली नाही आणि भूमीकर ६६% पासून १००% पर्यंत नेला. शेतकऱ्यांना न्यायालयात अपीलही करता येत नव्हते.

ह्या जुलूमामुळे १८७५ मध्ये दक्षिणेतील शेतकऱ्यांमधे ब्रिटीशविरोध उफाळून आला. म्हणून सरकारने १८७९ मध्ये दक्षिण मदत अधिनियम (Deccan Agriculturists Relief Act) संमत केला ज्यानुसार शेतकऱ्यांना सावकारापासून संरक्षण देण्यात आले. मात्र सर्व प्रकारणाचे मूळ असलेला अत्यधिक भूमिकर जसाच्या तसाच होता. रयतवारी पद्धतीचे गुण आणि दोष खालीलप्रमाणे:–

**रयतवारी पद्धतीचे गुण:-**

१. या पद्धतीमुळे जमीन कसणारे आणि सरकार यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. जमीनदार व अन्य मध्यस्थांचे महत्त्व संपले.

२. जमिनीवर मालकी असणाऱ्याकडेच जमिनीची मशागत गेल्यामुळे जमिनीची उत्पादनक्षमता वाढली.

३. शेतीचा अथवा कृषी व्यवसायांचा विकास घडवून आणणे शेतकऱ्याला शक्य झाले.

४. समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने रयतवारीचा वर्ग उपयुक्त ठरला. छोटे-छोटे मालक स्वतःच शेती करीत असल्यामुळे बेकारी वर्ग युद्ध व जुलूम हे दोष कमी झाले.

५. सरकारलासुद्धा शेतीची प्रगती घडवून आणण्यासाठी योग्य ते धोरण आखणे व त्याची अंमलबजावणी करणे सोईचे झाले.

६. शेतकऱ्यांकडे जमिनीची मालकी आल्याने तो आपल्या शेतीमध्ये नवे प्रयोग करण्यास जादा जमीन मशागतीखाली आणण्यास प्रवृत्त झाला. त्याच्या शेतीचा दर्जा वाढला.

७. डॉ. ताराचंद यांच्या मते, रयतवारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांची स्थिती बदलली. त्याच्या व्यक्तित्वात शेतमजूर, शेतकरी व जमीनदार यांची वैशिष्ट्ये निर्माण झाली. ही पद्धत शेत कसणारा व सरकार या दोघांनाही फायदेशीर ठरली.

**रयतवारी पद्धतीचे दोष**

१. ग्रामीण समाजात पूर्वापर आढळणारी ऐक्याची भावना नष्ट झाली.

२. एखाद्या रयताच्या बाबतीत झालेली महसूल आकारणी अवास्तव किंवा गैरवाजवी आहे असे त्या रयतास वाटले तर त्याला व्यक्तिशः सरकारकडे दाद मागावी लागे. पूर्वी अशी दाद पाटील किंवा देशमुखांच्या मार्फत मागितली जात असे. प्रत्येक रयताचा शासनाशी संपर्क येणे शक्य नसल्यामुळे वाटाघाटी करून न्याय मिळविणे ही पद्धत बंद झाली.

३. या पद्धतीमध्ये शेतकऱ्याने स्वतः ती जमीन कसावी अशी सुरुवातीची अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात अनेक ठिकाणी शेतकरी आपली जमीन कुळांना कसण्यासाठी देत असे व त्यांच्याकडून खंड घेत असे. परिणामी गैरहजर जमीनदार (Absent Landlordism) वर्ग निर्माण झाला. तो शहरात राहू लागला. त्यांचा खेडेगावाशी संबंध तुटला.

४. रयतवारीमध्ये जमीन महसुलाच्या रकमेत ३० वर्षांनी बदल केला जात असे. दरम्यानच्या काळात जर एखाद्याने अधिक गुंतवणूक करून जमिनीची उत्पादकता वाढवली तर त्याच्या बाबतीत जमीन महसुलाची आकारणी अधिक जादा दराने केली जाण्याची भीती त्या रयताला वाटत असे. त्यामुळे जमिनीमध्ये कायम स्वरूपाच्या सुधारणा करण्याकडे रयतेचा फारसा कल नसे. त्याचप्रमाणे सरकारचे उत्पन्न बुडत असे.

५. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळावर वेगळ्या बाजूने परिणाम झाला. मालक आपल्याकडे सदर जमिनीचा तुकडा किती दिवस ठेवणार आहे याची कुळालाच खात्री वाटत नसल्याने, आपले श्रमभांडवल खर्च करून जमिनीमध्ये सुधारणा घडवून आणण्यास कुळे फारशी दक्ष नसत. म्हणजे एका बाजूला शेतमालक उत्पादनवाढीमध्ये जादा रस घेत नाही, तर दुसऱ्या बाजूस कुळे दुर्लक्ष करू लागली. परिणामी शेतीच्या उत्पादनात अपेक्षित फरक पडला नाही.

६. काही कुळांच्या बाबतीत असे घडत असे की, त्यांची स्वतःचीही थोडी जमीन असे. व ते मालकाची जमीनही कसत असत. अशा परिस्थितीमध्ये मालकाच्या जमिनीकडे कुळाचे दुर्लक्ष होई व परिणामी शेतीच्या उत्पादनात घट होत असे.

७. शेताचे मालक, आपल्या कुळांना मनास येईल तेव्हा काढून टाकीत. खंडाव्यतिरिक्त इतर मार्गांनी कुळाकडून पैसा वसूल करीत. शेतीच्या कामाशिवाय इतर कामे कुळाकडून करून घेत. त्यामुळे कुळाची प्रतिष्ठा संपली. ग्रामीण भागात असुरक्षिततेचे व कलहाचे वातावरण निर्माण झाले.

८. पूर्वी जमीन महसूल गोळा करणे ही रयत, पाटील, कुलकर्णी यांची संयुक्त जबाबदारी असे. आता तसे नसल्यामुळे कोणी कोणाला जुमानीत नसे.

९. रमेशचंद्र दत्त यांच्या मते, या संदर्भात ते लक्षणीय ठरते. रयतवारी पद्धतीने सर्व मध्यस्थांचे उच्चाटन केले. ग्रामीण समाजाकडून व ग्रामीण अधिकाऱ्यांकडून पार पाडल्या जाणाऱ्या उपयुक्त भूमिकेकडे दुर्लक्ष झाले. परकीय शासन व हतबल शेतकरी यांच्यामध्ये न्याय मिळवून देणारा दुवा राहिला नाही.

**महालवारी पद्धती** (The Mahalwari System)

जमीन महसूल व्यवस्थेमधील कायमधारा पद्धत व रयतवारी पद्धत यानंतरची तिसरी महत्त्वाची पद्धत म्हणजे महालवारी पद्धत होय. महालवारी पद्धतीनुसार भूमीकर शेतकऱ्यापासून नाही तर संपूर्ण गावापासून (ग्राम) किंवा महालापासून (जागीरचा एक भाग) ठरविल्याप्रमाणे घेतला जात होता. भूमीवर संपूर्ण ग्रामाचा एकत्रित अधिकार होता. त्याला हिस्सेदारांचा समूह (Body of co-sharers) असे म्हणत. वैयक्तिक जबाबदारी असली तरी भूमीकराच्या बाबतीत ग्रामाची संयुक्त जबाबदारी होती. एखाद्या व्यक्तीने आपली भूमी सोडून दिली तर त्याचा सांभाळ ग्रामसमाज करीत असे. हा ग्राम समाज संयुक्त भूमीचा व इतर जमिनीचा स्वामी रहात होता.

भारतीय जमीन महसुलाच्या बाबतीत भारतीय खेडी व ग्रामीण अर्थव्यवस्था यांची चर्चा होते. पण खऱ्या अर्थाने भारतीय खेड्याच्या अर्थव्यवस्थेशी जवळीक असणारी जमीनधारणा व्यवस्था म्हणून महालवारी पद्धतीचा विचार केला पाहिजे. चार्ल्स मेटकाफपासून हेन्री मेन्रोपर्यंत ब्रिटिश प्रशासकांनी ग्रामीण समाजाची "Village Community' ची चर्चा केली, पण या समाजाच्या प्रत्यक्ष सुखदुःखाचा विचार वरील दोनही महसूल व्यवस्थेमध्ये परिपूर्णपणे केल्याचा दिसून येत नाही. मोघल साम्राज्याचा विचार केला असता उत्तर भारत, वायव्य सरहद्द प्रांत या ठिकाणी पसरलेल्या मोघल साम्राज्याच्या जमीन महसूल व्यवस्थेकडे ब्रिटिश

काळात जेवढे पाहिजे होते तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही. शिवाय गंगा यमुना नदीच्या खोऱ्यापासून हिमालयाच्या पायथ्यापर्यंत मोघल साम्राज्य पसरलेले होते. त्या प्रांतालाच उत्तर पश्चिमेचा प्रदेश असे मोघल प्रशासनामध्ये मानले जाते. या प्रदेशामध्ये मोघल काळापासून 'तालुकादार' हा प्रभावी आर्थिक व सामाजिक गट होता. प्रो. नुरुल हसन यांनी 'तालुकादारांनाच' मध्यस्थ-जमीनदार असा शब्दप्रयोग केला आहे. असे तालुकादार हे जमीन महसूल पद्धतीचा कणा होते. तालुकादारांना वेगवेगळ्या प्रकारच्या सवलती मिळत असत. उदा. कमिशन, साऱ्यामध्ये सूट, सारायुक्त जमीन, तालुकादारांना महसुलापैकी २.५ % ते १० % इतकी रक्कम मिळत असे. काही वेळा त्यांना मिळणारे हक्क वंशपरंपरेने असत तर काही वेळा अल्पमुदतीच्या कराराने हे हक्क मिळत. मोघल साम्राज्यामध्ये अशा तालुकेदारांत चौधरी, देशमुख, देसाई, देशपांडे, कानूंगो, इजातदार इत्यादींचा समावेश होत असे. हे तालुकेदारीचे अधिकार गरजेप्रमाणे बदलण्याचा अधिकार मोघल बादशहांना होता. प्रो. नुरुल हसनने तालुकादारांच्या पद्धतीचे वर्णन करून मोघली प्रशासनाचा एक दाखला दिला आहे. ब्रिटिशांनी बंगाल पाठोपाठ कायमधारा पद्धत गंगा-यमुनेच्या दुआबात लागू करण्याचा प्रयत्न केला. पण या वेळी दोन समाज गट दुआबात प्रभावशाली होते (१) वर उल्लेख केलेले तालुकेदार व (२) पूर्वापर सत्ता, प्रतिष्ठा व पैसा असणारा जमीनदारांचा वर्ग. त्यांच्यामध्ये संघर्ष अटळ होता. हे तालुकादार स्वत:ला "de-facto' राज्यकर्ते समजत असत. गंगा-यमुनेच्या दुआबामधील सामाजिक स्थिती मुंबई, मद्रासपेक्षा वेगळी होती असे प्रो. थॉमस मेटकाफ म्हणतात. प्रो. मेटकाफच्या मते, 'उत्तर भारतामधील ग्रामीण भागात जमिनीची मालकी एखाद्या जमीनदार घराकडे असे. त्या जमीनदारांचे नेतृत्व ज्याच्याकडे असे ती गावची प्रमुख व्यक्ती असे. हे सर्व रक्ताच्या नात्याने एकत्र आलेले असत. घरातील प्रत्येकाकडे काही जमीन कसण्यासाठी असे पण त्याचा त्या जमिनीवर मालकी हक्क नसे. हक्क मुख्य जमीनदाराचा असे. त्या व्यक्तीकडे रयतवारी पद्धतीने जमीन कसण्यासाठी असे. म्हणजेच गावचा जमीनदार व ग्रामीण समाज हा अंतिमत: ग्रामीण समाजरचना व अर्थव्यवस्थेचा प्रमुख असे. खेड्यामधील तालुकादार हा वजनदार गट असे. १८ व्या शतकामध्ये यांची ताकद खूप असल्याने ते स्थानिक राजप्रतिनिधींनाही विरोध करीत असत. तथापि, बंगालमधील जमीनदारांसारखी यांची संख्या मोठी नव्हती. ब्रिटिशांनी आपल्या राज्य स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात यांच्याशी समझोता करून त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. ब्रिटिशांनी असे धोरण आखण्याचे कारण असे की, दुआबामध्ये मराठे व पंजाबमध्ये शिखांचा धोका संपलेला नव्हता, परंतु १९ व्या शतकामध्ये १८१८ मध्ये मराठ्यांची सत्ता संपली. पंजाबमध्ये ब्रिटिशांनी शिखांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घातला. तेव्हा या तालुकादारांची किंमत कंपनी सरकारला वाटेना, सुरुवातीच्या काळात दुआबामध्ये ब्रिटिशांनी महसुलासंबंधी केलेले अंदाज अपुऱ्या माहितीवर आधारित होते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी महसूल आकारणी भारी दराने केली जाई. परंतु १८२० नंतर ब्रिटिशांनी तालुकादारांचे किल्ले गढ्या या उद्ध्वस्त करून टाकल्या. त्यांची उत्पन्नाची साधने काढून घेतली व त्यांना दुबळे केले. प्रो. एरिक स्टोक्स म्हणतात, १८२० नंतर समाजामधील हा वरिष्ठवर्ग दुबळा झाला. तालुकादारांना आपल्या जमिनी लिलाव करून सरकारी सारा भरण्याची पाळी आली, याचा परिणाम असा झाला की, बनारसच्या परिसरात जवळजवळ ४०% तालुकादारांनी आपल्या जमिनी विकल्या, या जमिनी बर्नार्ड कोहेन म्हणतात त्याप्रमाणे कंपनीच्या सनदी नोकरांनी, त्यांच्या वारसांनी, व्यापारी व सावकार यांनी खरेदी केल्या. या सामाजिक बदलामुळे एक नवा

जमीनदारांचा वर्ग निर्माण झाला. हा वर्ग खेड्यात राहणारा नव्हता तर शहरांत राहून आपला उद्योग व्यवसाय करणारा होता, स्वत: जमीनदार खेड्यात न राहता आपल्या प्रतिनिधीमार्फत जमीन कसण्याचे काम सुरू झाले. याला Absentee Landlord म्हणतात. जमिनी जरी अशा विकल्या गेल्या तरी जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय असा नियमित होत नसे असे प्रो. थॉमस मेटकाफ म्हणतात. बऱ्याच वेळा पूर्वीच्या ऋणानुबंधामुळे नवे जमीनदार, पूर्वीच्या तालुकादारांकडेच जमिनी कसण्यास देत. म्हणजे कागदोपत्री मालक बदलला तरी प्रत्यक्षात पूर्वीचाच मालक खेड्यात अधिकार गाजवित असे. होल्ट मॅकेन्झीने या परिवर्तनाला “Melancholy revolution’ म्हटले आहे.

**महालवारी पद्धत म्हणजे काय?**

ब्रिटिशांच्या दृष्टीने आता महत्व तालुकादारांना नव्हते तर नव्याने निर्माण झालेल्या जमीनदारांना होते. अशा स्थितीत ब्रिटिशांना या भागात नव्याने जमीन महसूल व्यवस्था करण्याची गरज भासू लागली. होल्ट मॅकेन्झीने भावी काळात ग्रामीण समाजाबरोबर (Village Community) सरकारने करार करून महसूल ठरवावा अशी सूचना केली. त्या सूचनेवर आधारित कंपनी सरकारने ‘Regulation VII of 1822’ हा नियम पास केला. या नियमाने दुआबातील प्रत्येक शेताची मोजमापणी करावी, त्याची प्रत ठरवावी व मग महसूल आकारावा हा महसूल खेड्यातील शेतकऱ्यांशी ठरवावा. ज्या ठिकाणी अजूनही तालुकादार अस्तित्वात आहेत तेथे त्यांच्याबरोबर करार करून सारा ठरवावा. त्यानंतर शेतकऱ्यांना शेतीवरील हक्क द्यावेत व शेतकऱ्यांनी किती खंड सरकारला द्यावयाचा, हे ठरवून द्यावे. या पद्धतीमध्ये करार जास्तीतजास्त खेड्यातील शेतकऱ्यांशी करावा. तालुकादारांना पूर्णपणे वगळू नये. अशा पद्धतीने जर शेतकऱ्यांत जमिनीवर मालकी हक्क दिले तर शेतीचे उत्पन्न वाढेल या पद्धतीला महालवारी पद्धत असे म्हणतात.

ही पद्धत सकृतदर्शनी सोपी वाटली पण सुरुवातीपासूनच या पद्धतीचा बोजवारा उडू लागला. कारण तत्त्व जरी जनताभिमुख असले तरी पद्धतीची कार्यवाही करणारी मंडळी पूर्वीचीच होती. नव्या पद्धतीमुळे गोंधळ वाढला. प्रत्यक्ष सर्व्हे काही शास्त्रोक्त पद्धतीने झाला नाही. तालुकादारांचा प्रभाव समाजावर असल्याने भ्रष्टाचार वाढला. प्रो. थॉमस मेटकाफ म्हणतात, जमाबंदी (साराबंदी) जादा आकाराने होऊ लागली. ही आकारणी वैयक्तिक अदमासाने झाल्याने सर्वत्र गोंधळ झाला. अशा स्थितीत १८२८ साली शेतीची दुर्दशा अनेक कारणांनी झाली. शेतकऱ्याकडे सारा भरण्यास पैसा नव्हता. साऱ्याची बाकी वाढली सरकारलाही पैसा मिळाला नाही. परिणामी शेतीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली नाही. शेतीचे नुकसान होऊ लागले. पूर्वीची तालुकादारी पद्धत चांगली म्हणण्याची वेळ कंपनी सरकारवर आली. शेवटी १८३३ साली Regulation XI पास करण्यात आला.

**महालवारी पद्धतीमध्ये सुधारणा**

१८२२ च्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी १८३३ साली जमीन महसूलविषयक नवा नियम तयार केला. या नियमानुसार आर. एम. बर्ड या सनदी नोकरांकडे जमाबंदीचे काम सोपविले, त्याने जमाबंदीसाठी खेड्यांचे लहान भाग पाडले, त्यांना महाल असे नाव दिले. याला आर्थिक गट असेही काही ठिकाणी म्हटले

आहे. या पद्धतीमध्ये प्रत्येक प्रकारची जमीन किती, उत्पन्न देऊ शकेल याचा अंदाज बांधण्यात येत असे. त्यावरून त्या महालाचे एकंदर उत्पन्न निश्चित केले जात असे. या उत्पन्नाच्या आकड्यांची विभागणी संबंधित शेतकऱ्यांमध्ये करून, प्रत्येकाच्या साऱ्याचा वाटा ठरविला जात असे. येणाऱ्या उत्पन्नापैकी २/३ सरकारला द्यावा व १/३ शेतकऱ्याला राहावे. ही जमाबंदी (Settlement) तीस वर्षांसाठी ठरविण्यात आली, परंतु या पद्धतीमध्येही पूर्वीचेच दोष उतरले. उदा. जादा महसूल आकारणी, चुकीचे अंदाज इ. तेव्हा पुन्हा अधिकारी बदलून हे काम जेम्स थॉमसन नावाच्या महसूल अधिकाऱ्याकडे सोपविले. थॉमसनने मात्र उघडपणे तालुकादारांच्या विरुद्ध आघाडी उघडली व त्यांचे अंतस्थपणे चाललेले खेळ बंद पाडले. थॉमसनने तालुकादारांना पेन्शन देऊन महसुलाच्या चित्रातून बाजूला काढले. बर्ड व थॉमसन यांनी दुआबाचा सर्व्हे करून महालवारी पद्धत सुरू केली. १८४२ साली आर. एम. बर्ड सेवानिवृत्त झाला.

महालवारी पद्धत सुरू झाल्याने उत्तर व वायव्य भारतामध्ये सुवर्णयुग सुरू झाले असे समजण्याचे कारण नाही. सरकारी अधिकारी बदलल्यावर, येणारा अधिकारी आपल्या पद्धतीने साराबंदी करीत असे. त्यामध्ये सरकारचा फायदा व्हावा यासाठी जादा सारा (Over assessment) आकारीत असत. तेवढा देण्याची ऐपत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊ लागला. साऱ्याची थकबाकी भरण्यासाठी शेतकरी जमिनी विकीत किंवा कोर्टामध्ये खटले सुरु झाले. मुलकी न्यायालयांची कामे वाढली. पैशाचा प्रश्न आल्याने श्रीमंत लोक, सावकार, व्यापारी यांची पुन्हा चलती सुरू झाली. सरकारी धोरणाविरुद्ध असंतोष वाढू लागला. त्याचा प्रत्यय १८५७ च्या उठावामध्ये इंग्रजांना आला.

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत कंपनीने तीन प्रकारच्या जमीन महसूल पद्धती सुरू केल्या. तिन्ही पद्धतींमध्ये खाजगी मालकीचा हक्क ब्रिटिशांनी दिला. कायमधारा पद्धतीमुळे जमीनदार, रयतवारीमध्ये रयत किंवा शेतकरी व महालवारीमध्ये खेड्यांचे खाजगी हक्क देण्याचे प्रयत्न ब्रिटिशांनी केले. महालवारी पद्धत पंजाब व मध्य भारतामध्ये लागू केली. रयतवारी पद्धत सिंध, आसाम व कूर्गमध्ये सुरू केली. कायमधारा पद्धत मद्रास इलाख्याच्या उत्तर जिल्ह्यामध्ये सुरू केली.

कायमधारा पद्धत, रयतवारी पद्धत व महालवारी पद्धत या तीन पद्धती ब्रिटिशांनी भारतात सुरू केल्या. या सर्वांच्या हिशेबी कंपनीचा महसूल वाढावा हीच भूमिका होती. त्यामुळे बऱ्याच वेळा जरुरीपेक्षा जादा आकारणी करण्यात आली. त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून सारा बाकी वाढली. शेतकरी कर्जबाजारी झाला. त्यामधून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून जमिनी विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल झाला. परिणामी शेतजमिनीचे भाव वाढले. शेतीच्या कायदेशीर कटकटी वाढून कोर्टाची पायरी चढण्याची पाळी सामान्य रयतेवर आली. त्यामधूनच १९ व्या व २० व्या शतकाच्या सुरुवातीस वकिली व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. काही काळ सावकार, श्रीमंत लोक व व्यापाऱ्यांचे धनदांडगेपण वाढले, पण भारतीय ग्रामीण समाजरचना इतकी भक्कम पायावर उभी होती की, स्वातंत्र्यापर्यंत (१९४७) यामध्ये गुणात्मक फरक पडला नाही. ब्रिटिशांच्या धोरणाचा परिणाम म्हणून शेतकरी वर्ग असंतुष्ट झाला, त्यामधून देशाच्या विविध भागांत शेतकऱ्यांचे उठाव झाले.

❖ **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कोणत्या तहाने ब्रिटिशांना बंगालमध्ये दिवाणीचे अधिकार मिळाले?

२. कायमधारा पद्धतीची सुरुवात कोणत्या प्रांतात करण्यात आली?

३. होल्ट मॅक्झेनी यांनी महसुलाची कोणती पद्धत पुढे आणली?

४. रयतवारी पद्धतीची सुरुवात कोणी केली?

५. माऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन कोणत्या इलाख्याचा गव्हर्नर होता?

ब) रिकाम्या जागा भरा.

१. राजा तोडरमल याने ................ बादशहाच्या काळात महसूल व्यवस्थेस आकार दिला.

अ) बाबर ब) हुमायून क) अकबर ड) औरंगजेब

२. .............. लढाईने भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला गेला.

अ) पानिपतची लढाई ब) प्लासीची लढाई

क) म्हैसूरचे दुसरे युध्द ड) बक्सारची लढाई

३. बंगाल प्रांतात दुहेरी राज्यव्यवस्था ................. याने सुरु केली.

अ) वॉरन हेस्टिंग्ज ब) लॉर्ड क्लाईव्ह क) लॉर्ड कॉर्नवॉलिस ड)लॉर्ड डलहौसी

४. वॉरन हेस्टिंग्जने ............. महसूल पद्धती अमलात आणली.

अ) कायमधारा ब) रयतवारी क) महालवारी ड) लिलाव

५. मुंबईत भूमी सर्वेक्षण क्षेत्रात ............... यांनी अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

अ) विगनेट ब) राजा तोडरमल क) महात्मा फुले ड) कॉर्नवॉलिस

## ३.२.२ प्रशासकीय यंत्रणा:– (१७५७–१८५८)

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीतर्फे भारतात आलेल्या व्यापाऱ्यांचा उद्देश व्यापार करणे आणि त्यातून जास्तीत जास्त नफा कमाविणे हा होता. पण त्याचवेळी भारतात कार्यरत असणाऱ्या डच ईस्ट इंडिया कंपनीकडून व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीकडून जोरदार स्पर्धेला तोंड द्यावे लागल्याने ब्रिटीश कंपनीच्या व्यापारावर व नफ्यावर मर्यादा घातली गेली. त्याला पर्याय व सर्वोत्तम मार्ग म्हणजे भारतीय व्यापारक्षेत्रातून ह्या स्पर्धक कंपन्यांना समाप्त करणे होय. परिणामी ब्रिटीश आणि डच व फ्रेंच कंपन्यांमधे संघर्ष झाले आणि

त्यात १७६३ पर्यंत ब्रिटीश कंपनीने पूर्ण विजय प्राप्त केला. त्यानंतर भारताच्या परराष्ट्र व्यापारावर ब्रिटीश कंपनीचा जवळजवळ एकाधिकार प्रस्थापित झाला. पण आता कंपनीच्या आकांक्षांना मर्यादा उरल्या नाही. भारताच्या राजकीय सत्तेवर नियंत्रण मिळवून त्याद्वारे देशाची अर्थव्यवस्था आपल्या नियंत्रणाखाली आणून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे कंपनीचे पुढील ध्येय बनले.

युद्ध व्यापारी मंडळाकडून व्यापारी आणि राजकीय मंडळ अशी कंपनीची वाटचाल सुरू झाली तेव्हा कंपनीच्या लक्षात आले की, व्यवस्थित प्रशासकीय व्यवस्था असल्याशिवाय प्रदेशांवर पकड ठेवणे व राज्यकारभार चालविणे शक्य नाही. पण कंपनीने निर्माण केलेली प्रशासकीय व न्यायालयीन पद्धती फारशी परिणामकारक नव्हती. म्हणून भारतात प्रचलित असलेली प्रशासकीय पद्धती कंपनीच्या अधिकाऱ्यांना स्विकारावी लागली आणि त्यात आवश्यक ते बदल करण्यात आले. ऑक्सफर्ड विद्यापीठातील विद्वान ज्युडिथ एम. ब्राऊन म्हणतात की, वेगळ्या अर्थाने उपखंडात जिंकलेल्या प्रदेशात कंपनी बंधनात होती आणि १८ व्या शतकाच्या शेवटी आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी त्यात बदलाची प्रक्रिया सुरू झाली.

ईस्ट इंडिया कंपनीने प्रारंभीच्या काळात राज्य रचनेबरोबरच विविध व नवीन अशा खात्यांची निर्मिती करून प्रशासन व्यवस्था राबविलेली दिसते. राज्याची रचना करतेवेळी मुख्यतः केंद्रीकरणाची प्रवृत्ती होती. कंपनी प्रशासनाने नोकरशाहीला प्राधान्य दिले, त्यांच्यावरच कंपनीचे प्रशासन अवलंबून होते.

प्लासी व बक्सार येथे झालेल्या लढायांतील विजयाबरोबर बंगाल, बिहार, ओरिसा हे प्रदेश कंपनीच्या अंमलाखाली गेले. परंतु पहिल्या काही वर्षात प्रत्यक्षपणे ब्रिटिश शासन तेथे सर्वार्थाने सुरू झाले नाही. त्याकरिता लागणारा शासनाचा अनुभव व अनुभवी माणसे त्यावेळी त्या व्यापारी कंपनीजवळ नव्हती. त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या हेतूने क्लाईव्हने द्विदल शासनपद्धती अंमलात आणली. या पद्धतीनुसार नवाब नाममात्र बनला व खरी सार्वभौम सत्ता ब्रिटिशांच्या हाती राहिली. राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी नवाबाची होती. तर, महसूल वसुलीचे काम कंपनीने स्वतःकडे ठेवले. त्यामुळे शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता लागणारा पैसा मात्र नवाबाच्या हाती नव्हता. त्याकरिता तो सर्वस्वी कंपनीच्या मर्जीवर अवलंबून होता. कारण त्या दोन्ही गोष्टीवर कंपनीचे नियंत्रण होते. ही व्यवस्था कंपनीला लाभदायक ठरली, तर जनतेच्या दृष्टीने मारक ठरली.

या व्यवस्थेचे परिणाम बंगालवर भयावह झाले. तत्संबंधीच्या बातम्या इंग्लंडला पोहोचल्या. तेव्हा कंपनीच्या भारतातील प्रदेशांवर नियंत्रण ठेऊन तेथील शासनाबद्दल व्यवस्था करणे ब्रिटिश सरकारला निकडीचे वाटले म्हणून ब्रिटीश पार्लमेंटने ग.ज. वॉरन हेस्टिंग्जच्या काळात १७७३ मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट पारित केला व प्रशासन, कायदे करणे व न्यायदान करणे अशा शासनाच्या तीनही शाखांच्या कामकाजाची व्यवस्था करून नव्या शासकीय पद्धतीचा पाया घालून दिला.

या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार बंगालचा गव्हर्नर जनरल ०५ वर्षाकरिता वॉरन हेस्टिंग्जची नियुक्ती करण्यात आली. ग.ज. ला प्रशासनात मदत करण्यासाठी एक कौन्सिल किंवा परिषदेची निर्मिती करण्यात आली. तसेच मुंबई व मद्रास प्रांताचे प्रशासन नियंत्रण बंगालच्या ग. ज. कडे देण्यात आले. कंपनीच्या प्रशासनावर

नियंत्रण ठेवण्यासाठी संचालक मंडळाची नियुक्ती करण्यात आली ज्यांचा कार्यकाळ ०४ वर्षाचा असेल. या कायद्याने कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले.

वॉरन हेस्टिंग्जने आपल्या कार्यकाळात या कायद्यानुसार प्रशासन चालविले. त्याने प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हा (District) हा प्रशासनाचा घटक म्हणून निर्माण केला. या घटकाचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी किंवा 'कलेक्टर' नियुक्त केला. यास काही ठिकाणी 'डेप्युटी कमिशनर' असेही संबोधले जाई. जिल्हा प्रशासनाचे मुख्य कार्य म्हणजे १) कायदा व सुव्यवस्था राखणे २) महसूल वसुली करणे, हे होते. रेग्युलेटिंग ॲक्टनुसार मद्रास व मुंबई प्रांताची जबाबदारीही गव्हर्नर जनरलवर होती. सर्वोच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र पूर्णपणे या कायद्याने स्पष्ट केले नव्हते. या कायद्यानुसार इ.स. १७७३ ते १७८३ असा ११ वर्षे कारभार हेस्टिंग्जने केला.

भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड कॉर्नवॉलिसची नियुक्ती करताना ब्रिटिश लष्कराचे सरसेनापतीपदही त्याच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यामुळे त्याचे हात अधिकच बळकट झाले. भारतात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे, न्यायदान करणे, भ्रष्टाचार व कुशासन यांमुळे बिघडलेली कंपनीची आर्थिक स्थिती सुधारून भारतातील शासकीय यंत्रणा दृढतेच्या व कार्यक्षमतेच्या खंबीर पायावर उभारणे, चीनला निर्यात होणारा चहा व एकंदर व्यापाराकरिता खरेदी करावयाचा भारतीय माल याकरिता लागणारा संपूर्ण पैसा भारतातील राजस्वातूनच उपलब्ध होईल इतका महसूल नियमीतपणे व खात्रीपूर्वक उभा होईल याची तजवीज करणे; तसेच कंपनीपासून तर लँकेशायरच्या कारखानदारांपर्यंत इंग्लंडमधील विविध गटांच्या हितसंबंधांना पोषक ठरेल याकरिता, भारतात नवनवीन प्रदेश कंपनीच्या अमलाखाली आणण्याकरिता व परकीय शासन क्षमतेने चालविण्याकरिता आवश्यक तो पुरेसा पैसा उभारणे अशी प्रमुख उद्दिष्टे कंपनीच्या शासनाची होती.

मात्र, रेग्युलेटिंग ॲक्टच्या अंमलबजावणीच्या काळात त्या ॲक्टच्या उणीवा व दोष अनुभवाला आले. ते दूर करून भारतातील शासनावर पार्लमेंटचे नियंत्रण अधिक दृढतेने प्रस्थापित व्हावे व शासन कार्यक्षमतेच्या मजबूत पायावर उभे व्हावे याची नितांत आवश्यकता पार्लमेंटला जाणवली. त्या हेतूने १७८४ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने पिट्स इंडिया ॲक्ट पारित केला.

या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीवरचे ब्रिटीश प्रशासनाचे नियंत्रण अधिकच घट्ट करण्यात आले. त्याचाच भाग म्हणून कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लडमध्ये सहा सदस्यांचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाकडे महसूल, लष्करी व मुलकी अधिकार देण्यात आले. ग.ज. च्या समितीमधील सदस्यांची संख्या ४ ऐवजी ३ करण्यात आली. नियामक मंडळ आणि संचालक मंडळाच्या माध्यमातून १८५८ पर्यंत कारभार चालविण्यात आला. नियामक मंडळाकडे परराष्ट्र व्यवहार तर संचालक मंडळाकडे अंतर्गत कारभार होता.

या कायद्याने आवश्यकता भासल्यास कौन्सिलचे निर्णय बाजूला सारून स्वतःच्या मताप्रमाणे निर्णय घेण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला दिल्याने, भारताच्या शासनाची सर्वोच्च सत्ता लंडनच्या ब्रिटिश

सरकारच्या देखरेखीखाली पिट्स इंडिया ॲक्टने घालून दिलेल्या प्रशासकीय चौकटीत गव्हर्नर जनरलच्या हाती आली. भारताचे प्रशासन कोणाही एका व्यक्तीच्या मतानुसार किंवा लहरीनुसार नव्हे तर लिखित नियमानुसार चालावे अशी तरतूद झाली.

या कायद्याने कंपनीच्या सत्तेचे हस्तांतरण पूर्णपणे पार्लमेंटकडे झाले. ब्रिटिश भारतातील मुलकी व लष्करी प्रशासनावर पार्लमेंटचे नियंत्रण प्रस्थापित झाले. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही पार्लमेंटचे नियंत्रण निर्माण झाले. नियामक मंडळ व संचालक मंडळाचे अधिकार क्षेत्र पूर्णपणे स्पष्ट न केल्याने उभय मंडळात अनेक वेळा वाद उद्भवत असत.

१७८४ च्या पिटच्या कायद्यानंतर प्रशासनात सुधारणांसाठी १७९३ व १८१३ चे चार्टर ॲक्ट आले. १७९३ च्या कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे नूतनीकरण ब्रिटिश सरकारने केले व यानुसार कंपनीला २० वर्षांची वाढीव मुदत मिळाली तर १८१३ च्या कायद्याने ही मुदत आणखी २० वर्षांपर्यंत म्हणजे १८३३ पर्यंत वाढविली.

१८३३ च्या कायद्याने कंपनीच्या भारतातील व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याचे बोर्ड ऑफ कंट्रोलचे अधिकार अधिक व्यापक व दृढ केले गेले. त्यामध्ये कंपनीच्या नूतनीकरणाचा प्रश्न पुन्हा ब्रिटिश संसदेसमोर आला व त्यास मान्यता मिळाली. या कायद्यानुसार कंपनीस इंग्लंडच्या राजा / राणीचे विश्वस्त म्हणून कार्य करण्यास परवानगी मिळाली. कंपनीकडून चीनमधील व्यापारी अधिकार रद्द करून फक्त भारतातील प्रशासनाची जबाबदारी दिली. या कायद्याने बंगालचा गव्हर्नर जनरल हा ब्रिटिश भारताचा गव्हर्नर जनरल बनला. त्याच्या अधिकारात प्रचंड वाढ केली. तसेच बंगाल, मद्रास व मुंबई प्रांतांचे कामकाज गव्हर्नर जनरलकडे दिले. भारतीय कायदा व्यवस्था संहिता बद्ध करण्यासाठी 'कायदा आयोग' स्थापन करण्यात आला. कंपनीच्या सेवेत भरती करताना धर्म, जन्म, वंश, वर्ग या बाबींवरून भेदभाव केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. भारतीयांना उच्च पदे मिळण्याचा मार्ग खुला झाला. या कायद्याने ब्रिटिश वर्चस्वाखाली प्रदेशांचे प्रशासकीयदृष्ट्या केंद्रीकरण झाले.

ईस्ट इंडिया कंपनी १८५७ मध्ये बरखास्त होण्यापूर्वी कंपनी प्रशासन काळातील शेवटचा कायदा म्हणून १८५३च्या कायद्याची ओळख आहे. रेग्युलेटिंग ॲक्टनंतर हळूहळू कंपनीवर ब्रिटिश पार्लमेंटचे नियंत्रण वाढत गेले. मुख्य म्हणजे या कायद्याने कंपनीला वारंवार मिळणारी मुदतवाढ रोखली. यातूनच कंपनी प्रशासनाकडे पाहण्याचा ब्रिटिश पार्लमेंटचा दृष्टिकोन स्पष्ट झाला व अवघ्या पाच वर्षांनंतर पार्लमेंटने कंपनीच बरखास्त केली. या कायद्यानुसार ब्रिटिश भारताचे प्रशासनाबाबत ईस्ट इंडिया कंपनीला २० वर्षांची मुदतवाढ न देता ब्रिटिश पार्लमेंट निर्णय घेईपर्यंत कंपनीकडे अधिकार देण्यात आले. त्याचबरोबर संचालक मंडळाच्या सदस्यसंख्येत बदल करून ती २४ ऐवजी १८ करण्यात आली. १८४० नंतर कंपनीने घेतलेल्या भारतीय प्रदेशांची व्यवस्था लावण्याचा अधिकार कंपनीला दिला गेला. प्रशासनात अधिकारी नेमण्याचा कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचा अधिकार रद्द करून स्पर्धा परीक्षेद्वारा उमेदवार नियुक्ती आवश्यक केली गेली. कायदा करणे आणि प्रशासन चालविणे या दोन्ही बाबी परस्परांपासून वेगळ्या करण्यात आल्या. बंगालच्या गव्हर्नरची

नियुक्ती स्वतंत्रपणे करण्यात आली. भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून असलेले त्याचे अधिकार कमी करण्यात आले. गव्हर्नर जनरलच्या परिषदेत १८ सदस्य संख्येपैकी बहुमतासाठी आवश्यक संख्या १० ठरविण्यात आली. या कायद्याने भारतीयांना कायदा बनविण्याचा अधिकार दिला नव्हता, हा या कायद्याचा मुख्य दोष होता.

१७५७ ते १८५७ चा शतकभराच्या कालखंडात कंपनीचा जसा राजकीय विस्तार होत गेला तसा कंपनीच्या अधिकारांचा संकोच होत गेला व हळूहळू ब्रिटिश पार्लमेंटचे नियंत्रण वाढत गेले. इ.स. १७५७ मध्ये कंपनीने प्लासीची लढाई जिंकून ब्रिटिश साम्राज्य पाया घातला व १८५७ पर्यंत डलहौसीने संस्थाने खालसा करून बहुतांश भारत ब्रिटिश साम्राज्यात विलीन केला. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने कंपनीच बरखास्त करून आपले नियंत्रण प्रस्थापित केले.

सत्तेच्या हस्तांतरणाची ही प्रक्रिया होत असताना ब्रिटिशांनी जिंकलेल्या भारतीय प्रदेशाची प्रशासकीय जडणघडण झाली. मध्ययुगीन प्रशासनाची छाप कमी होऊन ब्रिटिश पद्धतीची एक प्रशासन चौकट तयार झाली. रेग्युलेटिंग ॲक्ट, पिटचा कायदा यामुळे ईस्ट इंडिया कंपनीवर ब्रिटिश पार्लमेंटची पकड दृढ होत गेली. मुलकी प्रशासन, लष्कर व पोलिस, न्यायव्यवस्था या चार प्रमुख क्षेत्रात या कालखंडात प्रशासकीय बदल होत जाऊन गरजेनुसार सुधारणा होत गेल्या. कॉर्नवालीस, क्लाईव्ह यांनी मुलकी सेवा क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवून आणले. याच मुलकी प्रशासनाच्या आधारावर पुढे ब्रिटिशा साम्राज्य टिकून राहिले.

कंपनी प्रशासनाच्या काळातच भारतात 'कायद्याचे राज्य' ही संकल्पना पुढे आली. कायद्यासमोर सर्व समान आहेत, हे तत्त्वही याच काळात राबविले गेले. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी हा वेगळा भाग होता. अर्थात, प्रशासनातील हे सर्व बदल ब्रिटिशांच्या सोयीसाठी होते. भारतीयांच्या दृष्टीने या प्रशासनाचे प्रतिकूल परिणाम जास्त झाले. कंपनी प्रशासनात भारतीयांना कुठेही स्थान नव्हते, त्यामुळे या प्रशासनावर भारतीय जनतेचा विश्वास निर्माण होऊ शकला नाही.

**सरकारात भारतीयांना स्थान नाही:–**

इंग्रजांच्या अशा मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर भारतातील ब्रिटिश सरकारच्या शासनाची घडण झाली होती. अधिकाराच्या व जबाबदारीच्या सर्व पदांवरून भारतीयांना कटाक्षाने दूर देण्यात आले. भारताच्या शासनाकरिता इंग्लंडमध्ये निर्माण करण्यात आलेली शासकीय यंत्रणा–बोर्ड ऑफ कंट्रोल व कोर्ट ऑफ डायरेक्टर्स या शासकीय संस्थांच्या मार्गदर्शनानुसार भारताचे शासन चालविणारे, त्यांच्या हाताखाली कायदे करणारे, संपूर्ण राजकीय व शासकीय सत्ता हाती असलेले या सर्व यंत्रणांत केवळ इंग्रजांचा भरणा होता. भारतीय लोकांना ते कोणत्याही प्रकारे जबाबदार नव्हते. भारतीयांना नोकरीत घेतले जात होते ते केवळ मेहनतीच्या, अत्यल्प पगाराच्या अगदी कनिष्ट पदांवर, कारण तशा पदांकरिता पुरेशी इंग्रज माणसेच उपलब्ध नव्हती.

सर्व सरकारी सेवांतून भारतीयांना दूर ठेवण्याच्या कॉर्नवॉलिसच्या वंशभेदी धोरणाची त्याच्या दृष्टीने काही कारणे होती. भारतात, ज्या ब्रिटिश राजकीय पद्धतीच्या आधारावर शासकीय पद्धती त्याने वास्तवात

आणली ती यशस्वीरित्या कार्यान्वित व्हावयाची तर ती ब्रिटिश कर्मचाऱ्याकडूनच होऊ शकेल अशी त्याला खात्री होती. दुसरे म्हणजे भारतीय लोक सर्वच दृष्टींनी शून्य आहेत, त्यांच्यात नीतीमत्तेचा पूर्ण अभाव आहे. ते वंशानेच अगदी अध:पतित व हीन दर्जाचे आहेत. सर्व चांगल्या गोष्टींबद्दल त्यांना अनास्था आहे, ते दुराचारी, भ्रष्ट, दुष्ट, कपटी, आळशी आहेत म्हणजेच रानवट जीवनाचे सर्व दुर्गुण त्यांच्यात आहेत; ब्रिटिश सत्ता निर्वेधपणे भारतात टिकावयाची असेल तर भारतीयांना सर्वस्वी असहाय्य करून सोडले पाहिजे. त्यांच्या मनातून महत्वाकांक्षेचे बीज मुळासकट उपटून फेकले पाहिजे अशी त्यांची एकंदर विचारसरणी होती. शोअर हा इंग्रज अधिकारी म्हणतो की, ''संपूर्ण भारतीय राष्ट्राला सर्व प्रकारे दास बनवून त्याला आपल्या हितसंबंधांना व फायद्याला जुंपणे हे इंग्रजांचे मूलभूत धोरण आहे. कनिष्ठातील कनिष्ठ दर्जाच्या इंग्रजांना जी पदे स्वीकारण्यास म्हटले जाते त्या पदांपासूनही, सर्व प्रकारच्या सन्मानापासून किंवा प्रतिष्ठेपासून भारतीयांना दूर ठेवले गेले आहे.''

त्या काळची ब्रिटिशांची एक गरज म्हणूनही भारतीयांना सर्व अधिकारांच्या पदांपासून वंचित करण्यात येत होते. भारतीय लष्करी तुकड्यांचे प्रमुख म्हणून भारतीय अधिकाऱ्यांच्या निष्ठेवर विश्वास ठेवणे शक्य नाही अशी कॉर्नवॉलिससारख्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची पक्की धारणा होती. मोठ्या प्रशिक्षित, सुसज्ज युरोपीय लष्कराशिवाय बहुमोलाच्या भारतीय राज्यावरील आपली पकड सुरक्षित राहणे शक्य नाही. ज्या लोकांचा धर्म, कायदे, रूढी, परंपरा आपल्यापेक्षा अगदी भिन्न आहेत. व जे आपल्या अंमलाखाली पूर्ण दडपले गेले आहेत ते, आपण त्यांना कितीही चांगली वागणूक दिली तरी कधी आपल्याविरुद्ध बंड करून उठणारच नाहीत अशी अपेक्षा करणेच चूक आहे. म्हणून भारतीय सैनिकांच्या निष्ठेवर विसंबून राहणे शहाणपणाचे ठरणार नाही असे कॉर्नवॉलिसने कंपनीच्या डायरेक्टरांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले होते.

अर्थात सद्‌चारित्र्य, सद्गुण क्षमता, सचोटी अशा गोष्टीचा भारतीयांत पूर्ण अभाव असल्यामुळे त्यांची उच्च पदी नेमणूक करणे अशक्य आहे हा कॉर्नवॉलिसचा व इतरही इंग्रज अधिकाऱ्यांचा युक्तिवाद सर्वस्वी कपटीपणाचा व अनुदारपणाचा होता कारण त्या काळी सामान्यतः कंपनीच्या नोकरीत शिरून भारतात येण्याकरिता धडपडणारी इंग्रज मंडळी सद्गुणांचे पुतळे नक्कीच नव्हते. सुप्रसिद्ध इतिहासकार ट्रीव्हेलियन याने भारतातील त्या काळच्या सामान्य इंग्रजांच्या चारित्र्यहीन जीवनपद्धतीचे केलेले वर्णन त्या दृष्टीने लक्षणीय आहे. स्त्रिया, दारू, पैसा यांचे ते भक्ष्य बनलेले असत. त्यांच्या भ्रष्टाचाराची वर्णने इतिहासकाराच्या व साहित्यिकांच्याही लिखाणात वाचायला मिळतात.

सर्व जबाबदारीच्या पदावरून भारतीयांना दूर ठेवण्यामागे कॉर्नवॉलिसचा खरा हेतू होता तो वेगळाच, लठ्ठ पगाराची सर्व पदे इंग्रजांकरिताच राखलेली असली पाहिजेत ही इंग्रजाची मागणी होती. ''जित लोकांना त्यांची लायकी काय हे जाणवून दिले पाहिजे, भारतातील पूर्वीच्या शासकांना अवमानित केले पाहिजे, दारिद्र्याचे व परावलंबनाचे जीवन जगणे त्यांना भाग पाडले पाहिजे, स्वातंत्र्याच्या व स्वाभिमानाच्या सर्व खाणाखुणा त्यांच्या मनातून साफ पुसल्या गेल्या पाहिजेत''. असे त्याचे धोरण होते. या उलट कंपनीच्या सेवेत भारतात आलेल्या प्रत्येक इंग्रजाचे जीवन समृद्धीचे, अधिकाराचे व मानसन्मानाचे असावे असे प्रयत्न सर्वतोपरी केले जात.

याचा परिणाम व्हायचा तो झाला. न्यायखात्यात कोणीही भारतीय मुन्सीफ किंवा सद्र अमीनच्या पदावर जाऊ शकत नसे. पूर्वी न्यायदानाचे कार्य करीत असलेली, पंचायत सदस्य, जमीनदार, काझी, पंडित अशी सर्व मंडळी त्या क्षेत्रातून बाहेर फेकली गेली. व ग्रामीण क्षेत्रात मूळ नसलेल्या मंडळीकडे न्यायदानाचे कार्य सोपविण्यात आले. कार्यकारी शाखेतूनही भारतीयांना कटाक्षाने वगळण्यात आले. कारण ब्रिटिश नीतीच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्याच शाखेवर होती. ब्रिटिश लष्करात भारतीयांना थोड्याही जबाबदारीचे पद दिले जाऊ नये ही तर त्या परकीय राज्यकर्त्यांची मूलभूत गरज होती. भारतात ब्रिटिश शासन जनतेच्या सहकार्यावर पाठिंब्यावर किंवा आत्मीयतेवर स्थिर राहील हे अशक्य असल्याचे ब्रिटिश शासक जाणून होते. ब्रिटिश लष्कराच्या अजिंक्यत्त्वाच्या भावनेवर त्यांची सुरक्षितता विसावलेली होती. त्यामुळे लष्कराच्या रचनेकडे कॉर्नवॉलिसचे खास लक्ष होते.भारतातील ब्रिटिश शासन प्रामुख्याने तीन बलशाली स्तंभांवर विसावलेले होते. मुलकी सेवा, लष्कर व पोलीस. भारतात कायदा व सुव्यवस्था कायम राखून भारत ब्रिटिशांच्या दृढ पकडीत कायमचा राहील अशी व्यवस्था करणे हेच भारतातील ब्रिटिश शासनाचे सर्वप्रथम उद्दिष्ट होते.

❖ **स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. रेग्युलेटिंग ॲक्टने संचालक मंडळाची मुदत किती वर्षे केली?

२. पिट्स इंडिया ॲक्टने बोर्ड ऑफ कंट्रोलमध्ये किती सदस्यांची तरतूद केली होती?

३. १७९३ च्या कायद्याप्रमाणे गव्हर्नर जनरल यास कोणत्या दोन प्रांतावर अधिकार प्राप्त झाला?

४. कोणत्या कायद्याने कंपनीची व्यापारी मक्तेदारी नाहीशी केली?

५. भारतात संसदीय शासनपद्धतीने बीजारोपण कोणत्या कायद्याने केले?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. पिट्स इंडिया ॲक्टमध्ये कार्यकारी मंडळात ............. सदस्यांची तरतूद केली होती.

अ) ०२ ब) ०३ क) ०४ ड) ०५

२. ............कायद्याने भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रुपयांची तरतूद करण्यात आली.

अ) १७९३ चा चार्टर ॲक्ट ब) १८१३ चा चार्टर ॲक्ट

क) १८३३ चा चार्टर ॲक्ट ड) १८५३ चा चार्टर ॲक्ट

३. १८३३ च्या चार्टर ॲक्टने ...............हे महत्त्वाचे सामाजिक कार्य केले.

अ) गुलामगिरीस विरोध ब) सती प्रथेस विरोध

क) शिक्षणाचा प्रसार ड) कायद्याचे संहितीकरण

४. १८५३ च्या चार्टर अॅक्टने कंपनीच्या संचालकांची संख्या ...........करण्यात आली.

अ) १२ ब) १५ क) १८ ड) २४

५. १८५३ मध्ये केंद्रीय कायदेमंडळात ..............सदस्य होते.

अ) ०६ ब) ०८ क)१० ड)१२

### ३.२.३ लष्कर, न्यायव्यवस्था, पोलीस

**लष्कर:**

भारतातील ब्रिटिश शासनाचा शक्तिशाली आधारस्तंभ म्हणजे लष्कर. या लष्कराच्याच बळावर ब्रिटिशांनी सर्व भारतीय सत्ताधीशांना परास्त करून भारतावर आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले. भारतात परकीय स्पर्धकांविरुद्ध लष्करामुळेच ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षण झाले, तर अंतर्गत बंडांच्या व उठावांच्या अधूनमधून सतत होणाऱ्या उद्रेकांना तोंड देऊन लष्करानेच भारतावरील ब्रिटिश स्वामित्त्व दृढ राखले.

कंपनीची लष्करी व्यवस्था भारतातील स्थानिक सत्तांपेक्षा बलशाली असल्याने त्यांना मर्यादित सैनिकांच्या मदतीने भारतावर वर्चस्व प्रस्थापित करता आले. कंपनीने प्रारंभीच्या काळात आपल्या व्यापार रक्षणासाठी सैन्यांची उभारणी केली होती. इंग्रजांच्या वखारींना चांगल्या प्रकारे संरक्षण असे. त्यामुळे स्थानिक सत्तांना सहजासहजी इंग्रजांच्या वखारी लुटणे शक्य नव्हते. भारतातील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे कंपनीने येथे राजकीय सत्ता स्थापण्याचा निर्णय घेतला. यासाठी कवायत फौजेची उभारणी करून त्यांना आधुनिक स्वरूपाची शस्त्रे दिली. त्याच्या मदतीने भारतातील महत्त्वाच्या सत्तांचा त्यांनी पाडाव केला. भारतातील सत्तांनी इंग्रजाप्रमाणे आपले सैन्य उभारण्याचा प्रयत्न केला नाही. महादजी शिंदे, टिपू सुलतान यांच्या सारख्यानी आपल्या सैन्यास आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. परंतु अशा सत्ताधिशांची संख्या कमी होती. त्यामुळे इंग्रजाना मर्यादित सैन्याच्या मदतीने भारत जिंकता आला. उदा. बक्सारच्या युद्धाच्या वेळी भारतीय सत्तांच्याकडे साठ हजार पर्यंत सैन्य होते, तर कंपनीची सैन्य संख्या केवळ सात हजार इतकी होती. या युद्धात इंग्रज सैनिक भारतीय सत्तांच्या तुलनेत कमी प्रमाणात ठार झाले. हे केवळ इंग्रजांना लाभलेल्या प्रशिक्षणामुळे शक्य झाले होते.

भारतीय जनतेच्या उद्रेकांविरुद्ध गरजेनुसार आवश्यक ती कार्यवाही करून ब्रिटिश सत्तेला उद्भवणाऱ्या धोक्याचे निराकरण करणे, त्याकरिता भारतात ठिकठिकाणी उभारण्यात आलेली लष्करी ठाणी मजबूत ठेऊन मुलकी शासनाला आवश्यकतेनुसार तत्परतेने मदत करणे, संरक्षणाखालील भारतीय संस्थानातील जनतेने उठाव केल्यास ते दडपण्याकरिता तेथील संस्थानिकाला मदत करणे. चोर, लुटारू, दरोडेखोर अशांपासून रस्ते सुरक्षित ठेवणे व व्यापाऱ्यांचे रक्षण करणे, भारतीय राज्यकर्त्यांनी त्यांच्या लष्कराच्या संख्येत कपात केली तर त्या विसर्जित सैनिकांना ब्रिटिश लष्करात भरती करून सामावून घेणे, व अवध, पंजाब यांसारख्या स्वतंत्र राज्याच्या लष्कराला तोंड देता येईल एवढी लष्करी सज्जता सतत ठेवणे. अशी भारतातील ब्रिटिश लष्कराची उद्दिष्टे हेस्टिंग्जने विशद केली होती.

भारतात ब्रिटिश सत्तेला जनतेचा विश्वास व पाठिंबा मिळणार नाही व त्यामुळे ब्रिटिशांना सुरक्षिततेकरिता लष्करी सामर्थ्यावरच विसंबून राहावे लागणार हे ब्रिटिश शासक पूर्णपणे जाणून होते. अठराव्या शतकाच्या अखेरच्या काही वर्षात भारताचा बराच मोठा प्रदेश भारतीय सत्ताधीशांच्या अंमलाखाली होता व त्यापैकी काहींचा फ्रेंचांशी संपर्क होता आणि त्यामुळे ब्रिटिश सत्तेला धोका निर्माण होऊ शकतो याची कॉर्नवॉलिसला पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे त्याचे लष्कराच्या संघटनेकडे विशेष लक्ष होते.

कंपनीच्या लष्करात दोन भाग होते. एक म्हणजे कंपनीच्या मदतीकरिता म्हणून भारतात आलेल्या इंग्लंडमधील ब्रिटिश लष्कराचा एक हिस्सा असलेले युरोपीय सैनिकांचे कंपनीच्या खर्चाने, म्हणजेच भारताच्या महसुलाच्या बळावर पोसले जाणारे ''राजाचे लष्कर'', व दुसरे म्हणजे कंपनीने भारतात उभारलेले लष्कर. इंग्लंडमधून केवळ युरोपियनांचे असे मोठे लष्कर भारतात कंपनीच्या सेवेकरिता आणणे शक्य नव्हते. एक तर इंग्लंडची लोकसंख्या त्या दृष्टीने कमी होती, आणि शिवाय, जगाच्या निरनिराळ्या भागात इंग्लंडचे लष्कर कमी अधिक प्रमाणात होते. मुख्य म्हणजे नेपोलियनमुळे युरोपात युद्धे चालू होती व त्यामुळे इंग्लंडच्या सुरक्षिततेकरिता इंग्लंडमध्येच मोठे खडे लष्कर असावे हे अत्यावश्यक होते. अर्थात् इंग्लंडच्या लष्करातून मोठ्या संख्येने भारतात फौज पाठविणे शक्य नव्हते याला आणखी एक महत्त्वाचे कारण असे की, यूरोपीय फौजा फार खर्चिक होत्या, आणि भारतात पाठविण्यात येणाऱ्या त्या फौजेचा खर्च कंपनीच्या तिजोरीतून होत असल्याने, त्या फौजांची गरज असो, नसो, कंपनीच्या जीवावर पोसल्या जाण्याकरिता भारतात पाठविल्या जातात अशी कंपनीची नेहमीची तक्रार असे.

कंपनीच्या लष्कराचा दुसरा भाग म्हणजे कंपनीने स्वतः भारतात उभारलेले. लष्कर उभारणीकरिता भारतात परिस्थिती अनुकूल व सोयीची होती. चांगल्या दर्जाचे सैनिक मोठया संख्येने येथे उपलब्ध होते. अनेक जातींच्या व टोळ्यांच्या लोकांचा व्यवसायच शिपायांचा होता. त्यापैकी अनेक पराभूत भारतीयांच्या विसर्जित करण्यात आलेल्या लष्करांतील शूर सैनिक होते. त्यांच्यात भरपूर सहनशक्ती तर होतीच, पण त्याचबरोबर शिस्त व प्रशिक्षण ते उत्तम प्रकारे आत्मसात करीत. खाल्ल्या मिठाला जागण्याच्या त्यांच्या निष्ठेबद्दलच्या कल्पनांमुळे कंपनीप्रती त्यांच्या निष्ठा अभंग राहतील की नाही अशी भीती बाळगण्याचे कारणच नव्हते. शिवाय, युरोपीय लष्करावर होणाऱ्या खर्चापेक्षा हिंदी लष्कर पोसणे कितीतरी कमी खर्चाचे असे.

कंपनीच्या लष्करातील ''राजाचे लष्कर'' व हिंदी लष्कर या दोहोत फारसे सामंजस्य नसे. कारण ''राजाच्या लष्करा''तील अधिकारी स्वतःला कंपनीच्या हिंदी लष्करापेक्षा श्रेष्ठ समजत. व त्यांच्या श्रेणी व पगारही हिंदी लष्करापेक्षा अधिक असत. वस्तुतः कंपनीच्या लष्करातील बहुसंख्य युरोपीय सैनिक म्हणजे इंग्लंडमधील अगदी कनिष्ठ स्तरातील पुष्कळदा गुंडगिरी करणारे किंवा केलेल्या बेकायदेशीर कृत्यामुळे इंग्लंड सोडून बाहेर जाण्याची गरज भासलेले व म्हणून भारतात आलेले तरुण होते. त्यापेक्षा भारतीय लष्करातील सैनिक कोणत्याही प्रकारे कमी नव्हते. परंतु तरीही हिंदी शिपाई कंपनीला खूपच स्वस्तात पडे. हिंदी शिपायाला महिन्याला ७ रुपये, तर निम्नस्तरातील हिंदी अधिकाऱ्याला त्याच्या दर्जानुसार २५ रुपयापासून ६७ रुपये महिना पगार असे. १८५६ मध्ये कंपनीच्या एकूण २,७५,००० च्या हिंदी लष्करात ३०० रुपये पगार

मिळणारे भारतीय अधिकारी केवळ तीन होते. लष्करात सुभेदाराच्या पदाच्या वरच्या पदावर कोणाही भारतीयाची नेमणूक होत नसे.

कॉर्नवॉलिस इंग्लडला परत गेला त्यावेळी कंपनीच्या पदरी ७०,००० चे लष्कर होते. त्यापैकी केवळ १३,५०० ब्रिटिश होते. १८२६ मध्ये लष्कराची एकूण संख्या २,८१,००० झाली. त्यापैकी १०,५४१ युरोपीय होते. तर २२००० चे इंग्लडहून आलेले ''राजाचे लष्कर'' होते. १८५७ मध्ये भारतात ब्रिटिशांविरुद्ध उठाव झाला. त्यावेळी कंपनीच्या ३,११,३७४ च्या लष्करात फक्त ४५,५२२ युरोपीय होते.

सर्व सरकारी क्षेत्रातून केवळ उच्च पदावरूनच नव्हे तर साधारण जबाबदारीच्या पदांवरूनही भारतीयांना कटाक्षाने वगळण्याची कॉर्नवॉलिसची नीती लष्कराबाबत प्रकर्षाने प्रत्ययाला येते. सैन्याच्या भारतीय तुकड्यांच्या अगदी निम्न स्तरांवरील नेतृत्व पदीही अगदीच सामान्य, कनिष्ठ स्तरातील युरोपियनांची नेमणूक होई. १७९० ते १७९६ या काळात लष्कराची पुनर्रचना करण्यात आली. हिंदी शिपायांना पूर्णपणे नियंत्रणाखाली ठेवणे हा प्रमुख उद्देश होता. त्यानुसार हिंदी शिपायांच्या एका तुकडीवर ९ युरोपीय अधिकारी नेमले गेले. १८४८ मध्ये ७५० ते ८०० शिपायांच्या एका तुकडीला २४ युरोपीय अधिकारी, तर, घोडदळाच्या एका तुकडीवर २० युरोपीय अधिकारी नेमले गेले. १८२६ पर्यंत लष्करी तुकडयांच्या निम्न स्तरावरील नेतृत्वपदीही कोणीही भारतीय पोचलेला नव्हता. ''वर्षानुवर्षे कोणत्याही प्रकारच्या आशेशिवाय आम्ही येथे कुजत पडलेले असतो.'' असे अतीव नैराश्याचे उद्गार एका भारतीय रिसालदाराने काढलेले हेन्री लॉरेन्सने ऐकले होते. भारतीयांना तुच्छ लेखून सर्व क्षेत्रांतून दूर ठेवण्याची नीती अतिशय गर्हणीय असल्याचे कर्नल वेलस्ली (नंतर ड्यूक ऑफ वेलिंग्टन) सारख्या इतरही काही इंग्रज मुत्सद्यांचे मत होते.

हजारो मैलांच्या अंतरावरून भारतात आलेल्या मूठभरच ब्रिटिश लोकांनी प्रामुख्याने हिंदी लष्कराच्या बळावरच संपूर्ण भारत पादाक्रांत करावा ही साहजिकच एक मोठी आश्चर्याची बाब आहे. याला दोन गोष्टी कारणीभूत ठरल्या एक म्हणजे भारतात राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेचा पूर्ण अभाव होता. अवध, बिहार या भागातून कंपनीच्या लष्करात भरती झालेल्या शिपायाला मराठ्याविरुद्ध किंवा पंजाबविरुद्ध कंपनीच्या बाजूने लढताना आपण राष्ट्रद्रोह करीत आहोत किंवा आपले ते कृत्य भारतविरोधी आहे असे वाटत नसे. जो कोणी त्यांच्या सेवेचा पगार देईल त्याच्याशी एकनिष्ठ राहणे, खाल्ल्या मिठाला जागणे एवढेच त्याला कळत होते. तशाच कल्पना त्या काळी भारतात रूढ होत्या, म्हणजेच भारतीय शिपाई एक चांगला भाडोत्री सैनिक होता, आणि कंपनी चांगला व नियमीतपणे पगार देणारी होती जी गोष्ट भारतीय सत्ताधीश पुष्कळदा करू शकत नसत.

ब्रिटिश शासनाचे स्वरूप निम-लष्करी होते. भारताच्या प्रशासनात लष्कराची भूमिका महत्त्वाची होती. गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलमध्ये- म्हणजेच नीती निर्धारणात सदस्य म्हणून सरसेनापतीचे स्थान महत्त्वाचे असे. नव्याने जिंकलेल्या प्रदेशांचे शासन व नियंत्रण बहुधा लष्करी अधिकाऱ्यांकडे सोपविले जाई. उत्तरेच्या व दक्षिणेच्या क्षेत्रात व नंतर पंजाब व सिंध हे प्रांतही लष्करी अधिकाऱ्यांच्या हाती दिले गेले होते. एवढेच नव्हे तर अनेक मुलकी विभागांचे प्रमुखही लष्करी अधिकारी असत. भारतीय सत्ताधीशांशी संबंध हाताळणारा

राजकीय विभाग आणि त्या भारतीय राज्यांतील कंपनीच्या वकिलाती तर जणू लष्करी अधिकाऱ्यांची मक्तेदारीच होती.

लष्कराची मदत घेणारे आणखी एक महत्त्वाचे खाते म्हणजे पोलीस. अंतर्गत क्षेत्रातील गडबडी व उद्रेक हाताळण्याकरिता लष्कराला पाचारण केले जाऊ नये अशी साधारणपणे सरकारी नीती असली तरी जिल्ह्यांचे अधिकारी तशी मदत घेत. कारण छावण्या व ठाणी कामाच्या भाराखाली नेहमीच दबलेली असत. एका ठिकाणाहून दुसरीकडे सरकारी पैसा किंवा अन्य किंमती माल पोचविताना संरक्षण म्हणून लष्करातील शिपाई दिले जात. गरजेनुसार, कैदी अनेकदा ठराविक काळाकरिता लष्कराच्या ताब्यात दिले जात. बंगालच्या प्रांतीय तुकड्या तेथील पोलीसांशी संबध्द केल्या जात. ती पद्धती नंतर बेंटिकने बंद केली. मुंबई इलाख्यात, उत्तर व दक्षिण खानदेशात पहाऱ्यावर सैनिक नेमले जात. तर पंजाबात दोन तृतियांश पायदळाचे तर एक तृतियांश घोडदळाचे असे एकूण ८१०० सैनिक पोलिसांना त्यांच्या कामात मदत करण्याकरिता नेमलेले होते. सिंधमध्येही बदोबस्त राखण्याची जबाबदारी लष्कराचीच होती.

या सर्व महत्त्वाच्या कामांव्यतिरिक्त महसूल अधिकाऱ्यांना सर्वेक्षणात मार्गदर्शन करण्याचे कामही पुष्कळदा लष्कर करी. लोहमार्ग व रस्ते लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे त्यांच्या बांधकामाकरिताही प्रामुख्याने लष्कराचा उपयोग केला जाई. पंजाबात शिखांवर नजर ठेवण्याकरिता तेथील प्रमुख रस्ते लष्करानेच तयार केले; तर संरक्षणाच्या दृष्टीने डलहौसीने ग्रँड ट्रंक रोड हा महामार्ग लाहोरपासून पुढे पेशावरपर्यंत लष्करांच्या मदतीनेच पोचविला. ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याची दृढता व लष्कराची आघातक्षमता या दोन्ही दृष्टींनी दळणवळणाची ही साधने महत्त्वाची होती.

सार्वजनिक आरोग्य व बांधकाम, जंगले, जलसिंचन, जमीन महसूल अशा विभागातही गरजेनुसार लष्कराचा उपयोग करून घेण्यात येई. पंजाब, सिंध व मध्यप्रांत येथे महसूल वसूलीचे कार्य प्रामुख्याने लष्करी अधिकाऱ्यांकडे सोपविले जाई.

गव्हर्नर जनरलांच्या नेमणुकीतही ब्रिटिश शासनाचे निम लष्करी स्वरूप प्रतिबिंबित होते. कॉर्नवॉलिस व हेस्टिंग्ज हे अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात व इतरत्रही भरपूर लष्करी अनुभव असलेले सैनिक होते तर बेंटिकला नेदरलँड, इटली, स्पेन येथील युद्धात अनुभव होता. नेपोलियनविरुद्धच्या अनेक लढायांत हार्डिंज याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. तर पंजाबात शिखांविरुद्धच्या युद्धात तो सरसेनापती ह्यू गो याचा प्रमुख सहाय्यक होता. वेलस्ली, ऑक्लंड, एलेनबरो हेही साम्राज्यवादी अग्रगामी नीतीचा पूर्णाशाने पुरस्कार करणारे शासक होते.

**न्यायव्यवस्था:**

ब्रिटिश पूर्वकाळात न्यायव्यवस्थेत अनेक दोष होते. विशेषतः बंगालमध्ये मोठे जमीनदारच दिवाणी व फौजदारी गुन्ह्याचे निर्णय देण्याचे कार्य करीत असत. न्यायव्यवस्थेत मध्यस्थांचे प्राबल्य होते. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले होते. न्यायदान करणारी मंडळी ही भ्रष्ट होती. शिवाय क्षुल्लक गुन्ह्यासाठी जबर

शिक्षा ठोठावल्या जात असत. प्रारंभीच्या काळात कंपनी सरकारने न्यायव्यवस्थेत मोलाची भर घालून कायद्याचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

१७६५ साली कंपनी सरकारला बंगाल प्रांताचे दिवाणीचे अधिकार मिळाले. यावेळी बंगालचा गव्हर्नर म्हणून क्लाईव्ह कार्य करीत होता. कंपनी आपल्याकडे न्याय व महसूलचे अधिकार घेईल असे वातावरण निर्माण होते. परंतु क्लाईव्हने कोणतीच जबाबदारी स्वीकारली नाही. त्याने नायब दिवाण म्हणून महंमद राजा खान आणि राजा सिताब राय याची नेमणूक केली. त्यांच्याकडे अनुक्रमे महसूल व न्यायविषयक अधिकार सोपविले. अशा प्रकारची व्यवस्था १७७२ पर्यंत होती. क्लाईव्ह यास राजकीय बाबीकडे अधिक लक्ष द्यावयाचे तसेच त्याला स्थानिक प्रशासनाची फारशी माहिती नव्हती. म्हणून त्याने न्याय व महसूल व्यवस्था दोन नायब दिवाणाकडे सोपविली होती.

वॉरन हेस्टिंग्जने दोन्ही प्रकारची कामे कंपनीकडे घेतली. त्यामुळे कंपनीही खऱ्या अर्थाने बंगाल प्रमुख शासनकर्ती झाली. वॉरन हेस्टिंग्जने न्याय विषयक क्षेत्रात महत्त्वपूर्ण अशा सुधारणा केल्या. त्याची माहिती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी दिवाणी अदालत आणि फौजदारी अदालतची स्थापना केली.

२. दिवाणी अदालतचा न्यायाधीश म्हणून कलेक्टरची नेमणूक केली. त्याने भारतीय अधिकाऱ्यांच्या मदतीने न्यायदानाचे कार्य करावे. या न्यायालयास ५०० रु. पर्यंतचे खटले चालविता येत असत.

३. फौजदारी अदालतचा न्यायाधीश म्हणून भारतीयांची नियुक्ती केली होती. त्याच्या मदतीस काजी आणि मुफ्ती असत. मात्र त्याच्या निर्णयाची पहाणी कलेक्टर करीत असे. या न्यायालयास फाशीची शिक्षा देण्याचा अधिकार नव्हता, त्याचप्रमाणे वरिष्ठ न्यायालयाच्या परवानगीशिवाय मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार नन्हता.

४. सत्र दिवाणी अदालत आणि सत्र फौजदारी अदालत कलकत्ता येथे स्थापन केले होते. सत्र दिवाणी अदालतचे काम कलकत्ता कौन्सिलच्या अध्यक्षामार्फत चालत असे. त्याच्या मदतीस कौन्सिलमधील दोन सदस्य असत. सत्र फौजदारी अदालतचे काम नायब निजाम याच्यामार्फत चालत असे. त्याच्या मदतीस काजी, मुफ्ती व मौलवी असत. कलकत्ता कौन्सिल हे या न्यायालयाच्या निर्णयाची पहाणी करीत असत.

५. सत्र दिवाणी अदालत आणि सत्र फौजदारी अदालत हे जिल्हा न्यायालयाकडून आलेल्या अपिलांची सुनावणी करीत असत आणि त्याबाबत निर्णय देत असत.

६. दिवाणी न्यायालयात हिंदूसाठी आणि मुस्लिमासाठी अनुक्रमे हिंदू कायदा आणि मुस्लिम कायदा आधार म्हणून घेतला जाई. परंतु फौजदारी न्यायालयात मुस्लीम कायद्यांचा आधार घेतला जाई.

७. न्यायाधिशांचा पगार निश्चित करण्यात आला होता. त्यांना जनतेकडून कोणतेही बक्षिस स्वीकारता येत नसे. उपरोक्त नियमाशिवाय न्यायालयांच्या कामकाजासाठी काही नियमावली तयार केली होती.

१. प्रत्येक न्यायालयास आपल्या कामकाजाचे दप्तर व्यवस्थीत ठेवावे लागे.

२. प्रत्येक खटल्याच्या निकालासाठी वेळेचे बंधन निश्चित केले होते.

३. न्यायालयांना जबर दंड आकारता येत नव्हता.

४. सावकारपासून कर्जबाजारी व्यक्तीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न झाला. कारण सावकार ऋणकोची मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत असत.

५. दहा रुपयापेक्षा अधिक खटले तडजोडीने सोडवावेत अशा प्रकारचा सल्ला न्यायालये देत असत.

६. यानंतरच्या काळात हिंदू आणि मुस्लिम कायद्यांचे संहितीकरण करण्यास प्रारंभ झाला.

लॉर्ड हेस्टिंग्जच्या काळातच पिटस इंडिया ॲक्टने कलकत्ता येथे सुप्रिम कोर्टाची स्थापना केली. परंतु या सर्वोच्च न्यायालयाचा प्रारंभीच्या काळात हेतू फारसा साध्य झाला नाही. कारण सत्र दिवाणी अदालत आणि सत्र फौजदारी अदालत याचे सर्वोच्च न्यायालयाशी काय संबंध असावेत हे स्पष्ट केले नव्हते.

लॉर्ड कॉर्नवालिसने वॉरन हेस्टिंग्जने सुरू केलेल्या न्यायविषयक कामाची पूर्तता केली. त्याच्या काळात भारतातील न्यायविषयक कार्यास निश्चित असा आकार प्राप्त झाला होता.

१. यापूर्वी शेतमहसूल आणि इतर पैश्यांचे खटले यामध्ये फरक केला होता. परंतु कॉर्नवालिसच्या काळात सर्व पैश्यांचे खटले दिवाणी अदालत कडे सोपविले.

२. ५० रुपयापेक्षा कमीचे खटले चालविण्यासाठी मुन्सिफ कोर्टाची स्थापना केली. मुन्सिफ कोर्ट न्यायालय व्यवस्थेतील सर्वात खालचे न्यायालय होते. या न्यायालयांच्या न्यायाधिशपदी भारतीयांची नेमणूक करण्यात येत असे.

३. मुन्सिफ कोर्टानंतर इंडियन रजिस्ट्रार कोर्टाची स्थापना केली होती. या न्यायालयास ५०० रु. पर्यंतच्या खटल्याचे कामकाज चालत असे. या न्यायालयात न्यायाधीश म्हणून भारतीयांची नेमणूक करण्यात येत असे.

४. जिल्हा दिवाणी न्यायालयांची स्थापना प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी केली होती. अशा न्यायालयांचे न्यायाधीश युरोपीय असत. कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविषयी या न्यायालयात कामकाज चालत असे.

५. जिल्हा न्यायालयानंतर चार प्रांतिक दिवाणी न्यायालयांची स्थापना केली होती. ही न्यायालये कलकत्ता, ढाका, मुर्शिदाबाद आणि पाटणा येथे होती. येथील न्यायालयातील न्यायाधीश युरोपीय असत. हे न्यायाधीश भारतीयांच्या मदतीने न्यायदानाचे कार्य करीत असत.

६. प्रांतिक कार्यालयानंतर सद्र दिवाणी अदालत हे कलकत्ता येथे स्थापन केले होते. या न्यायालयाचे कामकाज गव्हर्नर जनरल आणि त्याच्या कार्यकारणीतील सदस्यांच्यामार्फत चालत असे.

७. न्यायदानविषयक अखेरचा निर्णय देण्याची जबाबदारी सर्वश्रेष्ठ अशा इंग्लंडच्या सत्ताधीशांच्या न्यायालयांची होती. राजाच्या मदतीस न्यायदानातील व्यक्ती असत.

८. यापूर्वी जिल्ह्याच्या ठिकाणी फौजदारी अदालत होते. या न्यायालयाचे कामकाज भारतीय न्यायालयामार्फत चालत असे. परंतु ही न्यायालये बंद करून त्याच्याऐवजी जिल्हा फिरती न्यायालये स्थापन केली. या न्यायालयाचे न्यायाधीश युरोपीय असत.

९. चार प्रांतिक फौजदारी न्यायालयांची स्थापना मुर्शीदाबाद, ढाका, पाटणा, कलकत्ता येथे करण्यात आली. या न्यायालयाचे न्यायाधीश युरोपीय असत. त्यांना फाशी देण्याचा अधिकार होता. मात्र त्यासाठी सद्र निजामत अदालतची संमती घ्यावी लागे.

१०. प्रांतिक न्यायालयानंतर कलकत्ता येथे सद्र निजामत अदालत होते. या न्यायालयाचे निर्णय देण्याचे काम गव्हर्नर जनरल आणि त्याच्या कार्यकारणीकडे सोपविले होते.

उपरोक्त न्यायविषयक सुधारणाशिवाय कॉर्नवालिसने न्यायविषयक आणखी काही तरतूद केल्या होत्या. त्यानुसार सरकारी नोकरांनी सरकारी कामकाजात योग्य रीतीने निर्णय घेतले नाही. त्यांचे निर्णय पक्षपाती स्वरूपाचे असतील तर त्यांना प्रचलित न्यायव्यवस्थेप्रमाणे शिक्षा करण्याचा अधिकार मिळाला. तसेच गव्हर्नर जनरलला क्षमा करण्याचा किंवा शिक्षा कमी करण्याचा अधिकार मिळाला. कलकत्ता येथील सुप्रिम कोर्टाकडे प्रामुख्याने युरोपीयनांबाबतचे खटले चालत असत.

**कॉर्नवालिसची कायादेसंहिता: (१७९३)**

कॉर्नवालिसने भारतात प्रचलित असलेल्या विविध प्रकारच्या कायद्यांचे संकलन करून त्यांना लिखित स्वरूप देण्याचे काम कायदेतज्ज्ञांकडे सोपविले. त्यांनी संकलित केलेल्या कायदेसंहितेस 'कॉर्नवॉलिसची कायदेसंहिता' असे म्हटले जाते. त्यामुळे न्यायाधीशांनी न्यायदान करताना कोणत्या कायद्यांचा आधार घ्यावा आणि त्यांच्या निकालाची अंमलबजावणी कोणाकडून व्हावी हे निश्चित केले. तसेच त्याच्या काळापासून कायद्याची समानता हे धोरण स्वीकारले. त्याच्या कायदेसंहितेत सत्ता विभाजनाच्या तत्त्वास अधिक महत्त्व दिले होते. त्यानुसार कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांची फारकत केल्याने जनतेत सुरक्षिततेची भावना वाढीस लागली. यापूर्वी न्यायदानाविषयक बरेच अधिकार कलेक्टरकडे होते. त्याच्याकडे महसूल आकारणे आणि गोळा करणे, शिवाय त्याला दिवाणी व फौजदारी खटल्याची कामेही पहावी लागत असत. या अधिकच्या कामामुळे कलेक्टरकडून योग्य प्रकारे, कामकाज होणार नाही अशी खात्री झाल्याने त्याचे कार्य कमी केले. त्यांच्याकडे केवळ महसूल विषयक अधिकार ठेवले आणि दिवाणी व फौजदारी कामकाजासाठी स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था उभारली.

कॉर्नवॉलिसच्या कायदेसंहितेत दिवाणी खटल्याकडे विशेष लक्ष दिले. त्यानुसार दिवाणी न्यायालयांची उभारणी चढत्या श्रेणीनुसार करण्यात आली. तसेच दिवाणी आणि महसूल खटले हा भेद नाहीसा केला. या कायदेसंहितेमुळे युरोपीय न्यायाधीशांना कामकाज करणे सुलभ झाले. कारण यापूर्वी या न्यायाधीशांना अनेक खटल्यांच्या प्रसंगी कायद्यांची माहिती घेण्यासाठी आपल्या मदतनीसावर अवलंबून रहावे लागे. परंतु आता कायद्याचे संहितीकरण झाल्यामुळे त्यांना कोणत्याही कायद्याचा संदर्भ घेणे शक्य झाले.

कंपनी सरकारच्या काळात न्यायविषयक क्षेत्रात लॉर्ड बेटिंकनेही महत्त्वाचे कार्य केले. त्याच्या काळात न्यायविषयक बाबतीत पुढीलप्रमाणे बदल घडून आणले होते.

१. फौजदारी फिरती न्यायालये बंद करण्यात आली आणि या न्यायालयांचे कामकाज मॅजिस्ट्रेट आणि कलेक्टर यांच्याकडे सोपविले.

२. सद्र दिवाणी अदालत आणि सद्र फौजदारी अदालत यांची स्थापना अलाहाबाद, उत्तर प्रदेशात केली. कारण या प्रदेशातील नागरिकांना न्यायविषयक कार्यासाठी कलकत्तासारख्या ठिकाणी जाणे कठीण होते. ३. यापूर्वी न्यायालयांचे कामकाज अधिक प्रमाणात पर्शियन भाषेत चालत असे. परंतु इतर प्रादेशिक भाषेतून न्यायालयाचे कामकाज चालेल अशी तरतूद केली. शिवाय न्यायालयाच्या कामकाजासाठी इंग्लिश भाषेचा स्वीकार केला.

४. मुन्सिफ आणि सद्र अमीन पदावर भारतीयांची नेमणूक करण्यात येऊ लागली.

५. १८३३ साली कायदेविषयक मंडळ मेकॉले याच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आले. या मंडळाने भारतीय दंडविधानाचा (Indian Penal Code) मुलभूत असा आराखडा तयार केला.

६. १८३६ च्या कायद्यातील अकराव्या तरतुदीप्रमाणे न्यायदान क्षेत्रातील वांशिक भेदभाव नाहीसा करण्यात आला. हा कायदा मेकॉलेचा Black Act म्हणून ओळखला जातो.

वर्ण यावरून भेद केला जाणार नाही असे स्पष्ट केले. लॉर्ड बेटिंक हा उदारमतवादी विचारवंत असल्याने त्याने आपल्या गव्हर्नर जनरलपदाच्या काळात न्यायदान क्षेत्रात महत्त्वपूर्ण असे बदल घडवून आणले. त्याने बंगाल प्रांताचे विभाजन करून प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र असा कमिशनर नेमला. गुन्हेगारांना फटके मारण्याची शिक्षा देणे बंद केले.

सन १८५३ च्या सनद कायद्याप्रमाणे कायदेमंडळाच्या उभारणीस प्रारंभ झाला. या मंडळात बंगाल प्रांताच्या सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधिश आणि एक दुय्यम न्यायाधिशांची नेमणूक केली. कंपनी काळात न्यायविषयक क्षेत्रात महत्त्वाचे बदल झाल्याने सर्वसामान्य जनतेला न्याय मिळणे शक्य झाले. तसेच न्यायविषयक कामकाजात शिस्त होती आणि पक्षपातीपणाचा अभाव असल्याने न्यायदानाची प्रक्रिया अत्यंत कार्यक्षम रीतीने चालत असे. त्यामुळे कंपनी काळात कायद्याचे राज्य निर्माण करता आले.

कायद्याचे राज्य: प्राचीन काळापासून भारतातील अनेक महत्त्वाच्या राजवटीत कायद्याच्या मदतीने न्यायदान करण्याचा प्रयत्न होत असे. मात्र अशा न्यायदानाच्या प्रक्रियेत सत्ताधिशांचा प्रभाव व्यापक असे. तसेच वरिष्ठ वर्गांना न्यायदानाबाबत अनुकूल असे निर्णय दिले जात असत. परंतु कंपनीच्या काळात न्यायदानाच्या क्षेत्रात अमुलाग्र असा बदल आला आणि कायद्याचे राज्य निर्माण झाले. असा प्रयत्न भारतात प्रथमच कंपनी सरकारकडून असे म्हणता येईल. याबाबत वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड कॉर्नवालिस आणि लॉर्ड बेटिंक याचे योगदान महत्वाचे समजले जाते. या गव्हर्नर जनरलनी तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेऊन न्यायव्यवस्थेला निश्चित आकार देण्यात यश मिळविले. परिणामी भारतात कायद्याचे राज्य निर्माण होऊ

शकले. कंपनीच्या काळात भारतात एकछत्री अंमल प्रस्थापित झाला. या विशाल देशासाठी न्यायविषयक सुधारणा करण्यात आल्या. त्यासाठी काही प्रमाणात समानतेच्या धोरणाचा पाठपुरावा करण्यात आला.

सन १८३३ च्या सनदी कायद्याने न्यायविषयक कामकाजास नवी दिशा देण्याचे कार्य केले. भारताच्या न्यायविषयक कार्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कायद्यांचे संहितीकरण करून कायदेविषयक ग्रंथ तयार करण्यासाठी जे मंडळ नेमले होते, त्याचा अध्यक्ष मेकॉले हा होता. त्याने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने वेगवेगळ्या कायद्यांचा अभ्यास केला आणि त्यांचे संहितीकरण करण्यात आले. त्यामुळे भारतात कायद्याचे राज्य निर्माण होण्यास बरीच मदत झाली. तसेच भारतात प्रथमच भारतीय दंडविधान आणि दिवाणी आणि दंड प्रक्रिया असे कायद्याचे भाग पाडले. या कायदेविषयक सुधारणामुळे भारतात राजकीय ऐक्य निर्माण करण्यास अनुकूल वातावरण लाभले.

भारतात कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी इंग्लंडमधील उदारमतवादी विचारवंतांची प्रेरणा ठरली. त्यांना ईस्ट इंडिया कंपनीचे भारतातील राज्य ही एक महत्त्वाची जबाबदारी आणि ती चांगल्या प्रकारे पार पाडली पाहिजे असे सतत वाटत होते. भारतात राजकीय स्थैर्य निर्माण होण्याकडे त्याचे विशेष लक्ष होते. वैयक्तिक गुणवत्ता किंवा सार्वभौम सत्तेचे जबरदस्त सामर्थ्य यापेक्षा कायदा आणि त्याच्या समर्थ अंमलबजावणीवर राज्याची उभारणी झाली पाहिजे असे त्याचे प्रामाणिक मत होते. या विचारवंतांना भारतात मिळालेली इंग्रजांना सत्ता केवळ आर्थिक फायद्यासाठी न राबविता येथील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करावी, यासाठी त्यानी आपल्या लेखणी आणि वाणीद्वारे अनुकूल असे वातावरण निर्माण केले.

**ईस्ट इंडिया कंपनी काळातील न्यायव्यवस्थेतील प्रमुख वैशिष्ट्ये :–**

**१. लिखित कायदा:–** प्राचीन काळापासून भारतात रूढी, परंपरेद्वारे अनेक कायदे तयार झाले. शिवाय काही महत्त्वाच्या राजवटीत कायदे तयार करण्यात आले. काही विचारवंतानीही कायद्याच्या क्षेत्रात भर घातली. परंतु हे कायदे काही प्रमाणात लिखित स्वरूपात असले तरी बरेच कायदे अलिखित स्वरूपात होते. कारण ते रूढी, परंपरेद्वारे चालत होते. त्यामुळे न्यायदानाच्या कामकाजात समस्या निर्माण होत असते. परंतु कंपनीच्या राजवटीत कायद्याचे लिखित स्वरूपात संहितीकरण करण्यात येऊ लागले. तसेच गव्हर्नर जनरल आणि त्याची कार्यकारिणी अथवा ब्रिटिश संसद लिखित स्वरूपात कायदे करू लागले. आणि त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली. लिखित कायद्याची माहिती नागरिकांना होऊ लागल्याने कायद्याचे नेमके स्वरूप त्यांना समजू लागले.

**२. कायदा हा सर्वाना समान:–** कायद्यासमोर सर्वांची समानता ही संकल्पना ब्रिटिशांच्या कायदा–पद्धतीचा मूलाधार होता. संपूर्ण देशभर एकच कायदा लागू होत होता. धर्म, जात, वंश व्यक्तीचे समाजातील स्थान अशा कोणत्याही कारणाकरिता भेदभाव केला जात नसे. पूर्वी भारतात, न्यायदान करताना या गोष्टी विचारात घेतल्या जात असत. उदाहरणार्थ, एकाच गुन्हयाकरिता ब्राम्हणाला व अब्राम्हणाला दिल्या जाणाऱ्या शिक्षेत फरक असे, किंवा जमीनदार, सरदार व जनसामान्य एकाच मापदंडाने तोलले जात नसत. परंतु ब्रिटिश काळात एखादी सामान्य व्यक्तीही कोणाहीविरुद्ध न्याय मिळावा याकरिता न्यायालयात जाऊ शकत असे.

कायद्यासमोर सर्वांची समानता या प्रशंसनीय तत्त्वाच्या अंमलबजावणीत अर्थात् मेख होतीच. युरोपीय व त्यांचे वंशज यांच्याकरिता वेगळी न्यायालये होती: व वेगळे कायदे होते. फौजदारी गुन्ह्यांकरिता त्यांचे खटले केवळ युरोपीय न्यायाधीशांपुढेच येत. अनेक शासकीय इंग्रज अधिकारी, लष्करी अधिकारी, मळे मालक, व्यापारी भारतीयांशी अत्यंत उद्दामपणे, कठोरपणे एवढेच नव्हे तर क्रौर्याने वागत. तसे खटले न्यायालयात नेले गेले तर त्या इंग्रज गुन्हेगारांना, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे नको ते संरक्षण दिले जाई. व इंग्रज न्यायाधीशांकडून त्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षा गुन्ह्याच्या मानाने अगदीच सौम्य असत. त्यामुळे, न्याय मिळावा म्हणून सामान्य व्यक्तीही कोणालाही न्यायालयात खेचू शकत असली तरी त्या समानतेच्या तत्वाला प्रत्यक्ष व्यवहारात अर्थ उरत नसे. कारण न्यायदानात पक्षपात व अन्याय उघडपणे व सरसकट होई.

**३. कायद्याचे राज्य:–** कायद्याचे राज्य ही पद्धती ब्रिटिशांनी भारतात सुरू केली. शासकाच्या वैयक्तिक लहरीनुसार नव्हे तर, प्रजाजनाचे हक्क, विशेषाधिकार व जबाबदाऱ्या स्पष्ट केलेल्या कायद्यानुसार प्रशासन चालविले जाईल (अर्थात केवळ तत्त्वतः) असा त्याचा अर्थ होता. प्रत्यक्षात शासकीय अधिकारी व पोलीस यांना अनिर्बंध सत्ता होती. व जनतेचे हक्क व व्यक्तिस्वातंत्र्य सरसकट पायदळी तुडविले जाई. 'कायद्याचे राज्य' या पद्धतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यालाही त्याच्या कर्तव्यात त्याने कसूर केल्यास, किंवा त्याला देण्यात आलेल्या अधिकारांचे त्याने उल्लंघन केल्यास त्याला न्यायालयासमोर खेचले जाऊ शकत होते. व्यक्तीस्वातंत्र्याची तेवढी हमी या तरतुदीनुसार दिली गेली. पूर्वीच्या शासकावरही परंपरा, रुढी, यांची बंधने होती परंतु त्यांना त्यांच्या मर्जीनुसार कोणतीही शासकीय कार्यवाही करण्याचा अधिकार होता. व तशा कार्यवाहीला कोणीही कोणत्याही प्रकारे आव्हान देऊ शकत नसे. परंतु ब्रिटिश शासन, बहुतांशी, न्यायालयाने कायद्यांच्या लावलेल्या अर्थानुसार चाले. अर्थात् ते कायदेच पुष्कळदा सदोष व अन्याय्य होते व ते परकीय शासकांनी जनतेच्या नव्हे तर स्वतःच्या हिताच्या दृष्टीने केलेले होते व त्यामुळे फार मोठी सत्ता अधिकाऱ्यांच्या व पोलीसांच्या हातात दिली गेली होती हे स्पष्टच आहे.

**४. न्यायव्यवस्थेस स्वातंत्र्य:–** कंपनी सरकारने प्रथमच नवीन कायदा आणि न्याय व्यवस्था निर्माण केली. तसेच दिवाणी खटल्यासाठी आणि फौजदारी खटल्यासाठी स्वतंत्र अशी न्यायालये स्थापन केली, तसेच कायद्याचे संहितीकरण सुरू झाल्याने न्यायव्यवस्थेत कार्यक्षमरितीने नि:पक्षपातीप्रमाणे कार्य करणे शक्य झाले. यापूर्वी राजा, जमीनदार आणि धर्मगुरू यांच्या मताप्रमाणे न्याय देण्याचे कार्य होत असे. त्यामुळे सर्वसामान्यांना योग्य असा न्याय मिळणे कठीण होत असे. अनेक वेळा धर्मगुरू कायद्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी धर्मशास्त्राचा उपयोग करीत असत. त्याचा फायदा केवळ वरिष्ठ वर्गास होत असे.

**५. युरोपीयनांना अनुकूल न्यायव्यवस्था:** यापूर्वी न्यायव्यवस्थेत वरिष्ठ वर्ग आणि कनिष्ठ वर्ग असा भेदभाव होता. तशा प्रकारचा भेद ब्रिटिश राजवटीत फारसा दिसत नसला तरी युरोपीयन आणि भारतीय भेद आढळून येत होता. न्यायदानाच्या निर्णयात युरोपीयनांना अनुकूल अशी भूमिका स्वीकारली जात होती. त्यामुळे भारतीयांना काही वेळा योग्य असा निर्णय मिळत नसे.

**६. न्यायव्यवस्थेवर नोकरशाहीचा प्रभाव:** सरकारी अधिकारी विशेषतः पोलिस अधिकारी अनेक वेळा बळाचा वापर करीत असत. त्याचा न्यायव्यवस्थेवर परिणाम होत असे. महसूल क्षेत्रातही अधिकारी वर्गाचे प्राबल्य असल्याने दिवाणी खटल्यात अनेक वेळा योग्य असा निर्णय मिळत नसे. इंग्रजी अधिकाऱ्यांना काही वेळा रूढी, परंपरेची माहिती नसल्याने न्यायालयीन कामकाजात अडचणी निर्माण होत असत.

**७. खर्चिक न्यायव्यवस्था:** न्यायालयाच्या कामकाजासाठी बराचसा पैसा खर्च होत असे. गरीब लोकांना पैसा खर्च करणे कठीण होत असे. तसेच न्यायालयाच्या निर्णयास विलंब लागत असे. त्याचा फायदा धनिक मंडळी घेत असत. अनेक वेळा न्यायाधिशांना एखाद्या निर्णयाच्यावेळी कायद्याचे स्पष्टीकरण करणे कठीण होत असे. त्याचा फायदा अनेकवेळा धनिकांना होत असे.

थोडक्यात ब्रिटिश राजवटीत 'कायद्याचे राज्य', 'कायद्यापुढे सर्व समान' या महान तत्वाचे समर्थन केले असले तरी या तत्त्वांची अंमलबजावणी मर्यादित प्रमाणातच झाली असे म्हटल्यास अयोग्य होणार नाही.

**पोलीस यंत्रणा:-**

अंतर्गत शांतता, सुव्यवस्था व सुरक्षितता टिकवून धरण्याकरिता ब्रिटिश सत्तेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ होता तो म्हणजे पोलीस. पोलीस यंत्रणेचा निर्माताही कॉर्नवॉलिसच होता. जमीनदारांच्या हाती असलेली पोलीसांची कार्ये त्याने त्यांच्याकडून काढून घेऊन, शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता स्वतंत्र पोलीस दलाची निर्मिती केली. त्याकरिता पूर्वी भारतात प्रचलित असलेली ठाण्यांची पद्धती पुन्हा सुरू करून त्याने तिचे आधुनिकीकरण केले. खुद्द ब्रिटनमध्येही तोपर्यंत तशी कार्यक्षम पोलीस यंत्रणा विकसित झालेली नव्हती.

लॉर्ड कॉर्नवालिसच्या पोलिस सुधारणा: १७८४ च्या पिटस् इंडिया ॲक्टने गव्हर्नर जनरलास व्यापक अधिकार बहाल केले आणि याच वर्षी गव्हर्नर जनरलपदी लॉर्ड कॉर्नवालिसची नियुक्ती केली. पुढील सात वर्षाच्या काळात त्याने प्रशासनाची भक्कम अशी चौकट निर्माण केली. त्याने न्यायविषयक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे असे कार्य केले. न्यायव्यवस्थेत अमुलाग्र असा बदल घडवून आणण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्याने व्यापारक्षेत्रात महत्त्वपूर्ण असे बदल घडवून आणले. त्याने कंपनीच्या नोकरांना खाजगीरीत्या व्यापार करता येणार नाही अशी कायद्याने तरतूद केली. भारतातील जनता प्रशासनासाठी पात्र नाहीत, ते भ्रष्ट आहेत असे त्याचे मत होते. म्हणून त्याने प्रशासनातील महत्त्वाची पदे युरोपियनांना देण्याचे धोरण स्वीकारले.

शेतमहसूल गोळा करण्यासाठी बंगाल प्रांताकरिता कॉर्नवालीसने कायमधारा पद्धती राबविली होती. या व्यवस्थेत महसूल गोळा करण्याचा अधिकार जमीनदारास दिला होता. या जमीनदारांकडे जनतेच्या रक्षणाची जबाबदारी सोपविली होती. जमीनदार वर्गातील दोषांची जाणीव त्याला होती. म्हणून त्याने जमीनदाराकडील जनतेच्या रक्षणाचे कार्य काढून घेतले. त्यावेळी जनतेच्या रक्षणासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा उभारली. या यंत्रणेच्या जोरावर त्याने पोलिसी स्टेट निर्माण करण्यात यश मिळविले. या काळात जनतेचे आर्थिक प्रश्न सोडवावेत असा विचार नव्हता. कल्याणकारी प्रशासनव्यवस्था ही संकल्पना अद्यापही राज्यकर्त्यांनी अंमलात आणली नव्हती. प्रजेचे रक्षण करणे हेच त्याचे महत्त्वाचे कार्य होते. हे ओळखून कॉर्नवालिसने पोलिस

सुधारणांकडे अधिक दिले. पोलिस सुधारणाबाबत त्याने जेवढे कार्य केले आहे, तेवढे कार्य दुसऱ्या गव्हर्नर जनरलने क्वचितच केले आहे.

ब्रिटिश सत्तेचा तिसरा महत्त्वाचा आधार पोलिस यंत्रणा होती. या पोलिसांच्या मदतीने इंग्रजांनी भारतात शांतता प्रस्थापित केली. लुटारू, दरोडेखोर यांचा बंदोबस्त केला. कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी इंग्रजांना पोलिस दलाचा बराच उपयोग झाला. पोलिस दलाची संख्या मर्यादित असली तरी या दलात शिस्त होती. भ्रष्टाचार फारसा नव्हता. त्यामुळे जनतेत पोलिसाबाबत वचक निर्माण झाला होता. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला होणारा उपद्रव थांबला होता. इंग्रजानी निर्माण केलेल्या पोलिसी स्टेटमुळे काही काळासाठी का होईना भारतात शांतता प्रस्थापित झाली होती. परंतु पुढे इंग्रज शासनाने आक्रमक धोरण स्वीकारल्यानंतर जनतेने स्वातंत्र्यासाठी पोलिसांना विरोध करण्याचे धोरण स्वीकारले. याकाळात काही प्रमाणात पोलिसांनी देखील सहकार्य केल्याचे दिसते. एकंदरीत इंग्रजांनी देशात अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिस सुधारणा घडवून आणल्या. यामध्ये कॉर्नवालिसचे कार्य सर्वात महत्त्वाचे आहे.

१७९१ साली पोलिस व्यवस्थेबाबत कायदा करण्यात आला. त्याने जमीनदाराकडून पोलिसविषयक कार्य काढून घेतले. शासन आणि कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र असे नियमित पोलिसदल निर्माण केले.

**पोलिस ठाण्यांची उभारणी:–** भारतात नवीन अशी पोलिस यंत्रणा निर्माण केली. ठराविक अंतरावर त्याने पोलिस ठाण्याची उभारणी केली. या ठाण्याचा प्रमुख म्हणून दरोगाची नेमणूक केली. त्याच्या मदतीस काही पोलिस देण्यात आले. या ठाण्याकडे ठराविक प्रदेश सोपविला होता. त्या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे काम सोपविले होते. पोलिस दलातील नोकरांना पुरेशा प्रमाणात वेतन दिले जात असे. त्यामुळे हे पोलिस प्रामाणिकपणे कार्य करीत असत. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पोलिस ठाण्याकडे सतत लक्ष असल्याने या दलात कार्यक्षमता निर्माण झाली होती. या पोलिसांच्या मदतीला घोडदळ असे. तसेच त्यांना आधुनिक स्वरूपाची शस्त्रे दिली होती. त्यामुळे एखाद्या ठिकाणी गुन्हा घडल्यास त्यांना लागलीच संपर्क साधणे शक्य होत असे. शिवाय त्याच्याजवळ असलेल्या अद्ययावत शस्त्रामुळे समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती नाहीशी होण्यास मदत झाली होती. शिवाय फौजदारी खटल्यासाठी दिली जाणारी शिक्षा गंभीर स्वरुपाची होती. परिणामी समाजात पोलिसांचा वचक निर्माण झाल्याने गुन्ह्यांचे प्रमाण बरेच कमी झाले होते. विशेष म्हणजे कॉर्नवालिस याने पोलिस ठाण्याची उभारणी केली होती, तशा प्रकारची व्यवस्था इंग्लंडमध्येही रूढ नव्हती. म्हणजे त्याने भारतात आणि प्रामुख्याने बंगाल प्रांतात हा प्रयोग केला होता.

**पोलिस अधीक्षकांची नेमणूक:** सहाशे चाळीस कि.मी. चौरस क्षेत्रात त्याने पोलिस अधीक्षकांची नेमणूक केली. या क्षेत्रात अनेक पोलिस ठाणी होती. या सर्व ठाण्यावर पोलिस अधीक्षकांचे नियंत्रण होते, त्याचप्रमाणे इंग्लिश मॅजिस्ट्रेटस् यांचाही अधिकार जिल्ह्याच्या पोलिस केंद्रांवर चालत असे. म्हणजे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोलिस अधीक्षक नेमण्याची तरतूद प्रथम कॉर्नवालिसने केली. हे पोलिस अधीक्षक युरोपियन असत. त्यांना चांगले वेतन आणि वास्तव्यासाठी भव्य अशा वास्तू असत. त्याचे वास्तव्य त्यांच्या

क्षेत्रातच असले पाहिजे अशा प्रकारचे बंधन होते. जिल्ह्याचा महसूल गोळा करणारा कलेक्टर आणि जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करणारा पोलिस अधीक्षक ही दोन महत्त्वाची पदे त्याकाळात होती. या दोन्ही अधिकाऱ्यांचे एकमेकांना सहकार्य होत असे. तसेच हे दोन्ही अधिकारी युरोपियन असल्याने त्यांच्यात शक्यतो संघर्षाचे प्रसंग निर्माण होत नसत. थोडक्यात वॉरन हेस्टिंग्जने नियुक्त केलेला गव्हर्नर आणि कॉर्नवॉलिसने नेमलेला पोलिस अधीक्षक यामुळे जिल्ह्यामध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकली आणि शासनाला महसूल गोळा करणे सुलभ झाले.

कॉर्नवॉलिस साम्राज्यवादी वृत्तीचा गव्हर्नर असल्याने त्याने लष्कर, न्यायव्यवस्था, पोलिस या तीनही संरक्षक शाखात महत्त्वाचे बदल घडवून आणले. त्याच्या आगमनकाळात पोलिसांचे काम जमीनदार पहात असत. परंतु या व्यवस्थेत अनेक दोष होते. म्हणून त्याने पोलिस दलाचा चेहरा मोहरा बदलला. पोलिस दलात प्रामाणिकपणा रुजविण्यासाठी त्याने पोलिसांचे पगार वाढविले. तसेच एखाद्या पोलिसाने अथवा पोलिस अधिकाऱ्याने उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केले तर त्याला बक्षीस दिले जाई. विशेषतः दरोडे किंवा खुनाच्या खटल्याच्या संदर्भात योग्य रीतीने कार्य करणाऱ्याचा बक्षीस देऊन गौरव करण्यात येत असे. जमीनदारांनी पोलिस कार्यात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये अशा त्यांना स्पष्ट सूचना दिल्या. त्याच्या मालमत्तेत चोरी किंवा तशा प्रकारची घटना घडली तर त्यांनीही पोलिस यंत्रणेची मदत घ्यावी हे स्पष्ट केले. पोलिस आणि पोलिस अधिकाऱ्यांसाठी ठराविक अशा पोशाखाची तरतूद केली. पोलिस दलास आधुनिक स्वरूप देण्यासाठी बराचसा पैसा खर्च करण्यात आला त्यामुळे कॉर्नवालिसच्या काळात गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण बरेच कमी झाले आणि सर्वसामान्य जनतेला निर्भय जगणे शक्य झाले.

**जमीनदाराकडे पोलिस विभागाची परत जबाबदारी:** लॉर्ड कॉर्नवालिसने जमीनदाराकडून विभाग काढून घेतला होता. त्याने पोलिस दलात महत्त्वाच्या सुधारणा केल्या होत्या. पोलिस अधीक्षकसारखे महत्त्वाचे पद निर्माण केले होते. पुढे लॉर्ड वेलस्लीच्या काळात प्रदेश विस्ताराचे धोरण स्वीकारल्याने सतत युद्धे करावी लागली. तसेच नेपोलियनच्या युद्धामुळे भारतातही भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याचा फायदा पोलिस दलाने घेतला. या दलात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढला. धनिक वर्ग पैश्याच्या मदतीने आपला फायदा करून घेऊ लागले. अनेक पोलिस ठाण्यातील पोलिसवर्ग आपणास ठरवून दिलेल्या कामाशिवाय पैश्यासाठी कामे करण्यास सुरुवात केली. परिणामी सर्व सामान्य जनतेत पोलिसवर्गाबाबत तिरस्कारांची भावना निर्माण झाली. काही पोलिस ठाण्यांमध्ये निरपराध लोकाना पकडून आणून कारणाशिवाय त्यांना कैदेत ठेवले जाई. पैशाच्या मदतीने पोलिस दल कामे करू लागला. याबाबतची माहिती वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होऊ लागली. त्यामुळे लॉर्ड मिंटोने पोलिस विभागाची जबाबदारी परत जमीनदारांकडे सोपविली होती. याकाळात कायमधारा पद्धतीचा उपयोग शेत महसूलासाठी बंगाल प्रांतात केला होता. याचा जमीनदारवर्गावर प्रतिकूल परिणाम झाला होता. या वर्गाकडे पोलिस विभागाची जबाबदारी आल्यानंतर त्यांनी पूर्वीपेक्षा अधिक भ्रष्टाचाराचा मार्ग स्वीकारून अधिक पैसा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिस विभाग म्हणजे भ्रष्टाचार असे समीकरण तयार झाले. जमीनदाराबाबतही वृत्तपत्रामध्ये बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या. म्हणून कंपनी सरकारने परत एकदा कॉर्नवालिस प्रमाणेच पोलिस व्यवस्था अमलात आणली. या व्यवस्थेत

असलेल्या त्रुटी नाहीशा करण्याचा प्रयत्न लॉर्ड मिंटोने केला. जमीनदारांकडून पोलिस खाते काढून घेतल्यामुळे हा वर्ग नाराज होण्याची शक्यता होती. शिवाय या वर्गाची बंगाल प्रांतात मोठी ताकद होती. म्हणून लॉर्ड मिंटोने कायमधारा पद्धतीत काही सवलती जमीनदारांना देण्यात आल्या. अशारीतीने लॉर्ड मिंटोने पोलिस खात्यास गतवैभव प्राप्त करून देण्यात यश मिळविले. पुढील काळात कंपनी सरकारने निर्माण केलेल्या प्रांतात पोलिस खात्याची उभारणी करण्यात आली.

**मुंबई–मद्रास प्रांतात १८१४ साली पोलिस दलाची स्थापना:** १८०२ च्या वसईच्या तहाने मराठी सत्ता अधिकच दुबळी झाली. त्यामुळे काही महत्वाचे मराठी सरदार पेशव्यावर नाराज झाले. दौलतराव शिंदेनी पुढाकार घेऊन होळकर, भोसले यासारख्या प्रबळ सरदारांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र या मराठी सरदारात ऐक्य निर्माण न झाल्याने दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. मराठी सत्ता अत्यंत कमकुवत झाली. आणि इंग्रजाचे मराठी राज्यावर प्राबल्य प्रस्थापित झाले. या सुमारास मद्रास प्रांताचा बराचसा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आला होता. या दोन्ही प्रांतात अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यासाठी १८१४ साली पोलीस विभागाची उभारणी केली. ही व्यवस्था लॉर्ड कॉर्नवालिसच्या योजनेप्रमाणेच राबविली होती.

मुंबई प्रांतात पोलिस दलाच्या उभारणीत मॉउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याचे योगदान महत्त्वाचे ठरले. त्याचप्रमाणे मद्रास प्रांतात थॉमस मुन्रोच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग अमलात आणला. मुन्रो आणि एल्फिन्स्टन याचे संबंध गुरू शिष्यासारखे होते. या दोन्ही प्रांतात स्वतंत्र असे पोलिस दल स्थापन झाल्याने जनतेचे चांगल्या प्रकारे संरक्षण झाले. चोरी व दरोडे यांचे प्रमाण बरेच कमी झाले. त्यामुळे जनतेला पूर्वीची शासनव्यवस्था आणि कंपनीची शासनव्यवस्था याच्यातील फरक दिसून आला. इंग्रजामुळे आपली प्रगती होईल अशा प्रकारचे अनुकूल आतावरण निर्माण झाले.

**सिंध प्रांतात १८४३ साली पोलिस दलाची स्थापना:–** सन १८०९ पासून कंपनीने सिंधवर आपले प्राबल्य प्रस्थापित करण्यास सुरुवात केली होती. लॉर्ड बेटिंकने सिंधच्या अमिरांशी व्यापारी करार केला होता. पुढे गव्हर्नर जनरल ऑकलंडने येथील अमिरांशी करार करून हैद्राबाद येथे आपला वकील ठेवला. सिंधचे अमिर इंग्रजांशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्याचा वरकरणी प्रयत्न करीत असत. म्हणून कंपनी सरकारने सिंध आपल्या राज्यात सामील करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चार्ल्स नेपियरच्या नेतृत्वाखाली १८४३ साली सिंध कंपनी राज्यात विलिन करण्यात आले. सिंघ विजयावर कडक टीका करण्यात आली. विशेष म्हणजे येथील अमिर कंपनीशी एकनिष्ठ असूनही त्याचे राज्य विलिन केले होते.

सिंध प्रांतात शांतता प्रस्थापित करणे कठीण होते. कारण येथील प्रदेशावर अनेक लहान मोठ्या टोळ्याचा प्रभाव होता. अशा वातावरणात कंपनीने चार्ल्स नेपियर यांची येथील गव्हर्नरपदी नेमणूक केली. त्याने या प्रदेशात अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यासाठी कार्यक्षम पोलिसदल स्थापन केले. पोलिस ठाण्याची उभारणी महत्त्वाच्या अशा ठिकाणी केली. पोलिसदलातील सेवकांना चांगल्या प्रकारे वेतन देण्यात आले. त्यांच्या कर्तबगारीची दखल घेऊन त्यांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सिंध

प्रांतातील पोलिस दलाची कार्यक्षमता वाढली. या प्रदेशात शांतता प्रस्थापित झाली. नेपियरने पोलिसदलाच्या मदतीने सिंध प्रांतात प्रस्थापित केलेली शांतता खरोखरच महत्त्वाची घटना ठरली. याची दखल कंपनीच्या संचालकांनी घेतली. एकंदरीत पोलिसदलाची कार्यक्षमता नेतृत्वावर अवलंबून होती. चार्ल्स नेपियरने पोलिस दलाच्या उभारणीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले होते. त्याचा चांगला परिणाम झाला. आणि संपूर्ण कंपनीच्या राज्यात सिंध येथील पोलिस विभाग आदर्श असा समजला जाऊ लागला. यानंतरच्या काळात कंपनीने जिंकलेल्या प्रदेशात सिंध प्रांताप्रमाणेच पोलिस यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे सिंध प्रांतात अंतर्गत शांतता प्रस्थापित करणे कठीण काम होते. परंतु नेपियरने आपल्या योजनेप्रमाणे पोलिस दलाची उभारणी करून सिंध प्रांतात अंतर्गत शांतता निर्माण केली.

**ग्रामीण भागातील पोलिस व्यवस्था:** कंपनी काळात भारतात खेड्यांची संख्या मोठी होती. नगरांची संख्या अत्यंत मर्यादित अशी होती. लॉर्ड कॉर्नवॉलिसने पोलिस ठाण्यांची उभारणी अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणीच केली होती. या पोलिस ठाण्याच्या कक्षेत त्या भागातील खेड्याचा समावेश झाला होता. परंतु त्या काळात दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने पोलिस दलास खेड्याशी सतत संपर्क ठेवणे शक्य होत नसे. एखादा मोठा गुन्हा घडल्यासच पोलिस त्या खेड्यांना भेटी देऊन गुन्ह्याबाबत तपास करीत असत. खेड्यामध्ये शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी येथील वतनदार मंडळीकडे असे. मुंबई प्रांतात अशी जबाबदारी पाटील यांच्याकडे असे. त्याच्या मदतीस खेड्यातील काही बलुतेदार मंडळी असत. त्यांच्याकडे गावांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली जाई. गावातील लहान प्रमाणातील खटल्याची चौकशी करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असे. गावातील वतनदार सहकार्याचे धोरण स्वीकारीत असत. त्यामुळे गावामध्ये संघर्षाच्या घटना मर्यादित प्रमाणात घडून येत असत. त्याचा अनुकूल परिणाम पोलिसदलावर होत असे. त्यांना महत्त्वाच्या गुन्ह्यांकडे लक्ष देणे शक्य होत असे. खेड्यामध्ये संरक्षणाची यंत्रणा परंपरेने आली होती. त्यामुळे या परंपरेच्या विरोधात वर्तन करण्यास खेड्यातील लोक तयार नव्हते.

हळूहळू चोऱ्या, दरोडे, मारामाऱ्या, खून असे गुन्हे पोलीसांनी नियंत्रणाखाली आणले. मध्य भारतात, रस्त्यांवर वाटसरूंना लुटालूट करून मारणारे ठग हे व्यापाऱ्यांना व प्रवाशांना कर्दनकाळच वाटत. त्यांचाही बंदोबस्त कठोरपणे पोलिसांद्वारा करण्यात आला. परकीय सत्तेविरुद्ध भारतीय जनतेकडून होणारा विरोध, त्या सत्तेविरुद्ध करीत असलेली कटकारस्थाने हाणून पाडण्याकरिताही पोलीस कार उपयोगी पडत. जनतेप्रती पोलीसांची भूमिका अगदी सहानुभूतीशून्य असे. चोर लुटारूचा बऱ्याच अंशी बंदोबस्त झाला असला तरी, ज्यांनी लोकांचे समाजकंटकांपासून रक्षण करायचे त्या पोलीसांकडून जनतेवर अत्याचार होणे ही गोष्ट नित्याची झाली.

❖ **स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. लॉर्ड कॉर्नवॉलिसने पोलीस दलात कोणत्या महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली?

२. सिंध प्रांतात प्रथम कोणी पोलीस व्यवस्था निर्माण केली?

३. सुप्रीम कोर्टाची स्थापना कोणत्या कायद्याने झाली?

४. कायद्याचे संहितीकरण करण्यात कोणी प्रथम पुढाकार घेतला?

५. फौजदारी न्यायदानासाठी सर्वश्रेष्ठ न्यायालय कोणते होते?

ब) रिकाम्या जागा भरा.

१. ..............चार्टर ॲक्टने सेनापतीस गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणीचे सदस्य केले.

अ) १७९३ ब) १८१३ क) १८३३ ड) १८५३

२. इ.स. १८०६ मध्ये सैनिकांनी .............. ठिकाणी उठाव केला.

अ) पुणे ब) दिल्ली क) वेलोर ड) बराकपूर

३. ...............गव्हर्नर जनरलने पंजाब येथे शिखांसाठी स्वतंत्र सैन्य उभा केले.

अ) जॉन शोअर ब) लॉर्ड हेस्टिंग्ज क) लॉर्ड बेटिंक ड) लॉर्ड डलहौसी

४. गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवॉलिसने ................ प्रांतिक न्यायालयांची स्थापना केली.

अ) ०३ ब) ०४ क) ०५ ड) ०६

५. इ.स. १८३३ च्या कायदे समितीचा अध्यक्ष ................. हा होता.

अ) विल्यम जोन्स ब) कोलब्रुक क)मेकॉले ड) चार्ल्स नेपियर

## ३.३ सारांश:

प्राचीन काळापासून भारतामध्ये कृषीप्रधान व्यवस्था प्रचलित होती. ऋग्वेदामध्ये राजाला बली नावाचा महसूल मिळत असल्याचा उल्लेख आहे. जमिनीची मालकी राजाची की शेतकऱ्याची हा प्रश्न जरी बाजूला तरी राजाला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात कर देणे शेतकऱ्यांवर बंधनकारक मानले जात होते. सुलतानशाही आणि मुघल राजवटीत जमीन महसूलाचे प्रमाण कमी जास्त आढळते पण सर्वसाधारणपणे ते अन्यायकारकच होते.

इंग्रजी राजवटीच्या सुरवातीच्या काळात दुहेरी राज्यव्यवस्था बंगाल प्रांतात अस्तित्वात आली. त्याचे दुष्परिणामच अधिक दिसून आले कारण या व्यवस्थेमध्ये अधिकार आणि जबाबदारी यांची फारकत करण्यात आली होती. यातून मार्ग काढण्यासाठी वॉरन हेस्टिंग्जने लिलाव पद्धती आणली. तिच्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडल्याने लॉर्ड कॉर्नवॉलिस याने कायमधारा पद्धतीचा स्वीकार केला. उत्तर प्रदेशात होल्ट मॅकेन्झी याने महालवारी पद्धतीचा अवलंब केला. जरी या विविध पद्धती वापरात आणल्या असल्या तरी एकंदरीत शेतकऱ्यांची पिळवणूक होऊ लागली. दारिद्र्यात वाढ झाली आणि यातूनच शेतकरी वर्गाने अनेक लहान मोठे उठाव घडवून आणले.

आधुनिक काळात शेतीचे व्यापारीकरण होण्याची प्रक्रिया गतीमान झाली. ब्रिटिशांनी मायदेशामधील कारखान्यांना आवश्यक कच्चा माल मिळवण्यासाठी अशी नगदी पिके पिकवण्याकडे शेतकऱ्यांचा कल झुकला. बलुतेदारीचा प्रश्न, दळणवळणाच्या क्षेत्रामधील सुधारणा इ. मुळे हा बदल प्रामुख्याने दिसून आला. परंतु याचे दुष्परिणाम पण प्रकर्षाने जाणवून आले. अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला, शेतकऱ्यांचे उत्पादन घेण्याचे स्वातंत्र्य संकुचित होत गेले. अगदी पिके वगळता इतर पिकांकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होऊ लागले. दुष्काळ, दारिद्र्य यांच्यामुळे भारतीय शेतकरी आणि कृषी व्यवस्था करमुक्त होत गेली. भूमिहीन शेतकऱ्यांच्या प्रश्नाने डोके वर काढले.

ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर आपली सत्ता मजबूत करण्याकडे अधिक लक्ष दिले. प्रशासनात महत्त्वाचे बदल केले. विशेषतः कंपनी आर्थिक अडचणीत सापडल्यानंतर रेग्युलेटिंग ॲक्टसारखे कायदे ब्रिटिश सरकारने संमत केले. त्यानुसार कंपनीवर बंधने घातली. काही गव्हर्नर जनरल यांना भारतावर इंग्रजांची निरंकुश सत्ता असावी असे वाटत होते, तर काहींना उदारमतवादी मार्गाने वाटचाल करावी असे वाटत होते. १८३३ नंतर प्रशासन व्यवस्थेत काही महत्त्वाचे बदल झाले. भारतीयांना प्रशासनात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न झाला. डलहौसीच्या आक्रमक धोरणामुळे १८५७ चा उठाव घडून आला आणि कंपनीची सत्ता नाहीशी झाली. त्याचबरोबर ब्रिटिश संसदेची सत्ता भारतावर प्रस्थापित झाली.

ब्रिटिशांनी भारतासारख्या विशाल देशाचा कारभार पहाण्यासाठी कार्यक्षम अशी यंत्रणा उभारली होती. अशा प्रकारची यंत्रणा यापूर्वीच्या क्वचितच सत्ताधिशांनी स्वीकारली होती. भारतातील जनतेच्या रक्षणासाठी पोलिस दल निर्माण केले होते. यामध्ये लॉर्ड कॉर्नवालिसचे कार्य महत्त्वाचे ठरले. तसेच इंग्रजांनी लष्करी व्यवस्थेत बदल करून त्याच्या मदतीने भारताचे संरक्षण केले. शिवाय या लष्कराच्या मदतीने शेजारच्या देशांचा प्रदेश काबीज केला. ब्रिटिशांनी कायद्याचे राज्य निर्माण करण्यात यश मिळविले. कायद्याद्वारे समानता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. मात्र या न्यायव्यवस्थेत काही महत्वाचे दोष होते.

ब्रिटिशांना आपला वंश श्रेष्ठ आहे अशा प्रकारचा गर्व होता. त्यामुळे भारतीयांना दुय्यम लेखण्याचा त्यांनी प्रयत्न केला, मात्र १८३० नंतर त्यांच्या धोरणात थोडा बदल झाला. परंतु फोडा व राज्य करा या धोरणाचा त्यांनी अखेरपर्यंत पाठपुरावा केला.

## ३.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❖ स्वयं–अध्ययन प्रश्न –१

अ) १. अलाहाबादचा तह   २.बंगाल,बिहार, ओरिसा
३. महालवारी पध्दत   ४. थॉमस मन्रो   ५. मुंबई

ब) १. अकबर   २. प्लासीची लढाई   ३. लॉर्ड क्लाईव्ह
४. लिलाव   ५. विगनेट

❖ स्वयं-अध्ययन प्रश्न -२

अ) १. ०५  २. ०६  ३. मद्रास व मुंबई  ४. १८३३  ५.१८५३

ब) १. ०३  २. १८१३ चा चार्टर ॲक्ट  ३. गुलामगिरीस विरोध

४. १८  ५. १२

❖ स्वयं-अध्ययन प्रश्न -३

अ) १. पोलीस अधीक्षक २. चार्ल्स नेपियर  ३. पिटस इंडिया ॲक्ट

४. लॉर्ड कॉर्नवॉलिस  ५. सत्र निजामत

ब) १. १७९३  २. वेलोर  ३. लॉर्ड बेटिंक  ४. ०६  ५. मेकॉले

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय:

अ) टिपा लिहा.

१. कायमधारा पद्धती

२. रयतवारी पद्धती

३. महालवारी पद्धती

४. लॉर्ड कॉर्नवॉलिसची कायादेसंहिता

५. १८३३ चा चार्टर ॲक्ट

६. लष्करी सुधारणा

ब) दीर्घोत्तरी प्रश्न:

१. कंपनी सरकारच्या न्यायदान व्यवस्थेचे परीक्षण करा.

२. कंपनी सरकारच्या पोलीस व्यवस्थेचा आढावा घ्या.

३. ब्रिटीशांचे जमीन महसूलविषयक धोरण स्पष्ट करा.

४. कंपनी सरकारच्या काळातील प्रशासकीय यंत्रणेच्या पुर्नरचनेचा आढावा घ्या.

## ३.६ संदर्भ ग्रंथ:

१. Bipinchandra, Modern India, National Council of Educational Research and Training, New Dehli, 1960

२. ग्रोवर बी.एल., बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी, लि. नवी दिल्ली, २०१०

३. सातभाई श्रीनिवास, आधुनिक भारताचा इतिहास (इ.स. १७५७ ते १९७७), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१६.

४. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१७.

५. पाटील अवनीश, रणजीत गुहा : भारतीय इतिहासलेखनाला कलाटणी देणारे अभ्यासक, समाज प्रबोधन पत्रिका अंक, एप्रिल-मे-जून २०२३.

❑❑❑

## घटक ४
# वसाहतीची विचारधारा आणि वसाहती राजवट

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१. प्राच्यविद्यावाद (Orientalism)

 ४.२.२. ख्रिस्ती धर्मप्रसारवाद / शुभवर्तमानवाद (Evangelicalism)

 ४.२.३. उपयुक्ततावाद (Utilitarianism)

 ४.२.४. भारतीय सभ्यता सुधारण्याचे विचार: श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे आणि दैवी देणगी (White Man's burden and Divine Providence)

४.३ पारिभाषिक शब्द/ शब्दार्थ

४.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- प्राच्यविद्यावादी विचारप्रणाली समजेल
- ख्रिस्ती धर्मप्रसारवादाच्या संकल्पनेबद्दल माहिती मिळेल
- उपयुक्ततावादाचे तत्त्वज्ञान कळेल
- श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे आणि दैवी देणगी ह्या संकल्पना स्पष्ट होतील

## ४.१ प्रास्ताविक

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये सत्ता स्थापन केली. प्लासीच्या (१७५७) आणि बक्सारच्या लढाईत (१७६४) विजय मिळवून कंपनीने बंगालमध्ये आपल्या राजकीय सत्तेची मुहूर्तमेढ

केली. इ.स. १६०० मध्ये जेव्हा ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली होती तेव्हा इंग्लंडच्या राजाने या कंपनीला भारताबरोबर व्यापार करण्याचे मक्तेदारी हक्क दिले होते. कंपनी भारतामध्ये व्यापार करण्याच्या इराद्याने आली होती. मात्र कालांतराने कंपनीने राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. बंगालमध्ये राजकीय सत्ता मिळवण्यासाठी कंपनीला देशी सत्तांशी लष्करी संघर्ष करावा लागला. प्रदेश विस्तार करण्यासाठी कंपनीने लढलेली युद्धे अत्यंत खर्चिक होती. परिणामी कंपनी आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आली. ईस्ट इंडिया कंपनीचे अस्तित्व टिकवण्यासाठी ब्रिटिश संसदेने पुढाकार घेतला. कंपनीला इंग्लंड सरकारने कर्ज दिले आणि आपले नियंत्रण प्रस्तापित करण्यासाठी संसदेने १७८४ चा पिट्सचा भारत कायदा (Pitts India Act) संमत करून भारतामधील कंपनी प्रदेशावर प्रशासन करण्यासाठी एक चौकट निर्माण केली. मात्र ही प्रशासकीय चौकट जुजबी स्वरूपाची होती. प्रशासनाचा ढाचा अत्यंत कमकुवत होता. प्रशासन चांगले चालण्याच्या दृष्टीने फक्त व्यावहारिक बदल करण्यात आले होते. भारतामध्ये स्थापन होणारे ब्रिटिश राज्य हे कोणत्या तत्त्वावर आधारले जाणार आहे, याचा कोणताही उल्लेख देखील केला गेला नव्हता.

भारतामध्ये कोणत्या प्रकारचे साम्राज्य उभा करायचे? ते तात्पुरत्या स्वरूपाचे असावे की कायम स्वरूपाचे असावे? साम्राज्याचे हेतू आणि जबाबदाऱ्या कोणत्या असाव्या? नवीन साम्राज्य कसे चालवायचे? अशा प्रकारचे मूलगामी प्रश्न सुरवातीच्या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांना भेडसावत होते. ही परिस्थिती साधारणपणे १८२० च्या दशकापर्यंत अशीच राहिली. या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावरच ब्रिटिश साम्राज्याचा पाया पक्का होणार होता. १८२८ साली लॉर्ड बेंटिक भारताचे गव्हर्नर जनरल झाले. त्यांच्या कारकिर्दीत या प्रश्नांची उत्तरे ब्रिटिशांना मिळालेली दिसतात. थोडक्यात १७७२ ते १८२८ हा काळ ब्रिटिश राजवट स्थापन होण्याचा सुरुवातीचा काळ होता. या काळात पुढे निर्माण होणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचे स्वरूप ठरवण्यासाठी विविध विचारसरणीचे लोक प्रयत्न करीत होते.

इ.स १७७२ ते १८२८ या काळात ब्रिटिश साम्राज्याच्या स्वरूपावर आणि विविध प्रश्नांवर अनेक अधिकारी आणि विचारवंतांनी चर्चा केली. आपले विचार स्वीकारले गेले तर त्यांचा उपयोग साम्राज्याचा पाया भक्कम करण्यात होईल, याची त्यांना कल्पना होती. ब्रिटिश साम्राज्याची तत्त्वे ठरवण्यासाठी तीन विचारसरणींनी दावा केला- प्राच्यविद्यावादी, ख्रिस्ती धर्मप्रसारवादी आणि उपयुक्ततावादी. या तिन्ही विचारसरणीच्या लोकांनी ब्रिटिश साम्राज्याचा पाया कोणत्या तत्वांवर घातला जाईल हे ठरवण्याचा प्रयत्न केला. आपले विचार ब्रिटिश साम्राज्याचा पाया ज्या मूळ तत्त्वांवर आधारलेला आहे त्यांच्यामध्ये सामील केले जातील, अशी त्यांना आशा होती.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ प्राच्यविद्यावाद (Orientalism)

ब्रिटिश लोकांमधील प्राच्यविद्यावादी विचारसरणी ही भारतात अस्तित्वात आलेली एक अद्वितीय गोष्ट होती. ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल मध्ये राजकीय सत्ता स्थापन केल्यावर त्यांना भारतीय भाषा अवगत असणारे प्रशासकीय अधिकारी तयार करणे आवश्यक होते. कार्यक्षम प्रशासन करण्यासाठी या अधिकाऱ्यांना

भारतीय भाषा, संस्कृती आणि इतिहासाची निदान तोंड ओळख असणे देखील अपेक्षित होते. या ईस्ट इंडिया कंपनीच्या गरजेतून प्राच्यविद्यावादी विचारसरणी निर्माण झाली. इ.स १७७२ ते १७८५ या कालावधीत गव्हर्नर जनरल असलेले वॉरेन हेस्टिंग्स यांनी पहिल्यांदा प्राच्यविद्यावादी धोरण अवलंबले. या विचारसरणीचा स्वीकार हेस्टिंग्स यांनी उपयुक्ततेच्या आणि सावधगिरीच्या भूमिकेतून केला होता. त्यांना कल्पना होती की, भारतासारख्या देशामध्ये कार्यक्षम प्रशासन हे 'भारतीय समाज आणि संस्कृतीला' समजून घेतल्यावरच करता येईल. ब्रिटिश अधिकारी आणि व्यापारी हे भारतीय भाषा आणि परंपरा यांना महत्त्व देणार नाही व त्यांच्याकडे दुर्लक्ष करतील, असे त्यांना वाटत होते. ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय प्रजा यांच्या मधील दरी मोठी होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांना प्रजेची संस्कृती माहित नव्हती आणि प्रजेला राज्यकर्त्यांची संस्कृती माहित नव्हती. एकमेकांशी नियमित संबंध येत असले तरी हे दोन घटक एकमेकांना ओळखत नव्हते. त्यांचा एकमेकांशी परिचय नव्हता. याचा परिणाम असा झाला होता की, भारतीय प्रजेला इंग्रजी राज्यकर्त्यांबाबत कोणत्याही प्रकारची सहानुभूती किंवा आपुलकी वाटत नव्हती. वॉरेन हेस्टिंग्सला ही गोष्ट जाणवत होती. याचे एक कारण म्हणजे हेस्टिंग्जचे स्वतःचे प्रशासन हे भारतीय परंपरा आणि रीतिरिवाज यांच्याकडे सहिष्णुतेने पहाणारे होते. भारतीय लोकांची संस्कृती, समाज आणि इतिहास यांचा अभ्यास करून व समजून घेतल्या शिवाय त्यांना योग्य प्रशासन देता येणार नाही. हेस्टिंग्जला माहित होते, हे हेस्टिंग्जला माहित होते.

भारतीय लोकांच्या परंपरा, समाज, भाषा आणि इतिहास समजून घ्यायचा असेल तर सुरुवातीला त्यांचा अभ्यास करणे आवश्यक होते. आणि म्हणूनच हेस्टिंग्जच्या विचारांनी त्याला प्राचीन भारतीय विद्यांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रेरित केले. यासाठी त्यांचा व्यवहारी आणि अभ्यासू दृष्टीकोन कारणीभूत होता. 'भारतामध्ये भाषा आणि शास्त्रांना प्रोत्साहान दिल्यामुळे मानवतेचा प्रचंड फायदा होईल, अशी हेस्टिंग्जची भूमिका होती. याशिवाय हे ज्ञान ब्रिटिश राजवटीला देखील फायदेशीर होईल कारण त्यामुळे त्यांना एतद्देशीय लोकांच्या अधीनतेचे दुःख कमी करता येईल. आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये एतद्देशीय लोकांच्या प्रति उपकरबुद्धी देखील निर्माण होईल. या भावनेतून हेस्टिंग्जने इ.स १७८१ मध्ये कलकत्ता मदरसा स्थापना केली. कंपनीच्या मुस्लिम अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी स्थापन केलेली ही शाळा होती. या शाळेमध्ये शिक्षण फारसी भाषेतून दिले जात असे. फारसी भाषा ही ब्रिटिश व पूर्वीच्या मुघल सरकारची दरबारी भाषा होती.

इ.स. १७८४ मध्ये हेस्टिंग्ज यांच्या पुढाकाराने बंगाल मध्ये कलकत्त्याला एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलची स्थापना झाली. प्रसिद्ध प्राच्यविद्या पंडित विलियम जोन्स हे ह्या संस्थेचे अध्यक्ष होते. या संस्थाने जवळ जवळ ५० वर्षे उत्कृष्ट कार्य केले. अनेक भारतीय ग्रंथांची इंग्रजीमध्ये भाषांतरे केली. 'एशियाटिक रिसर्चेस' नावाचे एक प्रभावशाली नियतकालिक संस्थेच्या माध्यमातून प्रसिद्ध होत असे. एशियाटिक सोसायटीच्या छत्रछायेखाली प्राच्यविद्यावादी अभ्यासकांनी भारतीय संस्कृती, भाषा, समाज आणि इतिहास अभ्यासण्यासाठी झोकून दिले. विलियम जोन्स, हेन्री कोलब्रुक, नाथ्यानियल हलहेड आणि चार्ल्स विल्किन्स यांच्या सारखे ख्यातकिर्त भारतीय संस्कृतीचे अभ्यासक एशियाटिक सोसायटीने पाठिंबा पुरवल्यामुळे प्रचंड प्रतिष्ठा मिळवू शकले. त्यांच्या अभ्यासाचे हेतू महत्वाकांक्षी होते. एका बाजूला त्यांना पाश्चिमात्य जगताला

पूर्वेकडील देशांच्या प्रचंड साहित्यिक आणि वैचारिक उपलब्धींची ओळख करून द्यायची होती तर दुसऱ्या बाजूला त्यांना एतद्देशीय लोकांना त्यांच्याच सांस्कृतिक वारशाचा पुन्हा परिचय करून द्यायचा होता. या प्राच्यविद्यावादी अभ्यासकांवर बुद्धिप्रामाण्यवाद आणि सार्वत्रिकता या मूल्यांचा प्रभाव होता. ते भारतामध्ये सेवा करणाऱ्या इतर ब्रिटिश अधिकारांपासून वेगळे होते. प्राच्यविद्यावादी अभ्यासकांना प्राचीन भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांमध्ये रुची होती. त्यांनी आपल्या लिखाणातून या परंपरांची भरभरून प्रशंसा व सन्मान केलेला दिसतो. भारतीय संस्कृतीच्या अभ्यासात आवड असल्यामुळे या विद्वानांनी भारतीय भाषाशास्त्र, पुरातत्वशास्त्र आणि इतिहासाच्या अभ्यासात योगदान दिले.

हेस्टिंग्जने राबवलेल्या प्राच्यविद्यावादी धोरणामागे एक विशिष्ट भूमिका होती– ब्रिटिश प्रशासक आणि मुलकी सेवेतील अधिकाऱ्यांना प्रजेच्या संस्कृती आणि जीवनात सामावून जाण्याचे प्रशिक्षण देणे. इ.स. १८०० मध्ये लॉर्ड वेलेस्लीने कलकत्ता येथे कॉलेज ऑफ फोर्ट विलियम ही संस्था स्थापन केली. या कॉलेजमध्ये भारताच्या दुर्गम प्रदेशामध्ये नेमणूक झालेल्या मुलकी सेवेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात असे. कार्यक्षम भारतीय प्रशासन देण्यासाठी भारतीय संस्कृतीची समज असणे आवश्यक असते, हा विचार कॉलेज स्थापन करण्यामागे होता. वॉरेन हेस्टिंग्जच्या मते, ''प्रभावशाली राजवट निर्माण करण्यासाठी भारतावर प्रेम करणे आवश्यक होते; भारतावर प्रेम करण्यासाठी लोकांबरोबर संपर्क करणे जरुरीचे होते, लोकांबरोबर संपर्क करण्यासाठी भारतातील भाषा शिकणे आवश्यक होते''. फोर्ट विलियम कॉलेजच्या आश्रयाखाली भारतीय साहित्य आणि भाषांवर संशोधन करण्यासाठी सविस्तर व महागडे प्रकल्प हाती घेण्यात आले. शिक्षक वर्गाला खास प्रशिक्षण दिले गेले. त्यांना देशी भाषा शिकवण्याची सोय केली गेली. एक उत्तम ग्रंथालय स्थापन करण्यात आले. याशिवाय बंगाली, मराठी, उर्दू , हिंदी, पर्शियन आणि संस्कृत भाषेतून ग्रंथ प्रकाशित केले गेले. कॉलेजने युरोपियन अभ्यासकांबरोबर मोठ्या प्रमाणात फारसी आणि संस्कृत अभ्यासकांच्या नेमणूका केल्या. शंभरहून अधिक संस्कृत ग्रंथ भाषांतरित करून कॉलेजने प्रकाशित केले. एकंदरीतच, फोर्ट विलियम कॉलेजच्या माध्यमातून ब्रिटिशांनी पुढील अडीच-तीन दशके प्राच्यविद्यावादी धोरण राबविलेले दिसते.

१९२० च्या दशकापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचे सामाजिक धोरण प्राच्यविद्यावादी विचारसरणीच्या प्रभावाखाली होते. प्राच्यविद्यावादी अधिकाऱ्यांचा विश्वास होता की, कंपनी सरकारचे स्वरूप 'सौम्य' असले पाहिजे. सरकारने लोकांच्या जीवनात कमीत कमी हस्तक्षेप केला पाहिजे. थोडक्यात, सरकारने आपले कार्य व्यापारी उपक्रम व महसूल गोळा कारण्यापर्यंतच सीमित ठेवले पाहिजे. प्राच्यविद्यावादी विचारसरणीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भारतीय धर्म, कायदे, संस्था आणि रितीरिवाजांच्या संदर्भात 'हस्तक्षेप न करण्याचे' (Policy of non-interference) धोरण स्वीकारले होते. त्यांनी हिंदू आणि मुस्लिम समाजातील परंपरा व रीतिरिवाज जतन करून ठेवण्याचा पुरस्कार केला. खूप बदल न करता भारतावर अंमल करण्याची भूमिका प्राच्यविद्यावादी विचारसरणीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी स्वीकारली होती. थोडक्यात, त्यांना भारतावर अंमल करायचा होता, मात्र सुधारणा करायच्या नव्हत्या.

**स्वयं अध्ययन प्रश्नः-१**

अ) योग्य पर्याय निवडा

१) वॉरेन हेस्टिंग्स हा .............. या कालावधीत ब्रिटिश गव्हर्नर जनरल होता

अ) १७७० ते १७७५ ब) १७७२ ते १७८५

क) १७७१ ते १७८१ ड) १७७२ ते १७७७

२) १७८१ साली कलकत्ता येथे मदरसा ................ याने स्थापन केला होता.

अ) वेलस्ली ब) हेस्टिंग्स क) जोन्स ड) रॉबर्टसन

३) कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना .......... साली झाली

अ) १७७२ ब) १७८४ क) १७९१ ड) १८०३

४) एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल पहिले अध्यक्ष ............. होते.

अ) विलियम जोन्स ब) हेन्री कोलब्रुक

क) नाथ्यानियल हलहेड ड) चार्ल्स विल्किन्स

५) भारतीय लोकांच्या संस्था आणि रितीरिवाजांच्या संदर्भात 'हस्तक्षेप न करण्याचे' (policy of non-interference) धोरण .............. यांनी अवलंबले होते.

अ) प्राच्यविद्यावादी ब) ख्रिस्ती धर्मप्रसारवादी

क)उपयुक्ततावाद ड) सुधारणावादी

## ४.२.२ **ख्रिस्ती धर्मप्रसारवाद/ शुभवर्तमानवादी** (Evangelicalism)

हेस्टिंग्जने राबवलेल्या प्राच्यविद्यावादी धोरणाला काहीच वर्षांमध्ये विरोध होऊ लागला. १७९० च्या दशकामध्ये भारतीय कायदा, भाषा, धर्म आणि रीतिरिवाज यांचा अभ्यास करणे व त्यांना जतन करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या भूमिकेला आव्हान निर्माण झाले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकारी मंडळावर प्रभाव असलेले चार्ल्स ग्रॅन्ट यांच्या कडून या आव्हानाला सुरूवात झाली. १७९६ साली ग्रॅन्ट यांनी "Observations on the State of Society among Asiatic subjects of Great Britain, particularly with respect to Morals; and on the means of Improving it" असे शीर्षक असलेला निबंध लिहिला. हा निबंध ईस्ट इंडिया कंपनीच्या धोरणावर टिपणी करणारा होता. या निबंधामध्ये ग्रॅन्ट यांनी भारतीय लोकांचे आणि भारतीय संस्कृतीचे अँग्लिकरण आणि ख्रिस्ती धर्मामध्ये धर्मांतर करण्याचा पुरस्कार केला. प्राच्यविद्यावाद अधिकाऱ्यांच्या प्रभावाखाली ईस्ट इंडिया कंपनीने अवलंबल्या 'हस्तक्षेप न करण्याच्या' धोरणाला त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी हिंदू धर्म, भारतीय सभ्यता आणि अंमलात

असलेल्या प्राच्यविद्यावादी धोरणावर हल्ला चढवला. ग्रॅन्टने आपल्या निबंधात खालील तीन वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वे मांडली. १. व्यक्तिवाद व वैयक्तिक विकास साधणे. २. मानवी व्यक्तिमत्त्व संपूर्णपणे बदलता येते; व ३. अशा बदलांसाठी शिक्षण प्रसार गरजेचा आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसारवादाचा विचार असलेल्या मंडळींनी ब्रिटिश राजवटीचा वापर भारतामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी करणे आवश्यक मानले. योग्य प्रकारे भारतीय लोकांची सुधारणा घडवून आणणे हेच ब्रिटिश राजवटीच्या समर्थनार्थ होते, असे ख्रिस्ती धर्मप्रसारवादी लोकांचे म्हणणे होते.

ख्रिस्ती धर्मप्रसारवादी लोकांसाठी सर्व गोष्टी होण्यामागे परमेश्वराची इच्छा कार्यरत होती. त्यांच्या मते भारताला परमेश्वराने इंग्रजांच्या ताब्यात काही कारणासाठी दिले होते. इंग्रजांना सत्ता मिळाली होती ती म्हणजे भारतातील लोकांमध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी होय. ख्रिस्ती धर्मप्रसारवादी लोकांच्या मते भारतातील लोकांची परिस्थिती अत्यंत बिकट होती कारण ते खोट्या देवदेवतांची आणि कोरलेल्या मूर्ती यांची पूजा अर्चा करीत होते. ग्रॅन्टने असे मत मांडले की, भारतामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे हे ब्रिटिश सत्तेचे कर्तव्य होते. असे केल्यास ब्रिटिश साम्राज्याच्या हितसंबंधांचा देखील सांभाळ होणार होता. त्याने लिहिलेल्या निबंधाच्या एक प्रमुख भागामध्ये त्यांनी भारतीय समाज कसा ऱ्हासाकडे झुकला होता, हे दाखवण्याचा प्रयत्न केला होता. ग्रॅन्टने नुसती भारतीय धर्मांवर टीका केली नाही, तर त्याने भारतीय कायदे, कला, शेती, हस्तकलाउद्योग, लोकांच्या वैयक्तिक शिष्टाचार आणि सवयी यांच्या देखील निषेध केला.

ख्रिस्ती धर्मप्रसारवाद विचारसरणीचे लोक यांच्यामध्ये ख्रिस्ती धर्माचा आधार घेऊन भारतीय लोकांची निकृष्ट नैतिकता आणि रितीरिवाजांना सुधारण्याची तीव्र इच्छा होती. त्यांना विश्वास होता की, भारतीय लोकांचे खालच्या दर्जाचे चारित्र्य हे त्यांना शिक्षण देऊन सुधारता येईल. ग्रॅन्टच्या मते ब्रिटिशांनी सुरुवातीला हिंदूंना इंग्रजी भाषा शिकवली पाहिजे. नंतर हळू हळू भारतीयांना पाश्चिमात्य साहित्याशी ओळख करून देता येईल. पाश्चिमात्य विचारांमधील छोटे छोटे घटक भारतातील उपयुक्त कला, तत्त्वज्ञान आणि धर्म यांच्या मध्ये सामील केले पाहिजेत. ग्रॅन्टला विश्वास होता की यामुळे भारतीय धर्माची चौकट ढासळेल. यानंतर इंग्रजी भाषेच्या माध्यमातून त्यांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश दिला जाईल. या कारणासाठी ग्रॅन्टने ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या शिक्षण प्रणालीमध्ये ख्रिस्ती धर्माचे प्रशिक्षण देण्याचा पुरस्कार केला होता.

ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या ब्रिटिश लोकांनी ''एकीकरणाचा सिद्धांताचा'' (principle of assimilation) पुरस्कार केला. त्यांच्या मते, भारतातील ब्रिटिश सरकारने अवलंबलेल्या धोरणाचे हे प्रमुख तत्व होणे आवश्यक होते. त्यांच्यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते यांच्या प्रजेपासून भाषा, राहणीमान, रीतिरिवाज, भावना आणि धर्म या सर्व गोष्टींबाबत वेगळे होते. यामुळे भारतीय लोकांमध्ये अशी भावना निर्माण झाली होती की त्यांचे हितसंबंध ब्रिटिश लोकांच्या हितसंबंधांच्या विरुद्ध होते. 'एकीकरणाचा सिद्धांत' स्वीकारला तर ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय प्रजेतील ही दरी कमी होण्याची शक्यता होती. जर भारताचे अँग्लिकरण झाले तर भारतीय लोक आणि ब्रिटिश लोक यांचे हितसंबंध एक होतील असे ख्रिस्ती धर्मप्रसारवादी लोकांचे म्हणणे होते.

१८१३ साली ब्रिटिश संसदेत ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी कराराच्या नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या गोष्टीचा फायदा घेऊन ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या नेत्यांनी इंग्लंड मध्ये आपले विचार अमलात आणण्यासाठी एक लोकचळवळ सुरू केली. आपल्या दबावाचा उपयोग करून त्यांना काही गोष्टी मिळवण्यामध्ये यश आले. भारतामध्ये ख्रिस्ती चर्चची स्थापना करण्यात आली. ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात धर्म प्रसार करण्याला परवानगी देण्यात आली. याशिवाय भारतातील लोकांच्या शिक्षणासाठी कंपनीने एक ठराविक वार्षिक रक्कम खर्च करण्यास मंजुरी दिली. ब्रिटिश संसदेत झालेल्या चर्चेमध्ये जॉन विल्बरफोर्स यांनी पुढाकार घेतला होता. जॉन विल्बरफोर्स हा इंग्लंडमधील प्रसिद्ध कल्यापहॅम (Chapham) गटाचा नेता होता. त्याने आपला युक्तिवाद करण्यासाठी ग्रॅन्टच्या निबंधाचा वापर केला होता. चर्चेच्या वेळेस विल्बरफोर्सने 'एकीकरणाचा सिद्धांत' खालील शब्दामध्ये मांडला होता:

''आपली तत्वे, मते, कायदे, संस्था आणि आपल्या धर्माची आणि आपल्या नैतिकतेची हळुवार भारतीयांना ओळख करून आपण आपली मुळे भारताच्या मातीत गाडण्याची प्रयत्न करू. युरोपियन कायदे आणि संस्था हे आशियाई कायदे व संस्थांपेक्षा अनेक पटीने श्रेष्ठ आहेत. ख्रिस्ती धर्म भारतात रुजवल्यावर भारतीय लोकांना फायदा म्हणून कायदा व सुव्यवस्था आणि संरक्षण मिळणार होते, ते आपल्याला आशीर्वादच देणार आहेत''.

एकंदरीतच, ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या ब्रिटिश नेत्यांना भारतामध्ये 'ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून धर्माच्या आधारे सुधारणा' घडवून आणायची होती.

**स्वयं अध्ययन प्रश्न:-२**

अ) योग्य पर्याय निवडा

१) चार्ल्स ग्रॅन्टने ………… चा पुरस्कार केला

अ) यहुदी धर्माचा ब) ख्रिस्ती धर्माचा क) हिंदू धर्माचा ड) जैन धर्माचा

२) 'एकीकरणाचा सिद्धांताचा'' पुरस्कार ………….. यांनी केला.

अ) प्राच्यविद्यावादी ब) ख्रिस्ती धर्मप्रसारवादी

क)उपयुक्ततावाद ड) सुधारणावादी

३) भारतामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे हे ब्रिटिश सत्तेचे कर्तव्य होते, असे मत कोणी मांडले होते.

अ) वेल्सली ब) हेस्टिंग्स क) चार्ल्स ग्रॅन्ट ड) जॉन विल्बरफोर्स

४) ख्रिस्ती मिशनरी यांना भारतात धर्म प्रसार करण्याची परवानगी ……………. साली मिळाली

अ) १७९१ ब) १८१३ क) १८३३ ड) १८३५

५) कल्यापहॅम (Chapham) गटाची स्थापना ............... देशात झाली होती.

अ) इंग्लंड ब) भारत क) अमेरिका ड) फ्रान्स

### ४.२.३ उपयुक्ततावाद (Utilitarianism)

इंग्लंडमधील विचारवंत जेरेमी बेन्थमने उपयुक्ततावादाची सूत्रबद्ध मांडणी केल्याने त्याला 'उपयुक्ततावादाचा जनक' असे संबोधले जाते. बेन्थमपूर्व काळातील हॉब्ज, लॉक, डेविड ह्यूम यांच्या लिखाणात उपयुक्ततावादाची बीजे आढळतात. उपयुक्ततावादाची दोन अतिशय महत्वाची मूलतत्त्वे खालील प्रमाणे होती:

१) आनंद वाढविणारी आणि वेदना कमी करणारी कोणतीही गोष्ट 'उपयुक्त' असते. राज्यसंस्थेच्या कृत्यांची चिकित्सा करण्यासाठी उपयुक्तता हा एकमेव निकष लावला पाहिजे.

२) महत्तमांचे महत्तम सुख (Greatest happiness of the greatest numbers) हे एक उदारमतवादी तत्त्व आहे. वेगवेगळ्या व्यक्तींच्या सुखाची एकत्रित बेरीज त्यात अभिप्रेत आहे. ज्या गोष्टींमुळे जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख साधले जाईल अशाच गोष्टी राज्यसंस्थेने करणे उपयुक्ततावादी विचारसरणीच्या लोकांना अपेक्षित असते. राज्यसंस्थेच्या निर्णयांचे आणि कृत्यांचे मूल्यमापन याच तत्वाच्या आधारे केले पाहिजे, असे उपयुक्ततावादी लोकांचे म्हणणे होते.

जेम्स मिल्लच्या माध्यमातून इंग्लंडमधील उपयुक्ततावादी विचारसरणीचे लोक भारतीय परिस्थितीशी जोडलेले होते. जेम्स मिल्लनेच भारताबद्दल उपयुक्ततावादी विचारांना चालना दिली. त्याचे लक्ष भारताकडे वळले तेव्हा त्यांनी "The History of British India" हा भारताचा इतिहास लिहिण्यास घेतला. जेम्स मिल्लने अखिल भारताचा हा पहिला इतिहास इ.स. १८१७ मध्ये प्रसिद्ध केला. हा इतिहास लिहीत असतांना मिल्ल ब्रिटनमधील उपयुक्ततावादी चळवळीमध्ये सहभागी झाले होते. त्यांनी जेरेमी बेंथॅम या विचारवंताने मांडलेल्या विचारांचा अभ्यास केला होता. बेन्थमचे कायदा आणि राजकारणासंबंधितचे सिद्धांत त्यांनी पूर्णपणे अवगत केले होते. या सिद्धांतांचा वापर त्यांनी शिक्षण सुधार, खुल्या व्यापाराचे धोरण, कायदा पद्धतीचे आधुनिकीकरण आणि संसदेमध्ये सुधारणा करण्यासाठी चळवळी उभा करण्यामध्ये केला होता. जेम्स मिल्लच्या मार्गदर्शनाखाली उपयुक्ततावादी विचारसरणी असलेल्या कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण झाली. या कार्यकर्त्यांनी समाजातील सदोष संस्था आणि सामाजिक चालीरीतींना विरोध केला. याबरोबरच मिल्ल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भारतामध्ये उपयुक्ततावादी विचारसरणीवर आधारलेले सुधारणा करून भारताचे रूप पालटण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

इ.स १८१९ साली भारताचा इतिहास प्रसिद्ध केल्यानंतर जेम्स मिल्लची नेमणूक ईस्ट इंडिया कंपनीच्या ऑफिस मध्ये 'पत्रव्यवहार परीक्षक' (examiner of correspondence) यापदावर झाली. त्यांनी लिहिलेल्या इतिहासामुळे त्यांना भारत देशावर तज्ञ समजले जाऊ लागले होते. त्यांची एक व्यावहारिक सुधारणावादी म्हणून देखील ओळख होती. 'पत्रव्यवहार परीक्षक' या पदावर जेम्स मिल्लने १८१९ ते १९३६

पर्यंत कार्य केले. १९३६ साली त्यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांने पद प्रमुख 'पत्रव्यवहार परीक्षक' हे होते. जेम्स मिल्ल यांनी या नोकरीचे स्वागत केले कारण या पदाच्या माध्यमातून त्यांना भारतामध्ये सुधारणा करण्याची संधी मिळाली होती. आपल्या पदाचा वापर करून जेम्स मिल्ल यांनी भारतीय प्रशासनामध्ये उपयुक्ततावादी विचारांचा शिरकाव केला.

जेम्स मिल्ल यांचा इतिहास म्हणजे भारतीय समाजाचे त्यांनी केलेले तात्विक विश्लेषण होते. ''सभ्यतेच्या श्रेणी (Scale of Civilization) ही संकल्पना वापरून त्यांनी भारताचे स्थान ठरवण्याचा प्रयत्न मिल्लने केला होता. मिल्लने 'सभ्यतेच्या श्रेणीची संकल्पनेचा वापर हिंदू आणि मुस्लिम सभ्यतांचे मूल्यमापन करण्यासाठी केला होता. ही संकल्पना म्हणजे 'रानटीपणा ते आधुनिक सभ्यते' पर्यंत जाणारी एका शिडीच्या संकल्पनेवर आधारलेली होती. खालच्या स्तरावर रानटी स्थितीत असलेल्या सभ्यता होत्या तर सर्वात वर आधुनिक ज्ञान असलेल्या सभ्यता होत्या. मिल्लने विकसित केलेल्या सभ्यतेच्या श्रेणीच्या कल्पनेच्या चौकटीत भारत अतिशय खालच्या स्तरावर होता. मिल्लने आपल्या ग्रंथाचा बहुतेक भाग भारतीय सभ्यतेचे मागासलेपणा दाखवण्यासाठी वापरलेला होता.

भारताला सभ्यतेच्या श्रेणीमधील खालच्या स्तरावरून वरच्या स्थरावर आणणे हे उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रमुख हेतू होता. त्यासाठी ते कायदा आणि शासनाची शक्ती वापरणार होते. उपयुक्ततावादी विचारसरणीमध्ये मानव हा संवेदना, सुख आणि वेदनांच्या आधीन होता. त्याला आनंद मिळवण्यात अपयश त्याच्या अज्ञान किंवा चुकांमुळे येत असे. त्याचा कल अधिक चिरस्थायी सुख मिळवण्यापेक्षा क्षणिक सुख मिळवण्याकडे असतो. त्याला ज्ञान दिले तर त्याला आपली खरी परिस्थिती समजेल आणि तो योग्य प्रकारे आपले हित साकारू शकेल. मात्र जो पर्यंत लोक पूर्णपणे शिक्षित होत नाहीत तो पर्यंत त्यांना क्षणिक सुख सोडून देण्यासाठी शासन करणे आवश्यक ठरते. त्यांना एका कडक शिक्षकाची गरज असते. शिक्षा देऊन आणि कायद्याचा उपयोग करून लोकांना त्यांना नुकसान पोहोचवणाऱ्या कृत्यांपासून दूर ठेवणे गरजेचे असते. उपयुक्ततावादी विचारवंतांच्या मते, मानवी चारित्र्यावर सर्वात जास्त प्रभाव हा शासन आणि कायदा या गोष्टींचा पडत असतो.

मिल्लच्या मते जर भारतामधील शासन पद्धती, कायद्यांचे स्वरूप आणि कर प्रणालीमध्ये सुधार केला गेला तर भारतीय समाज सभ्यतेच्या श्रेणीमध्ये झपाट्याने वरच्या स्तरावर जाईल. इतर सर्व बदल व सुधारणा दुय्यम होत्या आणि तुलनेने कमी महत्त्वाच्या होत्या. एकंदरीतच, उपयुक्ततावादी विचारसरणीचे लोक ब्रिटिश कायद्यांच्या माध्यमातून सुधारणा घडवून आणण्याच्या बाजूचे होते.

मिल्लने लिहिलेला भारताचा इतिहास हा लंडन जवळ स्थित असलेल्या हैलीबुरी कॉलेज मध्ये वापरलेला क्रमिक ग्रंथ होता. या कॉलेजमध्ये भारतात येणाऱ्या मुलकी सेवेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात असे. साहजिकच मिल्लच्या ग्रंथातील उपयुक्ततावादी विचारांचा प्रभाव भारतात येणाऱ्या तरुण ब्रिटिश अधिकाऱ्यांवर निर्माण झाला. त्यामुळे ब्रिटिश प्रशासनामध्ये जेरेमी बेन्थमचे तत्वज्ञान प्रभावशाली बनले. उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रभाव भारताचा गव्हर्नर जनरल असलेला लॉर्ड विलियम बेंटिंक यांच्यावर होता. त्यांनी इ.स.

१८२८ मध्ये भारताच्या गव्हर्नर जनरल पदाचा कार्यभार सांभाळला होता. असे म्हटले जाते की, भारतात येण्यापूर्वी बेंटिंक यांनी जेरेमी बेंथॅम यांची भेट घेतली होती. या भेटी दरम्यान ते बेन्थमला म्हणाले होते की, ''मी ब्रिटिश भारतात चाललो आहे पण मी गव्हर्नर जनरल नसणार आहे, तुम्ही गव्हर्नर जनरल असणार आहात'' (I am going to British India, but I shall not be Governor- General. It is you that will be Governor-General"). बेंटिंक जेव्हा भारतात आले तेव्हा उपयुक्ततावादी विचारसरणी असलेल्या अधिकाऱ्यांचा ब्रिटिश प्रशासनामध्ये वरचष्मा होता. प्राच्यविद्यावादी विचारसरणी आणि ख्रिस्ती धर्मप्रसार विचारसरणीचा प्रभाव घटला होता. उपयुक्ततावादी भूमिका ही १८३० आणि १८४० च्या दशकात ब्रिटिशांनी हाती घेलेल्या सुधारणांचा पाया बनली. दख्खनमध्ये प्रिंगल नावाच्या अधिकाऱ्याने ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकार्डो यांचा खंडाचा सिद्धांत (rent theory) वापरून शेतसारा आकारणी केली. एल्फिन्स्टनच्या नेतृत्त्वाखाली एक नवीन न्याय व कायदा प्रणाली महाराष्ट्रात अस्तित्वात आली. लॉर्ड मॅकॉले यांनी गुन्हेगारी आणि मुलकी कायद्यांचे संकलन करण्याचे मोठे काम हाती घेतले. १८३५ साली ब्रिटिशांची तत्कालीन राजधानी कलकत्ता येथे ब्रिटिश सरकारने शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषा करण्याचा निर्णय घेतला. या सर्व सुधारणांवर उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रभाव होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न:-३**

अ) योग्य पर्याय निवडा:

१) ''महत्तमांचे महत्तम सुख'' हे तत्त्व ........... यांनी स्वीकारले होते.

अ) प्राच्यविद्यावादी  ब) ख्रिस्ती धर्मप्रसारवादी

क) उपयुक्ततावादी  ड) सुधारणावादी

२) अखिल भारताचा पहिला इतिहास ............. यांने लिहिला.

अ) हॉब्ज  ब) लॉक  क) डेविड ह्यूम  ड) जेम्स मिल्ल

३) ''सभ्यतेच्या श्रेणी (scale of civilization) ही संकल्पना ............ याने मांडली.

अ) हॉब्ज  ब) लॉक  क) डेविड ह्यूम  ड) जेम्स मिल्ल

४) हैलीबुरी कॉलेज ................ जवळ स्थित होते.

अ) कलकत्ता  ब) श्रीरामपूर  क) लंडन  ड) मँचेस्टर

५) लॉर्ड विलियम बेंटिंक हे ................. यांचे अनुयायी होते.

अ) जेम्स मिल्ल  ब) जेरेमी बेन्थम  क) रिकार्डो  ड) चार्ल्स ग्रॅन्ट

### ४.२.४ भारतीय सभ्यता सुधारण्याचे विचार: 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' आणि दैवी देणगी (Whiteman's burden and Divine providence)

'व्हाईट मॅन्स् बर्डन' किंवा 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' ही संकल्पना वसाहतवादाच्या काळात भारतातील ब्रिटिश लोकांमध्ये प्रचलित होती. भारतातील श्वेत राजकर्त्यांमध्ये अशी भावना होती की, एतद्देशीय प्रजेला सुसंस्कृत करण्याची व त्यांचे उत्थान करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. या संकल्पाने वापर करून ब्रिटिशांनी आपल्या वसाहतवादी आणि साम्राज्यवादी धोरण आणि कृत्यांचे समर्थन केले. त्यांनी भारतीय लोकांना मदत करण्याच्या बहाणा करून त्यांच्यावर ब्रिटिश संस्कृती, धर्म आणि शासन लादण्याचा प्रयत्न केला.

१८९९ साली प्रसिद्ध ब्रिटिश कवी रुडयार्ड किपलिंग याने 'White man's burden' नावाची कविता लिहिली होती. ह्या कवितेत त्याने श्वेत वर्णीय ब्रिटिश लोकांची जगातील 'कमी' असलेल्या लोकांना दिशा देण्याचे काम कसे केले पाहिजे हे सांगितले होते. किपलिंगच्या मते, अशा प्रकारच्या कामामुळे त्यांचे शोषण, संस्कृती ऱ्हास किंवा अधीनता झाली तरी हरकत नाही, पण त्यांना श्वेत वर्णीयांकडून योग्य दिशा मिळणे आवश्यक होते.

आपल्या प्रजेच्या प्रति राजकर्त्यांच्या आश्रय देण्याच्या वृत्तीला 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' या संकल्पनेच्या अंतर्गत पकडले जाते. या संकल्पनेचा वापर वसाहतवाद व साम्राज्यवादाचे समर्थन करण्यासाठी केला गेल्यामुळे त्याच्यावर टीका केली जाऊ लागली.

भारतामधील ब्रिटिश लोकांमध्ये प्रचलित असलेल्या 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' या संकल्पनेचे खालील घटक होते:

१) ब्रिटिशांचा दावा होता कि ते एका मागासलेल्या आणि रानटी प्रजेला सभ्य आणि प्रगत बनवायचा प्रयत्न करीत होते.

२) एतद्देशीय भारतीय लोकांचे आधुनिकीकरण करणे आपली नैतिक जबाबदारी आहे, असे ब्रिटिशांना वाटत असे.

३) ब्रिटिशांना एतद्देशीय भारतीय लोकांपेक्षा आपण खूप श्रेष्ठ आहोत आणि म्हणून त्यांना मदत करणे आपले कर्तव्य आहे, असे वाटत असे.

४) 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' संकल्पनेचा वापर करून ब्रिटिशांनी आपल्या राजवटीचे समर्थन केले

५) 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' संकल्पनेचा युरोपियन लोकांच्या मानसिकतेवर खूप परिणाम झाला. ते स्वतःला श्रेष्ठ व भारतीय लोकांना कनिष्ठ समजू लागले. त्यामुळे ब्रिटिश राजकर्त्यांच्या आणि त्यांच्या प्रजेच्या संबंधांवर दूरगामी परिणाम झाला.

'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' या संकल्पनेचे काही खास वैशिष्ट्ये होते:

**१) पितृत्वाची भावना:** 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' या संकल्पनेमुळे भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांमध्ये भारतीय लोकांच्या संदर्भात पितृत्वाची भावना अस्तित्वात आली होती. ज्याप्रमाणे पालक आपल्या पाल्याची काळजी घेतो, त्याला दिशा देतो त्याचप्रमाणे ब्रिटिश भारतीय लोकांवर संस्कार करणे आपले कर्तव्य समजत असत.

**२) संस्कृतीकरणाची मोहीम:** भारतीय लोक हे असंस्कृत व रानटी अवस्थेत होते, अशी ब्रिटिशांची समजूत होती. पाश्चिमात्य सभ्यता, संस्कृती, धर्म आणि शासन भारतीयांना दिल्याशिवाय ते सुसंस्कृत होणार नाहीत असे त्यांना वाटत होते.

**३) सांस्कृतिक एकत्रीकरण:** युरोपियन संस्कृती आणि राहणीमानाच्या परंपरांचा भारतीय लोकांच्यात प्रसार केल्या शिवाय त्यांच्या भाषा, रीतिरिवाज आणि परंपरा बदलणार नाही, अशी भावना ब्रिटिश राजकर्त्यांमध्ये प्रचलित होती.

**४) आर्थिक शोषण:** भारतीय लोकांचे भले करण्याचा मुखवटा घेऊन ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण केले. भारतातील साधन सामग्रीचा उपयोग केला. भारतीय कामगारांचे श्रम वापरले. फायदा मात्र ब्रिटनचा झाला.

**५) वंशवादी उतरंड:** 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' संकल्पनेमुळे एक वंशवादी उतरंड तयार झाली. या उतरंडीमध्ये सर्वात वरच्या स्तरावर श्वेतवर्णीय लोक होते. एतद्देशीय लोक मात्र खालच्या स्तरावर होते. या उतरंडीचा उपयोग करून ब्रिटिशांनी देशी लोकांवर वंशवाद लादला आणि आपल्या श्रेष्ठत्वाचे समर्थन केले.

**६) यूरोपकेंद्रित भूमिका:** 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' संकल्पनेमुळे युरोपीय श्रद्धा, मूल्य, पद्धती आणि परंपरा ह्या सर्वश्रेष्ठ आणि सार्वत्रिक स्वरूपाच्या होत्या, अशा प्रकारचा समज निर्माण झाला.

**७) साम्राज्यवादाचे समर्थन:** 'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' संकल्पनेचा उपयोग करून ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यवादी भूमिकेचे समर्थन केले. भारतामध्ये ब्रिटिशांनी केलेला प्रदेश विस्तार याच संकल्पनेचा आधार घेऊन केला होता. एकंदरीतच या संकल्पनेने ब्रिटिशांना आपल्या विस्तारवादी धोरणाचे औचित्य सांगण्याची संधी दिली.

**८) स्थानिक ज्ञानाकडे दुर्लक्ष:** या संकल्पनेच्या प्रभावामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील स्थानिक संस्कृतींच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष केले. स्थानिक प्रश्नाची उत्तरे स्थानिक माहिती आणि ज्ञानामध्ये मिळण्याची शक्यता जास्त होती. मात्र या संकल्पनेच्या प्रभावामुळे ब्रिटिश राज्यकर्ते या स्थानिक ज्ञानापासून दूर राहिले.

### Divine Providence (ईश्वरी वरदान)

'श्वेत वर्णीय व्यक्तीचे ओझे' ही संकल्पना भारतातील श्वेत वर्णीय ब्रिटिश लोकांमध्ये प्रचलित होती. ईश्वरी वरदान ही संकल्पना मात्र अनेक एतद्देशीय लोकांनी देखील स्वीकारली होती. ब्रिटिशांची भारतातील

राजवट संदर्भात 'ईश्वरी वरदान', दैवी देणगी, ईश्वरी प्रसाद, ईश्वरी संकेत, ईश्वरी योजना आणि ईश्वरी व्यवस्था इत्यादी शब्द १९व्या शतकातील भारतीय लोकांच्या भाषणांमधून किंवा लेखांमधून व्यक्त होताना आढळतात. याचा अर्थ असा होता की, ''इंग्लंडशी आलेला संबंध हा भारताच्या भल्यासाठी जुळून आलेला एक गूढ ईश्वरी संकेत आहे''. या संकल्पनेवर अनेक भारतीय समाज सुधारकांचा ठाम विश्वास होता. त्यांना असे वाटत होते की, भारताला प्रगतीचा पथावर नेण्यासाठी ईश्वराने इंग्रजी राजवट निर्माण केली आहे. भारतीय नेत्यांवर या संकल्पनेचा खूप प्रभाव जाणवतो. गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाच्या घटनेच्या प्रास्ताविकातच या संकल्पनेचा समावेश केला होता.

परमेश्वराने भारतामध्ये ब्रिटिश राजवटीची स्थापना भारताला तिच्या दयनीय स्थिती मधून बाहेर काढण्यासाठी केली होती, असा १९व्या शतकातील अनेक लोकांचा बाळबोध समज झाला होता. मात्र येथे आपल्याला एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आधुनिक भारताचे ख्यातनाम इतिहासकार जे. व्ही. नाईक यांनी लिहिल्याप्रमाणे ईश्वरी वरदानाच्या कल्पना मांडणाऱ्या विचारवंतांनी त्यांना ब्रिटिश सत्ता हवी आहे, असे कधीच म्हटले नव्हते किंवा त्यांना ती चिरकाळ टिकावी असे देखील वाटत नव्हते. त्यांची ही इच्छा होती की, भारतात राजवट स्थापन केलेल्या ब्रिटिशांनी राज्यकारभार विश्वस्ताच्या भूमिकेतून केला पाहिजे. ब्रिटिश राजवटीमध्ये एक नवीन जीवनाची, नवीन समाजाची सुरुवात होईल, अशी आशा त्यांना वाटत होती. इ.स. १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने युरोपात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांचा प्रसार झाला होता. युरोपमध्ये १८ व्या शतकात प्रबोधनाच्या चळवळीचा परीणाम म्हणून लोकशाही तत्वे, धर्मनिरपेक्षता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन रुजण्यास सुरुवात झाली होती. युरोप मध्ये आधुनिकता येण्यास या सर्व गोष्टी कारणीभूत होत्या. भारतात ब्रिटिशांच्या माध्यमातून यासर्व गोष्टी येतील असे ह्या विचारवंतांना वाटत होते. स्वतः होऊन ही सुधारणा साध्य करण्यास भारत समर्थ नसल्याने ईश्वराने सुधारणावादी इंग्रजांची योजना केली. अशा अर्थाने 'ईश्वरी वरदानाची' संकल्पना भारतीयांमध्ये प्रचलित होती.

इतिहासकार जे. व्ही नाईक यांच्या मते, इंग्रजी राज्य म्हणजे 'ईश्वरी वरदान' हा शब्दप्रयोग प्रथम कोणी वापरला हे निश्चित सांगणे कठीण आहे. पण राजा राममोहन रॉय यांनी ह्या संकल्पनेचा वापर केल्याचे दाखले मिळतात. जे. व्ही. नाईक लिहितात, ''राजा राममोहन रॉय यांच्या 'संवादकौमुदी' या बंगाली साप्ताहिकाच्या ११ डिसेंबर १८२१ च्या अंकात ''भारतात ज्युरींमार्फत न्यायनिवाडा या विषयासंबंधी'' या मथळ्याचा एक लेख होता. इतर अनेक मुद्यांच्या जोडीला त्यात असे म्हटले होते पूर्वीच्या (मुघल राजवटीतली न्यायव्यवस्था) असह्य त्रास आणि दडपशाही यातून ईश्वरी कृपेमुळे आपली आता सुटका झाली आहे. आता आपल्यावर सौम्य प्रकारच्या व समानतेचे तत्त्व अनुसरणाऱ्या इंग्लंडची सत्ता आहे. या सत्तेच्या स्थापनेपासून आपण कोणत्याही अडथळ्याशिवाय सर्व प्रकारचा आनंद उपभोगू शकतो, कारण व्यक्तीचे जीवित व वित्त यांचे पूर्ण संरक्षण आपल्याला आता मिळू शकते. 'मिरात-उल-अखबार' (वृत्तदर्पण) या एप्रिल १८२२ मध्ये राम मोहन यांनी सुरू केलेल्या फारसी साप्ताहिकातल्या माहितीपत्रकातही हीच विचारधारा त्यांनी समाविष्ट केलेली आढळते.'' याशिवाय गव्हर्नर म्हणून पदभार सांभाळणाऱ्या ॲडम्स याने १८२३

मध्ये जारी केलेल्या वृत्तपत्रविषयक वटहुकुमाविरुद्ध इंग्लंडच्या बादशहाला सादर केलेल्या आपल्या विनंती अर्जात राममोहन रॉय आणि पाच अन्य बंगाली विचारवंतांनी 'ईश्वरी वरदान' या कल्पनेचा अधिक स्पष्ट उल्लेख केला आहे. त्यामध्ये खालील मजकूर आढळतो : 'ईश्वरेच्छेने इंग्लंडच्या अत्युच्च प्रमुखाच्या सार्वभौम स्वामित्वाखाली ज्यांची काळजी घेतली जात आहे व ज्यांना सुरक्षितता लाभली आहे, असे आम्ही आपले प्रजानन भारतीय व कलकत्तावासीजन आमचे आयुष्याचे, संपत्तीचे, धर्माचे पालक म्हणून आपल्याकडे पाहत आहोत. ईश्वरी वरदानाच्या असीम कृपेमुळे सरतेशेवटी आमच्यावरील जुलमी मुस्लिम सत्तेचा शेवट करण्यास व आम्हा बंगालच्या जनतेला आपल्या कृपाछत्राखाली घेण्यास इंग्लंडला उद्युक्त केले. त्यामुळे आम्ही कर्तव्यदक्ष प्रजानन इंग्लंडकडे केवळ एक विजेते म्हणून पाहत नसून, आमची सुटका करणारे राष्ट्र म्हणून पाहतो आणि महाराज, आपल्याकडे आम्ही केवळ एक शासक म्हणून पाहत नाही तर आमचा पिता व संरक्षक म्हणूनही पाहतो.''

'ईश्वरी वरदानाची कल्पना केवळ बंगालमधीलच नव्हे तर सबंध भारतातील लोकांच्या श्रद्धास्थानी राहिली. राष्ट्रीय सभेच्या मवाळ कालखंडातील अध्यक्षीय भाषणांमध्ये याचा सबळ पुरावा मिळतो. ब्रिटिश सत्ता ही ईश्वरी वरदान आहे, असा उच्चार प्रथमतः मुंबई इलाख्यातील स्थानिक नेत्यांनी माऊंट स्ट्यूअर्ट एल्फिन्स्टनला धाडलेल्या एका सार्वजनिक मानपत्रात केलेला आढळतो. १८२७ साली तो इंग्लंडला निघून गेला त्यावेळी दिलेले ते मानपत्र होते. नैतिक आणि भौतिक सुधारणा घडवून आणण्यात त्याने केलेल्या कार्याचे गुणगान करताना या नेत्यांनी म्हटले, ''ब्रिटिश सत्तेचा प्रभाव हा जगन्नियंत्याने आम्हाला देऊ केलेला एक इष्ट असा आशीर्वाद आहे. असे आमचे मत झाले आहे'''

इतिहासकार जे. व्ही. नाईक यांच्या मते, ईश्वरी प्रसादाचे तत्त्व महाराष्ट्रात सर्वप्रथम लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी पुरस्कारले. १८४८ ते १८५० च्या दरम्यान प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'शतपत्रा'मधील चार पात्रांत ब्रिटिश सत्तेमुळे प्राप्त झालेल्या फायद्याची चर्चा केलेली आहे. याच पत्रात त्यांनी ब्रिटिश सत्ता म्हणजे ईश्वरी वरदान आहे, असे प्रतिपादन केले आहे. एका पत्रात ते लिहितात, 'इंग्रज लोक यांनी इकडे राज्य संपादन केले, याचे कारण काय? याचा विचार करिता दिसते की, 'हिंदू लोकांमध्ये मूर्खपण वाढला तो दूर होण्याकरिताच हे गुरू दूर देशातून इकडे ईश्वराने पाठवले आहेत... ईश्वराने ही शहाणपणाची योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा इलाज नव्हता. सती जाणे, जलसमाधी घेणे, पोरे मारणे इत्यादी अघोरी आणि लज्जास्पद चालींमुळे ईश्वराचा प्रक्षोभ अत्यंत जाहला. तेव्हा दुष्ट लोकांस ताळ्यावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली.' (पत्र क्र. ४६, शतपत्रे पृ. ३१७)

जोतिबा फुले यांच्या लेखनात देखील आपल्याला 'ईश्वरी वरदान' ही संकल्पना आढळते. पण जे. व्ही. नाईक यांनी मांडल्या प्रमाणे ''फुल्यांच्या लेखनात आलेले स्पष्टीकरण अगदी व्यवहारी व समाजशास्त्रदृष्ट्या सहज पटेल अशा स्वरूपाचे आहे. 'गुलामगिरी', 'इशारा' आणि 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा' (प्रस्तावना) या त्यांच्या ग्रंथांत ईश्वरी प्रसादाची कल्पना अगदी ठळकपणे व मर्मज्ञपणे मांडण्यात आली आहे. इंग्रजांच्या 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेत अनुस्यूत असलेली कायद्यापुढील समानता व त्याचाच उपसिद्धांत ठरणारी मानवी हक्कांची हमी यामध्ये भारतातील लाखो दलितांना स्वमुक्तीच्या आशेचा

किरण दिसला. फुले त्याच दलितांची बाजू कळकळीने मांडत होते. त्यामुळे ईश्वरी वरदानाच्या कल्पनेकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन केवळ राष्ट्रवादी स्वरूपाचा नसून मानवतावादी होता. शूद्र व अतिशूद्र शेकडो वर्षे सामाजिक अनावस्थेत राहिले. पूर्वेतिहास हा जर काही निदर्शक असेल तर ब्राह्मणी समाजरचनेत सामाजिक न्याय मिळेल, असे समजण्यास कोणताच आधार नव्हता. सामाजिक गुलामगिरी कपाळी आलेल्यांना ब्रिटिश सत्तेमुळे आशेचा एक किरण दिसू लागला. ब्रिटिश सत्तेची योजना करून दलितांना ब्राह्मणांच्या वर्चस्वातून सुटका करण्याबद्दल फुल्यांनी ईश्वराचे आभार मानले हे स्वाभाविकच होते''.

जरी ईश्वरी वरदान संकल्पनेचा काही बुद्धिवंतांनी स्वीकार केला असला तरी ब्रिटिश राजवटीचा वाईट अनुभव येऊ लागल्यावर काही विचारवंतांनी ब्रिटिश राजवटीवर टीका करण्यास सुरुवात केली. १८३५ मध्ये चार्ल्स मेटकाफ याने काही काळ वृत्तपत्र स्वातंत्र्य भारतीयांना दिले होते. ह्या संधी फायदा घेऊन या टीकाकारांनी ब्रिटिश राजवटीच्या वाईट परिणामांची चर्चा वृत्तपत्रातून केली. त्यांनी अशी भूमिका घेतली की, ब्रिटिश राजवट हे ईश्वरी वरदान नसून भारताला दिलेला एक घोर शाप आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या लेखनात 'शापाच्या' कल्पनेचा विस्ताराने परामर्श घेतला गेला. पुढील काळात महाराष्ट्रात उदयास आलेल्या जहालमतवादाच्या जडणघडणीत 'शाप' या कल्पनेचा महत्त्वाचा वाटा होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न:-४**

अ) योग्य पर्याय निवडा:

१) 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे'' ही संकल्पना ........... लोकांच्यामध्ये प्रचलित होती

अ) बंगाली ब) मराठा क) राजपूत ड) ब्रिटिश

२) ............. याच्या कवितेमध्ये 'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' ही संकल्पना व्यक्त झाली आहे.

अ) रॉबर्ट ब्राउनिंग ब) विल्यम ब्लेक क) लॉर्ड बायरन ड) रुडयार्ड किपलिंग

३) ईश्वरी वरदान ही संकल्पना ................ यांच्यात प्रचलित होती.

अ) भारतीय ब) ब्रिटिश अधिकारी

क) ब्रिटिश सामान्य लोक ड) ब्रिटिश स्त्रिया

४) राजा राममोहन रॉय यांनी ............. संकल्पनेचा वापर केला.

अ) प्राच्यविद्यावादी ब) ईश्वरी वरदान

क) ख्रिस्ती धर्मप्रसारवादी ड) उपयुक्ततावादी

५) ईश्वरी प्रसादाचे तत्त्व महाराष्ट्रात सर्वप्रथम ............. यांनी पुरस्कारले.

अ) लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख ब) महात्मा जोतिबा फुले

क) रानडे ड) गोपाळकृष्ण गोखले

## ४.३ पारिभाषिक शब्द/ शब्दार्थ

**प्राच्यविद्यावादी विचारसरणी:** ब्रिटीशांना कल्पना होती की, भारतासारख्या देशामध्ये कार्यक्षम प्रशासन हे 'भारतीय समाज आणि संस्कृतीला' समजून घेतल्यावरच करता येईल. त्यामुळे भारतीय भाषा, संस्कृती आणि परंपरांचा अभ्यास करणे आवश्यक होते. त्यांना भारतावर अंमल करायचा होता, मात्र सुधारणा करायच्या नव्हत्या.

**ख्रिस्ती धर्मप्रसारवाद/शुभवर्तमानवादी:** या विचारसरणीचे ब्रिटिश लोक असे मानत असत की भारतामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून सुधारणा करणे आवश्यक होते.

**उपयुक्ततावादी विचारसरणी:** या विचारसरणीचे ब्रिटिश लोक हे भारतामध्ये आधुनिक शिक्षण आणि ब्रिटिश कायद्यांच्या माध्यमातून सुधारणा घडवून आणण्याच्या बाजूचे होते.

**'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे:** काही ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीय लोकांची सुधारणा करणे ही आपली नैतिक जबाबदारी वाटत असे.

**ईश्वरी वरदान:** इंग्लंडशी आलेला संबंध हा भारताच्या भल्यासाठी जुळून आलेला एक गूढ ईश्वरी संकेत आहे, अशी काही एतद्देशीय लोकांनी संकल्पना होती.

## ४.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांचीउत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न:-१

अ) योग्य पर्याय निवडा

१) ब २) ब ३) ब ४) अ ५) अ

स्वयं अध्ययन प्रश्न:-२

अ) योग्य पर्याय निवडा

१) ब २) ब ३) क ४) ब ५) अ

स्वयं अध्ययन प्रश्न:-३

अ) योग्य पर्याय निवडा:

१) क २) ड ३) ड ४) क ५) ब

स्वयं अध्ययन प्रश्न:-४

अ) योग्य पर्याय निवडा:

१) ड २) ड ३) अ ४) ब ५) अ

## ४.५ सारांश

ब्रिटिशांनी भारतात राजकीय सत्ता स्थापन केल्यानंतर, त्यांना भारतीय भाषा, संस्कृती आणि इतिहासाची चांगली समज असणे आवश्यक होते. यासाठी, त्यांनी प्राच्यविद्यावादी धोरण अवलंबले. या धोरणानुसार, भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आणि प्रचार करण्यासाठी अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. या संस्थांमध्ये भारतीय ग्रंथांची भाषांतरे करण्यात आली, तसेच भारतीय संस्कृती आणि इतिहासावर संशोधन करण्यात आले. प्राच्यविद्यावादी धोरणाचा एक मुख्य उद्देश ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीय संस्कृती समजून घेण्यास मदत करणे हा होता. यामुळे, त्यांना भारतीय लोकांशी अधिक चांगले संबंध निर्माण करता येतील आणि अधिक कार्यक्षम प्रशासन करता येईल असे ब्रिटिशांना वाटत होते. प्राच्यविद्यावादी धोरणाचा आणखी एक उद्देश भारतीय संस्कृती आणि इतिहासाची ओळख पाश्चात्य जगाला करून देणे हा होता. यामुळे, भारतीय संस्कृतीचे महत्त्व जगभरात जाणून घेतले जाईल अशी ब्रिटिशांना आशा होती. प्राच्यविद्यावादी धोरण ब्रिटिशांच्या भारतातील राजवटीवर लक्षणीय प्रभाव पाडले. या धोरणामुळे ब्रिटिशांना भारतीय संस्कृती आणि इतिहासाबद्दल अधिक जाणून घेण्यास मदत झाली. यामुळे, त्यांना भारतीय लोकांशी अधिक चांगले संबंध निर्माण करता आले आणि भारतावर अधिक कार्यक्षमपणे राज्य करता आले. थोडक्यात, ब्रिटिशांनी भारतात प्राच्यविद्यावादी धोरण अवलंबून भारतीय संस्कृतीचा अभ्यास आणि प्रचार केला.

प्राच्यविद्यावादी धोरणाला काहीच वर्षांमध्ये विरोध होऊ लागला. १७९० च्या दशकात भारतीय कायदा, भाषा, धर्म आणि रीतिरिवाज यांचा अभ्यास करणे व त्यांना जतन करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या भूमिकेला आव्हान निर्माण झाले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकारी मंडळावर प्रभाव असलेले चार्ल्स ग्रॅन्ट यांच्या कडून या आव्हानाला सुरूवात झाली. ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या ब्रिटिश नेत्यांनी भारतामध्ये 'ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून धर्माच्या आधारे सुधारणा' घडवून आणायची होती. त्यांच्या मते, भारतीय समाज ऱ्हासाकडे झुकला होता कारण ते खोट्या देवदेवतांची आणि कोरलेल्या मूर्ती यांची पूजा अर्चा करीत होते. त्यांना विश्वास होता की, भारतीय लोकांची निकृष्ट नैतिकता आणि रितीरिवाजांना सुधारण्यासाठी ख्रिस्ती धर्माचा आधार घेणे आवश्यक होते..ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या ब्रिटिश नेत्यांनी ''एकीकरणाच्या सिद्धांताचा'' पुरस्कार केला. १८१३ साली ब्रिटिश संसदेत ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी कराराच्या नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या गोष्टीचा फायदा घेऊन ख्रिस्ती धर्मप्रसारवादी विचारसरणीच्या नेत्यांनी इंग्लंड मध्ये आपले विचार अमलात आणण्यासाठी एक लोकचळवळ सुरू केली. आपल्या दबावाचा उपयोग करून त्यांना काही गोष्टी मिळवण्यामध्ये यश आले. भारतामध्ये ख्रिस्ती चर्चची स्थापना करण्यात आली. ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात धर्म प्रसार करण्याला परवानगी देण्यात आली. याशिवाय भारतातील लोकांच्या शिक्षणासाठी कंपनीने एक ठराविक वार्षिक रक्कम खर्च करण्यास मंजुरी दिली. थोडक्यात, ख्रिस्ती धर्मप्रसार वाद्यांनी भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून धर्माच्या आधारे सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

ब्रिटिश विचारवंत जेरेमी बेन्थम यांनी उपयुक्ततावादाची व्यवस्थशीर मांडणी केली. यानुसार, आनंद वाढवणारी आणि वेदना कमी करणारी कोणतीही गोष्ट उपयुक्त असते. राज्यसंस्थेच्या कृत्यांची चिकित्सा करण्यासाठी उपयुक्तता हा एकमेव निकष लावला पाहिजे. उपयुक्ततावादाची दोन अतिशय महत्वाची मूलतत्त्वे खालील प्रमाणे होती:

१) आनंद वाढविणारी आणि वेदना कमी करणारी कोणतीही गोष्ट 'उपयुक्त' असते.

२) महत्तमांचे महत्तम सुख (Greatest happiness of the greatest numbers)

इंग्लंडमधील विचारवंत जेम्स मिल्ल यांच्या माध्यमातून भारतात उपयुक्ततावाद पोहोचला. मिल्लने भारताचा इतिहास लिहिला, ज्यामध्ये त्यांनी भारतीय समाजाचे तात्विक विश्लेषण केले. त्यांनी 'सभ्यतेच्या श्रेणी' ही संकल्पना वापरून भारतीय समाजाचे मूल्यांकन केले. मिल्लच्या मते जर भारतामधील शासन पद्धती, कायद्यांचे स्वरूप आणि कर प्रणालीमध्ये सुधार केला गेला तर भारतीय समाज सभ्यतेच्या श्रेणीमध्ये झपाट्याने वरच्या स्तरावर जाईल.

मिल्लच्या ग्रंथातील उपयुक्ततावादी विचारांचा प्रभाव भारतात येणाऱ्या तरुण ब्रिटिश अधिकाऱ्यांवर निर्माण झाला. त्यामुळे ब्रिटिश प्रशासनामध्ये उपयुक्ततावाद प्रभावशाली बनला. उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रभाव भारताचा गव्हर्नर जनरल असलेला लॉर्ड विलियम बेंटिंक यांच्यावर होता. त्यांनी १८३० आणि १८४० च्या दशकात हाती घेतलेल्या सुधारणांवर उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रभाव होता.

'श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे' ही संकल्पना वसाहतवादाच्या काळात भारतातील ब्रिटिशांमध्ये प्रचलित होती. या संकल्पनेनुसार, श्वेतवर्णीय ब्रिटिश लोकांना इतर, कमी प्रगत असलेल्या लोकांना सुसंस्कृत करण्याची आणि त्यांना प्रगत बनवण्याची जबाबदारी होती. या संकल्पनेचा वापर ब्रिटिशांनी त्यांच्या वसाहतवादी आणि साम्राज्यवादी धोरण आणि कृत्यांचे समर्थन करण्यासाठी केला.श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे ही संकल्पना वसाहतवाद आणि साम्राज्यवादाच्या समर्थनासाठी एक युक्तिवाद होती. या संकल्पनेने ब्रिटिशांना त्यांच्या विस्तारवादी धोरणाचे औचित्य सांगण्याची संधी दिली. तथापि, या संकल्पनेने वंशवाद आणि स्थानिक ज्ञानाकडे दुर्लक्ष यासारख्या नकारात्मक परिणामांना देखील जन्म दिला.

भारतातील काही बुद्धिवंतांनी ब्रिटिश राजवटीला ईश्वरी वरदान मानले. त्यांना वाटत होते की, ब्रिटिशांनी भारताला सभ्य आणि आधुनिक बनवण्यासाठी पाठवले आहे. तथापि, ब्रिटिश राजवटीचा वाईट अनुभव येऊ लागल्यावर काही विचारवंतांनी ब्रिटिश राजवटीवर टीका केली. त्यांनी अशी भूमिका घेतली की, ब्रिटिश राजवट हे भारताला दिलेला शाप आहे.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

१) प्राच्यविद्यावादी विचारसरणीची ठळक वैशिट्ये स्पष्ट करा.

२) ख्रिस्ती धर्मप्रसारवादी / शुभवर्तमानवादी लोकांच्या भूमिकेची चर्चा करा.

३) उपयुक्ततावादाचा भारतावर झालेला परिणाम स्पष्ट करा.

४) ‘श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे’या संकल्पनेचे परीक्षण करा.

५) ईश्वरी वरदान संकल्पनेची चर्चा करा.

## ४.८ संदर्भ ग्रंथ


1) Stokes Eric, The English Utilitarian and India, Oxford University Press, New Delhi, 1959

2) Bearce George, British Attitudes towards India (1784-1858), Oxford University Press, London, 1961

3) Mukherjee S.N. Sir William Jones: A Study in Eighteenth-Century British Attitudes to India, Orient Longman, 1987

4) Viswanathan Gauri, Masks of Conquest: Literary Study and British Rule in India, Oxford University Press, Delhi, 1998

5) Said Edward W. Orientalism, Pantheon Books, New York, 1978

६) नाईक जे. व्ही., महाराष्ट्रातील प्रबोधनाचे अंतरंग, अवनीश पाटील व रणधीर शिंदे (संपादक), शब्द पब्लिकेशन, पुणे, २०२३


❑❑❑